# कृष्ण परमात्मा


5



श्रीपरमानंदस्वामी

" ज्याप्रमाणे सर्व अंगांना शुद्ध रक्ताचा पुरवठा करणाऱ्या खुद्द हृदयालाही कार्यरत रहाण्यासाठी त्या शुद्ध रक्ताची आवश्यकता असतेच आणि त्यासाठी त्या हृदयातीलच शुद्ध रक्त हृदयाला पुरविण्याची व्यवस्था जशी परमेश्वराच्या नियतीत निसर्गानेच करुन ठेवलेली आहे, त्याचप्रमाणे सर्वांना खऱ्या व शुद्ध प्रेमाचा अनुभव देणाऱ्या कृष्णालाही त्या प्रेमाची आवश्यकता होतीच. अशा खऱ्या प्रेमाचा अनुभव त्याला कोणी आणून दिला की नाही? कृष्णाचेच शुद्ध प्रेम घेऊन कोणीतरी तेच प्रेम भक्तिभावाने कृष्णाला अर्पण केले की नाही ? "

कोमल
प्रकाशन



नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून

उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गुज

# कृष्ण परमात्मा

## भाग ५

**श्री.अविनाश मोरेश्वर लिमये**

**एम.एस्सी.**

**उर्फ**

**श्रीपरमानंदस्वामी**

**सर्व हक्क स्वाधीन :**


सौ.अनुपमा अविनाश लिमये
१३, नवलकर बिल्डिंग, न.चिं.केळकर रोड,
दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ०२२ - २४३६ १५१४
मोबाईल : ९९६९८ ७६८५०

ई प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane (w) 400604.
7710980841
https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks
प्रकाशन : 23 जानेवारी २०१८
©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे,



**।।श्री।।**

साहित्यसिन्धोः बहुनि सन्ति

रत्नानि दिव्यानि सुभाषितानि ।

कृष्णस्य हृद्यं गुणगानवाक्यं

सुभाषितं मंगलमेव पुण्यम् ।।

श्रीअवधूतस्वामी

## अर्थ

साहित्यरूपी सिंधुमध्ये

सुभाषितरूपी असंख्य दिव्य रत्ने आहेत.

परंतु

कृष्णाच्या हृदयाचे गुणगान करणारे वाक्य

हेच मंगलदायी आणि

पुण्यकारी सुभाषित आहे.


# अनुक्रमणिका

२३. अर्जुन-सुभद्रा विवाह

२४. महात्मा गालव-कृष्ण भेट

२५. कृष्णार्जुन युद्ध

२६. कृष्ण-द्रौपदी सख्य



# अर्जुन—सुभद्रा विवाह

सुरूवातीला मार्गदर्शनपर बोलण्याचे नाटक करीत असलेला अर्जुन बोलता बोलता खरोखरीच भावपूर्ण झाला. विशेषतः जेव्हा अर्जुन खऱ्या प्रेमाविषयी बोलू लागला तेव्हा तर तोही त्या प्रेमभावनेने युक्तच झाला आणि प्रेमाचे गुणगान त्याच्याकडून सहजतेने व उत्स्फूर्तपणे घडू लागले. सुभद्रेवरील प्रेम अर्जुनाच्या ठिकाणी एवढे भरून आले की, स्वतःच्या भावनांना आवर घालणे अर्जुनाला तर कठीणच होऊ लागले. परंतु अर्जुनाने प्रयत्नपूर्वक संयम राखला आणि स्वतःला सावरले. अर्जुनाने बोलत असताना त्याचे डोळे त्याने जाणूनबुजूनच मिटवून ठेवले होते खरे, परंतु त्या डोळयातून वाहणाऱ्या अश्रुधारांना मात्र अर्जुन थांबवू शकला नाही. ‘यती महाराज’ असे एकदम भावपूर्ण झालेले पाहून सर्वांनाच भरून आले. सुभद्रेला तर तिचा भावनावेग एवढा अनावर झाला की तिच्याही नेत्रातून अश्रुधारा व मुखातून अस्फुट असे हुंदके बाहेर येऊ लागले. सुभद्रेने तशाच अवस्थेत पुढे येऊन यतीला दोन्ही कर जोडून वंदन केले आणि ती रूक्मिणीच्या जवळ जाऊन उभी राहिली. रूक्मिणी सुभद्रेच्या डोक्यावर आपल्या हाताने हलके हलके थोपटत तिचे सांत्वन करीत राहिली.


यतीच्या बोलण्याने सर्वात जास्त प्रभावित झाला होता तो बलराम. परंतु तो प्रभाव त्याच्या केवळ बुद्धीवरच झाला नव्हता, तर त्याच्या मनावरच तो जास्त झालेला होता. यतीचे सांगणे तर बलरामाला पूर्णपणे पटले होतेच परंतु त्याचे मन अधिक भावपूर्ण झाले होते. बलरामालाही मग रहावले नाहीच. त्यानेही पुढे होऊन यतीच्या चरणांना स्पर्श केला आणि मनोभावे हात जोडून वंदन केले. बलरामाच्या मुखातून हळुवार आवाजात फक्त एवढेच शब्द बाहेर आले. “यती महाराज, आपले सत्य वचन माझ्यासाठी आज्ञाच आहे आणि मला ती शिरोधार्ह आहे.” त्यावर यतीच्या मुखातून सहजपणे शब्द बाहेर आले, “तथास्तु!”

बलरामाने सुभद्रेकडे पाहिले असता त्याला तिच्याविषयीच्या प्रेमाचे भरतेच आले. तशाच गहिवरलेल्या अवस्थेत बलराम सुभद्रेच्या जवळ आला आणि त्याने तिच्या पाठीवर प्रेमाने थोपटले. बलरामाच्या प्रेमळ स्पर्शाने सुभद्रेला

अधिकच भरून आले आणि तिने बलरामाकडे वळून पाहिले. बलरामाने आश्वासक नजरेने सुभद्रेकडे पाहत फक्त स्वतःची मान संमतीदर्शक किंचितशी हलवली आणि सूचक असे मंदस्मित केले. बलरामाची खूण सुभद्रेला कळली आणि तिने स्वतःला बलरामाच्या कुशीत झोकूनच दिले. रेवतीचे नेत्रही पाणावलेच. परंतु खरा आनंद झाला होता तो मात्र रूक्मिणीलाच! नेत्रातून अश्रू वाहत असलेल्या अवस्थेतील रूक्मिणीने समाधानाने आपले नेत्र मिटून घेतले, तर तिला तिच्या अंतरात प्रसन्न मुद्रेने व मनमोकळेपणाने हसत असलेल्या कृष्णमूर्तीचे दर्शन झाले. कृष्णदर्शनाने आणि कृष्णाच्या माहात्म्याच्या जाणीवेने, रूक्मिणी अतिशय सद्गदित झाली. रूक्मिणीठायीचा कृष्णभक्तीचा भाव अतिशय उत्कट झाला आणि रूक्मिणी स्वतःच कृष्णरूप होऊन आनंदाच्या अनुभवात पूर्णपणे बुडूनही राहिली.

रूक्मिणी अशा अवस्थेत असतानाच बलराम, रेवती व सुभद्रा यांच्यासह तेथून सावकाशपणे निघून गेला. ते गेल्याची चाहूल लागल्यावर अर्जुनही भानावर आला. त्याने आपले नेत्र उघडले तेव्हा त्याला जाणवले की त्याचे नेत्र अश्रूंनी दाटून राहिले होते. समोर एकट्याच उभ्या असलेल्या रूक्मिणीकडे अर्जुनाने पाहिले, तेव्हा त्याच्या लक्षात आले की रूक्मिणीचा चेहरा हा अतिशय प्रसन्न आणि विशेष तेजाने उजळलेला दिसत होता. मग अर्जुनाला राहवलेच नाही. वेगाने पुढे येऊन अर्जुनाने रूक्मिणीच्या पदांना स्पर्श केला आणि विनम्रभावाने हात जोडून वंदन केले. अर्जुनाच्या हस्तस्पर्शाने रुक्मिणी भानावर आली. अर्जुनाला समोर उभा असलेला पाहून रूक्मिणी प्रसन्नतेने हसली आणि म्हणाली,

“शाब्बास! अर्जुना, शाब्बास!! तुझे मनःपूर्वक अभिनंदन. आपला विजय झाला. तुझ्या व सुभद्रेच्या विवाहासाठी बलरामदादांचे मन अनुकूल करण्यात आपल्याला यश आले. तुझ्या बोलण्याचा त्यांच्यावर खरेच एवढा प्रभाव झाला, की त्यांचा मूळ निश्चय पूर्णपणे ढळला आणि त्यांच्या मनातील घट्टपणाही पूर्णपणे विरघळला. अर्जुना, हा सर्व तू सांगितलेल्या प्रेमपुराणाचा परिणाम होता. मला तर अगदी नवलच वाटते. परंतु तू अगदी कमालच केलीस. खऱ्या प्रेमाची थोरवी वर्णन करताना तू तर त्यामध्ये एवढा रंगून गेला होतास आणि बोलत असताना तुझ्या मुखातून एकेक वचने अशी काही प्रगट होत होती, की ती ऐकताना मीही अक्षरशः चकितच होत होते. एवढे तत्त्वज्ञान तुझ्याठायी आले तरी कोठून? हाच प्रश्न मला सारखा पडत होता. अर्जुना, मी तुला खरे सांगते की त्यावेळेस तू काहीही अभिनय



करीत नसून जणू तू तुझा अनुभवच सांगत आहेस असेच मला सारखे राहून राहून वाटत होते. आता तू मला खरे सांग की त्यावेळेस तुला झाले होते तरी काय?”

रूक्मिणीच्या बोलण्यावर अर्जुनाने क्षणभर विचार केला आणि तो म्हणाला,


“अहो रुक्मिणीदेवी, मी तुम्हाला खरेच सांगतो की नेमका हाच प्रश्न मलाही पडलेला आहे. मला सुद्धा त्याचे अत्यंत नवल वाटत आहे. मला तरी असेच वाटते की मी माझ्या नकळत अचानक व एकदम कसल्यातरी प्रभावाखाली आलो आणि माझे मन पूर्णपणे भारित झाल्यासारखे झाले. सुरुवातीला खरे तर, मी बलरामदादांना केवळ प्रभावित करण्यासाठी म्हणून काही चमकदार वाक्ये आठवून आठवून व जुळवून जुळवून बोलत होतो. परंतु बोलता बोलता हळूहळू मला त्या प्रेमाची महती खरीच एवढी जाणवायला लागली, की मी त्या प्रेमभावाने खरेच युक्त होऊन बोलावयास लागलो. त्यामुळेच मी अत्यंत मोकळेपणाने बोलू लागलो आणि माझ्या बोलण्याचा मलाच आनंद व्हायला लागला. नाहीतर असे बोलावयास लागणारे तत्त्वज्ञानही मला मुळीच माहित नाही आणि त्यासाठी आवश्यक असणारे कौशल्यही माझ्यापाशी मुळातच नाही.

अहो रुक्मिणीदेवी, आणखीन एक महत्त्वाची गोष्ट मला जाणवली. प्रथम मी जेव्हा प्रेमाचे महत्त्व सांगत होतो तेव्हा माझ्या मनात फक्त सुभद्रेचेच प्रेम होते. परंतु नंतर मात्र माझ्याकडून त्या प्रेमाविषयी निरपेक्षपणे बोलले जाऊ लागले. आधी माझ्याही ते लक्षात आले नाही, परंतु जेव्हा ते माझ्या लक्षात आले तेव्हा मला माझ्याठिकाणी काहीतरी वेगळेच जाणवू लागले. माझ्या दृष्टीला सर्वकडे एकीएक प्रेमच दिसू लागले. एवढेच नव्हे, तर सर्व अंतर्बाह्य सृष्टी एकमेव प्रेमानेच भरून राहिली आहे असाच अनुभव येऊ लागला. अर्थात् हे सर्व त्या क्षणापुरतेच होते हे खरे आहे. परंतु तो अनुभव निश्चितच काहीतरी विलक्षण होता हेही खरे आहे. त्या अनुभवाच्या स्मरणाने अजूनही माझे शरीर रोमांचित होत आहे. अशी ही किमया कशामुळे झाली हेच मला अजून कळत नाही. मला तर असेच वाटते की त्यावेळेस जरी मी बोलत होतो, तरी बोलणारा जणू दुसराच कोणीतरी होता. हे कोडे उलगडणे मला तरी शक्य होत नाही.”

अर्जुनाच्या बोलण्यावर रुक्मिणीने मंदस्मित केले आणि ती म्हणाली,

"अरे अर्जुना, तुला आलेला अनुभव खरोखरीच आगळा वेगळा असाच आहे. परंतु असा अनुभव येऊ शकतो हेही खरेच आहे. कारण असे निरपेक्ष प्रेम या जगात दुर्मिळ असेल, पण खरोखरीच आहे. जेथे कुठलेही व्यावहारिक वा लौकिक नातेसंबंध नाहीत, तरीही जिव्हाळा आहे, आपुलकी आहे, खऱ्या हिताची खरी काळजी आहे, एवढेच नव्हे, तर सर्व प्रसंगात प्रत्यक्ष साथ देऊन उभे राहणे आहे, असे अलौकिक प्रेम हे तर ईश्वरी प्रेमच होय. असे प्रेम अनुभवायला मिळणे हेही त्या परमभाग्याचेच लक्षण आहे. फक्त ते प्रेम मिळूनही त्या प्रेमाला जाणणे घडणे हे महत्त्वाचे आहे.

अरे अर्जुना, अशा प्रेमानेच तू थोडावेळ युक्त होऊन राहिलास म्हणूनच तर तुला तो विलक्षण अनुभव आला. पण त्या आधी तू स्वतः तशा प्रेमाचा अनुभव घेतला होतास हे तुला कळले का? अरे, अशाच ईश्वरी प्रेमाचा अनुभव तर तुला कृष्णाकडून नेहमीच मिळत असतो हे तुझ्या लक्षात आले का? नीट विचार करून बघ, म्हणजे तुझे तुलाच सर्व काही समजेल. कृष्णाचे तुझ्यावर किती पराकोटीचे प्रेम आहे याची आठवण कर. तुझ्या सुखदुःखाच्या सर्व प्रसंगात केवळ बाह्य सहभाग घेऊन नव्हे, तर पूर्णपणे समरस होऊन तुझी सदैव पाठराखण करणाऱ्या कृष्णाचे जरा स्मरण तर करून बघ, म्हणजे तुझ्या सर्वकाही लक्षात येईल. कृष्णाचे असे प्रेम तर अगदी सर्वांवर आहे. कारण तो तर त्याचा सहज स्वभावच आहे. कृष्णाच्या संपर्कात व सहवासात आलेल्या सर्वांनाच त्या प्रेमाचा लाभ होत असतो. परंतु त्याचे महत्त्व मात्र फारच थोड्या लोकांना कळते. ज्यांना ते कळते त्यांना मग कृष्णाच्या प्रेमाशिवाय चैनच पडत नाही आणि त्यांचे कृष्णाशी प्रेमसंबंधच निर्माण होतात. त्या संबंधातून ज्यांच्याठायी त्या कृष्णाविषयीच प्रेम निर्माण होते ते सदासर्वकाळ कृष्णाच्याच स्मरणात राहून कृष्णाच्या प्रत्यक्ष भेटीसाठी आर्त होऊन राहतात. त्यामुळे त्यांच्या मनाला या संसाराचे मायामोहादी विकार स्पर्शच करू शकत नाहीत. संसाराच्या सर्व चिंता व भय यापासून ते मुक्त होतात आणि कृष्णाच्या प्रेमाने युक्त होऊन त्याचेच भक्त होऊन राहतात. अशाच त्याच्या भक्तांकडून पराक्रमाचे जीवन जगले जाते. त्यांच्या हृदयी सदैव कृष्णप्रेम व मुखी कृष्णाचे गुणगायन असते. म्हणूनच ते भक्त नित्य आनंदाच्या अनुभवात रममाण होऊन राहात असतात."



रुक्मिणीचे बोलणे ऐकून अर्जुन अत्यंत चकित होत होता. परंतु त्याचबरोबर तो थोडासा भांबावलाही. रुक्मिणीचे सांगणे त्याला आकलन होईना. त्यामुळे जरी थोडावेळ तो काहीच बोलला नाही तरी त्याला स्वस्थही बसवे ना. शेवटी न राहवून त्याने बोलायला सुरुवात केलीच,

“अहो रुक्मिणीदेवी, तुमचे बोलणे मला थोडेसे चमत्कृतीपूर्णच वाटत आहे. त्यातून मला नीटसा अर्थबोधही होत नाहीए. कृष्णाच्या माझ्यावरील प्रेमाविषयी तुम्ही जे सांगितलेत ते मात्र तंतोतंत खरे आहे. त्याच्या या प्रेमाचा मी पुरेपूर अनुभव घेत आलेलो आहे. त्याचे कारणही मला कळलेले नाही आणि ते जाणून घेण्याचा मी जास्त प्रयत्नही केलेला नाही. परंतु एवढे मात्र मला निश्चितपणे कळते की कृष्णासारखा मित्र मला माझ्या अत्यंत भाग्याने लाभलेला आहे. तो मला त्याचा परममित्र वगैरे म्हणतो खरा, पण खरी मैत्री तोच करतो आणि राखतोही. खऱ्या मैत्रीला जागणे म्हणजे काय हे त्याच्याकडे पाहिल्यावरच कळते. त्याची मैत्री आत्तापर्यंत त्याने वारंवार सिद्ध करून दाखवली आहे. खरे तर, त्याचा मित्र होण्याची माझी काहीच गुणवत्ता नाही. परंतु माझ्यावरील निरतिशय प्रेमापोटीच कृष्ण मला त्याच्या मैत्रीसाठी लायक समजतो हे मात्र अगदी शंभर टक्के खरे आहे. आत्ताचाच प्रसंग पाहा ना!

कृष्णानेच पुढाकार घेऊन माझी व सुभद्रेची भेट घडवून आणली. आम्हाला एकमेकांचा सहवास करण्यासाठी त्यानेच प्रोत्साहन दिले आणि आमच्या मनात निर्माण झालेली प्रेमभावनाही कृष्णच नित्य फुलवत राहिला. एवढेच नव्हे, तर प्रत्यक्ष बलरामदादांचा विरोध व रोष पत्करून आमच्या विवाहाला पूर्ण पाठिंबाही कृष्णानेच दिला. आमच्या विवाहाची योजनाही कृष्णानेच आखली होती. परंतु त्या योजनेत धोका तर जास्त होताच, पण त्याहीपेक्षा त्यामुळे बलरामदादांशी व सर्व यादवांशीच माझे व सर्व पांडवांचे कायमचे वैर होण्याचीच शक्यता अधिक होती. पण रुक्मिणीदेवी, तुम्ही सूत्रे हातात घेतलीत आणि सर्वच चित्र एकदम पालटले. थोडीशी जोखीम असूनही तुम्ही ठरवलेल्या योजनेनुसार सर्व काही अलगदपणे व सुरळीत पार पडले. त्याहीपेक्षा तुमची प्रत्यक्ष प्रसंगातील उपस्थिती व सक्रिय साहाय्य यानेच मला केवढी तरी प्रेरणा व धैर्यबळ मिळत राहिले. खरेच तुमचे उपकार मी जन्मोजन्मी विसरू शकणार नाही.


अहो रुक्मिणीदेवी, कृष्णाचा तर मी कायमचाच कृतज्ञ होऊन राहणार हे तर निश्चितच. त्याच्या माझ्यावरील प्रेमाचेही मला नित्य स्मरण

राहणारच. परंतु मगाशी तुम्ही जो काही ‘ईश्वरी प्रेम’ असा कृष्णाच्या प्रेमाचा उल्लेख केलात तो मात्र मला काहीच कळला नाही. ‘ईश्वर’ या संकल्पनेविषयी जरी मला थोडीफार ऐकून व वाचून माहिती असली तरी ईश्वराच्या अस्तित्वाविषयी मात्र मी पूर्णपणे अनभिज्ञच आहे. ईश्वराच्या सत्तेवर माझी पूर्ण श्रद्धा आहे. परंतु ईश्वरीप्रेम व त्याचा अनुभव या गोष्टी मात्र माझ्या आकलनशक्तीच्या पलीकडच्याच आहेत. त्यातूनही तुम्ही कृष्णप्रेम, कृष्णप्रेमाने युक्त होऊन राहणे, कृष्णाची भक्ती व त्याचा होणारा आनंद याविषयी जे काही बोललात, ते तर माझ्यासाठी नवीनच व नवलाईचेही आहे. मला तर तो विषय पूर्णपणे अनाकलनीय जाणवतो. तेव्हा तुम्ही त्यासंबंधी जरा अधिक स्पष्टपणे बोलून माझी योग्य ती समज करून द्याल तर बरे होईल.”

अर्जुनाच्या बोलण्यावर रूक्मिणीने मंदस्मित केले आणि ती म्हणाली,

“अरे अर्जुना, असा भांबावून जाऊ नकोस. माझ्या सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की तू कृष्णाकडे एक सामान्य व्यक्ती म्हणून पाहू नकोस. तुला कृष्णाचे वेगळेपण जाणवते आणि त्याच्या तुझ्यावरील प्रेमाचे आगळेपणही तुझ्या लक्षात येते. कृष्णाच्या या वेगळेपणाचे व आगळेपणाचे कारणच मी तुला सांगत होते. ईश्वराविषयी तुला एवढीतरी निश्चितच माहिती असेल, की ईश्वर म्हणजे अत्यंत विशुद्ध अशी परमशक्ती आहे जी सर्वांठायी आहे. त्याचप्रमाणे ईश्वराचे प्रेम हे सुद्धा अत्यंत शुद्ध, पवित्र, निर्मोही व निर्मळ असेच असते आणि ईश्वराचे हे प्रेम सर्व जीवमात्रांवर असते. कृष्णाच्या रूपाने तोच ईश्वर साकार झालेला आहे आणि तेच ईश्वरी प्रेम कृष्णाच्या रूपाने प्रगट आहे. अर्जुना, बाकी तुला सध्या काही कळले नाही तरी एवढीच गोष्ट लक्षात ठेव. तशीच दृढ श्रद्धा धर आणि त्याच दृष्टीने कृष्णाकडे पाहत रहा म्हणजे मी कृष्णाविषयी सांगितलेल्या इतर सर्व गोष्टी तुला यथावकाश कळतील.

अर्जुना, या यशस्वी झालेल्या योजनेचे सर्व श्रेय तू जरी मला देत असलास तरी मी तुला खरेच सांगते, की त्यामागील प्रेरणा एकीएक त्या कृष्णाचीच आहे. प्रत्यक्ष कृती करत असताना जरी मी दिसत असले तरी त्यामागील सूत्रधार मात्र कृष्णच आहे. तुझ्यावरील व सुभद्रेवरील प्रेमामुळे व मुख्य म्हणजे तुमच्या हितासाठीच कृष्णाने तुमच्या विवाहाचा संकल्प धरला होता. त्याचा ध्यासही



कृष्णानेच धरला होता आणि त्याची योजनाही त्यानेच ठरवली होती. माझ्या हाती सूत्रे देऊन कृष्ण बाह्यांगाने मुद्दामच थोडा वेळ दूर झाला खरा, पण हाही त्याच्या योजनेचाच एक भाग होता. त्या योजनेत ऐन वेळी मी काही बदल केले, तरी त्यामागील प्रेरणा ही माझ्या अंतःकरणातील कृष्णाचीच होती. माझ्या त्या अंतःस्थ कृष्णाला कौल लावून आणि त्याची अनुमती घेऊनच मी निर्णय घेत होते. त्या निर्णयाला कृष्णाची संमती होती म्हणूनच ते निर्णय योग्य होते हे सिद्ध झाले. आपली योजना यशस्वी झाली हेही त्याचेच लक्षण आहे.

अर्जुना, माझ्या म्हणण्याचा अर्थ तुला पूर्णपणे आत्ता कळणार नाही. परंतु हे सर्व तू ऐकून ठेव. पुढे तुझे कृष्णावरील प्रेम जसे जसे वाढेल आणि तुझी कृष्णावरील श्रद्धाही जशी जशी अधिकाधिक दृढ होईल, तशा या सर्व गोष्टी तुला तुझ्या अनुभवानेच कळतील. आता मात्र जास्त विचार करीत बसू नकोस. नाहीतर आता जे तू करायला हवे आहे त्याकडे तुझे दुर्लक्ष होईल. आता तुला एकच गोष्ट करायची आहे आणि ती म्हणजे येथून लवकरात लवकर निघून जाणे. येथे जास्त वेळ थांबणे हे कदाचित धोक्याचे ठरू शकेल आणि मग सर्वच मुसळ केरात जाईल."


रूक्मिणीचे बोलणे ऐकून खरे तर अर्जुन विचारमग्न होत होता. परंतु तिच्या बोलण्यातील शेवटचा भाग ऐकून अर्जुन एकदम सावध झाला. त्याने झटकन पुन्हा एकदा रूक्मिणीला आदराने नमस्कार केला. आपले मृगाजीन, झोळी व कमंडलू अर्जुनाने हातात घेतले आणि तो त्वरित त्या महालाच्या व राजवाड्याच्याही बाहेर पडला. बलरामाच्या कानावर ही बातमी सेवकांनी घातली असता तो धावत धावतच 'यती' च्या जवळ आला. हात जोडून समोर उभ्या असलेल्या बलरामाकडे अर्जुनाने एक दृष्टिक्षेप टाकला आणि तो एवढेच म्हणाला, "हे राजन्, ईश्वरी प्रेरणेनुसार आम्ही येथे आलो. आता आमचे येथील कार्य संपले आहे. आम्ही निघतो. ईश्वरावर श्रद्धा ठेवून योग्य प्रकारे जीवन जगण्याचे बळ घ्या. ईश्वराचे तुम्हाला आशीर्वाद आहेतच. ते तुम्ही खरे करा." क्षणभरही तेथे न थांबता व पुन्हा मागेही वळून न बघता झपाझप पाऊले टाकीत जाणारा अर्जुन क्षणार्धात दिसेनासाही झाला."

□□□

एवढा वेळ मध्ये जराही न थांबता सतत बोलत असलेला नारद अचानक बोलायचा थांबला. नेत्र मिटून श्रवणात पूर्णपणे तल्लीन झालेल्या लक्ष्मीने हलकेच आपले नेत्र उघडून पाहिले, तर तिला समोर नेत्र मिटून बसलेली नारदाची प्रसन्न मूर्ती दिसली. नारदाचे असे थांबणे लक्ष्मीला तर अनपेक्षितच होते. नारद बोलायचा थांबण्याचे निश्चित कारण काय असेल याचा लक्ष्मीला अंदाजही करता येईना. तेव्हा अंदाज करीत बसण्यापेक्षा नारदाशी प्रत्यक्ष बोलूनच त्याचे मन जाणून घ्यावे, या हेतूने लक्ष्मीने प्रथम नारदाच्या चरणांना स्पर्श करून त्याला वंदन केले आणि त्याच्यासमोर हात जोडून ती उभी राहिली. थोडा वेळ तसाच गेला. पण लक्ष्मीच्या त्या भक्तिभावाचा स्पर्शही नारदाला निश्चितच झाला असणार. कारण नारदाचे अंतर्मुख झालेले मन हळूहळू बाहेर येऊ लागले आणि त्याच्या मनाला लक्ष्मीचे अस्तित्व जाणवू लागले. अंतर्मुख अवस्थेतून बाहेर येता येता नारदाचे नेत्रही हळूहळू उघडू लागले. भक्तिभावाने युक्त असलेली लक्ष्मी पाहून नारदाच्या मनाला संतोष झाला. लक्ष्मीकडे पाहून नारदाने स्मितहास्य केले आणि प्रश्नार्थक नजरेने तो तिच्याकडे पाहत राहिला. नारदाच्या नजरेतील भावार्थ लक्ष्मीच्या लक्षात आला आणि तिने हळूहळू बोलावयास सुरूवात केली,

“अरे नारदा, तू वर्णन करून सांगत असलेल्या नारायणाच्या सगुणकथांमधून प्रेमरस एवढा ओसंडून वाहत होता, की त्याच्या सेवनाने मी तर अगदी तृप्त होऊन राहिले आहे. अमृताहूनी गोड असलेल्या त्या प्रेमरसाने माझे तर सर्व देहभानच हरपले होते. मुळात हा प्रेमरस तुझ्या अंतःकरणातून स्त्रवत होता हे मी जाणून आहे. तुझ्या त्या अंतःकरणाची अवस्था काय असेल याचा तर मी विचारही करू शकत नाही. कारण ती अवस्था मनाच्या सर्व विचारांच्या व बुद्धीच्या सर्व तर्कांच्याही पलीकडची आहे हे मला नक्कीच ठाऊक आहे. नारदा, तरीही तू प्रेमभावाच्याच पूर्ण अवस्थेमध्ये असणार याचीही मला खात्री आहे. कारण तेच तर उत्कट भक्तिभावाचे लक्षण आहे. अंतःकरणाच्या त्याच अवस्थेमधून तुझ्याकडून कृष्णकथांचे गुणगायन अखंडपणे घडत आहे. त्यामध्ये किती काळवेळ गेला याचा हिशोब करणे अशक्यच आहे, कारण तेवढा वेळ जणू काळ थांबलाच होता.

नारदा, अशा तुझ्या सगुण प्रेमात पूर्णपणे रमलेल्या आणि सगुण भक्तिगायनात पूर्णपणे रंगलेल्या अवस्थेचे मला नवल वाटत नाही. कारण तुझी ती सहजावस्था आहे हे मी जाणून आहे. पण त्याचबरोबर तुझा वचनौघ असा अचानक



व अकल्पितपणे थांबला याचेही मला आश्चर्य वाटत नाही. कारण तुझ्या भक्तिभावपूर्ण अवस्थेमध्ये भक्तिभावाचे जे एक विशेष अंग आहे आणि ते म्हणजे संवादभक्ती, ते अंगच जागे झाले असणार याची मला पूर्वानुभवामुळे खात्री आहे आणि त्याच अंगाची पूर्ती व्हावी म्हणूनच तुझा वचनप्रवाह असा थांबला हे अगदी निश्चित. आता त्या भावाची पूर्ती करण्याची जबाबदारी माझ्यावरती आहे हेही मला ठाऊक आहे.


नारदा, काय आहे ना, कृष्णावतारातील अर्जुन व सुभद्रा यांच्या विवाहाचा जो प्रसंग तू अगदी रंगवून रंगवून सांगत आहेस ना, त्यामध्ये खरे तर, कुठलाही प्रश्न निर्माण होण्यासाठी काही वावच नाही. कारण मुळात तो प्रसंग बाह्यांगाने अत्यंत गंमतीचा आहे आणि तो ऐकताना तर मनाला एक प्रकारची मौजच वाटत आहे. तुझ्या खुमासदार शैलीने तू वर्णन करत असताना त्या प्रसंगाची रंगत तर अगदी शिगेला पोहोचली आहे, यात मुळीच संशय नाही. पण त्याचबरोबर भक्तिभावाची लक्षणे जी रुक्मिणीच्या रूपाने प्रगट होऊन राहिली आहेत ती मात्र प्रशंसनीय व अभ्यसनीय आहेत. त्याचाच सखोल विचार घडला पाहिजे आणि त्यासाठी त्याविषयीचे बोलणे व संवाद घडणे आवश्यक आहे माझ्या लक्षात आले. म्हणूनच बहुधा तुझे बोलणे थांबले असावे, की ज्यामुळे मला बोलण्याची संधी मिळेल. कारण या भक्तिभावातच आनंद आहे आणि तोच वाढवला पाहिजे. या भक्तिनेच प्रेम रूपाला येते आणि आनंदाचा अनुभव देऊन राहते हे तर खरेच आहे ना?

नारदा, कृष्णमाहात्म्याला तू जी रुक्मिणीच्या भक्तिभावाची जोड देत आहेस ना, ती तर अजोडच आहे. किंबहुना देव व भक्त यांची जोडच आहे आणि तीच या प्रसंगातून प्रगट व सिद्ध होत आहे. अर्जुन व सुभद्रा यांना कृष्णाचे प्रेम भाग्याने लाभले आणि कृष्ण त्याच्या प्रेमाला जागण्याच्या स्वभावानुसार त्या उभयतांच्या पाठीशी उभा राहिला खरा, परंतु प्रत्यक्ष प्रसंगात रूक्मिणीच त्यांना साथ देण्यासाठी त्यांच्या बरोबरीने उभी राहिली, याचे कौतुक मला विशेषत्वाने वाटते. अर्थात् रूक्मिणी हे सर्व कृष्णावरील भक्तिभावामुळेच करू शकली. म्हणून शेवटी रूक्मिणीच्याद्वारे कृष्णाचेच माहात्म्य प्रगट झाले हेही खरेच आहे. परंतु ते माहात्म्य ज्या भक्तांच्या रूपाने प्रगट होते त्या भक्तांचे विशेषत्व हे राहतेच आणि

तेच मला जाणवत आहे. तेव्हा ज्याचे माहात्म्य आहे त्याचे माहात्म्य वर्णन केलेच पाहिजे आणि ज्याचे कौतुक आहे त्याचे कौतुकही केलेच पाहिजे. होय ना?

नारदा, अर्जुन व सुभद्रा हे कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य जाणत नव्हते, त्यामुळे त्यांच्या कृष्णावरील प्रेमालाही साहजिकच मर्यादा आलेली होती. त्यांच्या प्रेमात कृतज्ञतेचा भाव अधिक होता. परंतु रूक्मिणीची गोष्ट अतिशय वेगळी होती. ती कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य जाणत होती आणि त्यामुळे तिचे कृष्णावरील प्रेम हे भक्तिभावाचे होते. कृष्णाच्या अंतःकरणाला जाणून त्याच्या अंतःकरणाला प्रसन्न करणे, हा तिच्या मनाचा स्थायीभावच झाला होता. त्यातूनही कृष्णाच्या अंतःकरणातील भाव पूर्णपणे जाणत असल्यामुळे वेळप्रसंगी त्या भावाची पूर्ती करण्यासाठी, अगदी कृष्णाने ठरवलेल्या योजनेतही बाह्यांगाने योग्य बदल करण्याची लवचिकता रूक्मिणीच्या ठिकाणी होती. त्यामध्ये तिची कल्पकता व तिचे धैर्यबळ हे दोन्ही विशेषत्वाने प्रगट झाले. मला वाटते खऱ्या भक्तिभावाचेच हे लक्षण आहे. कारण असा बदल करण्याचा निर्णय रूक्मिणीला कृष्णाच्या अनुपस्थितीत घ्यायचा होता. पण रूक्मिणी तिच्या भावबळाने त्या कसोटीत अगदी पूर्णपणे यशस्वी झाली. यशस्विता हे तर भक्तिभावाचे प्रमुख लक्षण आहे. खरे ना?

नारदा, पण या प्रसंगात रूक्मिणीकडून प्रगट झालेल्या एका विशेष अंगाचे मला खास कौतुक करावेसे वाटते. कृष्णाने योजलेले कार्य यशस्वी करून दाखवताना तिने सर्व कुटुंबाची सांगड कायम राखली आणि कुटुंबातील समतोलही कायम राखला हे अत्यंत महत्त्वाचे आहे. बलरामाचा अवमान वा नाचक्की होऊ नये याला रूक्मिणीने प्राधान्य दिले. बलरामाचा योग्य मानही राखला गेला आणि कोठेही कसल्याच प्रकारची कटुता निर्माण होऊ न देता, सर्वांमध्ये प्रेमाची गोडी व आपुलकी तिने कायम राखली. या सर्वांतून रूक्मिणीने ती खरी सुगृहिणी होती हेही सिद्ध केले. मला अगदी खात्री आहे की कृष्णालाही या गोष्टीचे अत्यंत कौतुक वाटलेच असणार. अर्थात् कृष्णाने तसे कौतुक केले की नाही आणि केले असल्यास कसे केले असेल, ही कृष्णाच्या स्वभावाची गंमत आहे. ती तुझ्या मुखातून ऐकण्याची उत्सुकता तर मलाही आहेच. तेव्हा आता पुढील कथाभाग सांगावयास त्वरित सुरूवात कर बघू. त्याची आतुरता तुझ्याही मुखावर मला अगदी स्पष्टपणे दिसत आहे.”



लक्ष्मीच्या बोलण्याचा झालेला आनंद नारदाच्या मुखावर पूर्णपणे पसरून राहिलेला होता. लक्ष्मीच्या ठिकाणी निर्माण झालेला भक्तिभाव नारदाला जाणवला. कारण म्हणूनच तर लक्ष्मी रूक्मिणीचा भक्तिभाव यथार्थपणे जाणू व वर्णू शकली होती. हे भक्तिभावाचे लक्षण नारदाने अचूक ओळखले. आनंदाच्या अनुभवाला आणून देणाऱ्या अशा भक्तिभावाने नारद तर नेहमीच युक्त होता. त्यातच त्याला लक्ष्मीच्या भक्तिभावाचा स्पर्श झाला आणि नारदाचा आनंद शब्दरूपाने साकार होऊ लागला.


“हे लक्ष्मी, तुझी खरेच धन्य आहे. सगुण चरित्रामधील प्रेमभाव जसा तुझ्या लक्षात येतो, तसाच भक्तिभावही तू नेमका ओळखतेस. त्यामुळेच भावनात्मक प्रेम व भक्तिभावाचे प्रेम यातील फरकही तुला योग्य प्रकारे कळतो. म्हणूनच कोणाच्या कृष्णावरील प्रेमाचे जरी कौतुक तुला वाटले, तरी कृष्णाठायी जडलेल्या भक्तिभावाचे माहात्म्य तू यथार्थपणे जाणून आहेस आणि तुझ्या मनालाही त्या भक्तिभावाचेच आकर्षण लागून राहते. एवढेच नव्हे, तर तुझ्याठायी तोच ध्यास जडून राहतो. त्याचेच लक्षण म्हणजे तुला रुक्मिणी ही अधिकाधिक जवळची वाटू लागली आहे आणि तिच्या भक्तिभावाचे विशेषत्वही तुला जाणवू लागले आहे. त्या भक्तिभावाचीच परिणती ईश्वर प्रसन्न होण्यामध्ये होते आणि त्यामुळे आनंदाचा अनुभव हा भक्ताचा होतो. भक्तिभावामध्ये ही पूर्ती हीच महत्त्वाची व मुख्य असते. कारण भक्तिभावाचे तेच साध्य असते. त्यासाठी आवश्यक असल्यास साधन बदलण्यासाठी लागणारी मनाची लवचिकता हवी. नाहीतर, मन जर त्या साधनालाच घट्टपणे चिकटून राहील, तर ते मन आहे त्या अवस्थेतच अडकून राहील आणि मनाची भक्तिमार्गामध्ये वाटचालच घडणार नाही. मग भक्तिमार्गाची पूर्ती होऊन ईश्वराशी ऐक्य पावणे आणि त्याचा आनंद नित्य अनुभवणे हे तर दूरच राहिले. असाच भक्तिभाव रुक्मिणीकडून प्रगट झाला. तो कृष्णाच्या अंतःकरणाला पावला आणि त्याला प्रसन्न करता झाला. त्याची पावती पुढे कृष्णाकडून रुक्मिणीला मिळालीच आणि रुक्मिणीला आनंदाच्या अनुभवाची प्रचिती आली.

हे लक्ष्मी, अर्जुनाचे गमन झाल्यानंतर बलरामाने सर्व प्रथम कामाच्या निमित्ताने मथुरेबाहेर गेलेल्या कृष्णाला बोलावून घेतले. कृष्णाच्या मनात आले की बहुतेक त्याने आधी ठरवलेल्या योजनेनुसार, अर्जुनाने सुभद्रेला पळवून नेऊन तिच्याशी गांधर्व विवाह केला असणार आणि त्यामुळेच बलराम दादा सचिंत व क्रोधग्रस्तही झाले असणार. त्यासाठीच हे एवढ्या तातडीचे बोलावणे आले आहे.

म्हणून कृष्णही ताबडतोब मथुरेला येऊन पोहोचला. तेथे येऊन कृष्ण पाहतो तो काय? सगळीकडे अत्यंत उत्साहाचेच वातावरण पसरलेले दिसत होते. भेटायला सामोरा आलेला बलराम तर अत्यंत खुशीतच दिसत होता. तेवढ्यात सुभद्राही तेथे धावत धावत आली. तिने कृष्णाला हर्षभराने मिठीच मारली. कृष्णालाही त्या सर्वाचा काहीच अर्थ लागेना. कृष्णाने तेथेच उभ्या असलेल्या रूक्मिणीकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिले असता तिने कृष्णाकडे पाहून फक्त मंदस्मित केले. कृष्णही चकित व अचंबित झाला आणि बलरामाकडे हेतुपूर्ण नजरेने पाहतच राहिला. कृष्णाकडे पाहून मनमोकळेपणाने हसत बलराम त्याला म्हणाला,

“अरे कृष्णा, असा चकित मुद्रेने पाहत काय राहिलास? अरे, जे तुला नवल वाटत आहे ना ते येथे खरेच घडले आहे आणि ही सारी किमया त्या यतीमुळे घडली आहे हे आधी लक्षात ठेव. मी त्या यतीला या राजवाड्यात जेव्हा घेऊन आलो होतो, तेव्हा तू माझ्यावर केवढा तरी नाराजच झालेला होतास. ‘सुभद्रेने त्या यतीचा सहवास व सेवा करून काही पुण्यकर्म जोडावे’ या माझ्या सूचनेचा तर तुला रागच आला होता. अर्थात् तुझ्या स्वभावानुसार तू तो राग बाह्यांगाने दाखवला नाहीस. परंतु माझ्या ते लक्षात आल्याशिवाय राहिले नाही. पण मग मीही माझ्या लक्षात आल्यासारखे मुद्दामच दर्शविले नाही. त्याचवेळी तू काहीतरी कामाचे निमित्त काढून मुद्दाम येथून दूर निघून गेलास हे तर मी लगेचच ओळखले. कारण तुला येथे घडणाऱ्या गोष्टींत प्रत्यक्ष सहभागी व्हायचे नव्हते. होय ना? मला ते कळले. पण मीही जाणूनबुजूनच तुझ्या जाण्याला विरोध केला नाही. मनात म्हटले ‘एका अर्थी तू येथे नाहीस हे बरेच आहे. त्यामुळे सर्वकाही व्यवस्थित व निर्विघ्नपणे पार पडेल.’

अरे कृष्णा, तुला काय सांगू, सर्व काही अगदी तसेच झाले. सुभद्रा त्या यतीची भेट घेण्याला तयार झाली आणि प्रथम भेटीतच तिची त्या यतीवर पूर्ण श्रद्धा बसली. परंतु खरी थोरवी त्या यतीचीच आहे. त्या विशुद्ध व विशाल अंतःकरणाच्या महात्म्याने सुभद्रेचे मन मोकळे केले आणि तिचे मनोगत जाणून घेतले. सुभद्रेच्या मनात असलेल्या प्रेमभावनेतील खरेपणही त्या यतीने ओळखले. एवढेच नव्हे, तर त्या प्रेमाचे महत्त्व त्या यतीनेच मला समजावून सांगितले आणि ‘सुभद्रेच्या मनातील प्रेमभावनेचा आदर करून त्याची पूर्ती करा’ असे मार्गदर्शनही



त्या यतीनेच मला केले. त्याच्या सांगण्यामुळे मी एवढा प्रभावित झालो, की माझे पूर्णपणे मतपरिवर्तन झाले आणि मी त्याचा शब्द प्रमाणच नव्हे तर ती माझ्यासाठी शिरसावंद्य आज्ञाच मानली.

कृष्णा, पण एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव, की या सर्वाचे श्रेय केवळ एका व्यक्तिलाच आहे आणि ती व्यक्ती म्हणजे ही रूक्मिणी होय. या प्रसंगात रूक्मिणीने जो समजूतदारपणा दाखवला ना, तो आपण सर्वांनीच आणि विशेषतः तूच, शिकून घेण्यासारखा आहे. दुसऱ्याला आधी समजून घेणे आणि नंतर त्याला समजावून सांगणे, या दोन्ही गोष्टी रूक्मिणीकडून अगदी सहज स्वभावाने घडतात. तिच्या वागण्याबोलण्यात अजिबात कृत्रिमता नसते तर सर्वांविषयी आपलेपणा असतो. सर्वांच्या भल्याचाच नेहमी विचार असतो आणि त्यासाठीचे प्रयत्नही रूक्मिणीकडून सहजतेने घडत असतात. त्यासाठी ती आधी प्रेमाने दुसऱ्याचे मन वश करते आणि मग कुशलतेने त्या मनाला योग्य मार्गाकडे वळवते. हेही सर्व ती एवढ्या हळुवारपणे करते की त्यामुळे कोणाच्याही मनाला कसलाही त्रास असा जाणवतसुद्धा नाही. हे सर्व रूक्मिणीला कसे जमते याचे मला सुद्धा एक कोडेच वाटते.

सुभद्रेच्या जीवनातील व आपल्या कुटुंबातीलही हा नाजूक प्रश्न रूक्मिणीने ज्या पद्धतीने हाताळला व सोडवला त्याला तर तोडच नाही. प्रथम रूक्मिणीने त्या यतीची व्यक्तिशः भेट घेतली आणि त्याच्या माहात्म्याविषयी खात्री करून घेतली. स्वतःची श्रद्धा बसल्यावर मग रूक्मिणीने त्या यतीची भेट घेण्याविषयी सुभद्रेचे मन वळवले आणि सुभद्रेला स्वतः त्या यतीच्या दर्शनाला घेऊन गेली. तेथेही रूक्मिणीनेच सुभद्रेला तिचे मन मोकळे करून त्या यतीची संवाद करण्यास उद्युक्त केले. यतीच्या विषयी सुभद्रेच्याठायी विश्वास निर्माण झाला आहे याची खात्री पटल्यावर रूक्मिणी माझ्याकडे आली. सुभद्रेच्या विवाहासंबंधी त्या यतीचे मार्गदर्शन घेण्यासाठी रूक्मिणीने माझेही मन वळवण्यात जे यश मिळवले ना, ती तर तिची कमालच आहे. कारण कृष्णा, तू हे जाणूनच आहेस की माझ्या भूमिकेपासून मला वळवणे हे किती कठीण आहे. जे तुलाही जमू शकले नाही ते या रूक्मिणीने करून दाखविले हे लक्षात ठेव आणि म्हणूनच मला रूक्मिणीचे जास्त कौतुक वाटते. विशेषतः तिने हे सर्व ज्या पद्धतीने केले त्याला तर दुसऱ्या कशाचीच सर नाही. बरे, त्यात तुझ्यासारखे काहीही कारस्थान नाही. ना त्यात काही कपट, ना त्यात कसली लबाडी. सर्व कारभार कसा अगदी स्वच्छ व अगदी


स्पष्ट. रूक्मिणीच्या निष्कपट व निर्मळ मनाचेच हे लक्षण आहे. त्यामुळेच या सर्वांची परिणती सर्वांच्याच आनंदात झाली हे मुख्य व महत्त्वाचे आहे. कळले ना?

कृष्णा, त्याचबरोबर त्या यतीचेही मला वारंवार स्मरण होत आहे. काय त्याचे ते वैराग्य! काय ते त्याच्या मुखावरील ज्ञानतेज! आणि त्याहीपेक्षा काय त्याची ती मधुर वाणी! सर्वच खरोखरी अत्यंत अद्‌भूत होते एवढे मात्र खरे. त्याहीपेक्षा जेव्हा तो यती खऱ्या प्रेमाचे माहात्म्य सांगत होता, तेव्हा ते ऐकताना मी तर अगदी मंत्रमुग्धच होऊन राहिलो होतो. त्यावेळेस त्या यतीच्या ठायीचे असलेले प्रेमच जणू त्याच्या शब्दातून प्रगट होत होते असेच मला जाणवले. अरे कृष्णा, त्यावेळेस तू तेथे हजर असावयास हवा होतास. म्हणजे त्या यतीविषयी शंका घेतल्याबद्दल तुलाही तुझी चूक कळून आली असती. आता यापुढे तरी काळजी घे आणि योग्य तो धडा घे. कोणाविषयीही उगाचच शंका कुशंका घेण्याआधी नीट खात्री करून घेत जा. माझ्याशी नाही तरी निदान आधी रुक्मिणीशी तरी बोलण्याचे करून, मगच काय ते मत बनवायचे अशी सवय तुझी तूच तुला लावून घे. म्हणजे अशी पश्चात्ताप करण्याची वेळ तुझ्यावर येणार नाही. समजले ना?"

बलरामाचे असे बोलणे चालू असताना कृष्ण रुक्मिणीकडे हळूच बघत होता, तेव्हा रुक्मिणी कृष्णाकडे बघून मिश्कील हास्य करीत होती. कृष्ण काय ते मनातल्या मनात सर्व समजला. हा सर्व खेळ रुक्मिणीचा आहे हे कृष्णाने ओळखले आणि त्याला रुक्मिणीचे अत्यंत कौतुक वाटले. परंतु त्या वेळेस त्या ठिकाणी तसे काहीही न दर्शवता कृष्ण स्वस्थच राहिला. मात्र बलरामाला उद्देशून कृष्ण म्हणाला,

"दादा, तुमचे म्हणणे बरोबर आहे. यापुढे मी निश्चितच काळजी घेईन. कोणाविषयीही असे आधीच एकदम बरेवाईट मत बनवण्याची चूक माझ्याकडून यापुढे होणार नाही. त्याआधी मी निश्चितच रुक्मिणीशी बोलणे करीन. माझी पत्नी एवढी समजूतदार व चतुर आहे हे तर मी विसरूनच गेलो होतो. पण तिच्या या गुणांचा आता मी नेहमीच उपयोग करून घेईन याची तुम्ही खात्री बाळगा. तुम्हाला माझ्यामुळे जो मनस्ताप झाला त्याबद्दल मात्र मी तुमची क्षमा मागतो."

असे म्हणून कृष्णाने आपले दोन्ही हात जोडून व कमरेत थोडेसे वाकून बलरामाला नमस्कार केला. वाकलेल्या स्थितीतूनच कृष्णाने रूक्मिणीकडे हळूच



तिरक्या दृष्टीने पाहून आपले डोळे मिचकावले आणि किंचित हास्य केले. कृष्णाचा तो खट्याळपणा पाहून रूक्मिणीलाही हसू आले पण तिने स्वतःला सावरले आणि तिचा गंभीर चेहरा कायम ठेवला. बलरामालाही कृष्णाच्या त्या नमस्काराच्या कृतीची मनापासून गंमत वाटली. त्याने पुढे येऊन कृष्णाचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले आणि त्याच्या पाठीवर मुद्दामहूनच जरा जोराने थोपटले. त्यावर कृष्णासह सर्वच जण मोकळेपणाने हसले. तेव्हा कृष्णाला उद्देशून बलराम म्हणाला,

"अरे कृष्णा, ही युक्ती मात्र तुला चांगलीच जमलेली आहे. आधी जाणूनबुजून चूक करायची आणि तुझी ती चूक पकडली गेली किंवा अंगाशी आली की क्षमा मागून लगेच मोकळेही व्हायचे. पण तुझ्या या युक्तीला मी मुळीच फसत नाही हे मात्र लक्षात ठेव. शेवटी मोठा भाऊ या नात्याने तुझ्यासारख्या लहान भावाला सांभाळून घेणे हे माझे कर्तव्यकर्मच आहे. तसा माझा स्वभावही आहे, हे तू जाणून आहेस आणि माझ्या स्वभावाचा तू नेहमीच पुरेपूर फायदाही उठवीत असतोस हेही मला ठाऊक आहे. असे हे चालायचेच. पण घडलेल्या प्रसंगातून तू शिकून मात्र घे म्हणजे झाले. असो.

कृष्णा, काही वेळा वाईटातून चांगलेही निघते असे जे म्हणतात ते खरेच आहे. कारण या सर्वातून एक सर्वात महत्त्वाची गोष्ट घडली आणि ती म्हणजे आपल्या सुभद्रेचा विवाह ठरला. तिला मनपसंत पती मिळाला आणि आपल्यालाही एक सद्‌गुणी, सत्त्वशील व पराक्रमी असा जामात मिळाला. तेव्हा आता आपण सुभद्रेच्या विवाहाच्या तयारीला त्वरित सुरूवात करूया. तू प्रथम अर्जुनाशी संपर्क साध आणि त्याला ही सुवार्ता कळव. त्यानंतर मी स्वतः धर्मराजाची व कुंतीची भेट घेईन आणि सुभद्रा व अर्जुन यांच्या विवाहाचा प्रस्ताव त्यांच्यासमोर ठेवीन. मला दुर्योधनाचीही समजूत घालावी लागणार आहेच. अर्थात दुर्योधन अत्यंत नाराज होईल हे मला ठाऊक आहे आणि तेही साहजिकच आहे म्हणा. परंतु दुर्योधन माझ्या शब्दाबाहेर जाणार नाही याचीही मला खात्री आहे. कारण शेवटी तो माझा शिष्य आहे. असो. आता ज्याने त्याने ताबडतोब आपापल्या कामाला लागा."


बलरमाच्या बोलण्यातील उत्साहाने सर्वांनाच जोर आला. सर्वांनी हसून बलरामाच्या बोलण्याला दुजोरा दिला आणि सर्वजण आपापल्या महालाकडे निघून गेले. कृष्णही रूक्मिणीसह त्याच्या महालात आला आणि एका मंचकावर शांतपणे बसला. त्याने रूक्मिणीलाही स्वतःच्या शेजारी बसवून घेतले आणि तिचा हात आपल्या हातात हळूच धरून ठेवला. खरे तर, बोलण्यासारखे भरपूर होते. पण

काही बोलण्याची आवश्यकता त्या उभयतांनाही वाटतच नव्हती. त्यांच्यातील हस्तस्पर्शातूनच सर्व काही त्यांना जाणवत होते, जे शब्दांच्याही पलीकडचे होते. कृष्णाच्या नजरेतून ओसंडणाऱ्या प्रेमकौतुकात रूक्मिणी मनसोक्त नहात होती आणि रूक्मिणीच्या नजरेतून भरून वाहणाऱ्या भक्तिभावाने कृष्ण प्रसन्नचित्त होत होता. क्षणार्धात् कृष्ण व रूक्मिणी यांच्या मुखावर मोकळे हास्य विलसले आणि ती उभयता आनंदाच्या एकाच अनुभवात एकरूप होऊन राहिले.

हे लक्ष्मी, पुढे यथावकाश सर्व गोष्टी घडत गेल्या. कृष्णाने अर्जुनाची भेट घेतली असता अर्जुनाने घडलेली सर्व घटना आणि त्यातील रूक्मिणीची योजना याविषयी कृष्णाला अगदी भरभरून वर्णन करून सांगितले. रूक्मिणीविषयी बोलताना तर अर्जुनाला किती बोलू व कसे बोलू असेच झाले होते. रूक्मिणीविषयीचा अत्यंत कृतज्ञतेचा भाव अर्जुनाच्या शब्दाशब्दातून व त्याच्या मुखावरील भावातून प्रगट होऊन वाहत होता. ते ऐकताना कृष्णालाही अगदी ‘धन्य, धन्य’ असेच वाटत होते. परंतु त्याविषयी जास्त काहीही न बोलता कृष्णाने अर्जुनाची मात्र भरपूर प्रशंसा केली आणि त्याची कौतुकाने पाठ थोपटली.

बलरामाने स्वतः कुंती व धर्मराज यांची भेट घेऊन ‘सुभद्रेचा अर्जुनाची पत्नी म्हणून स्वीकार करावा’ अशी विनंती केली. जुळणाऱ्या सोयरिकीचा अत्यंत आनंद धर्मराज व कुंती यांनाही झाला आणि त्यांनीही विवाहाला तात्काळ अनुमती दिली. बलरामाने दुर्योधनालाही भेटून त्याला सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितली. दुर्योधन केवळ नाराजच झाला असे नाही तर त्याच्या मनाचा अत्यंत जळफळाटही झाला. परंतु स्वस्थ बसण्यापलीकडे काही करणे दुर्योधनालाही शक्यच नव्हते. परंतु त्याच्या मनातील किल्मिष मात्र तसेच राहिले आणि दुर्योधनाने त्याच्या स्वभावानुसार त्या गोष्टीचा मनात कायमचा डूक धरून ठेवला.

प्रत्यक्ष सुभद्रा व अर्जुन यांच्या विवाहाचा अतिशय वैभवशाली असा सोहळा मथुरेमध्ये मोठ्या धूमधडाक्याने पार पडला. यादवकुळातील व कुरूकुळातील सर्व थोर थोर मंडळींनी वधू-वरांना उत्तमोत्तम आशीर्वाद दिले. अनेक नामवंत राजेही त्या विवाहाला स्वतः जातीने उपस्थित होते. समस्त राजांनी अनेक प्रकारचे भारी भारी नजराणे वधूवरांना देऊन शुभेच्छा दिल्या. सर्व सोहळयात कृष्ण व रूक्मिणी हे स्वतः सर्व व्यवस्था जातीने पाहत होते. त्यामुळे कुठेही कसलीही कमतरता पडण्याची सुतराम शक्यता नव्हतीच. सर्व राजे मंडळी, पाहुणे मंडळी व व्याही मंडळी तृप्त व संतुष्ट झाली. त्या सर्वांनाही यथायोग्य आहेर बलराम व रेवती यांच्याच हस्ते देण्यात आला. जामात म्हणून अर्जुनालाही केवढे तरी आंदण



देण्यात आले आणि सुभद्रेचेही अगदी सालंकृत कन्यादान करण्यात आले. सुभद्रेला बरोबर घेऊन अर्जुन आपली माता व सर्व बंधू यांच्यासह हस्तिनापूरला परतला. मथुरेतही सर्वजण राजवाड्यात परत आले. कृष्ण व रूक्मिणी हे दोघेही त्यांच्या महालात परत आले आणि शयनमंचकावर शांतपणे पहुडले. अत्यंत दमलेले व भागलेले असूनही त्या उभयतांच्या चेहऱ्यावर अत्यंत समाधानाचा व कृतकृत्यतेचा भाव होता.”

बोलता बोलता नारदाचे बोलणे थांबले आणि त्यच्याही मुखावर अत्यंत समाधानाचा भाव पूर्णपणे पसरून राहिला. नारदाचे मुख एका विशेष आनंदाने भरून राहिलेले दिसत होते. लक्ष्मीची अवस्थाही काही नारदापेक्षा वेगळी नव्हती. त्य अवस्थेचीच परिणती लक्ष्मीकडून तिचा आनंद व्यक्त होण्यामध्ये झाली.

“अरे नारदा, तुझ्या भक्तिगायनामुळे पुन्हा एकदा भक्तिभावाने आनंदाचा कळसच गाठला. आत्यंतिक अशा सगुण प्रेमामुळेच भक्तीचा वेलु गगनावर जातो आणि आनंदाच्या रूपाने फळतो हे तर खरेच आहे. परंतु त्या फळात भरभरून राहिलेल्या प्रेमरसाचे जेव्हा सेवन होते, तेव्हा कृतार्थतेचा अनुभव तर येतोच, पण त्याचबरोबर अत्यंत खोलवर असलेल्या प्रेममुळाचेही स्मरण कृतज्ञभावाने तेवढ्याच सहजतेने होते. तरीही ऐक्यभावाचा अनुभव आणून देणाऱ्या भक्तिभावाची थोरवी मात्र नित्य जाणवत राहते. कारण प्रेममूळ हे जरी अप्रगट असले तरी भक्तिरूपाने तेच प्रेम प्रगट होत राहते आणि म्हणूनच ईश्वराशी ऐक्य पावू शकते. ईश्वर हा मूलतः व स्वभावतः आनंदस्वरूपच असल्यामुळे त्याच्याशी एकरूप झालेला भक्तही त्याच आनंदाचा अनुभव घेतो. हे एक अत्यंत अद्भुत असे गुह्यच आहे आणि तेच गुह्य तुझ्यासारख्या हरीभक्तांच्या रूपाने साकार झालेले असते. त्या गुह्य अनुभवाचे गुजच तुझ्याकडून घडणाऱ्या भक्तिगायनाद्वारे प्रगट होत असते. ते गुज मनाला भावते खरे, तरी ते गुह्य प्रत्यक्ष अनुभवल्यानेच आनंदाचा अनुभव येणार आहे हे सत्य आहे.

हे नारदा, सुभद्रा व अर्जुन यांच्या विवाहाच्या निमित्ताने रुक्मिणीच्या भक्तिभावाचे आणि कृष्ण व रुक्मिणी यांच्या एकरूपतेचेच प्रगटीकरण झाले. त्यानेच माझ्या अंतराचा ठाव घेतला आहे. त्या प्रसंगात तर रुक्मिणीच्या भक्तिभावाचे अनेकविध पैलू प्रगट झाले. प्रसंगावधान राखून आणि बुद्धीकौशल्य व चतुरता दाखवून, रुक्मिणीने कृष्णाच्या अनुपस्थितीतही कृष्णाने योजलेले कार्य त्याच्या मूळ हेतूसह यशस्वीपणे पूर्णत्वास नेले. हेच तर भक्तिभावाचे खरे लक्षण आहे. त्या भक्तिभावाने कृष्णाचे अंतःकरण प्रसन्न झाले यात काहीच नवल नाही.

कारण रुक्मिणीचा भक्तिभाव हाही त्याच गुणवत्तेचा होता. परंतु त्या भक्तिभावाचे मूळ जे कृष्णप्रेम, ते रुक्मिणीच्या अंतःकरणात अत्यंत खोलवर होते आणि त्याची जाणीव रुक्मिणीच्याठायी पूर्णपणे होती. त्यामुळे कर्तृत्वाच्या अहंकाराला रुक्मिणीच्या ठिकाणी जरासुद्धा वावच नव्हता.

हे नारदा, रुक्मिणीच्या या यशावरची कृष्णाची प्रतिक्रिया मात्र अत्यंत बोलकी अशीच होती. कृष्ण त्यावर काहीच बोलला नाही हीच त्याची प्रतिक्रिया अगदी सहज व म्हणून खरी होती. बलरामाने केलेले रुक्मिणीचे कौतुक ऐकून कृष्णाने रुक्मिणीकडे पाहून फक्त एक स्मितहास्य केले आणि त्यातच रुक्मिणीला कृष्णाकडून सर्व सर्व मिळाले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, कृष्णाने घडलेल्या प्रसंगाचा तपशीलही रुक्मिणीकडून जाणून घेण्याचा जराही प्रयत्न केला नाही आणि रुक्मिणीनेही तो तपशील कृष्णाला सांगण्याचा प्रयत्न केला नाही. तशी आवश्यकता त्या उभयतांना मुळीच वाटली नाही यातच सर्व काही आले. रुक्मिणीचा भक्तिभाव कृष्णाला पावला आणि कृष्णाचा आनंद रुक्मिणीला पावला याचेच ते लक्षण होय. रुक्मिणी ही कृष्णाची 'आत्मसखी' असल्याचा अनुभव कृष्णाला आला. कृष्ण हा रुक्मिणीचा 'प्रिय सखा' आहे याची प्रचिती तर रुक्मिणीच्याठायी नित्यच होती.

हे नारदा, परंतु या प्रसंगाला निमित्त झालेले अर्जुन व सुभद्रा यांचाही विचार माझ्या मनात येत आहेच. या प्रसंगात त्या दोघांना निश्चित काय मिळाले आणि त्यांना काय कळले, हा सुद्धा एक विचार करण्याचा प्रश्न शिल्लक राहतोच. त्या उभयतांच्या परस्परांवरील प्रेमाची पूर्ती झाली आणि त्यांना एकमेकांच्या रूपाने मनपसंत असा जीवनाचा जोडीदार मिळाला. परंतु त्यासाठी रुक्मिणीने केलेले प्रयत्न आणि त्यामागील असलेली कृष्णाची प्रेरणा याचे महत्त्व त्यांनी ओळखले की नाही? कृष्णाचा संकल्प आणि त्याचा ध्यास धरून रुक्मिणीने केलेली त्याची पूर्ती, ही सुभद्रा व अर्जुन यांच्या लक्षात आली की नाही? रुक्मिणी व कृष्ण यांच्याकडे बघण्याची त्या दोघांची दृष्टी तरी बदलली का? विशेषतः कृष्णाचे थोडेतरी माहात्म्य त्यांना जाणवले का? का केवळ कृष्णाविषयीची कृतज्ञताच त्यांच्याठिकाणी शिल्लक राहिली? कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य व रुक्मिणीचा भक्तिभाव प्रगट होण्यासाठी अर्जुन व सुभद्रा केवळ निमित्तमात्रच ठरले, की


त्यांनाही त्यांच्या पुढील जीवनात कृष्णाची खरी थोरवी व त्याच्या भक्तीचे माहात्म्य अनुभवण्याची संधी मिळाली आणि तसा अनुभवही त्यांनी घेतला? नारदा, माझ्या मनात एवढे प्रश्न निर्माण होण्याचे एकच कारण आहे, की मला असे अगदी मनापासून वाटते की ज्यांना जीवनात कृष्णाचे प्रेम व मार्गदर्शन यांचा लाभ अत्यंत भाग्याने झाला, त्यांना कृष्णाचे माहात्म्य जाणून त्याची भक्ती करण्याची केवढीतरी सुवर्णसंधीही मिळालेली होती. त्या संधीचा लाभ उठवून जर कोणाकडून कृष्णाची भक्ती घडली असेल आणि कोणी कृष्णाशी ऐक्य पावला असेल तर त्याला केवढा तरी आनंदाचा अनुभव मिळाला असेल, या विचाराने मलाच अतिशय आनंद होत आहे."

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने आपले नेत्र मिटून घेतले आणि तो काही काळ तसाच शांत बसून राहिला. थोड्यावेळाने नारदाने आपले नेत्र अलगदपणे उगडले. त्याच्या नेत्रात व मुखावरही एक प्रकारच्या गांभीर्याचाच भाव दिसत होता. तीच गंभीरता नारदाच्या बोलण्यातून व वाणीतून प्रकर्षाने प्रगट होऊ लागली,

"हे लक्ष्मी, तुझ्या मनात निर्माण होणारे प्रश्न हे अत्यंत काळजीपोटी आलेले आहेत हे मला पूर्णपणे ठाऊक आहे आणि तुला वाटणारी काळजी हीसुद्धा योग्यच व साहजिकच आहे. कृष्णासारख्या व्यापक अवतारचरित्रांमुळे अनेकांना कृष्णाचा सहवास, मार्गदर्शन व प्रेम याचा लाभ होतो हे खरेच आहे. परंतु त्यातून कृष्णाविषयी प्रेम निर्माण होणे आणि तेही भक्तिभावाचे प्रेम ही गोष्ट मात्र दुर्मिळच आहे. तेवढ्या सहजासहजी ते प्रेममूळ निर्माण होऊ शकत नाही हे खरेच आहे. कृष्णाच्या सहवासात लाभलेल्या प्रेमाने आणि जीवनात मिळालेल्या त्याच्या मार्गदर्शनाने थोडावेळ कृष्णाविषयी प्रेम निर्माण होते खरे, परंतु ते प्रेम अंतरात खोलवर जाऊन तेथे त्या प्रेमाने मूळ धरणे ही गोष्ट मात्र वाटते तेवढी सोपी नाही. खरे तर, ती गोष्ट अत्यंत कठीणच आहे. अर्थात् अशक्यही नाही, कारण ती तत्त्वतः सत्य आहे. पण सर्वसामान्य जीवाच्याठिकाणी त्याचे मन आणि त्याचे अंतर यामधील मार्ग अत्यंत बिकट आहे. मनाठायी वासनेचे मूळ आहे आणि ते चंचलही आहे. बुद्धीच्याठायी अज्ञान आहे आणि तिला स्वतःच्या अर्धवट ज्ञानाचा अहंकारही आहे. चित्ताच्याठायी संसारातील अनेक गोष्टींचे सुप्त ध्यास आहेत आणि चित्त असद्वृत्तीने ग्रस्त आहे. अशा परिस्थितीत सगुण प्रेमाचा थोडावेळ अनुभव येऊनही

ते प्रेम जास्त वेळ टिकाव धरू शकत नाही. मग अंतरात खोलवर जाऊन ते मूळ धरणे हे तर दूरच राहिले. बऱ्याच जणांच्या बाबतीत असेही घडते, की प्रसंग घडून गेल्यानंतर काळाच्या ओघात त्यांना त्या प्रसंगाचेही विस्मरण होते. कारण त्यांच्या मनावर संसाराचा जबरदस्त प्रभाव असतो. पुढे संसारभावाच्या वर्चस्वामुळे सहवासही तेवढासा घडू शकत नाही आणि जरी सहवास झाला तरी प्रापंचिक दृष्टीमुळे माहात्म्याचा विसर पडून ते जाणवेनासे होते. अशावेळी खरे तर व्यक्तिगत प्रेमाचीच कसोटी लागते. पण त्या व्यक्तिगत प्रेमाचे मूळही खोलवर नसल्यामुळे ते प्रेम प्रसंगी कमीच पडते. काहीवेळा तर साधा कृतज्ञभावही राहू शकत नाही, एवढा स्वतःच्या मनातील विचारांचा व विकारांचा जोर असतो.

हे लक्ष्मी, या दृष्टीने पाहिले तर सुभद्रा व अर्जुन यांना कृष्णप्रेमाचा लाभ किती व कसा झाला, हा एक निश्चितच अभ्यासाचा विषय आहे. त्यामध्ये सुभद्रेचा भाव हा तर अत्यंतच मर्यादित होता. कृष्णाची भगिनी या नात्याने तिला कृष्णाचे प्रेम अगदी लहानपणापासूनच अत्यंत सहजपणे मिळत राहिले. त्याला दोनच गोष्टी कारणीभूत होत्या. एक म्हणजे सुभद्रेचे भाग्य आणि दुसरे म्हणजे कृष्णाचा स्वभाव. त्यामुळे सुभद्रेला कृष्णाचे नात्यातले प्रेम पुढेही आपसूकच मिळत राहिले. अर्जुनासारखा कृष्णाचा परममित्र हा सुभद्रेला पती म्हणून मिळाल्यावर तिचे भाग्य दुणावलेच आणि कृष्णाचे मार्गदर्शन, रक्षण, आधार व प्रत्यक्ष मदत यासारख्या गोष्टींचा लाभ पुढील जीवनात अर्जुनाबरोबर सुभद्रेलाही सहजपणे मिळत राहिला. परंतु त्या कृष्णाचे खरे माहात्म्य मात्र सुभद्रेला कधीच जाणता आले नाही. खरे तर, सुभद्रेला ते जाणून घेण्याचे कारणच पडले नाही. कारण सुभद्रेला तसा कधी प्रश्नच आला नाही. कृष्णाकडे केवळ बाह्यांगानेच बघत रहाण्याच्या सवयीमुळे कृष्णाचे अंतरंग सुभद्रेच्या कधी दृष्टीसच आले नाही. किंबहुना असे काही अंतरंग किंवा अंतःकरण म्हणून असते हे सुभद्रेच्या गावीही नव्हते. अर्जुनाला पती म्हणून नित्य अनुसरणे हीच भूमिका सुभद्रेची निश्चित झालेली होती. सुभद्रेचा कृष्णाशी संबंधसुध्दा अर्जुनाच्या द्वारा व अर्जुनाच्यामुळे जेवढा येत होता, तेवढ्यापुरताच मर्यादित झालेला होता. ही गोष्ट जेवढी बाह्य परिस्थितीमुळे घडत होती त्याहीपेक्षा जास्त सुभद्रेच्या मनःस्थितीमुळे घडत होती. कारण कृष्णाशी काही स्वतःचे वेगळे प्रेमाचे संबंध निर्माण करावेत अशी आवश्यकता कधी सुभद्रेला जाणवलीच नाही. मुळात तिची तशी मानसिकताही नव्हतीच. सुभद्रा तिच्या संसारात पूर्णपणे रमलेली होती आणि तिच्यापरीने ती सुखीही होती. कृष्णाचा आधार व रक्षण हे तर सुभद्रेने कायमचे गृहीतच धरलेले होते. त्यामुळे सुभद्रेला



कशाचीही व कसलीही काळजी करण्याचे कारणच नव्हते. खरे तर, सुभद्रा स्वास्थ्याचे सुख पूर्णपणे अनुभवीत होती.

हे लक्ष्मी, अर्जुनाची गोष्ट सुभद्रेपासून अत्यंत वेगळी होती. कृष्णाचे व त्याचे बऱ्याच काळापासूनचे प्रेमाचे संबंध होते. अत्यंत दीर्घ काळाची अशी त्यांची मैत्री होती. त्यामध्ये अर्जुनाच्या विवाहानंतर बाधा येण्याचे काहीच कारण नव्हते. उलट, अर्जुनाला तर नवीन नातेसंबंधामुळे अधिकच लाभ झाला. अनेक कौटुंबिक प्रसंगांमुळे व कारणांमुळे अर्जुन व कृष्ण यांना एकमेकांना भेटण्यासाठी अधिकच संधी उपलब्ध होऊ लागली आणि त्यांनीही त्या संधीचा पुरेपूर लाभ उठवला. परंतु कृष्णाचे माहात्म्य न जाणल्यामुळे अर्जुनाठायी कृष्णाविषयी व्यक्तिगत प्रेम असूनही ते प्रेम उंची गाठू शकले नाही. ते प्रेम केवळ व्यक्तिगत पातळीवरच राहिले. अर्जुनाने कृष्णप्रेमाचे सुख भरपूर अनुभवले खरे, परंतु कृष्णाच्या भक्तीचा आनंद मात्र अर्जुनाला अनुभवता आला नाही. अर्थात् त्यामध्ये अर्जुनाचा काहीच दोष नव्हता. कारण निरनिराळ्या प्रसंगातून प्रगटणारे कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य पाहण्याची दृष्टी अर्जुनामध्ये नव्हती, त्याला अर्जुन तरी काय करणार? तशी दृष्टी मुळापासूनच कोणालाही असणे शक्यच नसते. ती दृष्टी कोणातरी द्यावी लागते. बरे, कृष्ण स्वतःहून त्यासंबंधी अर्जुनाशी काही बोलेल म्हणावे तर तशीही संधी नव्हती. कारण कृष्णाचा तो स्वभाव नव्हता. त्यामुळे कृष्णाच्या माहात्म्याविषयी अर्जुन अनभिज्ञच राहिला.


हे लक्ष्मी, या व्यक्तिगत प्रेमाची सुद्धा एक मोठी गंमत असते. जोपर्यंत आपल्या मनासारख्या गोष्टी घडत असतात ना, तोपर्यंत या प्रेमाची चलती असते. त्यामध्येही व्यक्तिगत प्रेम हे ‘दुसऱ्याचे आपल्यावरील प्रेम’ या पातळीपुरतेच मर्यादित असते, तेव्हा तर जास्तीत जास्त अपेक्षा दुसऱ्याकडूनच राहतात. ‘दुसऱ्यानेच आपल्या मनासाखे करावे, दुसऱ्यानेच आपली काळजी घ्यावी आणि त्यानेच आपल्याला नेहमी सुखवावे’ याचीच एखाद्याला एवढी सवय होते, की ‘आपणही दुसऱ्यासाठी कधीतरी काहीतरी करावे’ याचेही त्याला विस्मरणच होते. त्यातूनही जर दुसऱ्याकडून यदा कदाचित आपल्या अपेक्षांची पूर्ती काही कारणामुळे होऊ शकली नाही, तर मन नाराजच होते आणि काही वेळेला रागावतेसुद्धा.

दुसऱ्याच्या अडचणी समजून घेण्याला मन तयारच नसते. तेव्हा या व्यक्तिगत प्रेमाला स्वार्थी प्रेमच म्हणावे लागेल.

हे लक्ष्मी, परंतु 'व्यक्तिगत प्रेम' जेव्हा 'आपले दुसऱ्यावरील प्रेम' या स्तरावरील असते तेव्हा त्या प्रेमाची अंगं व रंग अत्यंत वेगळेच असतात. त्या प्रेमामध्ये दुसऱ्याला जसे सुखवणे असते, तसेच दुसऱ्याच्या हिताचीही अत्यंत काळजी असते. दुसऱ्याला अडचणीच्यावेळी जसे मार्गदर्शन करणे असते, तसेच त्याला प्रत्यक्ष मदत व साथ देणेही असते. दुसऱ्याच्या सुखदुःखाच्या प्रसंगात जसे बाह्यांगाने सहभागी होणे असते, तसेच त्यामध्ये मनापासून समरस होणेही असते. असे दुसऱ्यावर स्वतःसारखे व स्वतःएवढे व्यक्तिगत प्रेम असणे हेच प्रेम खरे होय आणि असे प्रेम हे ईश्वरीच असते हेही खरेच आहे. तेव्हा कृष्ण व अर्जुन यांचे जरी परस्परांवर व्यक्तिगत प्रेम असले तरी त्यामध्ये मूलभूतच फरक होता. कृष्णाचे प्रेम हे साहजिकच ईश्वरी प्रेम होते आणि त्याचे तसे प्रेम खरे तर सर्वांवरतीच होते. मग ते कोणाला कळो, न कळो. कारण कृष्ण हा तर प्रेमस्वरूपच होता. अर्जुनाचे कृष्णावरील प्रेम हे मैत्रीच्या पातळीवरील होते. परंतु कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य जाणत नसल्यामुळे अर्जुनाच्या प्रेमाची पातळी उंचावत नव्हती. मैत्रीच्या प्रेमामध्ये बरोबरीचे नाते असल्यामुळे त्यामध्ये वेळप्रसंगी नाराजी, रूसवे फुगवे किंवा मतभेदही संभवतात. परंतु प्रेमाची जागृती असल्यामुळे त्या गोष्टी टोकाला जात नाहीत आणि शेवटी सर्व गोडीगुलाबी होते. परंतु या मतभेदांची सीमारेषा जर यदाकदाचित् ओलांडली गेली, तर मात्र मनाठायी एक प्रकारचा हट्टीपणा निर्माण होतो आणि मग गोष्टी अतिशय कठीण होऊन बसतात.

***

हे लक्ष्मी, तुला हे ऐकून नक्कीच नवल वाटेल की असाच प्रसंग एकदा कृष्ण व अर्जुन यांच्यामध्ये घडला. अनपेक्षितपणे ते दोघे एकमेकांच्या विरूद्ध पक्षात उभे राहिले. कृष्ण अर्थातच नेहमीप्रमाणे धर्माच्या व सद्भावाच्या बाजूने उभा राहिला होता. कारण तोच तर कृष्णाचा स्वधर्म होता आणि तेच तर त्याचे कार्य होते. सद्धर्माची स्थापना व अधर्माचे उच्चाटन या ईश्वरीकार्यासाठीच तर कृष्णाचे सारे जीवन होते. अर्जुन नकळतपणे विरूद्ध पक्षाच्या बाजूने उभा राहिला. त्याच्याकडून ते अज्ञानाने घडले हे खरे आहे. परंतु त्याने घेतलेला पक्ष अधर्माचा



आहे हे कळून चुकल्यावरही अर्जुन त्याचा पवित्रा बदलायला तयारच होईना. कृष्णाने अर्जुनाला सर्व समजावून सांगून त्याची समजूत काढण्याचा आटोकाट प्रयत्न केला. परंतु अर्जुन काही मानायला तयारच होईना एवढा तो हट्टाला पेटला होता. मग कृष्णाचाही काही इलाजच चालेना. त्याने घेतलेला धर्माचा पक्ष सोडण्याचा प्रश्नच निर्माण होत नव्हता आणि अर्जुन त्याने घेतलेला पक्ष सोडायला तयार नव्हता. शेवटी त्याची परिणती कृष्ण व अर्जुन यांच्यात युद्ध होण्यामध्ये झाली.”


कृष्णचरित्रातील हा प्रसंग ऐकताना लक्ष्मी आधीपासूनच जरा सतर्क झाली होतीच. सुरूवातीला जेव्हा नारद सामान्य व्यक्तिगत प्रेम व ईश्वरी व्यक्तिगत प्रेम याविषयी बोलत होता आणि त्यातील फरक दाखवत होता तेव्हाच लक्ष्मीच्या मनाला काहीतरी कुणकुण लागू लागली होती. ‘पुढे काहीतरी कठीण प्रसंग घडला असावा आणि त्याचीच पार्श्वभूमी नारदाच्या बोलण्यातून तयार होत आहे’ हे लक्ष्मीच्या लगेचच लक्षात आले होते आणि तेव्हाच तिच्या मनाची थोडीशी चलबिचलही सुरू झालेली होती. काहीतरी मोठ्या संकटाचा प्रसंग आला असणार असा कयास लक्ष्मी मनात बांधीत होती. पण जेव्हा नारदाच्या मुखातून ‘कृष्ण व अर्जुन यांच्यात युद्ध’ असे शब्द बाहेर आले तेव्हा लक्ष्मीच्या मनाला अगदी जोरदार धक्काच बसला. त्याची परिणती म्हणजे लक्ष्मीने नारदाला हातानेच खूण करून ‘थांब, थांब’ असे सांगितले आणि आपले दोन्ही हात आपल्या कानावर ठेवले. लक्ष्मीची विचारशक्तीही एकदम कुंठितच झाली. ‘कृष्ण व अर्जुन यांच्यात युद्ध’ याची तर तिला कल्पनाच करवेना. असा विचार तिच्या मनात शिरूच शकत नव्हता आणि शिरला तरी लक्ष्मी त्या विचाराला लगेचच मनातून झटकून टाकत होती. लक्ष्मीने नारदाकडे बघून त्याला जणू नजरेनेच विचारले की ‘खरेच असे काही घडले का?’ आणि जेव्हा नारदानेही आपली मान हलवून होकारार्थी उत्तर दिले, तेव्हा मात्र लक्ष्मीचे मुख एकदम म्लान झाले. ज्या गोष्टीचा तिच्या कानावरही विश्वास बसत नव्हता, ती गोष्ट नजरेसमोरही येऊ नये म्हणून लक्ष्मीने तिचे डोळे अगदी घट्टपणे मिटून घेतले, तर तिच्या मनःचक्षूंसमोर कृष्ण व अर्जुन यांचे युद्धच दिसू लागले. म्हणून मग लक्ष्मीने भीतीने आपले डोळे लगेचच उघडले. लक्ष्मीची ही केविलवाणी अवस्था पाहून नारदाला अर्थातच तिची दयाच आली. पण तरीही थोडावेळ तो तसाच शांतपणे स्वस्थ बसून राहिला.

आवश्यक तो थोडा वेळ जाऊ दिल्यानंतर नारदाने लक्ष्मीला खूण करून काहीतरी बोलण्याची सूचना केली. कारण लक्ष्मीला बसलेल्या मानसिक धक्क्यातून बाहेर येण्याचा तोच एकमेव मार्ग होता हे नारदाला ठाऊक होते. लक्ष्मीच्याही ते लक्षात आले होतेच आणि तसा तिचा प्रयत्नही चालू होता. परंतु लक्ष्मीला ते शक्य होत नव्हते आणि काही न बोलता स्वस्थ बसणे हे तर तिला त्याहून अशक्य होत होते. शेवटी लक्ष्मीच्या मनातील बांध एकदाचा फुटला आणि तिच्या मुखातून शब्दप्रवाह बाहेर पडू लागलाच,

“अरे नारदा, तू तर मला केवढा तरी प्रचंड मानसिक धक्काच दिला आहेस आणि त्यातून मी अजूनही पूर्णपणे सावरलेले नाही हे खरे आहे. परंतु आता मी बोलल्याशिवाय माझे मन मोकळे होणे शक्य नाही हेही मला कळून चुकले आहे.

नारदा,एवढा वेळ जेव्हा तू कृष्ण व अर्जुन यांच्या मित्रप्रेमाविषयी केवढे तरी सांगत होतास तेव्हा माझे मन त्यामध्ये एवढे बुडून राहिले होते, की त्या प्रेमाचा अनुभव जणू मीच घेत आहे असेच मला वाटत होते. त्या पार्श्वभूमीवर तू अपेक्षा नसतानाच काय, अगदी कल्पनाही नसताना जेव्हा ‘कृष्ण व अर्जुन यांच्यात प्रत्यक्ष युद्धच घडले’ असे म्हणालास तेव्हा तर मी अगदी मुळापासूनच हादरले. कारण व्यक्तिगत प्रेमाचे मूळ जेथे खोल व दृढ आहे तेथे गोष्टी या थराला जाणे संभवतच नाही. फार तर काहीवेळा मतभेद होऊ शकतात किंवा थोड्यावेळचा रागही असू शकतो. परंतु युद्ध होणे म्हणजे तर फारच झाले. कारण तेथे व्यक्तिगत प्रेमाचेही मूळ उन्मळूनच पडले असाच त्याचा अर्थ होतो आणि नेमका हाच विचार मला सहन होत नाही. माझ्या मनाला त्याचा फारच त्रास होत आहे.

नारदा, कृष्ण व अर्जुन यांच्या व्यक्तिगत प्रेमातील फरकही जो तू सांगितलास, तोही माझ्या लक्षात आला आणि तो साहजिकच आहे. कृष्णाचे प्रेम हे ईश्वरी प्रेम आहे म्हणूनच ते अर्थातच उच्च पातळीवरचे आहे हे सत्यच आहे. अर्जुनाचे प्रेम हे मानवी पातळीवरचे आहे म्हणून व्यावहारिक आहे हेही खरे आहे. त्यामुळे कृष्णाचे अर्जुनावरील प्रेम हे ‘अर्जुन हा एक जीव आहे’ या मूलभूत पातळीपासूनचे तर आहेच, पण त्याचबरोबर ते व्यापकही आहे. ‘अर्जुन जीव म्हणून ईश्वराचा म्हणजेच माझाही अंश आहे’ हा सर्वश्रेष्ठ भाव कृष्णप्रेमामध्ये आहे हे मी जाणून आहे. अर्जुनाला ते कळणे कठीण होते हेही मी मान्य करते. पण म्हणून अर्जुन त्याच्या




मित्रप्रेमालाही कसा काय विसरला? ज्या मित्रप्रेमाला कृष्ण निरंतर जागला आणि त्याने नित्य अर्जुनाच्या हिताचीच काळजी वाहिली, त्या कृष्णाकडे अर्जुन शत्रू म्हणून पाहूच कसा शकला हेच मला कळू शकत नाही. अर्जुनाचे प्रेम व्यावहारिक पातळीवरचे होते हे मान्य केले तरी त्या व्यवहारामध्ये कृतज्ञता म्हणून काही भाग असतो की नाही? मला तर अर्जुनाच्या ठिकाणी ती कृतज्ञतासुद्धा दिसत नाही. अर्जुन हा कृष्णाशी कृतघ्नच झाला असेच म्हणावे लागेल आणि कृतघ्नतेला कुठलीही क्षमा नाही.

नारदा, या गोष्टीचा जेवढा म्हणून विचार करावा तेवढा त्याचा मनातील गुंता अधिकच वाढतो आहे आणि तो गुंता सोडवण्याचा जेवढा प्रयत्न मी माझ्या बुद्धीने करते आहे, तेवढी त्याची गुंतागुंत उलट जास्तच वाढत आहे. पण मला निश्चितपणे ठाऊक आहे की हा गुंता सुटणे माझ्यासाठी अत्यंत आवश्यक आहे आणि तो फक्त तूच सोडवू शकतोस हेही खरेच आहे. अर्थातच त्यासाठी आता तू जो प्रत्यक्ष घडलेला प्रसंग सांगशील तोच माझ्याकडून श्रवण होणे अत्यंत आवश्यक आहे. पण त्या श्रवणासाठी माझे मन अजून पूर्णपणे तयार झाले आहे असे मला तरी वाटत नाही. कारण हा विषय मुळातच माझ्या मनाला रूचत नाही, तेथे तो विषय माझ्या मनाला पचणे तर शक्यच नाही. पण तो विषय सेवन करणे तर आवश्यकच आहे. तो तर टाळताही येत नाही. कारण जर मी तुला असे म्हटले, की तो विषय माझ्या मनाला मानवत नाही आणि तो विषय माझ्या बुद्धीलाही मान्य होत नाही म्हणून तो तू मला सांगूच नकोस, तो प्रसंग आपण तसाच सोडून देऊया आणि त्याच्या पुढील कथाभागाकडे वळूया, तर ते तसे तुला मानवणार नाही आणि मान्यही होणार नाही. अर्थात तसे करणे हे माझ्यासाठीही योग्य नाहीच. कारण त्यामुळेच माझ्या मनाचा एक दुर्बल भाग जरी थोडा वेळ झाकला गेला, तरी ती दुर्बलता मात्र तशीच कायम राहील आणि कधीतरी अचानक ती दुर्बलता प्रगट होऊन माझ्या मनाचे स्वास्थ्य पुरते बिघडवून टाकेल. त्यापेक्षा वेळीच त्या मनाची दुर्बलता व त्या दुर्बलतेचे मूळ असलेले दोष काढून टाकणे हेच अत्यंत योग्य व आवश्यक आहे. मग त्यासाठी माझ्या मनाला थोडावेळ थोडा त्रास सहन करावा लागला तरी चालेल. त्यातच माझे हित आहे याची मला पूर्ण खात्री आहे. त्यामुळेच माझे मन हळूहळू सावरेल आणि श्रवणाचा खरा व पूर्ण आनंद अनुभवण्याच्या

स्थितीमध्ये ते निश्चितपणे येईल. तेव्हा नारदा, तू आता माझ्या मनःस्थितीचा जास्त विचार न करता प्रत्यक्ष घडलेला प्रसंग सांगण्यास त्वरित सुरूवात कर बघू.”

बोलता बोलता लक्ष्मीचा सूर बदलत राहिला आणि तो तिच्या सुरातील बदल हे तिच्या बदललेल्या मनोभावाचे द्योतक होते. सुरूवातीला तिच्या मनाला अकल्पितपणे बसलेल्या धक्क्यातून लक्ष्मी अजूनही पूर्णपणे सावरली नव्हती हे खरेच होते. परंतु त्याचबरोबर स्वतःच्या मनाची दुर्बलता झटकून टाकून वस्तुस्थितीला सामोरे जाण्यासाठी त्या मनाची तयारी करणे हे अत्यंत आवश्यक आहे, ही महत्त्वाची गोष्ट लक्ष्मीच्या लक्षात आली होती आणि त्याचेच कौतुक नारदाला वाटत होते. कारण त्यामुळेच कृष्णचरित्रात प्रगट झालेल्या नानाविध लीलांचा आनंद अनुभवणे लक्ष्मीला शक्य झाले असते, ही गोष्ट नारद पूर्णपणे जाणून होता. पण त्याचबरोबर नारदाला लक्ष्मीच्या मानसिक अवस्थेविषयीही अत्यंत सहानुभूती होती. त्यामुळे नारदाने अत्यंत हळुवार व समजावणीच्या सुरात लक्ष्मीशी बोलण्यास सुरूवात केली,

“अगं लक्ष्मी, तुझ्या मनात झालेली चलबिचल ही अत्यंत साहजिक आहे. कोणाही सामान्याच्या मनाची स्थिती अगदी अशीच होईल. परंतु त्या स्थितीतून वर येऊन तू श्रवणासाठी तयार व सादर होत आहेस, ही गोष्ट मात्र नक्कीच सामान्य नाही तर ती विशेषच आहे. तुला नुसती कृष्णकथा श्रवणाची गोडीच लागलेली नाही, तर त्या कथेतील गुज जाणून घेण्याची आवश्यकताही तुला तेवढीच महत्त्वाची वाटत असल्याचेच हे लक्षण आहे. मलाही खरे समाधान त्याचेच होत आहे. कारण श्रवणभक्तीचे ते एक मूलभूत व मुख्य लक्षण आहे. कुठल्याही परिस्थितीत तुझ्या मनःस्थितीची मात तू तुझ्या श्रवणावर होऊ देणार नाहीस याची मला पूर्ण खात्री आहे. परंतु तरीही मनावरचा सुप्त दबाव मात्र मनामध्ये तसाच कायम राहणार आहे. त्यामुळे मनाचा श्रवणातील सहभाग हा केवळ बाह्यांगाचाच राहील आणि मन त्या श्रवणातील विषयात समरस होऊ शकणार नाही ते नाहीच. तेव्हा त्या मनाला आधी श्रवणासाठी पूर्णपणे अनुकूल करणेही तेवढेच आवश्यक आहे. तुझे मन तर आधीच निष्कर्ष काढून बसलेले आहे. त्यामुळे मोकळेपणाने श्रवण करणे त्या मनाला शक्य होणार नाही. तुझ्या मनाला जो अकल्पितपणे धक्का बसला आहे त्याच्या आघाताने मन अधिकच हळवे झालेले आहे.




हे लक्ष्मी, तुझ्या या मनःस्थितीचा पूर्ण विचार माझ्या ठिकाणी आहे आणि त्यानुसारच मला तुझ्याशी बोलले पाहिजे. तुझी जी काही मनःस्थिती आहे ती वस्तुस्थिती आहे आणि ती डावलून चालणार नाहीच. तेव्हा तुझी मनःस्थिती लक्षात ठेवूनच मी तुला कृष्णचरित्रातील हा कथाप्रसंग सांगणार आहे. तूही शांतपणे व विषय नीट समजून घेऊनच श्रवण कर. त्यामुळे तुला प्रसंगात घडत गेलेल्या सर्व गोष्टींमागील कार्यकारणभाव लक्षात येईल. प्रत्येक कारणाची दोन अंगं असतात. एक बाह्यांगाचे निमित्त कारण आणि दुसरे महत्त्वाचे म्हणजे मनातील मूलभूत कारण. या दोन्ही कारणांच्या संयोगातूनच कार्य घडत असते. परंतु त्या एकाच कार्याचे परिणाम मात्र भिन्न भिन्न होत असतात. या भिन्न भिन्न परिणामाला कारणीभूत होत असते ते मूळ कारण, म्हणजे मनाचे भिन्न भिन्न स्वभाव व भिन्न वृत्ती. म्हणूनच भिन्न परिणामाचा दोष हा बाह्य निमित्त कारणाकडे जात नाही, तर त्याची जबाबदारी मूळ कारणावरती येते. आता एखाद्याच्या स्वभावाच्या गुणदोषांमध्ये आमूलाग्र बदल होणे ही साधी व सहसा घडणारी गोष्टच नाही. केवळ सगुण प्रेमभक्तीमुळेच ते घडू शकते हे तर तू जाणूनच आहेस आणि असा भक्तिभाव हा मुळात दुर्मिळच आहे हेही तुला माहित आहे. तेव्हा अशा भक्तिभावाची अपेक्षा एकदम अर्जुनाकडून किंवा दुसऱ्या कोणाकडूनही करणे हेच मुळात अयोग्य आहे. भक्तिभावाची कसोटी ही भक्ताने स्वतःसाठीच लावायची असते आणि त्यातून तावून सुलाखून निघून, तेजस्विता स्वतः प्राप्त करून घ्यायची असते. परंतु त्याचबरोबर इतर अज्ञानी व स्वभावाने बांधल्या गेलेल्या सामान्य जीवांविषयी मात्र भक्ताच्या ठायी सहृदयताच असते. त्यांच्याविषयी दया व सहानुभूतीच असते. कारण तेच तर खऱ्या भक्तिभावाचे लक्षण आहे.

लक्ष्मी, या दृष्टीने जर तू अर्जुनाकडे पाहशील तर तुलाही त्याची दयाच येईल. अगं, अर्जुनही काही खुशीने कृष्णाविरूद्ध लढाईला उभा राहिला नसणारच ना? त्याचे कृष्णावरील व्यक्तिगत प्रेम कमी पडले, हे तर खरेच आहे. पण त्याचबरोबर त्यावेळी अर्जुनाच्या मनातही केवढा तरी संघर्ष हा झाला असणारच ना? त्याच्या मनाला अत्यंत क्लेश व यातना या झाल्या असणारच. म्हणून लक्ष्मी, या प्रसंगाची सर्व अंगे व सर्व दृष्टीकोन नीट लक्षात घे. म्हणजे तुझ्या मनावरील ताण हलका होईल आणि ते मन कथाप्रसंग व त्यातील अंतर्बाह्य अशा दोन्ही अंगातील गुज जाणू शकेल. मुळात असा युद्धाचा प्रसंग कोणालाच घडावयास नको होता. तरीही तो नाईलाजाने का होईना, पण का व कसा कसा घडत गेला ते मी तुला

अगदी सुरूवातीपासून व सविस्तरपणे समजावून सांगतो. तो तू अत्यंत लक्षपूर्वक श्रवण कर.

▯▯▯▯▯



# महात्मा गालव-कृष्ण भेट

हे लक्ष्मी, त्याचे असे झाले. गालव नावाचे एक थोर ऋषी हे त्यांच्या अनेक शिष्यांसह आश्रमात राहत असत. गालव ऋषी हे ईश्वरी ज्ञानामुळे पूर्ण वैराग्यशील, ईश्वरप्राप्तीच्या अनुभवामुळे परमशांतीस पावलेले आणि ईश्वराच्या अखंड भक्तीमुळे नित्य आनंदात रममाण राहणारे, अशा मानवदेहातील सर्वश्रेष्ठ अवस्थेत होते. अंतःकरणातील ईश्वरी अनुभवाचे सात्त्विक तेज गालव ऋषींच्या मुखावर नित्य विलसत असे आणि त्याचबरोबर सर्व जीवमात्रांविषयीची असलेली करूणा त्यांच्या नेत्रांतून सदैव पाझरत असे. सर्वांचे आत्मकल्याण व्हावे आणि सर्वांच्या जीवनाचे सार्थक व्हावे हा एकच भाव त्यांच्या प्रेमळ दृष्टीतून नेहमी प्रगट होत असे. ईश्वरप्राप्तीची एकमेव तळमळ असलेले सत्शिष्य भेटावेत हा एकच ध्यास गालव ऋषींच्या चित्ताठायी होता. त्यासाठीच दयार्द्र होऊन त्यांनी आश्रमाची निर्मिती केली होती. त्या आश्रमात संसारातून मुक्तता मिळावी यासाठी आर्त असलेल्या मुमुक्षूंना गालव ऋषींनी आश्रय दिला होता. योग्य साधना त्या मुमुक्षूंकडून करवून घेऊन त्यांच्याठायी सत्शिष्यभाव निर्माण व्हावा हीच कळकळ गालव ऋषींच्या ठायी होती.

हे लक्ष्मी, सर्वात महत्त्वाची व मुख्य गोष्ट म्हणजे गालव ऋषी हे स्वतः ईश्वरभक्तीच्या बाह्य आचरणानेही युक्त होते. अंतःकरणात नित्य घडणाऱ्या ईश्वरभक्तीचे ते बाह्य लक्षण होते. त्यामुळे त्यामध्ये अत्यंत सहजता होती, सरलता होती आणि सुंदरता होती. स्वतःसाठी नित्य ध्यानधारणा व ईश्वरी उपासना यामध्ये गालव ऋषी जेवढे निमग्न असत, तेवढेच आपल्या शिष्यांना त्यांच्या आत्मकल्याणासाठी नित्य साहाय्यभूत होत असत. त्यासाठी शिष्यांशी संवाद साधणे, योग्य साधना घडण्यासाठी शिष्यांना मार्गदर्शन करणे यासाठी ते सदैव तत्पर असत. सर्वच शिष्यांकडे ते आपला अंश या भावानेच पाहत असत आणि त्यांची कृपादृष्टी व प्रेमळ नजर सर्व शिष्यांवर नेहमीच असे. सद्गुरूंच्या अशा कृपेला सत्पात्र होणारा सत्शिष्य हा दुर्मिळ व विरळाच असतो हे जरी खरे आहे, तरी असा एखादा का होईना पण भाग्यवान शिष्य असतो हेही खरेच आहे. नित्य उपासना व साधना यांचाच परिपाक होऊन ज्या शिष्याला सद्गुरूंच्या अंतःकरणातील ईश्वरी अनुभवाची खात्री पटते आणि तोच त्याचा निश्चय होऊन तोच अनुभव घेण्याचा ध्यासही ज्याला लागतो, त्या सत्शिष्यासाठी त्याचे सद्गुरू

हेच त्याचे दैवत होऊन राहतात. मग सद्‌गुरू सहवास व सद्‌गुरूसेवा ही त्या सत्शिष्याकडून अगदी सहजपणे घडू लागते. सद्‌गुरूंसाठी जीवन जगता जगता सद्‌गुरूंचे जीवन हेच त्या सत्शिष्यांचेही जीवन होऊन राहते. त्यामुळेच तो सत्शिष्य तन, मनाने नित्य सद्‌गुरूंच्या ईश्वरी अनुभवाच्या जवळ राहतो. या जवळीकतेतूनच तो सत्शिष्य भक्तिभावाने सद्‌गुरूंच्या अंतःकरणाच्या अधिकाधिक समीप येत राहतो आणि एक दिवस या सद्‌गुरूभक्तीचे फळ त्याला सहजपणे प्राप्त होते. तो सत्शिष्य व त्याचे सद्‌गुरू यांच्यातील सर्व विभक्तता लयाला जाते आणि तो सत्शिष्य कायमचा सद्‌गुरूभक्त होऊन राहतो. सद्‌गुरूंचा ईश्वरी अनुभव हा त्या सद्भक्ताचा होतो आणि सद्‌गुरूंचा ईश्वरी आनंद हा त्या सद्भक्ताच्या स्वानुभवाचा होतो.

हे लक्ष्मी, असाच एक भाग्यवान सत्शिष्य गालव ऋषींना लाभला होता. त्याचे नाव कौशिक असे होते. सद्‌गुरूंचे माहात्म्य व थोरवी त्याच्या लवकरच लक्षात आली आणि त्याला जणू त्याने केलेल्या सर्व साधनांचे फळच मिळाले. सद्‌गुरूंनी दिलेल्या ज्ञानदृष्टीने कौशिकाला सद्‌गुरूंच्या ठायीच तो ईश्वरी अनुभव आहे हे गुह्य कळले आणि मग त्याच्यासाठी दुसरे कुठलेही साधन व दुसरा कुठलाही मार्ग उरलाच नाही. बाह्यांगाने एकीएक सद्‌गुरूंचे व्यवधान, मनामध्ये केवळ सद्‌गुरूंचेच ध्यान आणि चित्ताठायी एकमेव सद्‌गुरूंच्या स्वरूपाचाच ध्यास अशीच अवस्था त्या कौशिकाची होऊन राहिलेली होती. ‘सद्‌गुरूपरता दुसरा परमेश्वर नाही’ हीच खात्री कौशिकाची झालेली होती आणि परमात्मस्वरूप अशा सद्‌गुरूंसाठीच आपले सर्व जीवन आहे असा त्याचा दृढ निश्चय झालेला होता. कौशिकाची ही अवस्था गालव ऋषींनाही जाणवत होती आणि त्यांच्याही ठिकाणी कौशिकाविषयी कौतुकच होते. कौशिकाच्या भक्तिभावाने गालव ऋषी आनंदित होत असत आणि त्यांचेही अंतःकरण प्रेमाने भरून येत असे.

एक दिवस नित्याप्रमाणेच भल्या पहाटे गालव ऋषी नदीवर स्नानासाठी गेले होते. साहजिकच कौशिक हा सुद्धा त्यांच्याबरोबर सेवाभावाने होताच. गालव ऋषींची स्नानादिक सर्व कर्मे होईपर्यंत सूर्योदयही होत होता. नदीच्या प्रवाहात उभे राहून गालव ऋषींनी सूर्याला अर्घ्यदान केले. त्यानंतर नदीच्या काठाजवळ येऊन आणि आपले दोन्ही नेत्र मिटून घेऊन गालवांनी आपले कर जुळवून त्यांची ओंजळ केली आणि सूर्याच्या दिशेने उंच करून धरली. सूर्योपासनेसाठी गायत्री मंत्राचा जप करण्यास त्यांनी सुरूवात केली. त्यांच्या त्या तेजस्वी ध्यानमुद्रेकडे कौशिक एकटक नजरेने पाहत होता.

त्याच वेळी चित्रसेन नावाचा एक गंधर्व त्याच्या काही मित्रांसमवेत विमानात बसून मद्यप्राशन करीत आकाशात विहार करीत होता. मुळात अत्यंत विलासी वृत्तीचा असलेला तो चित्रसेन नाना तऱ्हेचे विषयभोग उपभोगण्यामध्येच नेहमी दंग असे. सुखासीन वृत्तीमुळे त्याच्या तनमनाच्या होणाऱ्या हानीची ना त्याला जाणीव होती, ना काळजी वाटत होती. रजोगुणातून निर्माण झालेल्या तमोगुणाने त्या चित्रसेनाला पूर्णपणे ग्रासून टाकले होते. त्यामुळे कुठल्याही नीतिमत्तेची चाड त्याच्याठिकाणी अजिबात राहिलेली नव्हती. मदाने उन्मत्त व मद्याने धुंद झालेल्या त्या चित्रसेनाने त्याच्या तोंडातील मद्याची चूळ बेपर्वाईने विमानातून खाली टाकली आणि ती नेमकी गालवांच्या ओंजळीत पडली. देहभानविरहित अवस्थेमध्ये असलेल्या गालवांच्या तर ती गोष्ट लक्षातच आली नाही, परंतु गालवांच्या ओंजळीमध्ये आकाशातून काहीतरी पडले आहे, हे सतर्क असलेल्या कौशिकाच्या ताबडतोब लक्षात आलेच. त्याने पुढे होऊन पाहिले असता घडलेला प्रकार त्याच्या लक्षात आला. कौशिकाने झटकन मान वर करून आकाशाच्या दिशेने पाहिले तर त्याला वरती विमानात बसून मद्याच्या नशेत असलेल्या काही व्यक्ती दिसल्या.


हे लक्ष्मी, आपल्या सद्गुरूंच्या माहात्म्याच्या जाणिवेने युक्त असलेल्या त्या कौशिकाला त्याच्या सद्गुरूंचा झालेला अवमान सहन होईना. त्याने मोठ्याने हाका मारून विमानातील त्या व्यक्तींना खाली जमिनीवर उतरण्यास सांगितले. विमानात चित्रसेनाबरोबर असलेले त्याचे काही मित्र अर्धवट शुद्धीत होते. कौशिकाचा आवाज ऐकून त्यांनी खाली वाकून पाहिले. एक ऋषीकुमार आपल्याला खाली बोलावत आहे हे पाहून त्या धुंद अवस्थेतही ते आधी चपापले आणि नंतर घाबरलेही. कारण कौशिकाच्या आवाजातील संताप त्यांच्या लक्षात आला. ऋषीकुमारांच्या ठायी असलेल्या तेजाची त्यांना ऐकून माहिती होती. त्या तेजाने ते ऋषीकुमार काहीही शापही देऊ शकतात हेही त्यांना ठाऊक होते. म्हणून त्यांनी ताबडतोब चित्रसेनाला सावध केले आणि त्याचे लक्ष कौशिकाकडे वेधले. चित्रसेनही ऋषीमुनींचे सामर्थ्य जाणून होता. त्यामुळे जराही वेळ न दवडता चित्रसेनाने त्याचे विमान जमिनीवर उतरवण्यास सांगितले. विमान खाली आल्यावर चित्रसेन लगबगीने कौशिकासमोर येऊन हात जोडून उभा राहिला. कौशिकाच्या नजरेतील राग म्हणजे जणू आगीचे लोळ होते. त्याच्या नजरेला नजर देण्याचे धारिष्ट्य चित्रसेनाकडे असणे तर शक्यच नव्हते. चित्रसेनाच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता. पण त्याच्याकडून काय चूक झाली आहे हेही त्याच्या लक्षात आलेले नव्हते. शेवटी सर्व धैर्य कसेबसे एकवटून चित्रसेनाच्या मुखातून काही अर्धवट शब्द जेमतेम बाहेर येऊ लागले.

"अहो, मुनिवर्य, मी प्रथम आपली क्षमाच मागतो. आपल्यासारख्या नेहमीच शांत व गंभीर वृत्तीच्या असणाऱ्या मुनिवरांना ज्या अर्थी एवढा राग आलेला आहे, त्या अर्थी त्याचे कारण साधे असणे शक्यच नाही हे मी जाणून आहे. परंतु माझ्याकडून निश्चित काय चूक झाली आहे हे माझ्या अजूनही लक्षात आलेले नाही. परंतु त्यातूनही माझ्याकडून कळत नकळत काही आगळीक घडली असेल तर मी आपली मनःपूर्वक क्षमायाचना करतो. तसेच आपण असे क्रोधाविष्ट होऊ नका अशी मी आपल्या चरणी नम्रभावे प्रार्थना करतो"

असे म्हणत म्हणतच चित्रसेन पुढे येऊन कौशिकाच्या पायांना स्पर्श करण्यासाठी खाली वाकला. त्याबरोबर कौशिक रागाने मागे सरकला आणि चित्रसेनाकडे अधिकच जळजळीत नजरेने पाहू लागला. शेवटी कौशिकाच्या रागाचा स्फोट झालाच आणि त्याच्या मुखातून शब्द जणू फुटूनच बाहेर येऊ लागले,

"अरे नीचा, आधी दूर हो. माझ्या पायांना तुझे अपवित्र हात लावून ते मलिन करू नकोस. माझ्या सद्गुरूंचा अवमान करून पुन्हा वर तोंड करून माझ्याकडून काय चूक झाली असे विचारतोस? काही लाज लज्जा आहे की नाही तुला? विषयसुखाने धुंद झालेल्या तुला तर अंधत्वच आलेले आहे. म्हणूनच तुझ्याकडून घडलेला घोर अपराध तुझ्या दृष्टीसही येईनासा झाला. तुझी स्थिती तर 'आधीच मर्कट तशात मद्य प्याला' अशीच झालेली आहे. तुझे मन तर वासनेने पूर्णपणे मळलेले आहेच पण तुझी बुद्धीही चळलेली आहे. त्यामुळेच तुझे मन मोकाट सुटलेले आहे आणि घाणेरडे चाळे करीत आहे. आचार व विचार या दोहोंनी तू पूर्ण भ्रष्ट झालेला आहेस. म्हणूनच तर तू वरून विमानातून बेदरकारपणे मद्याची चूळ खाली फेकलीस आणि ती सूर्योपासना करीत असलेल्या माझ्या सद्गुरूंच्या, अत्यंत थोर असलेल्या या गालव ऋषींच्या ओंजळीत पडली. देहभान विरहित असलेल्या त्यांच्या लक्षात ही गोष्ट अजून आलेली नाही. परंतु माझ्या ते लगेचच लक्षात आले आणि म्हणूनच मी तुला ताबडतोब येथे खाली बोलावले. आता आपल्या दुष्कर्माची फळे भोगायला तयार हो."

कौशिकाच्या शब्दाशब्दातून त्याचा रागच नव्हे तर जणू आगच बाहेर येत होती. त्याचा चेहराही रागाने लालीलाल झाला होता आणि त्याचे नेत्रही लालबुंद झालेले होते. कौशिकाचे बोलणे थांबले तरी त्याचे ओठ अजूनही रागाने थरथरत होते. त्याची ती कोपायमान मूर्ती पाहून चित्रसेनाची धुंदी पूर्णपणे उतरली.



त्याच्याकडून घडलेल्या दुष्कृत्याची जाणीव तर त्याला झालीच, पण त्याहीपेक्षा पुढील संभाव्य परिणामांच्या कल्पनेने त्याच्या अंगाचा थरकाप होऊ लागला. ऋषीकुमार कुठल्याही क्षणी शापवाणीचा उच्चार करून आपल्याला देहदंड देईल या भीतीने चित्रसेन तर अगदी गर्भगळीतच झाला आणि त्याने धावतच पुढे होऊन कौशिकाचे पाय धरले. भेदरलेल्या अवस्थेतील चित्रसेनाला काही बोलणेही शक्यच होत नव्हते. अडखळत्या शब्दात तो एवढेच म्हणू शकला,

“मुनिवर्य, मला क्षमा करा. मी आपला घोर अपराधी आहे. माझ्याकडून पापाचरणच घडलेले आहे. त्यासाठी आपण सांगाल ती कुठलीही शिक्षा भोगायला मी तयार आहे. पण कृपा करून मला देहदंडाची शिक्षा देऊ नका. माझ्या जीविताचे रक्षण करा. मी आपल्या चरणी शरण आहे.”

चित्रसेनाच्या या बोलण्याचा कौशिकावर जराही परिणाम झाला नाही. उलट त्याने चित्रसेनाला आपल्या पायापासून दूर केले आणि तो त्याच्याकडे जळजळीत दृष्टीने बघत राहिला. कौशिकाचा संताप जराही कमी झालेला नव्हता. चित्रसेनाच्या बोलण्याने तो अधिकच वाढला आणि त्याच्या वाणीतून पुन्हा उफाळून बाहेर येऊ लागला.

“अरे पाप्या, तुझ्यासारख्या दुराचाऱ्याला क्षमा मागण्याचाही अधिकार नाही. तुझ्यासारखा नालायक हा केव्हाही क्षमेला पात्र ठरू शकत नाही. तुझ्यासारखे पापाचरणी भूतलावर जिवंत असणे म्हणजे तो या पृथ्वीमातेवरील वृथा भारच होय. स्वतःच्या दुष्कृत्यांची खंत तर तुला नाहीच, परंतु गालव ऋषींसारख्या महान तपस्व्यांविषयी तुझ्या ठिकाणी साधा आदरही नाही आणि हीच गोष्ट मी कधीही सहन करू शकणार नाही. माझ्या सद्गुरूंचा अवमान करणाऱ्याने माझ्याकडून दयेची अपेक्षा केव्हाही करू नये. माझ्या मुखातून जेव्हा शापवाणी प्रगट होईल तेव्हा तुझ्या मृत्यूची निश्चिती झालेली असेल एवढे मात्र लक्षात ठेव. परंतु माझ्या सद्गुरूंच्या अनुमतीशिवाय मी तुला शापही देऊ शकत नाही. ज्या वेळेस माझ्या सद्गुरूंची ध्यानधारणा पूर्ण होईल त्यावेळेसच मी त्यांना घडलेली सर्व हकीगत सांगेन आणि त्यांच्याकडून तुला शाप देण्याची अनुज्ञा मागेन. पण कोणत्याही परिस्थतीत मी तुझी गय करणार नाही हे लक्षात ठेव.”


कौशिकाच्या प्रखर वचनांमुळे चित्रसेन अधिकच भयभीत झाला. स्वतःचा जीव वाचवण्यासाठी काय करावे हे त्याला कळेच ना. परंतु मरणाच्या कल्पनेने भयग्रस्त झालेला चित्रसेन अत्यंत असहाय्य झाला होता. मदतीच्या आशेने

आजूबाजूला पहात असताना चित्रसेनाची नजर गालव ऋषींच्याकडे गेली. गालवांच्या शांत व तेजस्वी अशा ध्यानस्थ मुद्रेकडे पाहून चित्रसेनाला एकमेव आशेचा किरण दिसू लागला. त्याने धावतच पुढे जाऊन गालव ऋषींचे चरण अत्यंत घट्टपणे धरले. चित्रसेनाच्या अशा अचानक कृतीने कौशिक चकित झाला म्हणण्यापेक्षा, तो अधिकच चिडला आणि चित्रसेनाला आवरण्यासाठी त्याच्या मागोमाग धावलाच. परंतु कौशिकला उशीरच झाला होता. कारण त्या आधीच गालव ऋषी देहभानावर आले होते. त्यांच्या चरणांपाशी असलेल्या चित्रसेनाच्या डोक्यावर गालवांनी अत्यंत सहजपणे आपला हात ठेवला आणि त्यांच्या मुखातून सहजोद्गार निघाले, "शुभं भवतु! कल्याणमस्तु!!"

गालवांच्या मुखातील त्या मधुर शब्दांनी चित्रसेनाला थोडासा धीर आला आणि आपले दोन्ही हात जोडून त्याने गालवांना वंदन केले आणि म्हणाला, "ऋषीवर्य, मी आपला अनंत अपराधी आहे. परंतु आपण मला क्षमा करून अभयदान द्यावे अशी आपल्या चरणांपाशी प्रार्थना आहे." चित्रसेनाचे बोलणे पूर्ण होताक्षणीच गालवांच्या मुखातूनही अत्यंत उत्स्फूर्तपणे शब्द निघाले, 'तथास्तु!' चित्रसेनाच्या म्लान चेहेऱ्यावर थोडीशी लकाकी आली. परंतु तेवढ्यातच कौशिक पुढे सरसावला आणि त्याने गालवांना हाताच्या खुणेनेच थांबण्याची विनंती केली. कौशिकानेही गालवांना नम्रतापूर्वक वंदन केले आणि तो म्हणाला,

"गुरूवर्य, माझी आपल्याला एकच विनंती आहे की या चित्रसेनाला क्षमा करण्याआधी आपण त्याचा अपराध काय आहे तो जाणून घ्यावा आणि मगच तो क्षमेला पात्र आहे की नाही याचा निर्णय घ्यावा. कारण या चित्रसेनाने एवढा घोर आपराध केलेला आहे की तो आपल्याच काय, पण कोणाच्याही क्षमेला पात्र ठरेल असे मला तरी अजिबात वाटत नाही."

कौशिकाच्या बोलण्यावर गालवांनी मंदस्मित केले आणि म्हणाले, "अरे कौशिक बाळा, क्षमेसाठी दुसऱ्याच्या कोणत्याही पात्रतेची मुळी आवश्यकताच नाही. कारण अशी पात्रता ज्याला क्षमा करायची त्याची नसते, तर ती पात्रता जो क्षमा करतो त्याची असते आणि ती पात्रता म्हणजे सहृदयता होय. ज्याच्या अंतःकरणात ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव नित्य स्फुरत असते, त्याचे अंतःकरण



ईश्वरी प्रेमाने नेहमीच पूर्णपणे भरलेले असते आणि दया, क्षमा व शांती हे तर त्या ईश्वरी प्रेमाचे सहज गुणधर्म आहेत. त्यामुळे कोणाच्याही अपराधाच्या कमी जास्त तीव्रतेवर ती क्षमा अवलंबून नसतेच मुळी! किंबहुना कोणी आपला काही अपराध केला आहे असे वाटतच नाही. जो तो ज्याच्या त्याच्या स्वभावानुसार कर्मे करीत असतो आणि ईश्वरी नियतीनुसार त्याची फळेही भोगीत असतो. त्यामुळे खरे तर आपण कोणालाही क्षमा करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. एखाद्याने अगदी जरी क्षमा मागितलीच नाही, तरीही आपल्यासाठी काहीच फरक पडत नाही. परंतु क्षमा मागणाऱ्यासाठी मात्र फरक पडू शकतो. कारण त्यामुळे त्याच्या कृत्याचा पश्चात्ताप होण्याची संधी त्याला मिळते. म्हणूनच आपली क्षमा कोणी मागो किंवा न मागो, आपल्यासाठी तरी त्याची आपल्याला काहीच जरूरी नाही. पण आपल्याठायी सर्वांविषयी दया व प्रेम मात्र जरूर असावे आणि दुसऱ्याच्या मनाच्या समाधानासाठी तरी आपण त्याला उदारपणे क्षमा करावी.”


गालवांच्या बोलण्याने कौशिक जरी थोडासा नरमला तरी त्याच्या मनाचे पूर्ण समाधान झालेले नव्हते, हे तर त्याच्या चेहऱ्यावरून अगदी स्पष्टपणे दिसत होते. एकीकडे चित्रसेनाविषयीचा उफाळून येणारा राग कौशिक महत्प्रयासाने दाबून ठेवत होता तर दुसरीकडे गालवांविषयीच्या अलोट सद्गुरूप्रेमाने व त्यांच्यावरील अचल श्रद्धेने कौशिक स्वतःच्या मनाची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु त्याच्या मनाची समजूत काही पटत नव्हती हेही खरेच होते. त्यामुळेच कौशिकाला स्वस्थ राहणेही कठीणच जात होते. शेवटी त्याने त्याच्या मनाला मोकळे करण्याचे ठरवले. आपल्या सद्गुरूंविषयीच्या पूर्ण आदराने व नम्रभावाने त्याने गालवांशी बोलावयास सुरूवात केली,

“अहो गुरूवर्य, आपल्या अंतःकरणाची अवस्था ही अत्यंत विशुद्ध व पवित्र आहे. त्याठायी कोणतेही विकार हे संभवतच नाहीत. आपली ही अंतःकरणाची अवस्थाच माझ्यासाठी नित्य आदर्शवत् व मला प्रेरणादायी आहे. माझे मन नेहमीच आपल्या या सहजावस्थेचा विचार करीत असते आणि त्याचाच ध्यास धरण्याच्या प्रयत्नात असते. मी जाणून आहे की माझ्याकडून घडणाऱ्या सर्व साधनांची परिणती ही या ध्यासामध्येच व्हावयास हवी आणि त्यासाठीच माझ्या ठायी आपले प्रेम व आपले माहात्म्य यांची नित्य जागृती असणे आवश्यक आहे. त्यामुळेच आपल्या माहात्म्याला न जाणता जर कोणाकडून आपला अवमान घडला, तर आपल्यावरील प्रेमामुळे मला ते अजिबात सहन होणार नाही.

अहो गुरूनाथ, या दुराचारी चित्रसेनाने त्याच्या तोंडातील मद्याची चूळ प्रत्यक्ष आपल्या ओंजळीमध्ये टाकली आणि आपल्या हातातील शुद्ध जलाला भ्रष्ट केले. एवढा माज त्याला चढलेला आहे. त्याच्या ठायी मद्याची नशा तर होतीच पण त्याहीपेक्षा त्याला त्याच्या संपत्तीची व सत्तेची धुंदी चढलेली आहे. विमानात बसून विषयसुखाचे चाळे करीत असताना अत्यंत बेफिकीरपणाने त्याने ही मद्याची चूळ खाली टाकली. त्यावेळेस ती चूळ खाली कोठे व कोणावरती पडत आहे याचेही त्याला भान नव्हते. ती नेमकी आपल्या ओंजळीत पडली. त्यावेळेस आपण देहभानावर नसल्यामुळे ती गोष्ट आपल्या लक्षात आली नाही. परंतु माझ्या मात्र ते ताबडतोब लक्षात आले. आपला अवमान मी कधीही सहन करणे शक्य नाही. त्याच्या अपराधाची शिक्षा मी त्याला देणारच. पण त्यासाठी आपण मला अनुज्ञा द्यावी. आपल्या आज्ञेनेच मी या चित्रसेनाला शाप देऊन त्याला मृत्यूच्या स्वाधीन करीन.”

कौशिकाच्या बोलण्यातून प्रगटणारे गालवांवरील प्रेम पाहून गालवांना त्याचे कौतुकच वाटले. परंतु त्याचबरोबर कौशिकाच्या बोलण्यातून चित्रसेनाविषयी जो राग व संताप प्रगट होत होता त्याची मात्र गालवांना काळजी वाटू लागली. त्या काळजीपोटीच कौशिकाला शांतवणारी अशी प्रेमळ वचने गालवांच्या मुखातून प्रगट होऊ लागली,

“अरे कौशिक बाळा, असा रागावून व चिडून स्वतःच्या मनाची शांती ढळू देऊ नकोस. कोणाचाही व कसल्याही कारणाने आला, तरी राग हा रागच आहे आणि तो मनाचे स्वास्थ्य बिघडवतोच. राग हा एक अत्यंत घातक विकार आहे आणि एकदा का त्या विकाराच्या आहारी मन गेले की मनाच्या ठायीचा विवेकही नष्ट होतो. तेव्हा वेळीच तुझ्या रागाला आवर घाल. दुसऱ्याकडून चूक घडली म्हणून त्याला शिक्षा करण्याची दुसरी चूक आपण करू नये. ‘दुसरा चुकला’ असे म्हणताना आपल्या चुकीचे समर्थन करणे तर त्याहून चुकीचे आहे. त्याहूनही सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे एखाद्याकडून चूक घडली आहे असे आपण एकवेळ जरी गृहीत धरले, तरी त्याला शिक्षा करण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला? ईश्वराच्या नियतीप्रमाणे ज्याच्या त्याच्या कर्मानुसार बरी वाईट फळे ज्याला त्याला मिळणारच आहेत. पण एक गोष्ट लक्षात ठेव, की सर्वांना चांगली फळे देण्यासाठी ईश्वराने खास आपली योजना केलेली आहे. कारण आपण त्या ईश्वराचे अत्यंत भाग्यवान असे उपासक व भक्त आहोत. लोकांना चांगली फळे देण्यासाठी निमित्त



होताना त्याचा आनंद आपल्यालाही लाभत असतो आणि हीच त्या ईश्वराची आपल्यावरील कृपा आहे. सामान्यांना त्यांच्या दुष्कृत्याची फळे देण्यासाठी ईश्वराच्या नियतीत अनेक जण निमित्त होत असतील. त्याविषयी आपल्याला विचार वा काळजी करण्याचे काहीच कारण नाही. आपण फक्त ईश्वरी संकेतानुसार आपले कर्तव्यकर्म ईश्वराची सेवा म्हणून करायचे आणि त्याचे फळ म्हणून ईश्वराच्या भक्तीचा आनंद सेवन करीत रहायचे.

अरे कौशिका, सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण जी ईश्वरोपासना करीत असतो किंवा आपल्याकडून जे तपाचरण घडत असते, त्यामुळे आपल्याला निश्चितच एक प्रकारचे तपोबळ प्राप्त होत असते आणि या तपोबळानेच ईश्वराची प्राप्ती होत असते. पण त्याचवेळी या तपोबळाचा अपव्यय होणार नाही याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक असते. या तपोबळाने दुसऱ्याचे मनोगत जाणणे किंवा आपले बोलणे खरे होणे, अशासारख्या काही सिद्धीही प्राप्त होऊ शकतात हेही खरे आहे. पण त्याच वेळी आपण अत्यंत सावध राहिले पाहिजे. कारण अशा सिद्धीच्या वापराने तपोबळ कमी होते आणि मग ईश्वरप्राप्तीच्या मार्गात अडचणी निर्माण होतात. तेव्हा आपले तपोबळ केवळ ईश्वरप्राप्तीच्या मार्गाने प्रगती करण्यासाठीच राखून ठेवावे आणि त्यासाठीच उपयोगात आणावे. म्हणूनच या सिद्धींच्या मागे लागून त्यांच्या मोहात न पडता, आपले लक्ष केवळ ईश्वरप्राप्तीच्या ध्येयाकडेच केंद्रित करावे. तोच ध्यास सदैव घेऊन असावे. मनाला नेहमी ईश्वरी प्रेमात रमवावे. म्हणजे मनात इतर विचार व विकार निर्माण होणारच नाहीत. बुद्धीच्या ठायी नित्य ईश्वरी बोधाची निश्चिती ठेवावी म्हणजे बुद्धी केव्हाही चळणार नाही आणि तिचा निश्चय हा कधीही ढळणार नाही."

गालव ऋषींच्या बोलण्याचा परिणाम हळूहळू कौशिकावर होता होता त्याचे मन बरेचसे शांतही झाले. गालवांच्या अंतःकरणातील सहृदयता त्याला जशी जाणवली तसाच त्यांच्याठायी असलेला कौशिकाविषयीचा कळवळाही कौशिकाच्या लक्षात आला. आपल्या शिष्याला आपल्या अंतःकरणाचा एक अंशात्मक भागच म्हणून नित्य अनुभवणाऱ्या गालवांचे हे माहात्म्य कौशिकाला जाणवले आणि आपल्या सद्गुरूंच्या माहात्म्याच्या जाणिवेने कौशिकाठायीचे सद्गुरूप्रेम दाटून आले. त्याचा कंठ दाटून आला आणि त्याने गालवांचे चरण दृढ धरून त्यावर आपले मस्तक ठेवले. गालवांनी त्याला आपल्या हातांनी उठवले आणि त्याचे मस्तक प्रेमाने थोपटून कुरवाळले. कौशिकाच्या मुखाकडे पाहताना त्यांच्या


एक गोष्ट लक्षात आल्याशिवाय राहिली नाही, की कौशिकाची नाराजी अजूनही कमी झालेली नाही. कारण चित्रसेनाकडे पुन्हा पुन्हा कौशिक रागाचा दृष्टिक्षेप टाकीतच होता. कौशिकाच्या मनाची ही स्थिती ओळखून गालवांनी त्याच्याशी पुन्हा बोलण्यास सुरूवात केली,

“अरे कौशिका, तुझा राग व तुझी नाराजी मी समजू शकतो. माझ्यावरील आत्यंतिक प्रेमापोटीच तुझा हा राग आहे हेही मला ठाऊक आहे. परंतु एक गोष्ट तर निश्चित आहे ना की या चित्रसेनाने माझा अपराध केलेला आहे. मग त्याचा निवाडाही मलाच करू दे. मी त्याला उदार अंतःकरणाने क्षमा केलीच आहे आणि तूही आता मोठ्या मनाने त्याला क्षमा कर. ईश्वराच्या नियतीत त्याच्या कर्माची जी काही फळे त्याला मिळायची ती मिळतीलच. तेव्हा आपण त्याला मोकळा करून त्या ईश्वरी नियतीच्या हवाली करूया. हेच योग्य व उचित आहे.”

गालवांच्या या बोलण्यावर कौशिकाने आपली मान खाली लववली आणि ‘आपली आज्ञा मला प्रमाण आहे’ एवढेच वचन त्याच्या मुखातून अत्यंत अस्पष्ट शब्दात बाहेर आले. गालवांनी चित्रसेनाकडे पाहून त्याला तेथून निघून जाण्याची खूण केली. चित्रसेनाने मनातल्या मनात सुटकेचा मोठा निःश्वास टाकला. त्वरित पुढे येऊन त्याने कृतज्ञतेने गालवांना वाकून नमस्कार केला आणि क्षणाचाही अवधी न जाऊ देता तो तेथून ताबडतोब निघाला. निघण्यापूर्वी कौशिकाकडे बघण्याचे धैर्यही त्या चित्रसेनाला झाले नाही. निस्तेज व मनाने अत्यंत दुर्बल असलेला चित्रसेन, तपस्वी व तेजस्वी अशा कौशिकाच्या नजरेला नजर देऊच शकला नसता. अजूनही खाली मान घालून उभ्या असलेल्या कौशिकाच्या मनातील नाराजी गालवांनी ओळखली. त्यांनी पुढे होऊन कौशिकाच्या मस्तकावर व पाठीवर अत्यंत प्रेमाने थोपटले आणि त्याचा हात आपल्या हातात घेऊन ते आश्रमाच्या दिशेने मार्गक्रमण करू लागले. त्यांच्याबरोबर श्रद्धेने वाटचाल करणाऱ्या कौशिकाचे मन मात्र त्याला साथ देऊ शकत नव्हते, कारण ते तर मागेच राहिले होते.”

□□□

बोलता बोलता नारद क्षणभर थांबला आणि लक्षपूर्वक श्रवण करणाऱ्या लक्ष्मीकडे सहेतुक नजरेने पाहू लागला. लक्ष्मीनेही नारदाच्या नजरेतील भाव ओळखला आणि तिच्या मनातील भाव तिच्याकडून अत्यंत सहजपणे व्यक्तही होऊ लागला,




“अरे नारदा, तुझी तर अगदी कमालच आहे. अरे तू कृष्णार्जुन युद्धाचा प्रसंग सांगणार म्हणून मी माझ्या मनाची केवढी तरी तयारी केली होती. कारण भावनात्मक दृष्ट्या पाहिले असता तो प्रसंग श्रवण करणे मला कठीणच जाणार होते. पण त्या प्रसंगाची पार्श्वभूमी सांगताना तू जो आधीचा घडलेला प्रसंग सांगितलास तो तर माझ्या मनाला अधिकच अस्वस्थ करीत आहे. कारण त्यामध्ये पुन्हा धर्म-अधर्माचा अत्यंत नाजूक व गुंतागुंतीचा असणारा असा प्रश्न निर्माण होतोच आहे. हा मुळातील मुद्दाच पुढे अत्यंत वरचे टोक गाठून शिगेला पोहोचला असणार आणि त्याचीच परिणती कृष्ण व अर्जुन यांच्यातील युद्धामध्ये झाली असणार हे नक्की. तेव्हा कृष्ण व अर्जुन यांच्यातील युद्धही धर्म-अधर्माचेच होते हे जे तू सूचित करीत आहेस ते माझ्या आता लक्षात आले. त्यामुळे आता पुढील भाग श्रवण करीत असताना माझी दृष्टी हळूहळू सुधारत जाईल आणि प्रत्यक्ष कृष्णार्जुन युद्धाकडे मी योग्य नजरेने पाहू शकेन हे निश्चित. तोच तुझाही हेतू आहे आणि त्याची मलाही पूर्ण खात्री आहे.

अरे नारदा, परंतु कौशिकाचे त्याच्या सद्गुरूवरील प्रेम व त्यांच्या थोरवीची त्याच्याठिकाणी असलेली जाणीव हीसुद्धा योग्यच होती ना? त्याच्या सद्गुरूठायीच्या भक्तिभावाचे ते तर सहज लक्षण होते. कोणताही सत्शिष्य हा त्याच्या सद्गुरूंचा अवमान कसा बरे सहन करू शकेल? त्यामुळे कौशिकाची झालेली तीव्र प्रतिक्रिया हीदेखील अत्यंत साहजिकच होती. अर्थात् गालव ऋषींनी केलेले कौशिकाचे सांत्वन आणि त्यांनी त्याची करून दिलेली समजूत ही अधिक योग्य होती. कारण गालवांचे सांगणे हे मूलभूत सत्याकडे म्हणजे ईश्वरी अनुभवाकडे निर्देश करणारे होते. म्हणूनच त्यांनी त्या सत्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या साधकावस्थेतील कौशिकाला वेळीच सावध केले. कौशिकही त्याच्या शिष्यभावाला जागला आणि तसाच वागलाही, हे महत्त्वाचे. खरे तर, गालवांचे सांगणे कौशिकाच्या मनाला रूचतही नव्हते आणि मानवतही नव्हते. परंतु तरीही त्याने सद्गुरूवरील श्रद्धेने व विनम्रभावाने सद्गुरूंच्या सांगण्याचा स्वीकार केला. ही गोष्ट तर अगदी कठीणच आहे आणि म्हणूनच अत्यंत कौतुकास्पदही आहे. गालवांच्या सांगण्याप्रमाणे कौशिकाने कृती केली खरी, पण त्या कृतीत त्याचे मन नव्हतेच हेही खरे आहे. अर्थातच गालवांनी पुढे कौशिकाचे मन मोकळे करून त्याठायी सद्भावाची जागृती केली असणारच याची मला पूर्ण खात्री आहे. ते सर्व तुझ्या मुखातून ऐकण्यासाठी मी अत्यंत आतुर झालेली आहे.

हे नारदा, माझ्या मनात आणखीन एक विचार प्राबल्याने घर करून बसला आहे आणि तो विचार चित्रसेनाकडून घडलेल्या दुष्कृत्यांचा आहे. गालवऋषींचे अंतःकरण अत्यंत विशुद्ध होते आणि त्यांनी थोर मनाने चित्रसेनाला त्याच्या अपराधाची क्षमा केली, हे सर्व बरोबर आहे. पण मग चित्रसेनाचे पुढे काय झाले? गालवांनी त्याला मोकळा सोडला हे ठीक आहे. पण मग त्याने केलेल्या दुष्कृत्यांचा जाब त्याला कोण विचारणार? त्याचा न्याय निवाडा कोण करणार? तोही होणे अत्यंत आवश्यकच होते ना? कारण चित्रसेनाने जरी गालवांची क्षमा मागितली होती, तरी त्याने तसे केवळ मृत्यूच्या भयाने केले होते ही गोष्ट तर अगदी स्पष्टच आहे. त्यामुळे त्याने मागितलेली क्षमा ही केवळ वरवरचीच होती. ती अंतःकरणापासूनची असणे तर शक्यच नाही. मग त्यावरती उपाय काय? मोकळा सोडलेला चित्रसेन पुढे जर मोकाट सुटला असता तर मग त्याला जबाबदार कोण? त्याला आवर कोण घालणार आणि त्याला योग्य ते शासन कोण करणार? ती जबाबदारी कोणाची बरे? माझ्या दृष्टीने हा मुद्दाही अत्यंत महत्त्वाचा व कळीचा आहे. तेव्हा नारदा, हे सर्व मला नीट खुलासेवार विशद करून सांग. त्याशिवाय माझ्या मनाचे समाधान होणे शक्यच नाही.”

लक्ष्मीचे बोलणे ऐकत असतानाच नारद कौतुकाने मान डोलवीत होता आणि तेच कौतुक त्याच्याकडून शब्दरूपानेही प्रगट होऊ लागले.

“लक्ष्मी, तुझे बोलणे अत्यंत सयुक्तिक आहे आणि त्यामागील तुझी विचारसरणीही अत्यंत योग्य अशीच आहे. मुळात तुझ्याठिकाणी असलेल्या सद्भावाचेच ते लक्षण आहे. त्यामुळेच तुझ्याठायी सतत सद्विचारच असतात. असद्भाव तुझ्या लगेचच लक्षात येतो आणि त्या भावाचीच तुला नेहमी काळजी वाटत असते. तुझ्या संवेदनशील मनाला कौशिकाच्या सत्शिष्यभावाचे अत्यंत कौतुकही आहे आणि त्याचबरोबर तुझ्याठायी त्याच्याविषयी अत्यंत काळजीही आहे. मग लक्ष्मी, विचार कर की ज्यांचे अंतःकरण अत्यंत कोमल व अतिशय संवेदनाक्षम आहे अशा गालव ऋषींच्या ठायी कौशिकाविषयी किती काळजी असेल बरे? अगं, कौशिकाकडे तर गालव ऋषी त्यांचा एक अंश म्हणूनच पाहत होते आणि त्यांचा ईश्वरी अनुभव कौशिकाचा व्हावा म्हणून जास्त आर्तताही त्यांच्याठिकाणीच



होती. परंतु एक गोष्ट सत्य होती की गालव हे स्वानुभवसिद्ध अवस्थेत होते तर कौशिक हा साधकावस्थेत होता. परंतु तो खरा साधक असल्यामुळे कौशिकाच्याठायी एका गोष्टीचा पूर्ण निश्चय होता की त्याचे साध्य म्हणजे त्याच्या सद्‌गुरूंचे अंतःकरण हेच होते. तेच त्याला गाठायचे होते आणि तेथेच त्याला एकरूपता साधायची होती. गालवांच्या अंतःकरणाशी असलेली त्याची विभक्तता कौशिकाला जाणवत होती आणि तीच त्याला सहनही होत नव्हती. त्या आर्ततेतून निर्माण झालेला भक्तिभाव कौशिकाला स्वस्थ राहूच देत नव्हता. घडलेल्या प्रसंगामुळे कौशिक हा अस्वस्थच होऊन राहिला होता. त्याची ही अस्वस्थता गालवांच्याही लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. परंतु तरीही ते स्वस्थच राहिले आणि त्यांनी मुद्दामहूनच थोडा कालावधी जाऊ दिला. परंतु अंतःकरणात मात्र ते कौशिकाने जवळीकता साधण्याची वाट पाहतच होते.

हे लक्ष्मी, कौशिकालाही असे गालवांपासून फार काळ दूर राहणे शक्यच होत नव्हते. कारण सर्व साधने करत असताना जर शिष्याची त्याच्या सद्‌गुरूंशी जवळीकता साधत नसेल तर त्या साधनाला काहीच अर्थ नाही. अशावेळी ते साधन केवळ बाह्यांगाने करीत राहणे म्हणजे निव्वळ ओझी वाहणेच आहे हे कौशिक जाणून होता. त्यामुळे त्याने जास्त वेळ वाया जाऊ न देता गालवांची एकांतात भेट घेतलीच. विनम्रभावाने गालवांच्या चरणांवर आपले मस्तक ठेवून कौशिकाने त्यांना साष्टांग प्रणिपात केला आणि हात जोडून तो तेथेच बसून राहिला.

गालवांनी कौशिकाकडे पाहून अर्थपूर्ण असे मंदस्मित केले. कौशिकाची मनःस्थिती पूर्णपणे जाणून असलेल्या गालवांना हेही ठाऊक होते, की कौशिकाचे मन हे त्याच्याकडून बोलणे घडल्यावरच मोकळे होणार आहे. त्यासाठी कौशिकाला प्रोत्साहित करणे जरूरीचे होते आणि नेमके तेच गालवांच्या प्रेमळ दृष्टिक्षेपाने घडले. गालवांच्या दृष्टीतील हा भाव कौशिकानेही ओळखला. त्याचेही मन थोडे थोडे खुलू लागले आणि तो हळूहळू बोलूही लागला,


“अहो गुरूवर्य, तुमचे माहात्म्य खरोखरीच अगाध आहे. ते पूर्णपणे जाणण्याची माझ्यासारख्या सामान्याची कुवतच नाही. माझे मन एवढे कोते आहे व बुद्धी एवढी मर्यादित आहे की तुमच्या थोरवीचा पार मला कधीही लागणे शक्यच नाही. परंतु तरीही तुम्ही मला तुमच्या चरणांचा आश्रय दिला आहे ही तुमची माझ्यावरील कृपाच आहे. त्यामुळे मला तुमच्या अंतःकरणाची अवस्था नेहमी पहायला मिळते हे माझे खरोखरीचे भाग्यच आहे. अर्थात् तुमचे अंतःकरण मी पूर्णपणे जाणू शकत नाही किंवा ओळखूही शकत नाही हे खरे आहे. परंतु तुमचे

अंतःकरण जाणून घ्यावे हा ध्यास मात्र माझ्याठायी नित्य असतो आणि याला एकमेव कारण म्हणजे तुमचे माझ्यावरील असलेले प्रेम हेच होय. या तुमच्या प्रेमापोटीच मला तुमच्याशिवाय चैन पडत नाही आणि तुमच्या अंतःकरणाशी जवळीकता साधण्याचा प्रयत्न मी पुन्हा पुन्हा करीतच राहतो. परंतु ही जवळीकता साधण्यासाठी मी जेव्हा माझ्या मनाने व बुद्धीने कमी पडतो, तेव्हा मात्र माझ्या मनात खंत निर्माण होते आणि तुमच्यात व माझ्यात मला अत्यंत दुरावा जाणवतो, जो मला मुळीच सहन होत नाही. तेव्हा यावर उपाय काय? अशा वेळी मी काय करावे हे मला कृपा करून सांगावे अशी मी तुमच्या चरणी विनम्र प्रार्थना करतो.”

कौशिकाच्या बोलण्यातील सरळपणा व प्रांजळपणा गालवांच्या लक्षात आला आणि तोच त्यांना अतिशय भावला. शिष्यभावाचे ते एक महत्त्वाचे लक्षण आहे. शिष्याने स्वतःच्या मनाची खरीखुरी अवस्था मोकळेपणाने सद्‌गुरूंना विदित करणे अत्यंत आवश्यक असते. कारण तरच सद्‌गुरूंना त्या शिष्याला योग्य मार्गदर्शन करून त्याचे समाधान करणे शक्य होते. परंतु त्यानंतर सद्‌गुरूंच्या वचनांवर श्रद्धा ठेवून त्यातील बोधाठायी मन स्थिर करणे आणि त्या बोधाचा बुद्धीठायी निश्चय करून तसा अनुभव घेणे, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट मात्र त्या शिष्याकडूनच अपेक्षित असते. त्यावेळेसच त्या शिष्याच्या सद्‌गुरूंवरील श्रद्धेची व निष्ठेची कसोटी लागत असते. अशा कसोटीमुळेच शिष्याचा कस लागत असतो आणि वाढतही असतो. अशा कसदार शिष्याकडूनच सद्‌गुरूंची प्रत्यक्ष भक्ती घडू शकते. तोच शिष्य सर्व विभक्तता संपवून आपल्या सद्‌गुरूंशी ऐक्य पावतो आणि सद्भक्त होऊन राहतो हे सत्य आहे.

हे लक्ष्मी, कौशिक हा खऱ्या अर्थाने सत्शिष्य होता आणि मुख्य म्हणजे ही गोष्ट गालव जाणून होते. त्याचबरोबर कौशिकाच्या ठायी उदयाला येत असलेला भक्तिभावही गालवांना जाणवत होता. त्या भक्तिभावाला प्रोत्साहन देऊन व सबळ करून वर उठवणे आवश्यक होते आणि नेमके तेच गालवांच्या लक्षात आलेले होते. त्यासाठी कौशिकाच्या मनात स्वतःविषयीचा विश्वास व उत्साह निर्माण होण्याची जरूरी आहे हे गालवांनी बरोबर ओळखले. म्हणूनच कौशिकावरील प्रेमाने त्यांच्या मुखातून स्वानुभवाची सखोल सत्य वचने प्रगट होऊ लागली,

“अरे कौशिका, तुझ्या मनाची होत असलेली तगमग मी समजू शकतो. त्याचे कारण म्हणजे तुला विभक्तता जाणवतेही आणि ती तुला सहनही होत नाही,




तर ती तुला अधिकच आर्त करते. साधकावस्थेमध्ये असे घडणे हे अत्यंत संभवनीयच आहे. भक्तिमार्गाच्या वाटचालीत आत व बाहेर दोन्ही ठिकाणी अडचणी व अडथळे हे येतच असतात. अशावेळी धीर न सोडता व निरूत्साही न होता, त्या मनाला मोठ्या कौशल्याने हाताळावे व सांभाळावे लागते आणि त्याला योग्य मार्गावर आणून प्रगती करण्यासाठी उद्युक्त करावे लागते. त्यासाठी संवाद करणे हा एक अत्यंत महत्त्वाचा व आवश्यक उपाय आहे. स्वतःचे मन पूर्णपणे मोकळे करून त्या मनाची योग्य ती समजूत करून देणे हा त्या संवादाचा मूलभूत हेतू आहे. त्यानंतर संवादातून प्रगटलेल्या बोधाचा निश्चय करून त्याप्रमाणे अनुभव घेण्यासाठी मनाला प्रेरित करणे ही दुसरी पायरी आहे. कारण शेवटी सर्वाचा अनुभव घेणारे असे ते मनच आहे हे पूर्णपणे लक्षात ठेव. एकदा का मनाने स्वतः तसा अनुभव घेतला की त्या मनाला त्या अनुभवाचे नित्य स्मरण देणे, ही त्या पुढची पायरी आहे आणि मग त्या मनाला तो अनुभव घेण्यासाठी पुन्हा पुन्हा प्रवृत्त करणेही घडायला हवे. स्वानुभवाने मनाचा तो स्वभावच होऊन राहिला, की मुद्दामहून अनुभव घेण्याची आवश्यकता राहातच नाही, तर तो अनुभव येतच राहतो आणि ती त्या मनाची सहजावस्था होऊन राहते. मग त्या अनुभवाची एकीएक आनंददायी जाणीव मात्र उरते आणि तीच जाणीव नित्य स्फुरतही राहते.

अरे कौशिका, पण असे हे निरपेक्ष ज्ञान मनाला कितीही समजावून सांगितले तरी त्या मनाची योग्य ती समज होणे शक्य होत नाही. मनाला ते कठीण वाटते कारण निरपेक्ष ज्ञान श्रवण करताना मनाच्या दृष्टीसमोर एकतर काहीच येत नाही किंवा दुसरे म्हणजे काहीतरी कल्पनाच मनाच्या समोर येत राहतात. तेव्हा मनाची यथार्थ समजूत व्हावी म्हणून ते निरपेक्ष ज्ञान सापेक्षतेने वर्णन करून सांगावे लागते. त्यासाठी काही बाह्यांगाचे दृष्टांत किंवा कथाप्रसंग यांचा माध्यम म्हणून उपयोग करावा लागतो. पण त्याचबरोबर मन त्या बाह्य दृष्टांताच्या किंवा कथाप्रसंगाच्या तपशिलामध्येच गुंतून राहण्याची आणि त्यातच अडकून राहण्याची शक्यताही निर्माण होतेच. त्यावेळी मग मनाला सावध करून त्या प्रसंगातून बाहेर काढून पुन्हा निरपेक्ष ज्ञानाकडे, म्हणजे अनुभवाकडे निर्देश करावा लागतो. त्यासाठी मग त्याच प्रसंगाचा आधार घेऊन तो प्रसंग वेगवेगळया दृष्टीकोनातून व वेगवेगळया अंगाने वर्णन करून सांगावा लागतो. एकाच प्रसंगात सामान्याचा अनुभव हा त्याच्या अवस्थेनुसार व भावानुसार म्हणूनच एकांगी व मर्यादितच राहतो. तर त्याच प्रसंगामध्ये अनुभवी व्यक्तीचा अनुभव हा सर्वांगीण, व्यापक व

अत्यंत सखोल असा असतो. त्यामुळे अनुभवी व्यक्तीच त्या प्रसंगातील सर्व अंगे जाणू शकते आणि ती वेगवेगळी करून दाखवूही शकते.

कौशिका, मी जाणून आहे की जरी तू त्या चित्रसेनाच्या प्रसंगातून बाह्यांगाने बाहेर आला असलास, तरी तो प्रसंग तुझ्यातून अजून बाहेर आलेला नाही. तुझे मन त्या प्रसंगातच गुंतून अडकलेले आहे आणि हे मला ठाऊक आहे. तेव्हा त्या प्रसंगातून तुझ्या मनाला बाहेर काढण्यासाठी त्या प्रसंगाचाच आधार आपण घेऊया आणि त्याच्याविषयी पुन्हा बोलूया. तो प्रसंग तुझ्या दृष्टीने तू पाहिलास व अनुभवलास आणि तुझ्या मनावर त्याप्रमाणे त्याचा परिणाम झाला. आता तो प्रसंग माझ्या दृष्टीने कसा घडला हे पाहू या. त्यासाठी तो प्रसंग मला आता पुन्हा माझ्या मनःचक्षूंसमोर प्रयत्नपूर्वक आणावा लागेल. त्यातील तपशिलापेक्षा किंवा त्याच्या क्रमवारीपेक्षा मला तो प्रसंग कसा जाणवला आणि मी त्या प्रसंगात काय अनुभव घेतला हेच व एवढेच आता मी सांगू शकेन.

कौशिका, ज्या वेळेस मी सूर्याला अर्घ्य देण्यासाठी माझ्या ओंजळीत जल घेऊन व नेत्र मिटून नदीच्या काठाजवळ उभा होतो त्यावेळेस साहजिकच मी ध्यानमग्न अवस्थेत होतो आणि माझे देहभान तर हरवलेलेच होते. त्यामुळे माझ्या ओंजळीत दुसरी काही गोष्ट पडल्याचे त्यावेळेस माझ्या लक्षात येणे तर शक्यच नव्हते. कोणत्याही बाह्य कारणाने माझे मन विचलित होणे घडलेच नसते. कारण खरे तर माझे मन माझ्या देहभावात नव्हतेच, तर माझ्या अंतरीच्या स्वानुभवात पूर्णपणे तादात्म्य पावलेले होते. दुसरी अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझ्या ओंजळीतील जल हे अत्यंत पवित्र झालेले होते. कारण माझ्या अंतरात सर्वात पवित्र असा ईश्वरीभाव होता. त्यामुळे त्या जलात दुसरी कोणतीही म्हणजे अगदी अपवित्र अशी वस्तू जरी पडली, तरी ते जल अपवित्र होणे शक्यच नव्हते. कारण खरी पवित्र वस्तू कोणत्याही बाह्य कारणाने अपवित्र तर होऊच शकत नाही, उलट ती त्या अपवित्र वस्तूलाच पवित्र करून ठेवते. एवढे सामर्थ्य अत्यंत पवित्र अशा ईश्वरी भावामध्ये आहे. त्यातूनही मी जेव्हा माझी सर्व ओंजळच सूर्याला अर्घ्य म्हणून समर्पण केली, तेव्हा तर माझ्याठायी ना काही पवित्र म्हणून राहिले, ना काही अपवित्र म्हणून वेगळे राहिले. माझ्याठायी तर केवळ ‘त्याचे त्यासी केले सर्व समर्पण’ हाच एक कृतज्ञताभाव शिल्लक राहिला. हा कृतज्ञभाव हेच तर कृतार्थतेच्या अनुभवाचे मूळ आहे.



कौशिका, त्यानंतर जेव्हा मी देहभानावर आलो तेव्हा माझ्या लक्षात आले की कोणीतरी माझे पाय धरून माझ्याकडे अभयदान मागत आहे. त्यावेळेस माझ्या अंतःकरणाच्या अवस्थेनुसार माझ्या मुखातून उत्स्फूर्तपणे 'तथास्तु' असे सहजोद्गार निघाले. त्यानंतर ती व्यक्ती म्हणजे चित्रसेन आहे हे मला कळले आणि त्याच्याकडून काय आगळीक घडली हे मला तुझ्याकडून मग समजले. मी माझ्या वृत्तीनुसार शांतच राहिलो. तुझ्या दृष्टीने चित्रसेनाने माझा अवमान केला असे तुला वाटले आणि तुला साहजिकच राग आला. एवढेच नव्हे, तर त्यामुळे तुझ्या मनाचा समतोलही बिघडला आणि तू विकाराला वश होऊ लागलास. परंतु माझ्यावरील श्रद्धेने तुझा विवेक जागृत झाला आणि तू स्वतःला सावरलेस. त्याने मला अत्यंत संतोष झाला. तुझ्या ठिकाणचा हा मूलभूत शिष्यभाव हेच तुझे बलस्थान आहे आणि त्याच भावबळाने तुला ईश्वरी अनुभव अगदी निश्चितपणे येईल याची मला पूर्ण खात्री आहे.


कौशिका, आणखीन एक गोष्ट नीटपणे लक्षात घे की चित्रसेनाने काही जाणूनबुजून ती चूळ माझ्या ओंजळीत टाकलेली नव्हती. तर ती गोष्ट त्याच्याकडून अनवधानानेच घडली होती हे खरेच आहे. कारण विमानात असताना एवढ्या उंचावरून त्याला जमिनीवरील व्यक्ती वा वस्तू स्पष्टपणे दिसणे शक्यच नव्हते. म्हणूनच त्या गोष्टीचा एवढा बागुलबुवा करण्याचे काहीच कारण नाही. त्याची काही एवढी दखल घ्यावी एवढी महत्त्वाची मुळी ती गोष्टच नाही. अर्थात् अशा तऱ्हेने धुंद व मदांध अवस्थेत वागणे हे त्या चित्रसेनाच्या दृष्टीने निश्चितच चुकीचे आहे. कारण ते त्याच्यासाठी घातक आहे आणि त्याला अधोगतीला नेणारे आहे. पण म्हणून त्याच्यावर दया करण्यापलीकडे आपण दुसरे काहीच करू शकत नाही. त्याला काही समजावून सांगायचीही सोय नाही. त्यालाच काही पश्चात्ताप झाला आणि त्यालाच काही सुबुद्धी झाली तरच ते शक्य आहे. तेव्हा आपल्या दृष्टीने त्या चित्रसेनाचा प्रसंग व प्रश्न पूर्णपणे संपलेला आहे. खरे की नाही?"

गालवांच्या शांतीपूर्ण व बोधपर बोलण्याने कौशिकाचे मनही बरेचसे स्थिर झाले आणि त्याच्या ठिकाणचा विवेकही हळूहळू जागृत होऊ लागला. त्याने गालवांना दोन्ही कर जोडून वंदन केले आणि नम्रभावाने बोलण्यास सुरूवात केली,

"गुरुवर्य, तुमचे सांगणे पूर्णपणे सत्य आहे यात तिळमात्रही शंका संभवतच नाही. ईश्वरी अनुभवाने व्यापक व सखोल असलेल्या तुमच्या अंतःकरणाच्या ठायीच असा सद्भाव व असे सद्विचार सहजतेने निर्माण होतात.

कारण तुमच्या अंतःकरणाचा तो स्थायिभावच आहे. परंतु माझ्या अंतःकरणाचीच काय, माझ्या मनाची स्थितीसुद्धा तेवढी विशाल व सखोल नाही. तुमच्या माहात्म्याची जाणीव माझ्याठायी निश्चितच आहे. पण तुमच्यावरील व्यक्तिगत प्रेमामध्येच माझे मन पूर्णपणे गुंतलेले आहे हे जास्त खरे आहे. त्यामुळेच तुमचा कळत व नकळतही झालेला अवमान सहन करणे मला शक्य होत नाही. माझी ही प्रेमावस्था तुम्ही निश्चितच जाणून आहात आणि त्या प्रेमाचेच फळ मला मिळावे, म्हणजे माझ्याही अंतःकरणाची अवस्था तुमच्या अंतःकरणासारखीच व्हावी असे तुम्हाला तुमच्या अंतःकरणापासून सतत व सहजपणे वाटत असते. कारण तुम्ही मला तुमच्या अंतःकरणाचा एक अंश म्हणूनच पाहता आणि तसे अनुभवताही. तोच अनुभव मी घ्यावा असा तुमचा सत्यसंकल्प आहे. तसा ध्यासही तुमच्याठायी नित्य असतो आणि मलाही त्या ध्यासातच तुम्ही नेहमी ठेवीत असता. त्यासाठी तुम्हीच माझ्याशी संवाद साधून तुमच्या अंतःकरणाची विशुद्ध व तेजस्वी अवस्था प्रगट करीत राहता, ज्यामुळे माझ्याठायी शंका व विकल्प निर्माण झाले तरी ते मूळ धरू शकत नाहीत. ही तुमची माझ्यावरील केवढी तरी कृपाच आहे, जी मला नित्य प्रेरणा देते आणि माझ्याठिकाणी तुमच्या विषयीचा भक्तिभाव अधिकाधिक वाढवीत राहते.

अहो गुरूनाथ, आता माझे मन खरेच शांत झाले आहे आणि तुमच्या प्रेमाने ते पूर्ण युक्त झालेले आहे. परंतु अजून अधिक जाणून घेण्याच्या दृष्टीनेच केवळ मला तुम्हाला काही प्रश्न विचारावेत असे वाटत आहे. चित्रसेनाकडून अनवधानाने गोष्ट घडली किंवा तुमचे माहात्म्य जाणत नसल्यामुळे त्याच्याकडून अज्ञानापोटी तुमचा अवमान घडला हे तुमचे म्हणणे योग्यच आहे. कारण तुमच्या शुद्ध दृष्टीला तेच दिसले व तसेच जाणवले. परंतु एखाद्याकडून घडलेल्या दुष्कृत्याचे अज्ञान हे कारण असले, तरी ते त्याचे समर्थन होऊ शकणार नाही. त्याच्या कर्माची फळे त्याच्या प्रारब्धानुसार ईश्वरी नियतीत त्याला मिळतीलच हेही खरेच आहे. पण त्या दुष्कर्मीयांच्या दुष्कृत्याचा त्रास अनेक सामान्य जनांना व सज्जनांना सहन करावा लागेल आणि मग त्याच्यावरती उपाय काय? व तो कोण करणार? अशा पापी लोकांना शासन करून त्यांच्यापासून सज्जनांना संरक्षण देण्याची जबाबदारी कोणाची? आणि ती कोण स्वीकारणार? ईश्वराच्या नियतीतही त्यासाठी कोणीतरी निमित्त हा होणारच ना? नाहीतर अशा दुर्जनांची दुष्कृत्ये वाढतच राहतील आणि त्याची झळ व ताप सामान्यांना अकारण होत राहील. तेव्हा अशा दुर्जनांना आळा



बसण्यासाठी ईश्वराच्या नियतीत काय योजना असते, ते तुम्ही कृपा करून मला सांगावे आणि माझ्या मनाचे समाधान करावे अशी मी तुम्हाला विनंती करतो."

कौशिकाच्या बोलण्यातील मनमोकळेपणाचे गालवांना समाधान झाले. त्यांनी कौशिकाकडे पाहून मंदस्मित केले आणि शांतपणे व सावकाशपणे बोलण्यास सुरूवात केली,

"कौशिका, तुझा प्रश्न अगदी योग्यच आहे. या प्रश्नामागील जे विचार तुझ्या मनात आले त्यांचेच मला कौतुक वाटत आहे. कारण हे प्रश्न तुझ्याठायी केवळ जिज्ञासू वृत्तीतून निर्माण झालेले नाहीत, तर ते प्रश्न तुझ्या श्रवणातून व त्यातील मननातून बाहेर आलेले आहेत आणि त्यामध्ये विषयाच्या अगदी मुळाशी जाऊन पूर्ण सत्य जाणून घेण्याची तीव्र तळमळ आहे. म्हणूनच त्या प्रश्नांना महत्त्व आहे. ईश्वराच्या ज्या सृष्टीत आपण जन्माला आलो व जीवन जगत आहोत त्या सृष्टीकार्याचीही योग्य ती जाण आपल्याला असणे हेही तेवढेच आवश्यक आहे. कारण या बाह्य सृष्टीचाही आपल्या जीवनावर थोडा फार परिणाम होत असतोच आणि त्या बाह्य परिणामांचा आपल्या मनालाही स्पर्श होतोच.

कौशिका, तुझे म्हणणे योग्यच आहे. अशा दुष्ट व दुराचारी लोकांपासून सज्जनांचे रक्षण करणे अत्यंत आवश्यक आहेच. पण त्यासाठी प्रथम त्या सज्जनांनीच सबळ होणे जरूरीचे आहे. केवळ बाह्यांगाचे सद्वर्तन करून मनाला सबलता प्राप्त होत नाही. त्यासाठी मन, बुद्धी व मुख्यतः चित्त यांची पूर्णपणे शुद्धी व्हावी लागते. मनाची शुद्धी ईश्वरी प्रेमाने, बुद्धीची शुद्धी ईश्वरी ज्ञानाने व चित्ताची शुद्धी ईश्वरी भक्तीच्या ध्यासाने होत असते. रजोगुण व तमोगुण यांचा समूळ नाश करून एकीएक सत्त्वगुणच जेव्हा वृद्धिंगत होतो तेव्हाच खरी सबळता व तेजस्विता प्राप्त होते. परंतु या सत्त्वगुणाचाही अहंकार शिल्लक राहतो आणि तो केवळ ईश्वराठायीच्या शरण्यभावाने नाहीसा होतो. अशा निरहंकारीत्वानेच शुद्ध सत्त्वगुणाची प्राप्ती होते आणि त्यामुळेच पराक्रमही घडतो. मग दुसऱ्या कोणाच्याही रक्षणाची व आधाराची आवश्यकताच राहात नाही.


कौशिका, पण या सृष्टीत असे अनेक सामान्यजन आहेत की ज्यांच्याठायी अजूनही रजोगुण व तमोगुण आहेत, तरीही ते सत्त्वगुणप्रधान आहेत. त्यांच्या ठायी सत्त्वगुण हा प्रामुख्याने आहे पण रजोतमाच्या दोषामुळे ते मनाने

दुर्बल आहेत. अशा जनांच्याठायीचा सत्त्वगुण राखणे व त्याचे रक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण तरच एक दिवस ते सबळ होण्याची शक्यता आहे. म्हणूनच जेव्हा जेव्हा दुर्जन हे शिरजोर होऊन माजतात आणि सज्जनांचा प्रत्यक्ष छळ करू लागतात, तेव्हा सर्वशक्तिमान असा परमेश्वर, अंश रूपाने या सृष्टीत अवतरतो. आपल्या दिव्य पराक्रमाने दुर्जनांचे निर्दालन करून सज्जनांच्या सत्प्रवृत्तीचे संरक्षण करणे हे सत्कार्य या अवतार चरित्रांद्वारे घडत असते. परमेश्वराच्या नियतीत त्याच्याच संकल्पानुसार उत्स्फूर्तपणे घडणारी ही एक अद्भुतरम्य अशीच गोष्ट आहे.”

गालवांचे बोलणे एकाग्र मनाने ऐकणारा कौशिक हा अधिकच विचारात पडला. केवळ आपल्या सद्गुरूंच्या ठायीच परमेश्वराचे सर्व माहात्म्य प्रगट आहे, या दृष्टीने व श्रद्धेने पाहणाऱ्या कौशिकाला हा अवतार चरित्रांचा विषय नवीनच होता. त्याहीपेक्षा जास्त तो अनाकलनीय होता. आपल्या सद्गुरूंच्या कार्यापेक्षा दुसरे काही ईश्वरी कार्य असू शकते ही कल्पनासुद्धा करणे कौशिकाला शक्य होत नव्हते. पण अशा कार्याचा उल्लेख खुद्द गालवांच्याच मुखातून होताना ऐकल्यावर त्यावर श्रद्धा ठेवणे कौशिकाला भागच पडत होते. परंतु तो विषय अधिक विस्तारपूर्वक व सखोलतेने समजून घेतल्याशिवाय त्या श्रद्धेला बळकटी येणार नाही हे मात्र कौशिक जाणून होता. म्हणून थोडेसे थांबून त्याने पुन्हा विचारपूर्वक व नम्रभावाने गालवांशी बोलण्यास सुरूवात केली,

“अहो गुरूनाथ, हा अवतार चरित्रांचा विषय तुमच्या मुखातून मी पहिल्याप्रथमच श्रवण करीत आहे. या अवतार चरित्रांचे जे वेगळेपण व विशेषत्व तुम्ही सांगितलेत ते ऐकून मला थोडेसे नवलही वाटत आहे. माझ्या भावाने माझ्यासाठी तर तुम्हीच माझे दैवत व सर्वस्व आहात. कारण तुम्ही मला केवळ रक्षण व आधारच दिला असे नाही, तर मला माझ्या आत्मकल्याणाचा असा ईश्वरप्राप्तीचा मार्गही दाखवला आहेत आणि तुमच्या सेवेने व भक्तीने तो मार्ग निश्चितपणे पूर्ण होईल असा माझा दृढ विश्वास आहे. तेव्हा अशी ही अवतार चरित्रे या सृष्टिकार्यात प्रगट होत असतीलही, परंतु ती माझ्या सद्गुरूंच्या जीवनचरित्रापेक्षा श्रेष्ठ असू शकतील असे मला मुळीच वाटत नाही.”

कौशिकाच्या बोलण्यावर गालव ऋषी थोडेसे गंभीर झाले आणि थोडा वेळ काहीच न बोलता ते नेत्र मिटून स्वस्थच बसून राहिले. काही वेळाने गालवांनी आपले नेत्र उघडले आणि कौशिकाकडे कृपाकटाक्ष टाकला. कौशिकाच्या नजरेतील



अपार श्रद्धा व भक्तिभाव पाहून गालवांना त्याचे कौतुक वाटले. त्यांच्या ठायीचा प्रेमा दाटून आला आणि त्यांच्या मुखातून कौशिकासाठी प्रेमळ सत्य वचने प्रगट होऊ लागली,

"अरे कौशिका, एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव की या सृष्टीमध्ये भिन्न भिन्न कार्यासाठी ईश्वराची वेगवेगळी रूपे प्रगट होत असतात. परंतु ईश्वर मात्र एकीएकच आहे आणि तोच सर्वश्रेष्ठ आहे. त्याचे एकत्व हे सर्व रूपात व सर्व कार्यात अबाधितच असते आणि म्हणूनच त्यामध्ये श्रेष्ठ वा कनिष्ठ असा भेदभाव अजिबात संभवतच नाही. गुरूशिष्य परंपरेद्वारे आत्मप्राप्तीचा मार्ग प्रगट ठेवण्याचे कार्य जसे घडते, तसे अवतारकार्याद्वारे सर्वसामान्यांच्या भाविकतेचे रक्षण केले जाते. या सृष्टीत गुरूशिष्य परंपरा ही अखंडपणे व अव्याहत चालू असते, तर अवतार चरित्रे ही काही विशिष्ट कारणांनी व विशिष्ट काळापुरती प्रगट होत असतात. गुरूशिष्य परंपरेचा आश्रय घेण्यासाठी ज्या संसाराच्या वैराग्याची नितांत आवश्यकता आहे, ते कालमानानुसार सर्व सामान्यांच्याठायी तेवढ्या सहजतेने असू शकत नाही. परंतु ईश्वराची विशेष अवतार चरित्रे ही सामान्य भाविकांच्याठायी ईश्वरप्राप्तीच्या मार्गाची गोडी व आवश्यकता निर्माण करण्यास कारणीभूत व सहाय्यभूत होत असतात. सर्वात मुख्य गोष्ट म्हणजे असे अवतारकार्य ज्या महात्म्यांकडून प्रगट होत असते त्यांनी आधी स्वतः गुरूशिष्य परंपरेचा आश्रय घेतलेला असतो. असे महात्मे सद्‌गुरूंना अनन्य अशा शिष्यभावाने शरण जाऊन सद्‌गुरूभक्तीने आत्मज्ञानप्राप्ती करून घेतात आणि मगच त्यांच्याकडून अवतारकार्य घडत असते. त्यांच्यामुळेच गुरूशिष्य परंपरा विशेषत्वाने उजळून निघते आणि गुरूशिष्य परंपरेचे व सद्‌गुरूभक्तीचे माहात्म्य प्रकर्षाने प्रगट होते. त्यामुळे काही भाविक उद्युक्त होऊन या परंपरेचा आश्रय घेतात आणि साधकावस्थेला प्राप्त होतात. तेव्हा अवतार चरित्रे व गुरूशिष्य परंपरा ही एकमेकांना पूरकच आहेत ही गोष्ट कायमची लक्षात ठेव. त्या संबंधी केव्हाही मनाची द्विधा स्थिती होऊ देऊ नकोस.

कौशिका, तुला एक आनंदाची गोष्ट सांगतो जी ऐकून तुलाही नवल वाटेल, की असे अवतार चरित्र सांप्रत काळी कृष्णरूपाने प्रगट आहे. द्वारका नगरीत सध्या वास्तव्य करून असलेल्या त्या कृष्णाच्या अद्‌भुत व दिव्य चरित्राद्वारे त्या परमेश्वराचे सर्व दैवी गुणच साकार झालेले आहेत. आपल्या दिव्य पराक्रमाने अनेक दुष्ट व दुर्जनांचे निर्दालन करून त्याने सज्जनांना आधार दिला. एवढेच नव्हे, तर

त्याच्या दैवी प्रेमाने अनेक सामान्य प्रापंचिकांना कृष्णाने संसाराच्या बंधनातून मुक्त केले आणि त्यांची जीवने स्वास्थ्याची, सुखाची व समाधानाची करून ठेवली. आपल्या ठायीच्या ईश्वरी प्रेमाच्या गोडीचा अनुभव सर्वांना आणून देताना, कृष्णाने अनेकांच्या ठायी ईश्वरी प्रेमाची निर्मिती केली आणि ईश्वरी भक्तीचे माहात्म्य ठसविले आहे, ही कृष्णचरित्रातील सर्वात विशेष महत्त्वाची गोष्ट आहे. तेव्हा कृष्णरूपाने असे अवतारकार्य घडत असताना आपल्याला काळजी करण्याचे काहीच कारण नाही. दुराचाराला व अधर्माला आळा घालण्याचे काम कृष्णाचे आहे आणि त्याची जबाबदारी तो उत्कृष्टपणे पार पाडत असणार यात तिळमात्रही शंका नाही."

गालवांचे बोलणे ऐकत असताना कौशिकाला नवल तर वाटत होतेच पण त्याचबरोबर त्याच्या ठिकाणची उत्सुकताही वाढत होती. त्यामुळे न राहवून कौशिक लागलीच उद्गारला,

"अहो गुरूनाथ, एवढे जर त्या कृष्णाच्या कार्याचे माहात्म्य आहे तर मग अजूनही या चित्रसेनासारखे दुराचारी जिवंत कसे? आणि अशी दुष्कृत्ये करण्याचे धाडस ते कसे काय करू शकतात? कृष्णाचे धर्मकार्य व्यवस्थित घडत असेल तर मग चित्रसेनाला कृष्णाचा वचक तरी हवा की नाही? हे प्रश्न माझ्या मनात निर्माण होत आहेत खरे, परंतु त्यामागे कृष्णाविषयी कोणतीही शंका वा अनादर मात्र माझ्याठिकाणी अजिबात नाही. तर कृष्णाचे कार्य व माहात्म्य अधिकाधिक जाणून घ्यावे हाच एकमेव हेतू माझ्याठायी आहे, आणि हे तुम्हीही जाणून आहातच याची मला पूर्ण खात्री आहे. पण माझा प्रश्न बरोबर आहे ना?"

कौशिकाच्या प्रश्नावर गालवांनी हलकेच मान डोलवली आणि ते म्हणाले,

"कौशिका, तुझ्या मनात असे प्रश्न येणे साहजिकच आहे. परंतु त्यातील गुह्यही नीट समजून घे. अरे, अवतार कार्य हे परमेश्वरी शक्तीच्या अधिष्ठानावर व प्रकृतीनुसार घडत असते हे खरे आहे. पण त्या कार्याला मानवी जीवनाच्या सर्व मर्यादाही असतात हे पण खरे आहे. या भूतलावरील सर्व दुराचारी व दुष्ट लोकांना शोधून काढून त्यांचा नाश करणे हे कृष्णालाही शक्य नाही. मुळात त्याचे कार्य

सद्धर्माची स्थापना करणे हे आहे आणि म्हणून त्या कार्याच्या आड येणाऱ्या अधर्मीयांचे निर्दालन करणे कृष्णाला क्रमप्राप्त होते. त्यातूनही कृष्णाच्या कार्याला विरोध करून कोणी आपणहूनच अहंकाराने कृष्णाच्या समोर उभे राहण्याचे साहस दाखवलेच, तर त्याचाही निःपात करणे हे तर कृष्णाचे कर्तव्यकर्मच ठरते. तेव्हा चित्रसेनासारखे दुराचारी जोपर्यंत कृष्णाच्या निदर्शनास येत नाहीत, तोपर्यंत कृष्णही त्यांच्याविरूद्ध काहीही कारवाई करू शकणार नाहीच हे खरे आहे ना? त्यावर कृष्णाचाही काही इलाज नाही. पण एखाद्याला जर असे वाटत असेल की कृष्णाने अशा दुराचाऱ्यांना शासन करावे, तर त्याने ती गोष्ट कृष्णाला प्रत्यक्षपणे कळीत करावयास हवी. कृष्ण त्यावर विनाविलंब उपाय योजना करेल या विषयी शंकेला जराही वावच नाही. कौशिका, तूच याचा अनुभव का घेत नाहीस? तू स्वतः कृष्णाला भेटून त्याला चित्रसेनाची माहिती दे आणि मग कृष्ण त्यावर काय करतो ते तू स्वतःच बघ म्हणजे झाले."

गालवांच्या बोलण्यावर आपली मान नकारार्थी हलवीत कौशिक लागलीच म्हणाला,


"नाही, नाही, गुरूनाथ, माझ्या मनात तशी कोणतीही इच्छा मुळीच नाही. तुम्ही अवतार चरित्रांची महती व माहिती सांगत होतात म्हणूनच केवळ माझ्या मनात उत्सुकतेपोटी काही प्रश्न निर्माण झाले एवढेच. पण एक गोष्ट मी तुम्हाला विनम्रभावाने पण निश्चयात्मकतेने सांगतो, की माझ्याठायी तुमच्याशिवाय दुसऱ्या कोणाचेही माहात्म्य नाही. माझ्यासाठी तुम्हीच माझे सर्वस्व आहात. माता, पिता, गुरू व ईश्वर या सर्वांचा अनुभव मी तुमच्या ठायीच घेत असतो. तुमच्या पलीकडचा दुसरा कोणी परमेश्वर निदान माझ्यासाठी तरी नाही. परमेश्वराचे अस्तित्व, त्याचे ज्ञान व त्याची सत्ता सर्वव्यापक आहे हे सत्यज्ञान मी जाणून आहे. परंतु तुम्हीच माझे सर्व अंतर्बाह्य जीवन व्यापून राहिलेला आहात हेच माझ्यासाठी सत्य आहे. म्हणूनच दुसरे कोणतेही कार्य अनुभवण्याची व पाहण्याची मला अजिबात इच्छा नाही. तुमच्या चरणीच मी अनन्य आहे आणि त्यातच मी धन्य आहे. माझ्या हृदयात केवळ आपलीच प्रेमळ व तेजस्वी मूर्ती स्थापित झालेली आहे आणि माझ्या मनात दुसऱ्या कोणालाही जागाच नाही."

कौशिकाच्या बोलण्याचा झालेला संतोष गालवांच्या मुखावर अगदी स्पष्टपणे दिसत होता. परंतु अंतःकरणात कौशिकाविषयी असलेल्या अतीव प्रेमापोटी गालवांना त्याच्याशी पुन्हा बोलल्याशिवाय राहवले नाही.

“अरे कौशिका, तुझी माझ्यावरील श्रद्धा व निष्ठा मी पूर्णपणे जाणून आहे. त्यामुळेच तुला तुझ्याठायी आत्मज्ञानाचा अनुभव निश्चितपणे घेता येणार आहे. परंतु एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव की आपल्या हृदयात जसे आत्म्याच्या रूपाने ईश्वराचे अस्तित्व आहे तसेच तो ईश्वर सर्व रूपाने व सर्वत्र आहे. त्यातही त्या ईश्वराचे प्रगटणारे अवताररूप हे विशेष आहे हेही खरेच आहे. त्यामुळे त्या रूपाला पाहणे, ऐकणे व भेटणे याचा होणारा आनंद हाही एक विशेषच असतो. या सृष्टीमध्ये असे अवताररूप वारंवार प्रगट होत नसते. त्यामुळे आत्मानुभवी महात्म्यांच्या ठायीसुद्धा असे प्रगटलेले अवताररूप पाहण्याची एक उत्सुकता असतेच. आत्मस्वरूपाच्या आत्मानंदात रममाण असणाऱ्यांनाही अशा अवतारी रूपाने साकार झालेला परमानंद अनुभवण्याची उत्कंठा असते. एवढे माहात्म्य व्यापक परमेश्वराच्या सगुण रूपातील अवतारलीलांचे आहे, ही महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव. तेव्हा या प्रसंगाचे निमित्त करून कौशिका, तू कृष्णाची प्रत्यक्षच भेट का घेत नाहीस? म्हणजे तुला तुझ्या अनुभवानेच कृष्णाचे विशेषत्व काय आहे हे कळेल. किंबहुना आपण असे करूया, की आपण दोघेही त्या कृष्णाच्या भेटीला जाऊया. खरे तर, माझ्याही ठिकाणी या सृष्टीत प्रगटलेल्या ईश्वरी लीलेचे ते कौतुक पाहण्याची ऊर्मी निर्माण झालेली आहे.”

□□□

गालवांच्या बोलण्याचे कौशिकाला सुरूवातीला जरी नवल वाटत होते तरी नंतर मात्र कौशिक थोडासा गंभीरच झाला आणि मनातल्या मनात विचारही करू लागला. परंतु काही केल्या त्याच्या मनाचा उलगडा होईना. कौशिकाच्याही ते लक्षात आलेच. शेवटी त्याने मनाचा एकच निश्चय केला की केवळ विचार करीत राहण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीनेच अनुभव घेऊ या. कारण त्यानेच योग्य तो निवाडा होईल. त्याच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची गोष्ट हीच होती की स्वतः गालवांच्या ठायीच कृष्णभेटीची ऊर्मी निर्माण झालेली होती. तेव्हा त्या ऊर्मीची पूर्ती करण्यासाठी गालवांच्या बरोबर राहणे तर कौशिकाकडून सहजच घडणार होते. कारण तेच तर त्याच्या शिष्यभावाचे व सद्‌गुरूभक्तीचे लक्षण होते. त्यामुळे कौशिकाने गालवांच्याकडे पाहून होकारात्मक मान डोलवली. परंतु त्याच्या



मुखावरील गंभीरता मात्र गालवांच्या दृष्टीस आलीच. मग गालवही काही बोलले नाहीत आणि ते स्वस्थच राहिले. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळची सर्व आन्हिके झाल्यानंतर गालव व कौशिक हे उभयता द्वारकेच्या दिशेने मार्गक्रमण करू लागले एवढे मात्र खरे!


गालवांच्या बरोबर प्रवास करीत असताना सेवाभावाने असलेला कौशिक हा अत्यंत सावध व दक्ष होता. अत्यंत शांत व प्रसन्न मुद्रेने चालत असलेल्या गालवांना कौशिकाकडून योग्य अशी साथ अगदी सहजतेने दिली जात होती. कधी गालवांचा हात धरून त्यांच्या बरोबर, तर कधी गालवांच्या पाठोपाठ योग्य ते अंतर ठेवून चालताना कौशिकाच्या ठिकाणी फक्त एकच व्यवधान होते आणि ते म्हणजे गालवांच्या अंतःकरणाचे. गालवांच्या अंतःकरणाची अनुभवावस्था जाणता येणे जरी कौशिकाला शक्य नव्हते, तरी त्यांच्या मुद्रेवरून व नेत्रातून किंवा त्यांच्याकडून सहजतेने घडणाऱ्या हालचालींमधून जे भाव निर्देश होत असत ते कौशिकाला नेमके कळत असत. त्याचे मन गालवांच्या मनाशी जुळल्याचेच ते लक्षण होते. त्यामुळे कौशिकाकडूनही योग्य तो प्रतिसाद प्रत्यक्ष कृतीने लगेचच दिला जाई. कारण गालवांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्याचाच एकीएक विचार कौशिकाच्या मनात जागृत होता. काही वेळा कौशिक स्वतःहूनही गालवांना मध्ये थांबून विश्रांती घेण्यासाठी किंवा जलप्राशनासाठी विनंतीपूर्वक विचारणा करीत असे. त्याला काहीवेळा गालव मान्यता देत असत किंवा देत नसतही. पण कौशिक मात्र गालवांवरील अतीव प्रेमापोटी त्याच्या सेवाभावाने नित्य युक्तच राहिला. परंतु एक गोष्ट कौशिकाच्या निश्चितपणे लक्षात आली की गालवांचे मन तेथे नव्हतेच. ते मन बहुधा आधीच द्वारकेला जाऊन पोहोचले असावे हे कौशिकाच्या लक्षात आले. त्याचे मन मात्र केवळ गालवांच्या ठिकाणीच होते आणि तो एकमेव गालवांच्याच विचारात होता.

गालव व कौशिक या उभयतांनी जेव्हा द्वारका नगरीत प्रवेश केला तेव्हा सूर्य अजून माध्यान्हीला आला नव्हता खरा, परंतु पूर्व दिशेला बराचसा वरती आला होता. आपल्या तेजस्वी किरणांनी त्याने सर्व द्वारका पूर्णपणे उजळवून ठेवली होती आणि द्वारकेचे सोनेरीपण अधिकच झळाळून राहिले होते. द्वारकेतील प्रगटलेले वैभव पाहता पाहता कौशिकाचे डोळे तर साहजिकच दिपून गेले. कारण ते सर्व तो प्रथमच पाहत होता. परंतु गालवांच्या विशुद्ध अंतःकरणाला मात्र त्या बाह्य वैभवातून प्रगटलेले कृष्णाचे षड्गुणैश्वर्य जाणवले आणि परमेश्वरी प्रेमाने त्यांचे अंतःकरण भरून आले. निर्गुण निराकार परमेश्वराचे सगुण साकार झालेले ते अभिजात सौंदर्य पाहात असताना गालवांचे नेत्र अतिशय आनंदले. समरस होऊन

त्या सौंदर्याचा रसास्वाद गालव स्वतः घेत होते आणि कौशिकाला अत्यंत रसिकतेने त्यांचा आनंद पुन्हा पुन्हा वर्णन करून सांगत होते. गालवांचे ते रूप कौशिक प्रथमच पाहत होता आणि मनातल्या मनात चकितही होत होता. एरव्ही पूर्णपणे वैराग्यशील असलेल्या गालवांच्या बाह्यरूपाच्या त्या आगळया वेगळया दर्शनाने कौशिक जरी थोडासा बावरला, तरी बाह्यांगाने गालवांच्या आनंदात सहभागी होण्याचा प्रयत्न मात्र कौशिकाकडून अगदी मनापासून घडत होता.

अशा तऱ्हेने द्वारकेतील ईश्वरी ऐश्वर्याच्या आविष्काराचे सर्व सौंदर्य न्याहाळीत, पण कुठेही न रमता वा न रेंगाळता गालव ऋषी कौशिकासह त्वरेने चालत कृष्णाच्या महालाच्या बाहेर येऊन पोहोचले. गालवांची तेजस्वी मूर्ती पाहूनच द्वारपालांना त्यांचे विशेषत्व लक्षात आले आणि त्यांनीही लगबगीने महालात जाऊन कृष्णाला कळीत केले. कृष्ण जवळ जवळ धावतच बाहेर आला आणि गालवांना पाहताच कृष्णाने त्यांना एकदम साष्टांग प्रणिपातच केला. गालवांनी हर्षभराने कृष्णाला आपल्या दोन्ही हातांनी वर उठवले आणि अत्यंत प्रेमभराने त्याला दृढालिंगन दिले. ते दृश्य पाहताना कौशिकाचे भान मात्र पूर्णपणे हरवून गेले. त्याला काहीच अर्थबोध होईना. कृष्णाने जेव्हा गालवांना साष्टांग प्रणिपात केला तेव्हा आपल्या सद्‌गुरूंचे माहात्म्य जाणवून कौशिकाचेही अंतःकरण भरूनच आले होते. पण त्यानंतर गालवांनी ज्या प्रेमाने कृष्णाला दृढालिंगन दिले आणि कृष्णभेटीचा जो आनंद गालवांच्या मुखावरून ओसंडून वाहत होता, तो पाहून मात्र कौशिक जरासा भांबावल्यासारखा झाला. कारण गालवांच्या बाह्य लक्षणांवरून तरी कौशिकाला असेच दिसत होते की गालवांना जणू परमात्म्याच्या भेटीचाच परमानंद झालेला आहे. गालवांच्या ईश्वरी अनुभवाच्या परते असे कृष्णाठायी काय आहे की ज्याचा एवढा आनंद गालवांना व्हावा, असे कोडेच कौशिकाच्या मनाला पडले. परंतु तरीही कौशिक मात्र शांत व स्वस्थच राहिला.

एक गोष्ट मात्र निश्चितच खरी होती की कृष्णाचे रूप व व्यक्तिमत्व पाहून कौशिकाच्या ठिकाणीही कृष्णाविषयी एक जबरदस्त आकर्षण निर्माण झालेले होते. कृष्णाचे प्रसन्न मुख व त्यावरील मोहक व मधुर हास्य पाहून कौशिकाचे मनही हरखून गेलेच. कृष्णाच्या वागण्याबोलण्यातील अकृत्रिम सहजता व विनम्रता यांचा कौशिकाच्या मनावर केवढा तरी प्रभाव पडला होता. तेवढ्यातच जेव्हा कृष्णाने कौशिकाच्या जवळ येऊन व आपले दोन्ही कर जोडून कौशिकाचे स्वागत केले तेव्हा तर कौशिक अगदी चकितच झाला आणि पूर्णपणे बावरलाच. कृष्णाला प्रतिसाद देण्याचेही भान कौशिकाला थोडावेळ राहिले नाही. त्याची ही अवस्था गालवांच्या लक्षात आली आणि त्यांनी पुढे होऊन कौशिकाच्या मस्तकाला हळूच स्पर्श केला.



कौशिकाने स्वतःला लागलीच सावरले आणि त्यानेही कृष्णाला हात जोडून वंदन केले. नंतर कृष्णाने अत्यंत आदरपूर्वक गालवांचा हात धरला आणि त्यांना आपल्या महालात हळूहळू नेऊ लागला. कौशिकही मनात अत्यंत उत्सुकता बाळगून त्यांच्या मागोमाग पावले टाकीत चालत राहिला.

कृष्णाने गालवांना महालातील स्वतःच्या खास दालनात नेले आणि त्यांना एका उच्चासनावर बसवून स्वतः त्यांच्या चरणाशी नम्रभावाने बसून राहिला. तेवढ्यात रूक्मिणीही तेथे येऊन उभी राहिली. कोणीतरी ऋषी कृष्णाच्या बरोबर महालात येत असल्याची बातमी रूक्मिणीला सेवकांकरवी कळलीच होती. त्यामुळे बरोबर येताना पूजेचे सर्व साहित्य घेऊनच रूक्मिणी तेथे आली होती. ते सर्व साहित्य खाली ठेवून रूक्मिणीही कृष्णाच्या शेजारी बसून राहिली. त्यानंतर कृष्ण व रूक्मिणी या उभयतांनी गालवांचे पादप्रक्षालन करून त्यांच्या चरणांचे तीर्थ प्राशन केले. कृष्णाने गालवांच्या गळयामध्ये सुगंधित पुष्पांची माळ अर्पण करून त्यांना वंदन केले. रूक्मिणीने गालवांना पंचारतीने ओवाळून त्यांचे औक्षण केले. त्यानंतर कृष्ण व रूक्मिणी पुन्हा गालवांच्या चरणाशी हात जोडून बसून राहिले. गालवांच्या तेजस्वी मुखावरील प्रसन्नता पाहून कौशिकाला अत्यंत आनंद झाला. त्याच बरोबर गालवांविषयी कृष्णाठायी असलेला पूज्यभाव पाहून कौशिकाला कृष्णाचे विशेष कौतुक वाटले. आपले सद्‌गुरू हेच सर्वात थोर आहेत या जाणिवेने कौशिकाच्या ठायीचा शिष्यभाव अत्यंत सुखावला. पण तेवढ्यात गालवांनी आपल्या गळयातील पुष्पमाळा काढून कृष्णाच्या गळयात घातली आणि रूक्मिणीच्या हाती एक सुगंधित फूल दिले. गालवांनी केलेल्या गौरवाने कृष्णही आनंदित झाला आणि त्याने गालवांच्या चरणांवर मस्तक ठेवून विनम्रभावे त्यांना पुन्हा वंदन केले. रुक्मिणीही तेवढ्याच सहजतेने कृष्णाला अनुसरती झाली आणि तिनेही नमस्कार करून गालवांचे दर्शन घेतले. हे सर्व पाहून कौशिक मात्र अत्यंत अचंबित झाला आणि तो गालव व कृष्ण यांच्याकडे अनिमिष नेत्रांनी फक्त पाहातच राहिला.


थोडा वेळ अशाच शांततेत गेला असता कृष्णानेच आपले दोन्ही हात जोडून गालवांना उद्देशून बोलावयास सुरुवात केली,

“अहो ऋषिवर्य, आज अत्यंत भाग्याने आपले पवित्र चरण आमच्या गृहाला लागले आणि आम्ही धन्यच झालो. आपल्यासारख्या थोर महात्म्यांनी आम्हाला आपल्या दर्शनास पात्र समजावे ही आपली आमच्यावरील मोठी कृपाच आहे. खरे तर, आपण सर्वसंगपरित्याग करून आपल्या आश्रमातच नित्य वास करून असता आणि केवळ आत्मानंदात रममाण असता. आत्मज्ञानदानाचे धर्मकार्य

आपल्याकडून आपल्या सहजधर्माने घडत असते आणि आपल्यासारख्या महात्म्यांच्या जीवनकार्यामुळेच आत्मज्ञानप्राप्तीसाठी अत्यंत आवश्यक असलेली सद्गुरू सत्शिष्य परंपरा अखंडपणे चालू राहत असते. पण आज आपण आपला आश्रम सोडून मुद्दामहून आमच्या भेटीसाठी एवढे कष्ट घेऊन आलात त्याअर्थी आपल्या येण्यामागे काहीतरी विशेष हेतू निश्चितच आहे. खरे तर, आपण मला नुसते जरी कळीत केले असते तरी मी स्वतः लागलीच आपल्या भेटीसाठी धावत आलो असतो. आपला तेवढा हक्क माझ्यावर निश्चितच आहे. तेव्हा आपण आपल्या येथे येण्यातील हेतू प्रगट करावा आणि माझ्याकडून आपली काही सेवा घडणे शक्य असल्यास तसे जरूर सांगावे. मी आपल्या सेवेसाठी नित्य तत्पर आहे.”

कृष्णाच्या बोलण्यातील नम्रभाव व मार्दवता यामुळे गालव अत्यंत प्रसन्न झाले. त्यांनी मंदस्मित करून कौशिकाकडे एक नेत्रकटाक्ष टाकला. कृष्णाच्या बोलण्याने कौशिकही अत्यंत प्रभावित झालेला होता. गालवांच्या नजरेतील भाव कौशिकाने ओळखला. कृष्णाच्या अवतार चरित्राचे जे वेगळेपण व विशेषपण गालवांनी कौशिकाला सांगितले होते ते हळूहळू त्याला कृष्णाच्या ठायी जाणवू लागले. पण तरीही कृष्णाच्या बोलण्यावर गालवांच्याकडून काय व कसा प्रतिसाद प्रगट होतो हे पाहण्याची उत्कंठा मात्र कौशिकाच्या ठिकाणी लागून राहिली होती. म्हणून तो गालवांच्याकडे अपेक्षित नजरेने पाहत राहिला. गालव मात्र कृष्णाकडे अत्यंत कौतुकाने व प्रेमळ नजरेने बराच वेळ पाहत राहिले होते. थोड्या वेळाने त्यांच्या मुखातून त्यांच्या अंतःकरणातील भाव शब्दरूपाने साकार होऊ लागले,

“अरे कृष्णा, तुझे हेच अत्यंत मनमोहक व लाघवी रूप पाहण्यासाठीच तर मी येथे आलो आहे. तुझ्या अद्भुत चरित्राद्वारे तू सद्गुरू व सत्शिष्य या परंपरेला तर उजळवून ठेवलेसच, पण त्याच बरोबर सामान्य जनांचाही उद्धार करून त्यांच्या ठिकाणच्या सद्भावाला संजीवन दिलेस. एवढेच नव्हे, तर तुझ्या सगुण प्रेमभक्तिच्या द्वारे ईश्वरप्राप्तीचा मार्ग त्यांच्यासाठी खुला केलास. तुझ्या पराक्रमामुळेच ग्लानी आलेल्या सद्धर्माला पुन्हा जाग आली आहे आणि अधर्माला आळा बसला आहे. तुझ्यामुळेच उन्मत्त झालेल्या अधर्मीयांना जरब बसली आहे आणि त्यांच्याठिकाणी तुझा वचक निर्माण झालेला आहे. तुझ्या भीतीपोटी असे असुर दबून असतात हे जरी खरे असले, तरी संधी मिळताच त्यांचे दुष्टत्व पुन्हा डोके वर काढते आणि मग ते सामान्यजनांसाठी त्रासदायक ठरू लागतात. स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी व स्वतःची विषयभोगाची लालसा पुरी करण्यासाठी हे दुष्ट दुर्जन



कोणत्याही थराला जातात आणि त्यासाठी सामान्यांचा अवमान वा छळ करण्यासही कमी करत नाहीत.

कृष्णा, मी पूर्णपणे जाणून आहे की या अधर्मीयांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी तुझ्याकडून तू सर्वतोपरीने प्रयत्न करीत आहेस. पण एक गोष्ट माझ्याप्रमाणेच तूही जाणून आहेस की काळाच्या गतीनुसार अधर्म हाच वाढणार आणि शिरजोर होत राहणार. कारण तीच ईश्वराची नियती आहे. परंतु तरीही तुझे अवतारकार्यसुद्धा असेच अखंडपणे घडत राहणार आहे ही गोष्टही सत्यच आहे. म्हणूनच मी तुझी खास भेट घेण्यासाठी आलो आहे. कारण असाच एक प्रसंग नुकताच माझ्या बाबतीत कोणा चित्रसेन नामक गंधर्वाच्या निमित्ताने घडला आहे. अर्थात त्याचा माझ्यावर बिलकूल परिणाम झालेला नाही. परंतु माझा हा सत्शिष्य कौशिक मात्र त्यामुळे अत्यंत दुखावला गेला आहे. माझा झालेला अवमान त्याला सहन होणे शक्यच नव्हते. साहजिकच त्याच्या मनाचा तोलही थोडासा गेला होता. परंतु माझ्या सांगण्यावरून कौशिकाने स्वतःला सावरले. मी त्याला समजावून सांगितले की 'अशा दुर्जनांना शिक्षा करणे ही आपली वृत्ती नाही आणि ते आपले कार्यही नाही. तसे कार्य केवळ कृष्णाकडूनच घडू शकते. त्याचाच तो अधिकार आहे.' माझ्या वचनांवर श्रद्धा ठेवून कौशिक जरी त्यावेळी शांत झाला असला तरी साहजिकच त्याच्या मनातील राग अजून पूर्णपणे गेलेला नाही. म्हणूनच मी कौशिकाला तुझ्या भेटीसाठी घेऊन आलेलो आहे. तेव्हा त्याचा राग नाहीसा करण्याची जबाबदारी कृष्णा, आता तुझीच आहे."


गालवांचे बोलणे ऐकत असताना कृष्ण अधिकाधिक गंभीर व विचारमग्न होत होता. त्याचबरोबर त्याच्या मुखावरील आरक्तताही वाढत होती. गालवांचे बोलणे थांबल्याबरोबर कृष्णाने लागलीच बोलावयास सुरूवात केली.

"अहो ऋषिवर्य, आपले म्हणणे अत्यंत योग्य व यथार्थच आहे. ईश्वराची नियती आपण पूर्णपणे जाणून आहातच आणि तरीही आपण आपला आत्मानुभव या कौशिकासारख्या सत्पात्र सत्शिष्यांच्या स्वानुभवाचा व्हावा म्हणून आश्रमाची स्थापना करून तेथे वास्तव्य करीत असता. त्याठिकाणी अनेक खऱ्या साधकांना आश्रय देऊन आपण त्यांना आत्मधर्माचे सत्यज्ञान देता आणि नित्य मार्गदर्शन करून सत्शिष्य घडवीत असता, ही आपली थोरवी व माहात्म्य मी पूर्णपणे जाणून आहे. अशा आपल्यासारख्या महात्म्यांचा जर कोणी अवमान केला असेल, तर या कौशिकालाच काय मलाही त्याचा रागच येणार हे अगदी सहज आहे. अधर्म व

अनीती वाढत आहे आणि हे पुढे येऊ घातलेल्या कलियुगाचेच लक्षण आहे. अर्थात् हे जरी खरे असले तरी अजूनही सद्धर्माचे अस्तित्व केवळ आपल्यासारख्या महात्म्यांमुळे टिकून आहे हेही खरेच आहे. त्या सद्धर्माला संरक्षण देणे हे माझे कर्तव्यकर्मच आहे. त्या सद्धर्माला मी केव्हाही अनाथ किंवा पोरका होऊ देणार नाही हे माझे ब्रीद आहे आणि आपल्या आशीर्वादाच्या बळावरच मी माझे ब्रीद प्रत्यक्ष आचरणाने राखीन असा माझा दृढ विश्वास आहे. ऋषिवर्य, मी आपल्या साक्षीने या कौशिकाला असे वचन देतो की ज्याने आपला अवमान केला आहे, त्या चित्रसेनाला मी मृत्युदंडाचे शासन करीनच, ही माझी प्रतिज्ञा आहे.”

कृष्णाच्या या बोलण्यावर गालव काहीच बोलले नाहीत. शांतपणे त्यांनी त्यांचे नेत्र मिटून घेतले आणि त्यांच्या मुखातून हळुवार ‘जशी ईश्वराची इच्छा’ एवढेच शब्द बाहेर आले. परंतु कौशिक मात्र जरी आधी चकित झाला तरी नंतर मात्र तो थोडासा सुखावलाही. सद्‌गुरूंच्या झालेल्या अवमानामुळे आलेल्या रागाची मनातील आग अजूनही कौशिकाच्या मनात कुठेतरी थोडीशी का होईना पण धुमसत होतीच. कृष्णाच्या त्या प्रतिज्ञापूर्वक वचनाने त्या मनावर जलाचा शिडकावा झाल्यासारखे झाले आणि कौशिकाचे मन बरेचसे निवळून शांत झाले. कृष्णाविषयीच्या आदराने कौशिकाचे मन भरून राहिले. पण त्याला माहात्म्य मात्र एकीएक त्याच्या सद्‌गुरूंचे म्हणजे गालवांचेच जाणवत होते. मनाच्या त्याच स्थितीत कौशिक कृष्णाच्याजवळ आला आणि त्याने कृष्णाला अत्यंत आदरपूर्वक दोन्ही हात जोडून वंदन केले. कृष्णाने पुढे होऊन कौशिकाचे हात आपल्या हातात घेतले आणि अत्यंत प्रेमाने कौशिकाच्या पाठीवर थोपटले. कौशिकाची सद्‌गुरूंवरील निष्ठा व भक्ती पाहून कौशिकाविषयीचे कौतुक कृष्णाच्या नेत्रातून भरभरून वाहत होते.

कौशिक लागलीच गालवांच्या जवळ गेला आणि त्याने त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांना साष्टांग प्रणिपात केला. गालवांनी सुद्धा कौशिकाचे मस्तकावर त्यांचा कृपाहस्त ठेवला आणि त्याचे मस्तक हळुवारपणे कुरवाळले. पुढच्याच क्षणी गालव त्यांच्या आसनावरून उठून उभे राहिले. त्यांनी सहेतुक नजरेने कृष्णाकडे पाहिले आणि जणू असेच सुचविले की ‘आता आमचे येथील कार्य पूर्ण झाले आहे.’ गालवांची खूण कृष्णाच्या लगेचच लक्षात आली आणि रुक्मिणीसह कृष्ण गालवांच्या सन्मुख येऊन उभा राहिला. त्या उभयतांनी गालवांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांचे दर्शन घेतले. गालवांनी आपले दोन्ही हात वर करून त्या उभयतांना शुभाशीर्वाद दिले आणि तेथून निघण्यास ते सज्ज झाले. तेवढ्यात




अचानक गालव पुन्हा मागे वळले आणि त्यांनी कृष्णाच्या जवळ येऊन कृष्णाला प्रेमालिंगन दिले. त्यांच्या ठिकाणचा निर्गुण आनंदच जणू कृष्णरूपाने सगुण झाला होता. निर्गुण आनंद सगुण आनंदाला भेटला आणि त्या मीलनात परमानंदच प्रगट होऊन राहिला. पुढच्याच क्षणाला गालवांनी स्वतःला कृष्णापासून अगदी सहजपणे दूर केले आणि ते महालाच्या बाहेर पडून मार्गस्थ झाले सुद्धा!

घडलेल्या प्रसंगाने आश्चर्यचकित झालेला आणि मनातल्या मनात थोडासा बुचकळयातच पडलेला कौशिक शांतपणे पावले टाकीत गालवांच्या मागोमाग चालत राहिला. आता जरी त्याच्या मनात गोंधळ नसला तरी घडलेल्या गोष्टींची योग्य सांगड लावणे त्याच्या मनाला अजूनही शक्य होत नव्हते. कौशिकाच्या ठायी असलेली सद्‌गुरूनिष्ठा हे तर त्याचे बळ होते. परंतु सद्‌गुरूंच्या अंतःकरणाची अवस्था त्याला पूर्णपणे कळू शकत नव्हती. त्याच्या मनाच्या कल्पनेपलीकडे व बुद्धीच्या तर्कापलीकडे असलेले सद्‌गुरूंचे अंतःकरण जाणून घेण्याचा ध्यास मात्र कौशिकाच्या चित्ताच्या ठिकाणी आता निश्चितपणे निर्माण झालेला होता. वाटेत चालत असताना कौशिक सतत गालवांच्या मुखाकडे पाहून त्यावरील भाव निरखण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु त्यांच्या मुखावरून ते पूर्णपणे निर्विकार व गंभीरच दिसत होते. त्यामुळे जरी त्यांच्या अंतःकरणाचा काहीच ठाव लागत नव्हता, तरी ते स्वतः स्वतःमध्येच पूर्णपणे रममाण झालेले आहेत एवढे मात्र कौशिकाने निश्चितपणे ओळखले. थोड्याच वेळापूर्वी कृष्णाच्या भेटीचा आनंद पूर्णपणे अनुभवणारे गालव आता अंतर्मुख होऊन अंतःकरणाच्याठायी त्याच आनंदाचा अनुभव घेत आहेत, हे कौशिकाने जाणले आणि गालवांची ही गूढ अवस्था काय व कशी बरे असेल, या एकाच विचारात कौशिक पूर्णपणे गढून गेला. अशा तऱ्हेने गालव त्यांच्या अंतर्मुख अवस्थेत, तर कौशिक सद्‌गुरूमाहात्म्याने भारलेल्या अवस्थेत चालत राहिले आणि आश्रमामध्ये केव्हा येऊन पोहोचले हे त्यांनाही कळले नाही. गालव जणू काही घडलेच नाही इतक्या सहजपणे त्यांच्या नित्यक्रमाने जीवन जगू लागले. परंतु कौशिक मात्र घडलेल्या प्रसंगाच्या स्मरणाने अधिक अंतर्मुख होऊन विचार करू लागला होता.

# कृष्णार्जुन युद्ध

इकडे चित्रसेनाच्या कानावर जेव्हा कृष्णाने केलेल्या प्रतिज्ञेची बातमी आली तेव्हा तो अत्यंत भयभीतच झाला. मृत्यूच्या भीतीचा त्याच्या मनाला घोरच लागला. त्याची ती अवस्था पाहून त्याची पत्नीही अत्यंत घाबरीघुबरी झाली. कृष्णाच्या प्रतिज्ञेपासून चित्रसेनाला वाचविणे कोणालाही शक्य नव्हते हे ते उभयता जाणून होते. तेवढ्यात चित्रसेनाच्या पत्नीला अर्जुनाचे स्मरण झाले, जो चित्रसेनाचा अत्यंत जवळचा असा मित्र होता. परंतु कृष्ण व अर्जुन यांचे सख्यही ती जाणून होती. अशा परिस्थितीत जाणूनबुजून अर्जुन चित्रसेनाची मदत करणे शक्यच नाही हे तिला माहित होते. परंतु काहीतरी प्रयत्न करणे तर भागच होते. कारण चित्रसेनाच्या पत्नीच्या सौभाग्याचा तो प्रश्न होता. तिच्या मनाची अस्वस्थता सतत वाढतच होती. शेवटी तिने एक धाडसी निर्णय घेतला. आपल्या मनाचा हिय्या करून चित्रसेनाची पत्नी त्वरित अर्जुनाच्या भेटीस गेली. अर्जुनाची भेट होताच तिने आपल्या गळयातील सौभाग्यमणी काढला आणि अर्जुनाच्या पायांवर ठेवला. अर्जुनाचे पाय धरून व धाय मोकलून रडत रडत चित्रसेनाची पत्नी पुन्हा पुन्हा ‘माझ्या पतीला अभयदान द्या आणि त्यांचे प्राण वाचवा’ अशा एकाच वाक्याचा उच्चार करू लागली. निश्चित काय झाले आहे हे अर्जुनालाही कळेना. परंतु चित्रसेनाच्या पत्नीचा तो आक्रोश ऐकून त्याचे मन द्रवले आणि त्याला दया आली. अर्जुनाने चित्रसेनाच्या पत्नीला बाजूला करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. परंतु ती काही केल्या अर्जुनाचे चरण सोडेच ना. तेव्हा अर्जुनाच्या मुखातून धीरगंभीर शब्द बाहेर पडले, “काही काळजी करू नकोस. कोणत्याही परिस्थितीत मी चित्रसेनाचे प्राण वाचवीनच. मग त्यासाठी मला प्राणार्पण करावे लागले तरी हरकत नाही. हे एका क्षत्रियाने दिलेले वचन आहे आणि ते मी खरे करीनच, ही माझी प्रतिज्ञाच आहे.”

अर्जुनाच्या आश्वासक वचनांनी चित्रसेनाच्या पत्नीच्या मनाला केवढा तरी धीर मिळाला. तरीही मुसमुसतच व आपले डोळे दोन्ही हातांनी पुसण्याचा प्रयत्न करीतच ती जेमतेम उभी राहिली खरी, परंतु अजूनही तिचे शरीर भीतीने कापतच होते. तेवढ्यात सुभद्राही तेथे आली. तिने आधी चित्रसेनाच्या पत्नीला



आपल्या जवळ घेतले. दासीच्या करवी जल मागवून घेऊन सुभद्रेने तिला जलप्राशन करविले. वारंवार तिच्या पाठीवर व मस्तकावर थोपटून सुभद्रेने चित्रसेनाच्या पत्नीचे सांत्वन केले असता बऱ्याच वेळानंतर चित्रसेनाची पत्नी थोडीशी शांत झाली. अर्जुनाने तिला 'निश्चित काय घडले आहे' असे वारंवार विचारले. पण चित्रसेनाच्या पत्नीच्या मुखातून काही केल्या शब्दच बाहेर येईना. शेवटी सुभद्रेने तिची समजूत काढली आणि तिला बोलण्यास उद्युक्त केले असता चित्रसेनाच्या पत्नीने घडलेली सर्व घटना क्रमवारीने अर्जुनाला विदित केली. ते ऐकताक्षणीच अर्जुन एकदम गंभीर झाला आणि काही न बोलता स्वस्थ बसून राहिला. अर्जुनाकडून अभयदान मिळाल्यामुळे निर्धास्त व निश्चिंत झालेली चित्रसेनाची पत्नी मग तेथे न थांबता परत गेली. तिच्या मुखातून जेव्हा चित्रसेनाने ऐकले की अर्जुनाने त्याला रक्षण देण्याची प्रतिज्ञाच केली आहे तेव्हा चित्रसेनाची चिंता थोडीशी कमी झाली खरी, पण तरीही तो काही पूर्णपणे निःशंक झाला नाही. त्याच्या मनातील धाकधूक कायमच राहिली. आता पुढे काय होणार या विचाराच्या काळजीने चित्रसेनाच्या मनाला एक प्रकारचा तणावच जाणवत होता हे मात्र खरे, कारण कृष्ण व अर्जुन यांचे विशेष सख्य तो जाणून होता.

अर्जुनाच्या मनातील विचारचक्रही जोरात चालू होतेच. चित्रसेनाचा वध करण्याचा निश्चय खुद्द कृष्णानेच केलेला आहे हे कळताच तर अर्जुनाच्या काळजाचा एक ठोकाच चुकला. 'अनवधानाने का होईना मी चित्रसेनाच्या पत्नीला वचन देऊन बसलो आहे आणि त्या वचनाचे पालन कोणत्याही परिस्थितीत करणे हे तर माझ्या क्षत्रिय धर्मानुसार माझे ब्रीदच आहे. परंतु कृष्ण जो माझा अगदी जीवश्च कंठश्च असा मित्र आहे, त्याच्याविरूद्ध भूमिका घेणे मला कसे बरे शक्य होणार? ते तर शक्यच नाही. माझ्या धर्मालाही मला सोडता येत नाही. कारण वचनभंगाचे पाप माझ्या माथी येईल आणि त्यापेक्षा मी प्राणत्याग करणेच अधिक पसंत करीन. तेव्हा मी माझ्या वचनाला जागायचे की माझ्या मित्रप्रेमाला जागायचे?' मनाच्या अशा द्विधा स्थितीत असलेल्या अर्जुनाला काही सुचेचना. शेवटी त्याने प्रत्यक्ष कृष्णाचीच भेट घेण्याचा निश्चय केला आणि त्याप्रमाणे अर्जुन ताबडतोब कृष्णाच्या भेटीसाठी द्वारकेला रवाना झाला.

अर्जुनाने द्वारकेला गेल्या गेल्या ताबडतोब प्रथम कृष्णाची एकांतात भेट घेतली आणि त्याला झालेला सर्व प्रकार सांगितला. कृष्णानेही अर्जुनाचे सर्व बोलणे शांतपणे ऐकून घेतले. त्यावर थोडा वेळ विचार करून कृष्ण अर्जुनाशी बोलू लागला,

"अरे अर्जुना, हे सर्व कारस्थान त्या नीच चित्रसेनाचे आहे. स्वतःचे प्राण वाचविण्यासाठी धडपड करीत असलेल्या त्या चित्रसेनाने त्याच्या पत्नीला पुढे करून हा डाव टाकला आहे. पण तो डाव कधीच साधला जाणार नाही हे निश्चित आहे. चित्रसेनाने त्याच्या पत्नीला मुद्दामहूनच तुझ्याकडे पाठवले आणि तुझ्याकडून अभयदान मागून घेतले. परंतु माझा उल्लेख तुझ्याकडे करण्याचे मात्र तिने जाणूनबुजून टाळले. त्याला मृत्युदंड देण्याची प्रतिज्ञा मी केली आहे हेही तिने लपवून ठेवले. त्याचबरोबर चित्रसेनाने गालव ऋषींसारख्या थोर महात्म्यांचा अवमान केला आणि म्हणूनच मी त्याचा वध करण्याची प्रतिज्ञा केली आहे ही गोष्टही तिने उघड केली नाही. अशा तिच्या लबाड वागण्यामुळे चित्रसेनाच्या अपराधाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. कारण या निमित्ताने तो आपल्या दोघांत कलागत लावू पाहत आहे. पण त्यामध्ये त्यालाच काय दुसऱ्याही कोणालाच कधीच यश मिळणार नाही हे सत्य आहे. असो.

अर्जुना, आता यासंबंधी जास्त काही बोलण्याची आवश्यकता नाही. तूही सर्व नीट जाणून न घेताच भावनेच्या भरात त्या चित्रसेनाच्या पत्नीला शब्द देऊन बसलास. पण आता तुला सर्व तपशील कळला आहे आणि तुझी योग्य समजही झालेली आहे. तेव्हा तूही आता कोणताही प्रतिष्ठेचा प्रश्न न करता, त्या चित्रसेनाच्या पाठीशी उभा राहू नकोस. कारण ज्या कारणासाठी मी चित्रसेनाचा वध करण्याचा पण केला आहे ते माझे केवळ कर्तव्यच नाही, तर ते माझे कार्यच आहे. धर्माचरण करणाऱ्यांना संरक्षण देऊन त्यांचा सन्मान करणे आणि अधर्मीयांना शासन करून त्यांचे उच्चाटन करणे यासाठीच माझे सर्व जीवन आहे. तेच माझे एकमेव जीवितकार्य आहे, ही गोष्ट तुलाही पूर्णपणे ठाऊक आहे. तेव्हा तुझ्याकडून नकळतपणे जी चूक झालेली आहे ती आता तूच सुधार आणि त्याप्रमाणे तसे आधी त्या चित्रसेनाला त्वरित कळीत कर बघू."

कृष्णाच्या या बोलण्यावर अर्जुन काहीही न बोलता बराच वेळ स्वस्थच बसून राहिला. कृष्णाचे बोलणे त्याला कळत होते निश्चित, पण ते त्याला मानवत नव्हते आणि ही गोष्ट त्याच्या मुखावरून स्पष्टपणे दिसत होतीच. अर्जुन कृष्णाकडे बघतही नव्हता मग त्याच्या नजरेला नजर देणे तर दूरच राहिले. अर्जुनाच्या मनातील ही चलबिचल कृष्णाच्याही लक्षात आल्याशिवाय राहिली नाही. कृष्ण थोडासा अधिक अर्जुनाच्या जवळ आला आणि आपला हात अर्जुनाच्या खांद्यावर ठेवून कृष्णाने हलकेच थोपटले. अर्जुनाने मान वर करून कृष्णाकडे

पाहण्याचा प्रयत्न केला खरा, परंतु कृष्णाकडे जास्त वेळ पाहणे त्याला शक्य होतच नव्हते. शेवटी अर्जुनाने आपले सर्व धैर्य एकवटले आणि त्याच्या मुखातून हळूहळू का होईना पण एकेक शब्द बाहेर येऊ लागला.

"अरे कृष्णा, माझ्या अनवधानाने मोठाच घोटाळा झालेला आहे ही गोष्ट खरीच आहे. या गोंधळाच्या परिस्थितीला मीच सर्वस्वी जबाबदार आहे. पण तू मला सांभाळून घेशील आणि योग्य तो मार्ग काढशील याची मला पूर्ण खात्री आहे. आत्तापर्यंत प्रत्येक प्रसंगात तू माझ्या पाठीशी उभा राहिलेला आहेस आणि म्हणूनच मी त्या सर्व प्रसंगातून निभावून गेलेलो आहे याची मला जाणीव आहे. म्हणूनच या प्रसंगातही तू मला साथ देशील असा विश्वास माझ्याठायी आहे. तेव्हा कृष्णा, माझ्यावर कृपा कर आणि मी दिलेला शब्द पाळण्यासाठी मला साहाय्यभूत हो. त्यासाठी चित्रसेनाचा वध करण्याचा तुझा निर्णय तू माझ्या शब्दासाठी तरी मागे घ्यावास अशी माझी तुला प्रेमाची विनंती आहे."

अर्जुनाचे बोलणे ऐकून कृष्ण तर आधी चकितच झाला. पण नंतर मात्र तो अत्यंत गंभीरच झाला. कृष्णाकडे अत्यंत खात्रीपूर्वक नजरेने पाहणाऱ्या अर्जुनाकडे कृष्णाने थोडेसे रोखून पाहिले. त्याच्या नजरेतील निश्चयात्मकता कायम होती आणि ती अर्जुनाला जाणवल्याशिवाय राहिली नाही. अर्जुन थोडासा वरमलाच. कृष्णाशी बोलण्यासाठी अर्जुन सुरुवात करणार तेवढ्यातच कृष्णाने त्याला हाताच्या खुणेने थांबवले आणि तो अत्यंत ठाम सुरात अर्जुनाला म्हणाला,

"अर्जुना, ते केव्हाही शक्य नाही. तसे मी अजिबात करणार नाही हे लक्षात ठेव. असा भावनेच्या आहारी जाऊ नकोस. मनाशी विवेक बाळग आणि त्या विवेकाने विचार कर. अरे, प्रश्न तुझ्या शब्दाचा किंवा माझ्या शब्दाचा असा मुळीच नाही. शांत मनाने हा विषय नीट समजून घे. येथे निवाडा धर्म व अधर्म, सत्य व असत्य आणि सज्जन व दुर्जन या मधील आहे. आपण कोणत्याही परिस्थितीत दुष्ट प्रवृत्तीच्या मागे उभे राहूच शकत नाही. तर आपण दुष्टांना समोरासमोर नेस्तनाबूतच करावयास हवे. आपण चुकून जरी अधर्माला प्रोत्साहन दिले तरी त्याचा दोष आपल्याला लागेल. कारण अधर्माला कळत नकळतही साहाय्यभूत होणे हाही अधर्मच आहे आणि मग त्याचे फळही अटळ आहे हे लक्षात घे. तेव्हा अधर्माच्या बाजूने उभा राहण्याचा विचारही मनात आणू नकोस. या ठिकाणी गालव ऋषी व चित्रसेन यांच्यामध्ये कोणाची बाजू सत्य व योग्य आहे असा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही. तेव्हा कोणत्याही परिस्थितीत चित्रसेनाला मृत्युदंड


मिळणारच आहे हे तू समजून रहा. वेळीच तुझ्या मनाचा हा वेडेपणा सोड आणि मनाला योग्य मार्गाने विचार करावयास उद्युक्त कर."

कृष्णाच्या खंबीर बोलण्यामुळे अर्जुन गंभीर झाला. कृष्णाचे एवढे स्पष्ट बोलणे त्याला अनपेक्षितच होते. एरव्ही अर्जुनाचे मन राखणारा आणि अर्जुनाच्या प्रेमासाठी काहीही करण्यास तयार असलेला कृष्ण या वेळेस मात्र त्याची भूमिका जराही बदलण्यास तयार नव्हता. असा कृष्ण अर्जुन प्रथमच पाहत होता आणि त्यामुळे तो जरासा भांबावलाच. पण तरीही अर्जुनाला मात्र मनातून पक्की खात्री वाटत होती की शेवटी कृष्ण हा नेहमीप्रमाणेच अर्जुनाच्या मनासारखे करावयास तयार होईलच. म्हणूनच अर्जुनाने त्याचे म्हणणे कृष्णाला पटवून देण्याचा प्रयत्न मुळीच सोडला नाही. कृष्णाकडे अत्यंत अपेक्षेने पाहत अर्जुनाने पुन्हा कृष्णाशी बोलावयास सुरुवात केली,

"अरे कृष्णा, माझ्याकडून चूक झालेली आहे, हे मी पुन्हा पुन्हा कबूल करतो. त्या अपराधासाठी तू मला काहीही शिक्षा दे. ती भोगण्यास मी तयार आहे. परंतु कृपा करून मी दिलेला शब्द खाली पडू देऊ नकोस. नेहमीप्रमाणे तुझ्या सर्व शक्तीनिशी माझ्या पाठीशी उभा रहा. नाहीतर काहीतरी युक्तीचा मार्ग काढ आणि माझा शब्द खरा करण्यासाठी मला मदत कर. मी केवळ तुझाच भरवसा धरून आहे. मला असा नाउमेद करू नकोस. मी दिलेले वचन जर मी पाळू शकलो नाही तर माझी सर्वत्र नाचक्की होईल आणि मग माझे हे तोंड कोणालाही दाखवणे मला शक्य होणार नाही. हा माझा अवमान माझ्या मनात अगदी जीवनभर कायमचा सलत राहील आणि अशा जीवनापेक्षा मग मी मृत्यू पत्करणेच योग्य मानेन. माझ्यासाठी केवळ तोच एक मार्ग शिल्लक राहील. तेव्हा माझ्यावर आता तू दयाच कर आणि माझी प्रतिज्ञा पूर्ण करण्यासाठी मला साहाय्यभूत हो."

अर्जुनाचे बोलणे संपत असतानाच कृष्ण लागलीच अत्यंत निश्चयात्मक सुरात उद्गारला.

"अर्जुना, तसे होणे शक्यच नाही. एवढे दिवस मी तुझे कौतुकाने अनेक हट्ट पुरवीत आलो खरा, पण त्यामुळे तुझे मन दुर्बलच राहिले आहे. तुझ्या मनाप्रमाणे मी नेहमीच करावे अशी तुझी कायमचीच अपेक्षा असते. कारण तुझ्या मनाला तशी सवयच जडली आहे. परंतु तुझ्या मनाचा हा दुबळेपणा झटकून टाकण्याची आता वेळ आली आहे. धर्म व अधर्म यातील फरक तुझ्या लक्षात आलाच पाहिजे आणि सर्व शक्तीनिशी धर्माच्या बाजूने उभे राहण्याचे बळ तुला आता तरी घेतलेच पाहिजे.



कारण या वेळेस माझी भूमिका जराही हलण्याचा सुद्धा प्रश्नच निर्माण होत नाही. त्यातूनही समजा तुला धर्म व अधर्म यामधील फरक कळत नसेल किंवा धर्माची बाजू घेण्याचे बळ तुला घेता येत नसेल तर फक्त माझ्या तुझ्यावरील प्रेमाचा विचार कर. म्हणजे मग तुला धर्माच्या म्हणजे माझ्याच बाजूने उभे राहण्याचे धैर्यबळ निश्चित येईल याची मला पूर्ण खात्री आहे."

कृष्णाच्या बोलण्यात थोडीशी अजिजीच होती. परंतु अर्जुनाच्या मनात मात्र थोडीशी नाराजीच निर्माण झालेली होती आणि ती त्याच्या मुखावर अगदी स्पष्टपणे दिसत होती. मग त्याच्या बोलण्यातूनही ती नाराजी प्रगट झाल्याशिवाय राहिली नाहीच. जरासा चिडूनच व थोड्याशा उच्च स्वरातच अर्जुन बोलू लागला,


"अरे कृष्णा, मगापासून तू सारखा 'माझा धर्म, माझा धर्म' असे म्हणतो आहेस. पण त्याचा निश्चित अर्थ मात्र मला मुळीच कळत नाहीये. मुख्य म्हणजे जसा तुझा धर्म म्हणून काही आहे, तसाच माझाही धर्म म्हणून काही आहेच की नाही? अरे, मी क्षत्रिय आहे आणि माझ्यासाठी क्षत्रिय धर्म हाच श्रेष्ठ आहे. माझ्यासाठी तर तो माझे सर्वस्व आहे. कारण त्या धर्माशिवाय माझे जीवन शून्यवत् आहे. तो क्षत्रिय धर्म जर मी बाजूला केला तर माझ्या अस्तित्वाला काही अर्थच राहणार नाही. त्या धर्माशिवाय जगण्यापेक्षा मी मरणच पत्करेन. तेच मला अधिक श्रेयस्कर आहे. या क्षत्रिय धर्माच्या आचरणाचा मुख्य भाग म्हणजे दुसऱ्याला दिलेले वचन पाळणे हा आहे. त्यानुसारच मी चित्रसेनाला जे त्याचे संरक्षण करण्याचे वचन दिले आहे ते पाळणे हे माझे प्रथम कर्तव्यकर्म आहे. त्यासाठी मला प्राणत्याग करावा लागला तरी मी मृत्यूनंतर निश्चितपणे स्वर्गाला जाईन आणि मी जर तसे करू शकलो नाही तर मग माझ्यासाठी फक्त नरकाचीच वाट शिल्लक राहील. कृष्णा, खरे तर तूही हा क्षत्रिय धर्म जाणून आहेस. असे असतानाही तू मला जाणूनबुजून नरकाच्या वाटेला का ढकलत आहेस हेच मला कळत नाही. माझी अशी अधोगती तुला पाहवेल तरी कशी? हे मला तरी समजत नाही. एवढा का मी तुला नकोसा झालो आहे? तसे असल्यास मला तसे स्पष्टपणे सांग ना!"

अर्जुनाच्या मनाची होणारी चिडचिड कृष्णाच्या लक्षात आली आणि त्याचे त्याला वाईटच वाटले. परंतु कृष्णाचाही नाइलाजच झाला होता. अर्जुनाची मनःस्थिती पाहून कृष्णाला त्याची दयाच आली. कृष्णाठायी अर्जुनाविषयी खरे प्रेम होते आणि म्हणूनच कृष्ण अर्जुनाची समजूत घालण्याचा प्रयत्न पुन्हा करू लागला,

"अरे अर्जुना, असे काहीतरी वेड्यासारखे बोलू नकोस. तू तर मला अत्यंत प्रिय आहेस आणि म्हणूनच तुझ्या अधोगतीचा विचारही माझ्या मनाला शिवू शकत नाही हे कायमचे लक्षात ठेव. त्याचे कधीही म्हणजे अगदी स्वप्नातही विस्मरण होऊ देऊ नकोस. अरे, खरेच तुझी अधोगती होऊ नये म्हणूनच तर माझा हा सर्व प्रयत्न आहे. फक्त खरी अधोगती कशात आहे हे तुला माहित नाही, म्हणूनच मला तुझी अत्यंत काळजी वाटत आहे. पण खरी अधोगती कशामध्ये आहे हे मला ठाऊक आहे आणि म्हणूनच मी तुला त्या अधोगतीपासून वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहे. कारण खरा धर्म म्हणजे काय हे मी जाणून आहे. जो धर्म ईश्वराच्या अस्तित्वाची जाणीव करून देतो आणि ज्या धर्माचरणाने ईश्वराची प्राप्ती होते तोच खरा धर्म होय. या ईश्वरी धर्मामध्ये भूतदयेला व मानवतेला निश्चितच प्राधान्य आहे. परंतु पशुवृत्तीला वा राक्षसी कृत्याला जराही स्थान नाही. एखादा जेव्हा या ईश्वराला विसरतो आणि ज्याला मानवतेचेही भान राहत नाही तेव्हा तो पशुवृत्तीचाच होतो आणि मग त्याचे अस्तित्व सर्वांनाच धोकादायक ठरते. अशी पशुवृत्ती त्या चित्रसेनाच्या वागण्यातून प्रगट झाली. म्हणूनच त्याचा वध करणे हेच त्या ईश्वरी धर्माचे पालन करण्यासारखे आहे आणि तेच मी करणार आहे. अर्जुना, त्यासाठी तूही मला साथ देणार आहेस. हेच आता अंतिम व नक्की ठरले. कळले ना?"

कृष्णाचे सांगणे एवढे निक्षून होते की बोलता बोलता त्याचाही सूर थोडासा चढा लागलाच. अर्जुनही थोडासा कावराबावरा झाला आणि काहीही न बोलता स्वस्थच बसून राहिला खरा, परंतु त्यालाही स्वस्थ बसवेच ना. अर्जुन त्याचे म्हणणे कृष्णाला पटवण्याचा पुन्हा प्रयत्न करू लागला.

"अरे कृष्णा, तू ज्या ईश्वरी धर्माविषयी सांगत आहेस ते जरी मला पूर्णपणे आकलन होत नसले, तरी मला एवढे मात्र निश्चित माहित आहे की ज्याने त्याने आपापल्या धर्माचे पालन करणे हेच धर्माचरण ईश्वराला अपेक्षित आहे. स्वधर्माचरणानेच ईश्वर संतुष्ट होतो आणि त्याची प्राप्ती होते असेही धर्मशास्त्रात सांगितलेले आहेच ना? तेव्हा माझ्या धर्माचे पालन मला करू दे आणि तुझ्या धर्माचे काय करायचे ते तू बघ. आता वादविवाद वाढवत बसण्यात काहीच अर्थ नाही. कारण आपणा उभयतांची मने व मते आता आपल्याला पूर्णपणे कळलेली आहेत. पण मला पक्की खात्री आहे की शेवटी तुझ्याठायी जे माझ्यावरील प्रेम आहे त्याचीच



मात होणार. प्रत्यक्ष जर खरोखरीच आपण दोघे समोरा समोर उभे ठाकलो, तर मला नाही वाटत की आपण एकमेकांवर शस्त्र उगारू शकू. त्यामुळे आपल्या दोघांत कधीही युद्ध होणे शक्यच नाही हे मलाही ठाऊक आहे आणि कृष्णा, तुलाही ते ठाऊक आहे. होय की नाही?”

असे म्हणून अर्जुन हसत हसत कृष्णाच्या जवळ आला. त्याने कृष्णाचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले आणि हलकेच दाबले. कृष्ण काहीच बोलला नाही. त्याच्या मुखावर गांभीर्य पूर्णपणे पसरलेले होते. अर्जुनाच्याही ते लक्षात आले. परंतु तरीही काहीही न बोलता अर्जुनाने कृष्णाचा नजरेनेच निरोप घेतला आणि तो तेथून निघून तडक चित्रसेनाकडे गेला.


अर्जुनाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत कृष्ण कितीतरी वेळ तेथेच उभा हेता. त्याच्या जीवनीतील अत्यंत गंभीर व कठीण प्रसंग पुढे येऊन उभा राहिला होता. परंतु त्याचा कोणत्याही प्रकारचा तणाव कृष्णाच्या ठिकाणी जराही नव्हता. त्याच्या आत्मबळाने तो युक्त होता. त्यामुळेच तो निर्भय व निर्मोही होता आणि त्याच्या आत्मधर्माचे पालन करण्यासाठी तो समर्थ होता. त्याचबरोबर अर्जुनावरील प्रेमामुळे कृष्णाला अर्जुनाच्या अज्ञानाची कीव येत होती आणि दयाही वाटत होती. त्याने अर्जुनाला समजावण्याचा पुरेपूर प्रयत्न केला होता. पण अर्जुनाची समजूत काही पटू शकली नव्हती. कृष्णाला त्याचे अत्यंत वाईटही वाटत होते. पण त्याचाही नाईलाजच होता. आता परमेश्वरी नियतीत पुढे गोष्टी कशा व काय घडतील ते पाहण्यासाठी कृष्ण सज्ज होऊन राहिला होता. कृष्णानेही चित्रसेनाच्या नगरीकडे जाण्यासाठी त्वरित प्रयाण केले.”

कृष्ण व अर्जुन यांच्यातील तणावपूर्ण प्रसंगाचे वर्णन करीत असताना नारदाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या शब्दप्रवाहाचा वेगही त्याच्या नकळतपणे अत्यंत वाढलेला होता. साहजिकच वेगाबरोबर शब्दांना तेजही प्राप्त झाले होते. लक्ष्मीलाही ऐकताना ते जाणवल्याशिवाय राहिले नाही. खरे तर, लक्ष्मीच्या मनालाही त्या शब्दप्रवाहाच्या वेगामागील ताण जाणवत होताच. परंतु तीही सर्व अधीरतेने श्रवण करीत होती. म्हणूनच लक्ष्मीलाही नारदाचे बोलणे थांबवण्याची आवश्यकता वाटत नव्हती. कारण लक्ष्मीच्याठायी पुढील रोमहर्षक कथाभाग श्रवण करण्याची उत्सुकता कमालीची वाढली होती. त्यामुळे जेव्हा नारदाच्या बोलण्याचा वेग थोडासा मंदावला तेव्हाच लक्ष्मी जरा बेचैन झाली. लक्ष्मीची ही अवस्था नारदाच्या लगेचच लक्षात आली कारण तोही मनाच्या त्याच अवस्थेत होता.

कथाभाग संपूर्ण सांगितल्याशिवाय नारदाच्याही मनाला चैन पडणे शक्यच नव्हते. त्यामुळे नारदाने त्याचे बोलणे त्याच वेगाने व त्याच आवेगाने पुढे सुरूच ठेवले,

“हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने कृष्ण व अर्जुन हे दोघेही आपापल्या भूमिकेशी जरी ठाम राहिलेले दिसत असले तरी त्यांच्या मानसिक अवस्थेमध्ये मात्र नितांत फरक होता. आत्मधर्माच्या जाणिवेने सहज युक्त असलेल्या कृष्णाठायी साहजिकच पूर्ण आत्मविश्वास होता. त्यामुळे त्याचे मनही तणावमुक्त व अगदी मोकळे होते. अर्जुनाच्या ठिकाणी मात्र त्याच्या क्षात्रधर्माची बांधिलकी होती. स्वतःच्या पराक्रमावरही अर्जुनाचा पूर्ण भरवसा होता. पण तरीसुद्धा अर्जुनाचे मन मात्र पूर्णपणे निःशंक नव्हते. तो चुकीच्या व अयोग्य पक्षाच्या बाजूने उभा आहे हे तर अर्जुनाला आता कळून चुकलेच होते. त्यामुळे त्याचे मन आतून त्याला खातच होते. पण तरीही क्षात्रधर्माचे बंधन प्रमाण मानून, हट्टाने खुद्द कृष्णाविरुद्धच युद्धाला उभा राहण्यास तयार झालेल्या अर्जुनाच्या मनात मात्र चलबिचलच होती. कृष्णाविरुद्ध शस्त्र उगारणे त्याला शक्य होणार नाही हे अर्जुन पूर्णपणे जाणून होता. कृष्णप्रेम हा अर्जुनाच्या मनाचा एक मुख्य दुर्बल घटक आहे हे अर्जुनालाही ठाऊक होते. पण तरीही बाह्यांगाने तसे न दाखवता अर्जुन धैर्याचा आविर्भाव आणत होता. कारण काही झाले तरी कृष्ण त्याच्यावर शस्त्र उचलणे कधीही शक्यच नाही, एवढी एकच खात्री अर्जुनाच्या ठिकाणी होती. त्या गोष्टीचाच त्याला जबरदस्त आधार वाटत होता.

हे लक्ष्मी, पण जेव्हा प्रत्यक्षात कृष्ण खरोखरीच चित्रसेनाच्या नगरीच्या बाहेर येऊन दाखल झाला तेव्हा मात्र अर्जुन थोडासा गांगरलाच. कृष्णाने प्रथम मोठ्याने ललकारी देऊन चित्रसेनाला नगरीच्या बाहेर येऊन निमूटपणे कृष्णाच्या स्वाधीन होण्यास सांगितले. कारण कृष्णालाही नाहक युद्ध व रक्तपात नकोच होता. कृष्णाच्या त्या आवेशयुक्त गर्जनेने चित्रसेन तर गर्भगळीतच झाला. परंतु अर्जुनाने त्याला धीर दिला आणि चित्रसेनाला बरोबर घेऊन अर्जुन स्वतः एकटाच नगराच्या बाहेर आला. कृष्णाला पाहताच अर्जुनाने मंदस्मित करून त्याला अभिवादन केले. पण कृष्णाने अर्जुनाकडे लक्षच दिले नाही आणि तो चित्रसेनाच्या दिशेने पुढे धावला. कृष्णाच्या या अनपेक्षित कृतीने आधी बेसावध असलेला अर्जुनही एकदम सावध झाला आणि तो कृष्ण व चित्रसेन यांच्यामध्ये येऊन उभा राहिला. अर्जुनाच्या या कृतीने कृष्णाला अर्जुनाचा अत्यंत राग आला आणि त्याने अर्जुनाला हाताने बाजूला हटवण्यास सुरुवात केली. परंतु अर्जुन काही केल्या तेथून हटेना आणि तेथेच घट्ट पाय रोवून उभा राहिला. आता मात्र कृष्णाचा संताप अनावर झाला. त्याने क्षणार्धात कमरेची तलवार बाहेर काढली आणि तो



चित्रसेनाच्या अंगावर धावून जाऊ लागला. तेव्हा मात्र अर्जुनाच्या लक्षात आले की कृष्णाचा हेतू अगदी स्पष्ट व ठाम आहे. कृष्णाला तर चित्रसेनाव्यतिरिक्त दुसरे काहीच दृष्टीला येत नव्हते. ही गोष्ट अर्जुनाने ओळखली. तोही एकदम गंभीर झाला. दुसऱ्याच क्षणाला अर्जुनाचीही तलवार चित्रसेनाच्या रक्षणासाठी बाहेर निघाली. त्याबरोबर कृष्णाने आपली तलवार अर्जुनाच्या तलवारीला भिडवली आणि मग तलवारींच्या आवाजाचा एकच खणखणाट सुरु झाला.

हे लक्ष्मी, अर्जुनाचा अडथळा दूर करण्याच्या प्रयत्नात कृष्णाच्या ठिकाणचा त्वेष अधिकाधिक वाढतच राहिला. रागाने लालबुंद झालेल्या कृष्णाच्या नेत्रातून तर जणू रागाची आगच बाहेर येत आहे की काय असेच जाणवत होते. कृष्णाचा असा आवेश अर्जुनाने आत्तापर्यंत कधीच पाहिला नव्हता. परंतु तरीही अर्जुनाला मात्र कृष्णाचा राग येतच नव्हता आणि त्यामुळेच त्याचा पराक्रमही पूर्णपणे प्रगट होऊ शकत नव्हता. अर्जुनालाही हे जाणवत होतेच. पण तरीही अर्जुनाने हट्टाने कृष्णाशी सामना करणे चालूच ठेवले. अखेरीस कृष्णाचा प्रतिकार करण्यामध्ये अर्जुन हळूहळू कमी पडू लागला. कृष्णाच्या ब्रह्मतेजापुढे अर्जुनाचे क्षात्रतेज फिके पडू लागले आणि अर्जुन निस्तेज होऊ लागला. एका निर्णायक क्षणी अर्जुनाच्या हातातील तलवार उडून जमिनीवर पडली आणि कृष्णाच्या तलवारीचा वार अर्जुनाच्या छातीवर बसला. त्या वर्मी बसलेल्या घावाने अर्जुनाची शुद्ध हरपली आणि तो मूर्च्छित होऊन जमिनीवर कोसळला.

हे लक्ष्मी, अर्जुन जमिनीवर पडत आहे हे पाहताक्षणीच कृष्णाने त्याच्या हातातील तलवार खाली टाकली आणि पुढे धावून त्याने अर्जुनाला धरून सावरले. अर्जुनाला घेऊन कृष्ण जमिनीवर बसला आणि त्याने अर्जुनाचे मस्तक स्वतःच्या मांडीवर ठेवले. अर्जुनाला त्या अवस्थेत पाहून कृष्णाचे अंतःकरण भरून आले आणि त्याच्या नेत्रातून अश्रुधाराच वाहू लागल्या. अर्जुनाचे मस्तक आपल्या हातांनी कुरवाळीत कृष्ण अर्जुनाला हाका मारीत सावध करण्याचा प्रयत्न करू लागला. कृष्ण आपल्या शेल्याने अर्जुनाच्या जखमांतून वाहणारे रक्त हलकेच पुसत होता. तेवढ्यात चित्रसेनाच्या सेवकांनी तेथे जल आणले आणि कृष्ण ते जल अर्जुनाच्या मुखावर हलक्या हाताने शिंपडू लागला. बऱ्याच वेळाने अर्जुन हळूहळू सावध होऊ लागला. त्याच्या मुखातून थोडासा कण्हण्याचाही आवाज येऊ लागला. त्याची ती अवस्था पाहून कृष्ण अधिकच कासावीस झाला. त्याने अर्जुनाला थोडेसे जल प्राशन करविले आणि हळुवार आवाजात व्याकुळतेने अर्जुनाला हाका मारीत राहिला. कृष्णाच्या अंतःकरणातील ती आर्तताच बहुधा अर्जुनापर्यंत पोहोचली असावी. अर्जुनाने आपले डोळे किंचितसे उघडले. प्रथम त्याच्या डोळयांसमोर कृष्णाची अंधुकशी मूर्ती दिसू लागली आणि अर्जुनाचे डोळे अधिकाधिक उघडू

लागले. कृष्णाकडे पाहताच अर्जुन भानावर आला. कृष्णाच्या मांडीवर आपले मस्तक आहे हे अर्जुनाला जाणवले आणि त्याच्या डोळयात पाणी तरारून आले. क्षणात अर्जुनाला घडलेल्या प्रसंगाचे स्मरण झाले आणि त्याला गहिवरूनच आले. तशाच अवस्थेत कसाबसा उठून अर्जुन कृष्णाच्या कुशीत शिरला आणि मुसमुसून रडू लागला.

हे लक्ष्मी, अर्जुनाची ती अवस्था पाहून कृष्णाचेही मन गलबललेच. त्याचेही अंतःकरण भरून आले. अर्जुनाचे परोपरीने सांत्वन करून कृष्ण अर्जुनाला शांत करण्याचा प्रयत्न करू लागला. पण अर्जुनाच्या भावनेचे फुटलेले बांध कितीतरी वेळ तसेच वाहत राहिले. अर्जुनाचे मन जसे जसे मोकळे झाले तसा तसा तो स्वतःहूनच सावरू लागला आणि थोड्या वेळाने पूर्णपणे शांत झाला. घडलेल्या प्रसंगाचे स्मरण अर्जुनाच्या ठिकाणी पुन्हा जागे झाले आणि अर्जुनाने स्वतःला कृष्णापासून दूर केले. अर्जुन उठून उभा राहिला असता कृष्णही उठून उभा राहिला आणि अर्जुनाच्या जवळ आला. अर्जुनाने आपली मान खाली घातली आणि दोन्ही हात जोडून कृष्णाला म्हणाला,

“अरे कृष्णा, मी तुझा अनंत अपराधी आहे. मी तुझ्या क्षमेलाही पात्र नाही हे मी जाणून आहे. खरे तर तुझी क्षमा मागण्याचेही धैर्य माझ्यापाशी नाही आणि तूही मला क्षमा करू नकोस. कारण मी तुझ्या मित्रप्रेमाला विसरून तुझ्याशी मित्रद्रोहच केलेला आहे. त्यासाठी तू मला कोणतीही शिक्षा दे, ती भोगण्यास मी तयार आहे. अशी शिक्षा भोगून प्रायश्चित्त केल्याशिवाय माझ्या मनाला कधीही शांती लाभणार नाही. माझे मन मला कायमचे खात राहील आणि ही अपराधभावना जीवनभर मला सलत राहील. तेव्हा तू माझी मुळीच गय करू नकोस आणि मला जास्तीत जास्त कडक शासन कर. या चित्रसेनाला मी आता तुझ्या हवाली करीत आहे. त्याचे काय करायचे ते करायला तू पूर्णपणे मोकळा आहेस. पण त्याच्याबरोबर मलाही शिक्षा करायला विसरू नकोस. कुसंगतीचे फळ मलाही मिळायलाच हवे. कारण तरच माझ्याकडून घडलेल्या अपराधाचे काही प्रमाणात तरी परिमार्जन होईल. तेव्हा आता अजिबात वेळ न दवडता त्वरित निर्णय घेऊन त्याची लगेच अंमलबजावणी कर.”

अर्जुनाच्या अशा बोलण्याने कृष्णाचे अंतःकरण अधिकच भरून आले. त्याने अत्यंत कौतुकाने अर्जुनाचे मस्तक थोपटले आणि एक कटाक्ष चित्रसेनाकडे टाकला. अत्यंत भयग्रस्त अवस्थेत असलेला चित्रसेन एवढा वेळ तेथे उभा होता खरा, परंतु त्याचे सर्व अंगच भीतीने थरथरत होते. अर्जुनाच्या बोलण्याने

चित्रसेनाठायीचे उरले सुरले अवसानही गळाले आणि तो मटकन खालीच बसला. जीव वाचवण्याचा शेवटचा उपाय म्हणून चित्रसेनाने कृष्णापुढेच आपले हात जोडले आणि गयावया करून स्वतःच्या प्राणांची भीक मागू लागला. कृष्णही क्षणभर विचारात पडला. धर्म-अधर्माचा निर्णय करण्याची पुन्हा वेळ आली होती. एकीकडे अधर्माचा नाश करण्याची कृष्णाची प्रतिज्ञा आणि दुसरीकडे शरणागताला अभय देऊन त्याच्यावर दया करणे हा धर्म. या दोहोतील कशाची निवड करावी आणि मुख्य म्हणजे कोणत्या निकषांवर करावी? त्याहूनही सर्वात महत्त्वाची गोष्ट ही होती की 'चित्रसेनाचा वध करीन' असे वचन कृष्णाने प्रत्यक्ष गालव महर्षींना दिलेले होते. तेव्हा तो दिलेला शब्द पाळणे हे कृष्णाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक होते. नाहीतर तो एक प्रकारे गालवांचा अवमानच केल्यासारखे झाले असते.

□□□


थोडावेळ त्याठिकाणी निःशब्द शांतता होती खरी, पण ती सर्वांनाच अस्वस्थ करीत होती. वातावरणात थोडासा ताणही जाणवू लागला होता. पण तेवढ्यातच एक नवल घडले. त्याठिकाणी अचानक व अकल्पितपणे खुद्द गालव ऋषींचेच कौशिकासह आगमन झाले. कृष्णाने पुढे होऊन गालवांचे स्वागत केले आणि त्यांना विनम्रपणे नमस्कार करून कृष्ण तेथेच उभा राहिला. 'हे गालव ऋषी आहेत' हे कळल्यावर अर्जुनाने त्याही स्थितीत गालवांच्या चरणांना स्पर्श करून नमस्कार केला. चित्रसेन तर धावतच पुढे आला आणि त्याने गालवांच्या चरणांवरती लोळणच घेतली. गालवांनी चित्रसेनाच्या मस्तकावर त्यांचा हात आश्वासनपूर्वक ठेवला आणि त्याला उठवून बाजूला केले. सर्वांच्या ठायीची अधीरता गालवांनी ओळखली आणि त्यांनी त्यांच्या धीरगंभीर वाणीने बोलावयास सुरुवात केली,

"माझ्या येथील आगमनामुळे सर्वांना आश्चर्य वाटणे अगदी साहजिकच आहे. परंतु कृष्ण व अर्जुन यांच्यातील संभाव्य संघर्षाची बातमी जेव्हा माझ्यापर्यंत येऊन पोहोचली तेव्हा मी ताबडतोब येथे येण्याचे केले आणि मला वाटते मी अगदी वेळेवर येऊन पोहोचलो आहे. ही त्या सर्वसत्ताधीश परमेश्वराचीच इच्छा व कृपा आहे हे निश्चित. कारण काही झाले तरी कृष्ण व अर्जुन यांच्यात युद्ध व्हावे आणि तेही या चित्रसेनासारख्या व्यक्तीमुळे हे योग्यच नाही. माझ्या अवमानाचे निमित्त ते काय व्हावे आणि कृष्णाने चित्रसेनाला देहदंड देण्याची प्रतिज्ञा ती काय करावी,

त्यातून अर्जुनाने अजाणतेपणाने चित्रसेनाला अभयदान ते काय द्यावे, खरोखरीच ही सर्व त्या परमेश्वराचीच माया आहे. परंतु अज्ञानामुळे जेव्हा त्या मायेला जाणणे घडत नाही, तेव्हा त्या मायेमध्ये अधिकाधिक गुंतणे होते. त्यामुळे मग त्रास, क्लेश व दुःख यांचाच अनुभव येतो. पण जे त्या परमेश्वरी सत्तेला जाणतात तेच त्याच्या मायेलाही ओळखून असतात आणि त्या मायेच्या बंधनात न अडकता पण त्या मायेच्या मर्यादेत राहूनच परमेश्वरी अस्तित्वाचा ते नित्य अनुभव घेत राहतात. एवढेच नव्हे, तर वेळ प्रसंगी त्या मायेत खेळून परमेश्वरी लीलेचा आनंद अनुभवतात.

अरे कृष्णा, तू तर नित्यच या मायेत लीलया खेळून तुझे लीलालाघव प्रगट करीत असतोस. परंतु या तुझ्या खेळाच्या मुळाशी असलेल्या तुझ्या आत्मधर्माची जाणीव तुझ्याठायी आहे. म्हणूनच तुझा खेळ तर रंगतोच परंतु त्या खेळातून ईश्वरी सत्यधर्मही प्रगट होत असतो. जे कोणी तो सत्यधर्म जाणतात त्यांनाच तुझ्या खेळाचा आनंद होतो. परंतु या अर्जुनासारखे, ज्यांना तो धर्म कळत नाही ते मात्र त्या खेळाच्या मायेत गुंतून अडकतात आणि मग त्यांच्या पदरी फक्त दुःख व क्लेश एवढेच पडते. परंतु अशा अज्ञानी जनांची दया येऊन आपण त्यांची कीवच करावी. त्यांची अवस्था आपण प्रेमाने समजून घ्यावी आणि त्यांना आपल्या अनुभवात सामावून घ्यावे. त्याचवेळी आपल्या अनुभवाचे सत्य त्यांना समजावून सांगून, त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न मात्र आपण करीत रहावे. तेच आपल्या हातात आहे आणि तेच नित्य आपल्या हृदयात असावे, म्हणजे सर्व काही आपल्याला पावले.

बरे कृष्णा, आता आपण मुख्य मुद्द्याकडे वळूया आणि प्रत्यक्ष प्रसंगाविषयी बोलू या. या चित्रसेनाकडून माझा नकळतपणे अवमान घडला आणि त्या गोष्टीचा या माझ्या कौशिकाला साहजिकच रागही आला. मग त्याला घेऊन मी तुझ्याकडे आलो आणि चित्रसेनाला देहदंड देण्याची तू प्रतिज्ञा केलीस. अर्जुनानेही अजाणतेपणाने चित्रसेनाला अभय दिले. हे सर्व खरे आहे. इथपर्यंत सर्व ठीक आहे. पण त्याची परिणती कृष्ण व अर्जुन या दोन परम मित्रांमध्येच संघर्ष होण्यात व्हावी हे मात्र योग्य नाही आणि यामध्ये कोणताच धर्म नाही. अर्थात् कृष्णा, तुझी भूमिका हीच सत्याची व धर्माची आहे हे निश्चित. कारण हे सर्व तू सत्यधर्माच्या रक्षणासाठीच करीत आहेस हे सत्य आहे. परंतु तो तुझा धर्म अर्जुन जाणत



नसल्यामुळे तो अज्ञानाने त्याच्या क्षत्रिय धर्मालाच चिकटून राहिला. एवढेच नव्हे, तर तो त्याला हट्टाने धरूनच राहिला. हा त्याचा हट्टच त्याला नडला आणि प्रत्यक्ष युद्धात तो असा मूर्च्छित होऊन पडला. परंतु आता ते सर्व काही बाजूला करून आपण यातून योग्य असा मार्ग काढला पाहिजे, की ज्यामध्ये सर्वांचेच हित साधले जाईल.

सर्व दृष्टीने विचार केला असता आता या चित्रसेनाला मृत्युदंड देण्यात काहीच अर्थ उरलेला नाही. कारण त्याची स्थिती तर मेल्याहून मेल्यासारखीच झालेली आहे. मला वाटते मरणाच्या भीतीनेच आत्तापर्यंत तो शेकडो मरणे मेलेला आहे. तेव्हा आधीच मेलेल्याला पुन्हा मारण्यात काहीच अर्थ नाही. मुळामध्ये या चित्रसेनाकडून जी काही आगळीक घडली ती माझ्या निसबत होती आणि मी तर त्याला तेव्हाच क्षमा केलेली आहे. मला खात्री वाटते की आता या कौशिकाचाही राग मुळासकट निमालेला असेल. तेव्हा या चित्रसेनाला मोकळा करणे हेच योग्य होईल.

अरे चित्रसेना, पण घडलेल्या प्रसंगामधून तू आता तरी काही धडा घे आणि शहाणा हो. स्वतःचे आचरण सुधार आणि तुझे पुढील जीवन नीतीचे, शांतीचे व समाधानाचे जग. विषयभोगाच्या आसक्तीने तन व मन या दोहोंचा कसा ऱ्हास होतो आणि जीवनाची किती अधोगती होते हे तू प्रत्यक्ष अनुभवलेच आहेस. तू तर प्रत्यक्ष मृत्यूच्या दारापर्यंतच पोहोचला होतास. परंतु केवळ परमेश्वराच्या कृपेनेच तू वाचला आहेस हे लक्षात ठेव आणि सावध होऊन पुढील जीवन तरी वृथा जाणार नाही याची काळजी घे. कुसंगती व कुकर्मे यांचा त्याग कर आणि सत्संगतीने मनोबळ प्राप्त करून घेऊन सत्कर्माने जीवन जग. पुन्हा नवीन जीवन जगण्याची संधी तुला परमेश्वरी कृपेने लाभली आहे हे लक्षात ठेव आणि त्याचे सार्थक कर म्हणजे झाले."

गालवांच्या विशुद्ध अंतःकरणातील सद्भावाला प्रगट करणारे त्यांचे बोलणे ऐकून सर्वजण स्तब्धच झाले. चित्रसेनाचा तर त्याच्या कानांवर विश्वासच बसेना. अर्जुनही अत्यंत चकितच झाला आणि तो आळीपाळीने एकदा कृष्णाकडे व एकदा गालवांकडे पाहू लागला. कृष्णाच्या गंभीर मुखावर मात्र अत्यंत मंद असे स्मित आले. थोड्याच वेळात चित्रसेन भानावर आला आणि त्याने धावतच पुढे होऊन गालवांचे चरण दृढतेने धरले. चित्रसेनाच्या डोळयातून पश्चात्तापाचे अश्रू वाहत होते. गालवांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याला उठवले आणि त्याला तेथून निघण्याची खूण केली. चित्रसेनाने पुन्हा एकदा दोन्ही हात जोडून गालवांना


वंदन केले आणि तो अर्जुनाच्या जवळ गेला. अर्जुनापुढे हात जोडून चित्रसेनाने त्याचे आभार मानले. पण अर्जुन काहीच बोलला नाही. एवढेच नव्हे तर त्याने चित्रसेनाकडे पाहिलेही नाही. चित्रसेन मनात काय समजायचे ते समजला. त्याला तर कृष्णाच्या समोर जाण्याचे धाडसही झाले नाही. चित्रसेनाने कृष्णाला दुरूनच हात जोडून नमस्कार केला आणि तो त्वरेने तेथून निघून गेला.

गालवांच्या वागण्याने आणि त्याहीपेक्षा त्यांनी ज्या तऱ्हेने चित्रसेनाशी बोलणे केले, त्याने अर्जुन तर पुरता भांबावलाच होता. त्याला कशाचीच कशाशी सांगड लागेना आणि काहीच उलगडा होईना. त्याची ती अवस्था गालवांनी ओळखली आणि त्यांना त्याची दयाच आली. गालवांनी प्रेमाने अर्जुनाला आपल्या जवळ बोलावले. अर्जुन अत्यंत नम्रभावाने गालवांच्या जवळ आला आणि त्याने गालवांना वाकून नमस्कार केला. गालवांनी प्रेमाने अर्जुनाचे मस्तक हलकेच थोपटले आणि ते त्याच्याशी बोलू लागले,

“अरे अर्जुना, तू तर अत्यंत भाग्यवान आहेस. कारण कृष्णासारखा मित्र तुला मिळाला. कृष्णाचे प्रेम तुला अगदी सहजपणे मिळालेले आहे. परंतु त्याचे यथार्थ मूल्य मात्र जाणून घे, तरच तुला कृष्णप्रेमाचा योग्य लाभ करून घेता येईल.

ज्या कृष्णाची मैत्री तुला मिळाली आहे व ज्याचे सख्यत्वही तुला लाभले आहे, तो कृष्ण ही सर्वसाधारण व्यक्ती नाही हे लक्षात ठेव. त्याचे माहात्म्य केवढे तरी मोठे व व्यापक आहे. सद्धर्माची स्थापना करून अधर्माचा समूळ नाश करणे हे त्याचे कार्य आहे आणि तोच त्याचा धर्म आहे. त्यासाठीच त्या कृष्णाचे सर्व जीवन आहे. या सद्धर्माची स्थापना ही सर्वांच्या अंतःकरणातच होऊ शकते. पण त्यासाठी अंतःकरणामध्ये सद्भाव निर्माण होणे आवश्यक असते आणि त्यासाठीच हा कृष्ण सर्वांना जवळ करून त्याचे प्रेम त्यांना देत असतो. त्याचे प्रेम अत्यंत निरपेक्ष, निःस्वार्थी व विशुद्ध आहे. कारण ते प्रेम ईश्वरी आहे. म्हणूनच त्या शुद्ध कृष्णप्रेमामुळे सामान्यांच्या मनातील अशुद्ध भाव नाहीसा होतो. त्या प्रेमाने मन तृप्त होऊन निर्मळ होते. एवढेच नव्हे, तर मनातील सर्व वासनांचे मूळच नाहीसे होते आणि तेथे सद्भावाचे मूळ धरले जाते.

अर्जुना, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव की त्या सद्धर्मापुढे बाकी सर्व धर्म हे गौणच आहेत. खरे तर, त्या सद्धर्माची प्राप्ती व्हावी म्हणूनच इतर सर्व धर्म आहेत आणि त्या सद्धर्मासाठी बाकी सर्व धर्मांचा त्यागच घडावा लागतो. म्हणजे तो



त्याग प्रयत्नपूर्वकच करावा लागतो आणि तसा त्याग करणे हाच सर्वश्रेष्ठ पराक्रम आहे. परंतु तुला त्या सद्धर्माचे ज्ञान नसल्यामुळे तू तुझ्या धर्मामध्ये अडकून बसलास आणि कृष्णाशी युद्ध करायलाही तयार झालास. बरे, तुला ज्ञान नव्हते हे एकवेळ मी समजू शकतो. परंतु तू कृष्णाच्या प्रेमालाही कसा काय विसरलास? त्या प्रेमासाठी तरी तुझ्याकडून तुझ्या धर्माचा त्याग घडावयास हवा होता. कारण जेथे खरे प्रेम आहे तेथे त्याग करणे अगदी सहजपणे घडते.

अर्जुना, मला तुला एकच गोष्ट निक्षून सांगावयाची आहे की या कृष्णाचे माहात्म्य नीट समजून घे आणि त्याचे केव्हाही व कधीही विस्मरण होऊ देऊ नकोस. कृष्णाकडे एक सामान्य व्यक्ती या दृष्टीने पाहू नकोस. त्याच्या सहवासात राहता राहता त्याचे वेगळेपण जाणून घेण्याचा प्रयत्न करीत रहा. म्हणजे कृष्णाचे असामान्यत्व तुझ्या हळूहळू लक्षात येईल आणि त्याचे माहात्म्यही तुला जाणवू लागेल. कृष्णाशी संवाद साधून त्याच्या अंतःकरणाचा वेध घेत रहा. म्हणजे मग त्याच्या वागण्या बोलण्यामागील त्याची भूमिका तुला कळू लागेल. कृष्णाची भूमिका हीच सत्याची व धर्माची आहे अशी पूर्ण श्रद्धा ठेव आणि कृष्णाला त्याच्या धर्मकार्यात पूर्णपणे सहकार्य करीत रहा. कृष्णाची व तुझी जोडी अशीच कायम राहो आणि तुमची मैत्री खऱ्या अर्थाने फलरूप होवो असे माझे तुम्हाला आशीर्वाद आहेत. अर्थात् तसे घडणार आहेच. कारण परमेश्वराच्या नियतीलाही तेच अपेक्षित आहे अशी ग्वाही माझे अंतःकरण मला देत आहे.”

गालवांच्या बोलण्याने अर्जुन अत्यंत प्रभावित झाला. त्याने गालवांच्या चरणांवर मस्तक ठेवून त्यांना नमस्कार केला आणि आपले दोन्ही हात जोडून विनम्रभावाने गालवांशी बोलू लागला,


“अहो ऋषिवर्य, खरोखरीच आपले माझ्यावर अनंत उपकार आहेत. आपण केवळ मला माझ्या होणाऱ्या अधोगतीपासून वाचवलेत एवढेच नव्हे, तर आपण मला माझ्या कल्याणाचा मार्गही दाखवत आहात. आपण म्हणता त्याप्रमाणे या कृष्णाचे मोठेपण मी जाणत नाही हे खरेच आहे. त्याला जसा कृष्णाचा स्वभाव कारणीभूत आहे तसाच माझाही स्वभाव कारणीभूत आहे. कृष्ण त्याच्या स्वभावानुसार माझ्याशी अत्यंत प्रेमाने व मोकळेपणाने वागत बोलत असतो. परंतु त्यामागील त्याची असलेली भूमिका किंवा त्याची अवस्था या विषयी कधीच आपणहून सविस्तरपणे बोलत नाही. त्याचे पूर्व जीवन विशेषतः गोकुळातील जीवन हे विशेष पराक्रमाचे व अद्‌भुत होते हे मीही ऐकून आहे. परंतु त्याविषयी कृष्ण

स्वतःहून तरी गंभीरतेने असे कधी काहीच बोलत नाही आणि मीही कधी काही विचारले तर जेवढ्यास तेवढे बोलून तो मग दुसरा काही तरी गंमतीचा व खेळीमेळीचा विषय काढतो. मीही माझ्या स्वभावानुसार कृष्णाच्या खेळकर स्वभावाला भुलतो व प्रतिसाद देतो आणि विचारलेल्या गोष्टींचा पाठपुरावा न करता मग सर्व काही विसरून जातो.

हे ऋषिवर्य, मला तरी असे खात्रीपूर्वक वाटते की कृष्णाच्या सततच्या व अत्यंत जवळीकतेच्या सहवासामुळेच मी कृष्णाला पूर्णपणे ओळखू शकत नाही. एवढेच नव्हे, तर माझ्या नकळत का होईना पण माझ्याकडून त्याचे अवमूल्यनच होते. यावेळेस तर माझ्याकडून कृष्णाचे एवढे अवमूल्यन झाले की मी तर त्याचा अवमानच केला. त्याच्या मैत्रीला, त्याच्या उपकाराला व मुख्य म्हणजे त्याच्या प्रेमालाही विसरलो. या गोष्टीचा सल माझ्या मनाला नेहमीच टोचत राहील आणि आयुष्यभर त्याचे विस्मरण मला होणार नाही. आता तर मला कृष्णाच्या जवळ जाण्याचीही लाज वाटत आहे. त्याच्या सावलीत सुद्धा उभे राहण्याची माझी लायकी नाही. मी कृष्णाला नेहमीच गृहीत धरीत आलो आणि त्याच्या प्रेमाचे फायदे तेवढे लुटीत आलो. पण जेव्हा कृष्णाने माझा भरवसा धरला तेव्हा मात्र मी केवळ कमीच पडलो असे नव्हे, तर त्याच्या विरोधातच उभा राहिलो. ही अपराध भावना माझ्या मनाला नित्य सतावीत राहणार. ही माझ्या मनातील खंत कधीच जाणे शक्य नाही. हे ऋषीवर्य, आपण माझ्यावर एवढीच कृपा करा आणि मला असा आशीर्वाद द्या, की जेणेकरून माझ्या जीवनातील ही अत्यंत दुःखदायी घटना मी कायमची विसरून जाईन. तरच माझे मन मोकळे होऊन हलके होईल असे मला तरी वाटते. तेव्हा माझ्यावर आपण एवढी कृपा तरी कराच करा. आपल्या चरणी माझी पुन्हा पुन्हा हीच प्रार्थना आहे."

बोलता बोलता अर्जुन अत्यंत भावनाविवश झाला होता. त्याचे मुखही अत्यंत म्लान झाले होते आणि त्याच्या नेत्रांतील अश्रुधारा तर थांबायलाच तयार नव्हत्या. अर्जुनाची ती केविलवाणी अवस्था पाहून गालवांना त्याची कीवच आली. त्यांचे दयार्द्र अंतःकरण अधिकच द्रवले. गालवांनी पुढे होऊन अर्जुनाच्या मस्तकावर हात ठेवून हलकेच थोपटले आणि त्याच्याशी ते प्रेमळ सुरात बोलू लागले,

"अरे अर्जुना, असा निराश व अगतिक होऊ नकोस. सध्या तुझी मनःस्थिती अत्यंत खालावली आहे हे मी जाणून आहे. तुझ्या मनाची अशी अवस्था



होणेही साहजिकच आहे. परंतु तुझी काही पूर्ण अधोगती झालेली नाही. तुझे मन थोडावेळ थोडेसे घसरले होते हे खरे आहे. परंतु परमेश्वरी कृपेने तू वेळीच सावध झालास आणि सावरलास. आता या मनाच्या अवस्थेतून तुझे तूच निश्चयपूर्वक बाहेर पडायचे आहेस. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुला एक अत्यंत मोठी अनुकूलता आहे आणि ती म्हणजे स्वतः कृष्ण तुझ्या संगतीला व साथीला आहे. कृष्णाचे तुझ्यावरील प्रेम तसेच व तेवढेच कायम आहे, ते केव्हाही व कधीही कमी होणे शक्यच नाही. कारण ते कृष्णप्रेम आहे. कृष्ण हा तर प्रेमस्वरूपच आहे. तू फक्त त्याला प्रेमाने प्रतिसाद व साथ देत रहा. म्हणजे मग तुझे मन निश्चितपणे पुन्हा उभारी घेईल याची पूर्ण खात्री बाळग.

अर्जुना, घडलेल्या प्रसंगाचे विस्मरण व्हावे असे जे मागणे तू माझ्याकडे मागितलेस तेही अनावश्यक आहे. खरे तर, मी तुला असेच सांगेन की घडलेला प्रसंग कधीच विसरू नकोस, तर तो कायमचा लक्षात ठेव. त्या प्रसंगामागील मूळ कारण जाणून घे आणि त्यातून सावध हो. त्या प्रसंगातीलही काय लक्षात ठेवायचे, एवढे मात्र लक्षात घे. त्या प्रसंगातील कृष्णाची भूमिका, कृष्णाची धर्मकार्यनिष्ठा व त्यासाठी प्रगटलेली त्याची तेजस्विता ही तर एक आदर्श म्हणून तुझ्या दृष्टीसमोर नित्य ठेवच, पण त्याहीबरोबर तू मूर्च्छित झाल्यावर कृष्णाची प्रगटलेली प्रेमळता आणि तुझ्यासाठीच्या शोकाने त्याची झालेली व्याकुळता ही कायमची स्मरणात ठेव. कृष्णाची ती प्रेमळ मूर्ती नित्य तुझ्या मनःचक्षुंसमोर राहू दे, म्हणजे त्या कृष्णाचे प्रेम अनुभवण्यासाठी आणि त्या प्रेमाला पात्र होण्यासाठी तुझे मन सदैव आर्त राहील. मग ही आर्तताच तुझ्याठायी तेज निर्माण करील आणि तुझ्याकडून पराक्रमही घडवील. तेव्हा कृष्णप्रेमाच्या गोडीमुळे घडलेल्या प्रसंगातली कटुता तुझ्याठायी निश्चितच राहणार नाही. फक्त त्यासाठी तू प्रसंगातील नकारात्मक गोष्टींकडे दुर्लक्ष करून फक्त होकारात्मक गोष्टींवरतीच तुझे लक्ष केंद्रित कर म्हणजे झाले."

गालवांच्या बोलण्याचा योग्य तो परिणाम अर्जुनावर झाला आणि त्याच्या ठिकाणी निर्माण झालेल्या नैराश्याचा जोर बराचसा कमी झाला. त्याच्या म्लान मुखावरील मरगळही ओसरली. त्याने हळूच मान वळवून कृष्णाकडे प्रथमच पाहिले. कृष्णाच्या नेत्रातील प्रेमळ हास्य अर्जुनाला जवळ येण्यासाठी खुणावीतच होते. कृष्णाची प्रेमाची साद अर्जुनाला ताबडतोब कळली. मग प्रतिसाद देण्यासाठी जराही वेळ न दवडता अर्जुन धावतच कृष्णाच्या जवळ आला आणि कृष्णाच्या

पसरलेल्या बाहूंमध्ये त्याने स्वतःला झोकूनच दिले. कृष्ण अत्यंत प्रेमाने अर्जुनाचे मस्तक कुरवाळीत होता आणि अर्जुन त्याच्या अश्रुधारांनी कृष्णाची छाती भिजवून ओलीचिंब करीत होता. मग कृष्णाच्या नेत्रांतूनही अश्रुधारा वहावयास मुळीच वेळ लागला नाही. अर्जुनाच्या मस्तकावर होणारा त्या प्रेमाश्रूंचा वर्षाव अर्जुनाचे मन अधिकाधिक शांत करीत होता.

कृष्णार्जुन प्रेमाचा कळस गाठणारे ते भावपूर्ण दृश्य पाहून कौशिक तर त्याचे देहभानच विसरला आणि तोही अत्यंत भावपूर्णच झाला. गालवांच्या प्रेमाने त्याचेही अंतःकरण भरून आले. कौशिक अत्यंत सहजतेने गालवांच्या जवळ आला आणि त्याने गालवांच्या चरणांना वंदन करून त्यांचे दर्शन घेण्यासाठी त्यांच्याकडे पाहिले, तो त्याच्या लक्षात आले की अत्यंत आनंदित झालेल्या गालवांचे मुखही त्यांच्या नेत्रांतील अश्रूंनी न्हाऊन निघत आहे.

अशा त्या भावपूर्ण वातावरणातही गालव मनाने शांत व स्थिर होते आणि त्यांच्या ठिकाणचे भानही कायम होते. त्यांनी कौशिकाचे मस्तक हळुवारपणे थोपटले आणि त्याला तेथून निघण्याची खूण केली. गालवांनी स्वतः कौशिकाचा हात आपल्या हातात घेतला आणि ते जाण्यासाठी सज्ज झाले. कृष्ण व अर्जुन यांच्याही जेव्हा ते लक्षात आले तेव्हा ते धावतच गालवांच्या जवळ आले. अर्जुनाने पुन्हा एकदा गालवांच्या चरणांना वंदन केले असता त्यांनी त्याच्या मस्तकाला आशीर्वादपर स्पर्श केला. कृष्णही वाकून गालवांना नमस्कार करीत असता गालवांनी त्याला प्रेमाने उठवले आणि दृढ आलिंगन दिले. एका क्षणात जणू आनंदाचे आनंदाशीच मीलन झाले आणि परमानंद साकार झाला. दुसऱ्या क्षणाला गालवांनी कौशिकासह तेथून गमन केले. अजूनही भावपूर्ण अवस्थेतच असलेल्या कृष्ण व अर्जुन यांनी एकमेकांचा हात धरला आणि तेही एकाच रथात बसून द्वारकेच्या दिशेने निघाले.”

बोलता बोलता नारदांनी त्यांचे बोलणे हेतूपुरस्सर थांबवले आणि ते लक्ष्मीकडे अपेक्षित नजरेने पाहत राहिले. लक्ष्मीच्या मुखावरील आनंद अगदी स्पष्टपणे दिसत होता. तिच्या मनावर आता कोणत्याही प्रकारचा ताणतणाव अजिबात राहिला नव्हता याचेच ते लक्षण होते. नारदांच्या नजरेतील भाव लक्ष्मीलाही कळला आणि तिने हसतमुखाने बोलावयास सुरुवात केली,

“अरे नारदा, ज्याचा शेवट गोड ते सर्वच गोड असे जे म्हणतात ते अगदी खरे आहे. कृष्ण व अर्जुन यांची मैत्री शेवटी टिकून राहिली आणि त्यांच्यात पुन्हा प्रेमाची गोडीही निर्माण झाली याचाच मला अतिशय आनंद होत आहे. खरे

तर, प्रसंगात सर्वांचीच कसोटी लागली होती. परंतु खरे माहात्म्य प्रगट झाले ते मात्र कृष्णाचेच! त्यातूनही ते कृष्णाचे माहात्म्य गालव ऋषींकडून प्रगट झाले हे या प्रसंगातील विशेषत्व आहे असे मला तरी जाणवते. त्यातून गालवांचीच थोरवी प्रगट झाली असेच म्हणावे लागेल. प्रत्यक्ष कृष्णार्जुन युद्धाच्या वेळचा भावनात्मक दृष्ट्या अत्यंत नाजूक व कठीण असलेला प्रसंग गालवांनी ज्या पद्धतीने सोडवला त्याला तर तोडच नाही. त्यावेळी गालवांचे अत्यंत व्यापक व विशुद्ध असे जे अंतःकरण प्रगट झाले, ते पाहून तर माझे डोळे दिपूनच गेले आणि माझी बुद्धीही अगदी कुंठितच झाली. माझ्या समजुतीच्या व तर्काच्याही पलीकडच्या अशा या गोष्टी आहेत. पण मला सर्वात नवल वाटते ते म्हणजे गालवांनी त्या चित्रसेनावरही दयाच केली आणि त्याला जीवनदान दिले या गोष्टीचे. ही तर दयेची परिसीमाच झाली. केवळ गालवांच्या अंतःकरणातच अशी व एवढी दया निर्माण होऊ शकते हे मात्र खरे आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गालवांच्या शब्दापुढे कृष्णाने सुद्धा आपली प्रतिज्ञा मागे घेतली. त्यासाठी त्याने जराही अनमान केला नाही ही गोष्ट मला केवळ कौतुकाचीच नव्हे तर अभ्यसनीयही वाटते. परंतु त्यावर विचार करूनही मला समाधानकारक असे उत्तर सापडतच नाही.”

लक्ष्मीच्या बोलण्यावर नारदाने किंचितसे स्मित केले आणि कौतुकाने मान डोलावली. लक्ष्मीच्या बोलण्याचा झालेला आनंद नारदाकडून सहजपणे व्यक्त झाला आणि त्याने स्वतः बोलावयास सुरूवात केली,

“अगं लक्ष्मी, तुझ्या मनातील विचार व तुला पडलेला प्रश्न अगदी बरोबर आहे. गालवांनी चित्रसेनावर मुद्दामहून काही दया केली असे म्हणणेही योग्यच नाही. कारण गालवांच्या अंतःकरणातील ईश्वरी प्रेमच चित्रसेनासाठी दयेच्या रूपाने प्रगट झाले असेच म्हणावे लागेल आणि तेच खरे आहे. पण त्याचबरोबर गालवांनी चित्रसेनाला जे मार्गदर्शन केले ती गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. कारण त्यामुळे झालेल्या दुष्कृत्यांचा पश्चात्ताप करून स्वतःच्या आचरणात सुधारणा करण्याची केवढीतरी संधी चित्रसेनाला मिळाली. ‘चित्रसेनाचे निदान पुढील आयुष्य तरी सदाचरणाचे जावे’ केवळ याच सद्भावनेने गालवांनी चित्रसेनाला त्याच्या कल्याणाचा मार्ग दाखवला. त्यांनी चित्रसेनाच्या मनावर सत्संगती व सत्कर्म याचे महत्त्व पटवण्याचा त्यांच्याकडून पुरेपूर प्रयत्न केला आणि गालव मोकळे झाले. अर्थात पुढे चित्रसेनाने प्रत्यक्ष काय केले? त्याच्या मनावर घडलेल्या प्रसंगाचा काय परिणाम शिल्लक राहिला? गालवांकडून प्रेरणा घेऊन

चित्रसेनाने खरेच त्याचे पुढील जीवन प्रयत्नपूर्वक बदलले का? हे प्रश्न आपल्यासाठी अभ्यसनीय नाहीत आणि म्हणून वर्णनीयही नाहीत.

हे लक्ष्मी, आणखीन एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घे. चित्रसेन हा विषयासक्त व विषयभोगी होता म्हणजे तो रजोगुणी होता हे खरे आहे. पण तो काही तमोगुणी व राक्षसवृत्तीचा नव्हता. त्यामुळे त्याच्याकडून इतरांना कोणत्याही प्रकारचा त्रास देणे किंवा कोणाचा छळ वगैरे करणे अशा गोष्टी घडत नव्हत्या. अर्थात विषय सेवनामुळे मदांध होऊन त्याच्याकडून गैरवर्तन घडत असले तरी मुळात त्याची स्वतःचीच अधोगती होत होती. तेव्हा पूर्ण अधोगती होऊन विनाश होण्याच्या आधीच चित्रसेनाला स्वतःची अधोगती थांबवण्याची जी काही थोडीफार संधी शिल्लक राहिली होती, ती त्याला गालवांच्या कृपेमुळे उपलब्ध झाली. लक्ष्मी, एक गोष्ट लक्षात ठेव की गालवांनी सुद्धा चित्रसेनाला त्याच्या कल्याणाचा फक्त मार्गच दाखवला. पण त्याची जबाबदारी काही स्वीकारली नाही हेही तेवढेच खरे आहे.

लक्ष्मी, अर्जुनाची गोष्ट वेगळी होती. तो जरी सात्विक वृत्तीचा होता तरी त्याच्या क्षत्रिय धर्मानुसार रजोगुणी स्वभावाचा होता. त्यामुळे त्याच्या दृष्टीने धर्मातील कर्माला जास्त महत्त्व होते. धर्माचे आंतरिक स्वरूप जाणून घेण्यापेक्षा धर्माच्या बाह्य आचरणाला अर्जुन जास्त महत्त्व देत होता. धर्माच्या मूळ हेतूला जाणत नसल्यामुळे अर्जुनाच्या बाह्य आचरणात एक प्रकारचा अहंकार व त्यामुळे आलेले काठिण्य होते. धर्माचा मूळ हेतू साधण्यासाठी बाह्य आचरणात वेळप्रसंगी आवश्यक असलेली लवचिकता अर्जुनाच्या ठिकाणी नव्हती. त्यामुळेच चित्रसेनाचे दुष्कृत्य लक्षात आल्यावरही चित्रसेनाला दिलेले वचन खरे करण्याचा हट्टच अर्जुनाने चालू ठेवला आणि त्यासाठी खुद्द कृष्णाच्या विरोधातही उभे राहण्यापर्यंत अर्जुनाची मजल गेली. अर्जुनाने ना धर्माचरणाचा हेतू जाणला, ना कृष्णाचे प्रेम जाणले. कृष्णाचे माहात्म्य तर त्याला माहीतच नव्हते. पण गालवांनी कृपावंत होऊन खरा धर्म जाणणाऱ्या व धर्माचे खरे आचरण करणाऱ्या कृष्णाचे माहात्म्य अर्जुनाला सांगितले. गालवांच्या वचनावर श्रद्धा ठेवून कृष्णाचे माहात्म्य जाणून घेण्याची जबाबदारी मग अर्जुनाची होती. गालवांनी फक्त कृष्णाकडे निर्देश केला होता. आता त्याचा अनुभव घ्यायचा होता अर्जुनाने!

हे लक्ष्मी, खरे तर चित्रसेन असो किंवा अगदी अर्जुनही असो, त्यांची कृष्णाशी तुलना कधीच होऊ शकत नाही. तशी तुलना करणेही योग्यच नाही.


कारण कृष्ण हा स्वयंभू होता आणि त्याचे सर्व वागणे त्याच्या स्वयंप्रेरणेनुसार अगदी सहजतेने घडत असे. त्यामध्ये कोणतीही कृत्रिमता वा अभिनिवेश नसे. कोणासाठी किंवा कोणाविरुद्ध असे निर्णय न घेता कृष्ण त्याच्याठायीच्या आत्मधर्माला प्रमाण मानत असे आणि त्यानुसारच सर्व आचरण कृष्णाकडून घडत असे. त्यामुळेच आत्मधर्माच्या ठायी असलेली निरपेक्षता, निर्भयता व निरहंकारीत्व कृष्णाच्या प्रत्येक कृतीतून सहजतेने प्रगट होत असे. कृष्णाचे अगदी हेच वेगळेपण व विशेषत्व याही प्रसंगात प्रकर्षाने दिसलेच. तसे बघायला गेले, तर कृष्ण व अर्जुन या दोघांनीही प्रतिज्ञा केली होती. परंतु अर्जुन कृष्णप्रेमाला तर विसरलाच आणि वर धर्माचरणाच्या अहंकाराने पछाडलाही गेला. त्यामुळेच अर्जुन त्याची प्रतिज्ञा सोडायला तयार होईना. ‘प्रतिज्ञाभंगामुळे पाप लागेल’ याची काल्पनिक भीतीही अर्जुनाच्या मनाला सतावीत होतीच.

लक्ष्मी, पण गालवांनी जेव्हा चित्रसेनाला अभयदान देऊन त्याला मुक्त केले, तेव्हा कृष्णाने मात्र गालवांचा शब्द ही आज्ञाच समजून प्रमाण मानला आणि अत्यंत सहजतेने स्वतः केलेली प्रतिज्ञा बाजूला ठेवली. हेच ते निरहंकारीत्व. प्रतिज्ञाभंगाचे पाप वगैरे विचार तर कृष्णाच्या मनाला स्पर्शही करू शकले नाहीत, हीच ती निर्भयता. चित्रसेनावरच्या व्यक्तिगत रागालोभापेक्षा गालवांसारख्या महात्म्याला अपेक्षित असे वागण्यासाठी स्वतःचा निर्णय व वागणे कृष्णाने एका क्षणात बदलले, हीच ती निरपेक्षता. आत्मधर्माच्या जाणिवेने युक्त असलेल्या कृष्णाने त्याच आत्मधर्माचा अनुभव घेणाऱ्या गालवांच्या अंतःकरणात सहजतेने स्फुरलेल्या सदिच्छेचा तेवढ्याच सहजतेने मान ठेवून सन्मान केला. म्हणूनच कृष्णाची ही कृती गालवांना अत्यंत आनंदित करती झाली आणि त्यांनी कृष्णाला प्रेमालिंगन देऊन त्याचा गौरवच केला. कृष्ण जसा त्या गौरवाला पात्र होता, तशीच कृष्णाचा गौरव करण्याची पात्रताही फक्त गालवांच्या ठिकाणीच होती. एकाच आत्मस्वरूपाचे दोन वेगळे वेगळे, पण एकमेकांना पूरक असे आविष्कार म्हणजेच अवतारी कृष्ण व महात्मा गालव होत. त्यांच्यातील ही एकरूपता ज्याला कळली त्यालाच त्यांच्या भिन्नत्वातील एकत्व जाणवेल आणि तोच त्या उभयतांना झालेल्या एकाच आनंदाचा अनुभव घेऊ शकेल, हे मात्र सत्य आहे.”

नारदाच्या बोलण्याने आनंदित झालेल्या लक्ष्मीच्या मुखातून एकदम सहजोद्गार निघाले,

"अगदी बरोबर, आणि तो आनंद अनुभवणारा आणि त्याचे वर्णनही करून सांगणारा एकमेव असा तूच आहेस याची प्रचिती तर मी प्रत्यक्ष घेतच आहे. सर्व द्वैताचे मूळ असलेल्या या नारायणाशीच तू ऐक्य पावलेला आहेस. म्हणूनच द्वैतातील एकत्व तू जाणतोस आणि द्वैताच्या खेळाचा आनंद अनुभवाने वर्णन करून सांगतोस. त्या निःशब्द अनुभवातील आनंदाचे वर्णन करताना तुझ्या अंतःकरणातील दाटलेले सगुण प्रेम तर दुथडी भरून वाहत असतेच, परंतु त्याचबरोबर प्रेमस्वरूप ईश्वराशी एकरूप करून ठेवणाऱ्या सगुणभक्तीचे माहात्म्यही तुझ्याकडून तेवढ्याच प्रकर्षाने प्रगट होत असते. तेच मला अधिक आकर्षित करीत राहते. कारण त्यामुळेच मला या नारायणाशी एकरूप करणारा भक्तीमार्ग माझ्या दृष्टिक्षेपात येऊ लागतो. या नारायणावरील प्रेमाने त्याच्या अंतःकरणापर्यंत जाऊन तेथेच एकरूप होऊन राहण्याची वाटचाल मात्र मलाच प्रयत्नपूर्वक करावयाची आहे हे मी जाणून आहे. माझ्या ठिकाणचे ते व्यवधान केवळ नित्य जागृत राहण्यासाठीच नव्हे, तर माझ्याठायी त्याचा ध्यासच निर्माण होण्यासाठी, नारायणाच्या या सगुण कथांचे श्रवण मला अत्यावश्यकच आहे. कारण त्याद्वारे नारायणाचे प्रेम व माहात्म्य प्रगट होऊन साकार होत असते. त्यातूनही या कृष्णचरित्राची गोडी तर अवीटच आहे. प्रेमरसाने भरभरलेल्या कृष्णकथा, श्रवणाची गोडी अधिकाधिक वाढवीत राहतात हे तर खरेच आहे. पण त्याचबरोबर त्याच कथेच्या निमित्ताने सखोल विचार करून कृष्णाच्या अंतरातील ईश्वरी माहात्म्यही जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे ही गोष्टही मी पूर्णपणे लक्षात ठेवली आहे आणि माझा नेहमी तसाच प्रयत्नही चालू असतो.

हे नारदा, कृष्णार्जुन युद्धाच्या निमित्ताने घडलेल्या अभूतपूर्व व अत्यंत रोमहर्षक प्रसंगाचे वर्णन करून झाल्यावर तू जी गालवांच्या अंतःकरणाची अवस्था प्रगट करून दाखवलीस ती तर अत्यंत हृदयंगमच होती. त्याविषयी मी आणखीन ते काय बोलणार? मी तर तेथे फक्त नतमस्तकच होऊ शकते. मी तरी दुसरे काय करणार? परंतु नारदा, त्यानंतर तू चित्रसेन, अर्जुन व प्रत्यक्ष कृष्ण यांच्याविषयी जे विवेचन केलेस ते मात्र माझ्यासाठी अत्यंत चिंतनीय आहे. त्या तिघांशी गालव कसे वेगवेगळ्या रितीने प्रगट झाले आणि त्या तिघांनी गालवांना कसा वेगवेगळ्या भावाने प्रतिसाद दिला याचे तू केलेले वर्णन अजूनही माझ्या मनात घर करून आहे. त्यामध्ये चित्रसेनाला गालवांनी उद्धाराची संधी दिली हे तर त्याच्या पूर्वपुण्याईचेच फळ म्हणावे लागेल, एवढेच! त्याच्या पुढील जीवनाचा विचार करण्याचे



आपल्याला कारण नाही असे जे तू म्हणालास तेही अगदी खरेच आहे. त्याचप्रमाणे कृष्णाचे पुढील चरित्र कसे कसे प्रगट झाले याची केवढी तरी आतुरता माझ्या ठिकाणी लागून राहिलेली आहेच. परंतु अर्जुनाविषयीचे विचार मात्र माझ्या मनात अगदी ठाण मांडून बसलेले आहेत. अर्जुनाची अवस्था मला त्याचा विचार करायला भागच पाडत आहे.

अरे नारदा, कृष्ण व अर्जुन यांच्यात पुन्हा गोडी झाली आणि त्यांची पूर्ववत जोडी जमली ही गोष्ट तर अत्यंत चांगलीच झाली, यात तिळमात्रही शंका नाही. परंतु राहून राहून माझ्या मनात एक विचार पुन्हा पुन्हा येत आहे की पुढे त्या अर्जुनाने कृष्णाचे माहात्म्य खऱ्या अर्थाने कधी जाणले की नाही? म्हणजे तशी काही माझ्या मनात शंका वगैरे नाही. पण ते जाणून घेण्याची केवळ उत्सुकताच नव्हे तर अत्यंत आतुरता मात्र माझ्या मनाठायी तीव्रतेने आहे एवढे मात्र नक्की. कारण गालवांनी नेमक्या याच गोष्टीकडे निर्देश केला होता आणि कृपावंत होऊन त्यांनी कृष्णाचे वेगळेपण व विशेषत्व अर्जुनाला आवर्जून सांगितलेही होते. ते ध्यानात ठेवून अर्जुनाने त्या गोष्टीचा पाठपुरावा केला की नाही? आणि अर्जुनाने स्वतः पुढाकार घेऊन कृष्णाशी संवाद साधून त्याचे माहात्म्य जाणून घेतले की नाही? कारण तरच अर्जुनाकडून कृष्णाची भक्ती घडणे शक्य झाले असते. केवळ व्यक्तिगत प्रेमाचा भरवसा धरता येत नाही आणि त्या प्रेमाचे विस्मरण केव्हा घडेल हे सांगता येत नाही, ही गोष्ट तर स्वानुभवाने अर्जुनाच्या लक्षात आलेलीच होती. तेव्हा पुढे तरी त्या अर्जुनाकडून कृष्णाची भक्ती घडून तो खऱ्या अर्थाने कृष्णभक्त झाला की नाही?”


लक्ष्मीच्या बोलण्यावरती नारदाच्या मुद्रेवर थोडा वेळ गंभीरता पसरली. नारदाने त्याचे नेत्र क्षणभर मिटून घेतले आणि तो विचारमग्न झाला. परंतु थोड्याच वेळात नारदाचे नेत्र सहजपणे उघडले गेले. लक्ष्मीकडे थोडेसे रोखून बघत नारदाने लक्ष्मीशी बोलावयास सुरूवात केली,

“लक्ष्मी, तुझ्या मनातील विचार व आतुरता अगदी योग्यच आहे. मिळालेल्या संधीचा उपयोग करून अर्जुनाला कृष्णाचे माहात्म्य खरेच जाणता आले का आणि तो कृष्णाचा भक्त होऊ शकला की नाही, ही जाणून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी गोष्ट आहेच. त्यात मुळीच शंका नाही. कारण त्याद्वारेच या

मानवी मनाचा अभ्यास करणे शक्य होते. शेवटी प्रेमभाव असो, भक्तिभाव असो, नाहीतर ऐक्यभाव असो, हा सर्व अनुभव घेणारे तर ते मनच आहे. त्या मनाला एखादी गोष्ट शब्दाने कळल्यानंतरही आधी त्याठायी मन स्थिर होणे आवश्यक आहे. तरच त्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा मनाचा निश्चय होणे शक्य आहे. त्यानंतर मनाने तसा ध्यास धरून तो अनुभव घेण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हा सर्वात महत्त्वाचा भाग तर पुढचाच आहे. पण एखाद्या गोष्टीठायी अशी मनाची स्थिरता होणे हेच मुळात कठीण आहे. कारण मन हे मुळातच अत्यंत चंचल असे तत्त्व आहे. मनाला अनेक इतर गोष्टीही आवडत असतात आणि त्याही लक्षात ठेवण्याचे मनाचे प्रयत्न एकीकडे चालूच असतात आणि मग मनाच्या हिताच्या असलेल्या गोष्टी हळूहळू विस्मरणात जात बाजूला पडू लागतात. म्हणूनच त्या मनाला त्याच्या हिताचे नित्य स्मरण राहण्यासाठी कोणीतरी पुन्हा पुन्हा आठवण करून देणे आवश्यक असते. अशा व्यक्तींच्या सहवासात व संगतीतच मनाच्या ठायी त्याच्या हितकारक गोष्टींविषयी जागृती राहू शकते आणि ती गोष्ट प्राप्त करून घेण्याची स्फूर्तीही त्या मनाला मिळत राहते.

हे लक्ष्मी, अर्जुनाचे इतर बंधू वा खुद्द त्याची आई हे सर्वजण कृष्णाला मानत असत आणि त्याचा प्रेमादरही करीत असत. परंतु कृष्णाच्या ईश्वरी माहात्म्याविषयी मात्र ते सगळेच जण पूर्णपणे अनभिज्ञ होते. त्यामुळे त्यांच्याकडून कृष्णाच्या माहात्म्याविषयी काही बोलणे घडेल अशी अपेक्षा करणे हेच मुळी चुकीचे होते. बरे, ‘स्वतःचे माहात्म्य स्वतःच प्रगट करणे’ ही अपेक्षाही कृष्णाकडून करणे शक्य नव्हते. कारण कृष्णाचा तो स्वभाव नव्हता आणि कृष्णमाहात्म्य स्वतःहून जाणून घेण्यासाठी अर्जुन फारच कमी पडत होता. त्यालाही ते शक्य होत नव्हते. कारण त्याचाही तो स्वभाव नव्हता.

हे लक्ष्मी, पण मला ही गोष्ट सांगावयास अत्यंत आनंद होत आहे आणि मला पूर्ण खात्री आहे की ती गोष्ट ऐकून तुलाही माझ्यासारखाच व माझ्या एवढाच आनंद होईल की, अर्जुनाच्या जीवनात असा चमत्कार खरोखरीच घडला होता. कृष्णाचे माहात्म्य जाणून असलेली आणि कृष्णावर नितांत प्रेम व श्रद्धा असलेली अशी एक व्यक्ती अर्जुनाच्या जीवनात आधीच आली होती. ती व्यक्ती नुसती आलीच होती असे नाही तर अर्जुनाची पत्नी म्हणून, त्याची जीवनभराची जोडीदार व साथीदार होऊन राहिली होती. तिच्या सहवासामुळे व संगतीमुळे अर्जुनाच्या ठायी कृष्णप्रेम हळूहळू जागे राहू लागले होते. तिच्या नित्य बोलण्यातून सहजतेने



प्रगटणारे कृष्णमाहात्म्य ऐकून ऐकून, कृष्णाकडे पाहण्याची अर्जुनाची दृष्टी थोडी थोडी बदलत होती आणि त्याच्याठायी कृष्णमाहात्म्याची जाण हळूहळू निर्माण होऊ लागली होती. अर्जुनाठायीचा कृष्णाविषयीचा आदरही वाढू लागला होता आणि कृष्ण व अर्जुन यांच्यातील मैत्रीलाही एक वेगळा पण योग्य असा अर्थ लाभू लागला होता.

हे लक्ष्मी, तुला हे ऐकून निश्चितच नवल वाटेल की अज्ञानाने स्वतःच्या क्षत्रिय धर्माचा हट्ट धरून प्रत्यक्ष कृष्णाच्या विरोधात युद्धासाठी उभा राहिलेला अर्जुन, पुढे एका प्रसंगी स्वकीयांच्या मोहात पडून त्या क्षत्रिय धर्माचरणाला स्वतःच विसरला आणि आवश्यक असलेले धर्मयुद्ध करावयास तयारच होईना. अशावेळी कृष्ण त्याच्या मैत्रीला व धर्माला नित्याप्रमाणे जागला आणि त्याने अर्जुनाला सावध केले. एवढेच नव्हे, तर मोह नाहीसा होण्यासाठी आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावे यासाठी कृष्णाने अर्जुनाला उद्युक्त केले. त्यावेळी अर्जुनाठायी कृष्णाचे प्रेम व माहात्म्य दोन्ही जागे झाले आणि तो अनन्य अशा शिष्यभावाने कृष्णाला शरण गेला. कृष्णाकडूनही अर्जुनावरील प्रेमापोटी ते आत्मज्ञान संवादरूपाने केवढ्यातरी शब्दांनी प्रगट झाले. त्याचीच परिणती म्हणजे अर्जुनाचा मोह समूळ नष्ट झाला आणि आत्मधर्माच्या जाणिवेने अर्जुन त्याच्या क्षत्रियधर्माचे आचरण करण्यासाठी पुन्हा प्रवृत्त झाला. कृष्णाच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनानुसार अधर्मीयांचा नाश करून अर्जुनाने धर्माचे रक्षण केले आणि विजयश्री प्राप्त करून घेतली.”

नारदाचे बोलणे ऐकून नारदाला अपेक्षित असा आश्चर्याचा धक्का लक्ष्मीला निश्चितच बसला. तिचे नेत्र विस्फारले गेले आणि तिने आपले दोन्ही हात उत्स्फूर्तपणे उचलून स्वतःच्या तोंडावर ठेवले. लक्ष्मीचा तर बराच वेळ तिच्या कानांवर विश्वासच बसत नव्हता. लक्ष्मीची ती अवस्था पाहून नारदाला मात्र जशी मौज वाटत होती तसेच समाधानही होत होते. कारण लक्ष्मीची प्रतिक्रिया ही तिच्याठायी पुढील श्रवणासाठी निर्माण होत असलेल्या पार्श्वभूमीची सूचक अशी सुरूवात होती. म्हणूनच लक्ष्मीने बोलावयास सुरूवात करेपर्यंत नारद मुद्दामहूनच स्वस्थ बसून राहिला.


अखेर लक्ष्मी त्या सुखद धक्क्यातून थोड्यावेळाने स्वतःहूनच सावरली आणि तिने थोडेसे प्रयत्नपूर्वकच का होईना पण बोलावयास सुरूवात केली.

“अरे नारदा, तू तर अगदी कमालच केलीस. तुझ्या छोट्याशा वक्तव्यानेच तू कृष्ण व अर्जुन यांच्या संबंधाला केवळ वेगळेच वळण दिले आहेस

असे नाही, तर तू ते संबंध अगदी कळसावरच नेऊन ठेवलेस. अर्जुन कधीकाळी कृष्णाचे माहात्म्य जाणून कृष्णाला शरण गेला असेल ही गोष्ट तर माझ्या कल्पनाशक्तीच्या कितीतरी पलीकडची आहे. परंतु अर्जुनाच्या जीवनात आलेल्या त्याच्या पत्नीचा जो तू ओझरता उल्लेख केलास त्याने तर तुझ्या बोलण्यातील गूढ अधिकच वाढले आहे आणि माझ्या उत्कंठेने तर अगदी शिगच गाठली आहे. कृष्णावर प्रेम व श्रद्धा असलेली पण जिचा विवाह मात्र अर्जुनाशी आधीच झाला होता अशी ती स्त्री कोण बरे? तू तर म्हणतो आहेस की अर्जुनाला कृष्णाकडे पाहण्याची दृष्टी ती देत होती आणि तिच्यामुळे अर्जुनाला कृष्णाचे माहात्म्य थोडे थोडे कळू लागले होते. खरेच नारदा, मला आता राहवतच नाही. तुझ्या मुखातून हे सर्व गुज मी केव्हा एकदा ऐकते असेच मला झाले आहे. पण हे गुज तू मला आधीच का सांगितले नाहीस बरे?

नारदा, तू मला थोडक्यात साररूपाने पुढील विषय सांगितलास खरा. परंतु त्यामुळे तुला अपेक्षित असाच परिणाम माझ्यावर झालेला आहे. माझी श्रवणाची भूक अधिकच तीव्रतेने वाढलेली आहे. तेव्हा आता माझ्यासाठी कृष्णकथारूपी भोजनाची त्वरित व्यवस्था कर बघू. ते भोजन जरी षड्रसाने युक्त असले त्यातील कृष्णप्रेमाचा मधुर रस हीच खरी मेजवानी आहे हे मी पूर्णपणे जाणून आहे. म्हणून आता मुळीच वेळ वाया न घालवता कृष्णचरित्रातील हा सुरस व सुरम्य कथाभाग अगदी सविस्तरपणे आणि तुझ्या रसपूर्ण वाणीने गाऊन माझ्यासाठी प्रगट कर.”

लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारद अतीव सुखावला आणि त्याच्या अंतःकरणात सगुणप्रेमाच्या लहरींवरती लहरीच उठू लागल्या. त्या प्रेमाच्या जाणिवेच्या सुखद आनंदात सर्वभावाने रममाण झालेला नारद पूर्णपणे अंतर्मुख होऊन राहिला. काही वेळाने तर त्याच्या हृदयातील आनंदसागराला पूर्ण भरती येऊन ते उचंबळू लागले आणि नारद त्यामध्ये संपूर्णतः विलय पावला. देहातील ती देहातीत स्वानंदाची अवस्था म्हणजे तर परमानंदाची परमावधीच होती. नारदाची ती अवस्था जरी लक्ष्मीच्या अनुभवाची नव्हती तरी तिच्यासाठी ती अनाकलनीयही नव्हती. नारद हा पूर्णपणे त्याच्या हृदयस्थ नारायणाशी ऐक्य पावलेला आहे हे त्याच्या मुखावरील भाव पाहून लक्ष्मीला निश्चितपणे जाणवले. परंतु लक्ष्मीच्या ठायी खात्रीही होती की त्याच नारायणाच्या स्वेच्छेने नारदाच्या अंतःकरणात पुन्हा द्वैत स्फुरून येईल आणि तेथे नारायणाशी नित्य एकरूप असलेला असा त्याचा भक्त नारद पुन्हा प्रगट होईल. नारायण व नारद यांच्यातील प्रेमभक्तिभावाचा संयुक्त



खेळ नारदाच्या अंतरंगात पुन्हा सुरू होऊन रंगत राहील आणि त्या रंगाच्या अनेकविध छटा नारदाच्या मुखातून कृष्णाच्या सगुण चरित्राच्या द्वारे प्रगट होत राहतील. त्याच क्षणाची वाट पाहत लक्ष्मी तेथेच शांतपणे बसून राहिली. नारायणाशी पूर्णपणे ऐक्य पावलेल्या नारदाच्या मूर्तीकडे पाहून लक्ष्मीने भक्तिभावाने आपले हात जोडून नारदाला वंदन केले आणि स्वतःचे नेत्र मिटून घेतले मात्र तीही देहभान विरहीत अवस्थेमध्ये गेली.

□ □ □

नारद व लक्ष्मी यांची अवस्था बाह्यांगाने जरी एक सारखीच दिसत होती तरी त्यांच्या अंतःकरणाच्या अवस्थेमध्ये मात्र निश्चितच फरक होता. लक्ष्मीच्या मनामध्ये सगुण प्रेमभावाचा उगम झाला होता, तर नारद त्याच्या अंतरातील सगुण प्रेमभक्तिच्या संगमात नाहता नाहता बुडून गेला होता. त्यामुळे साहजिकच थोड्या वेळाने लक्ष्मीच्या मनामध्ये प्रेमाची आर्तता निर्माण होऊन भक्तिभावाची भूक तिला लागली आणि ती व्याकूळ झाली. तिच्याठायी श्रवणभक्तीची नितांत जरूरी निर्माण झाली. सगुण प्रेमभक्तिभावाच्या कथा श्रवण केल्याशिवाय तिच्या मनाला शांती व समाधान लाभणारच नव्हते. मनाच्या अशा उत्कट बेचैनीमुळेच लक्ष्मी लवकरच पुन्हा देहभानावर आली. नारदाकडे दृष्टीक्षेप होताच लक्ष्मीच्या लक्षात आले की नारद मात्र अजूनही देहभान विरहित अशा भावपूर्ण अवस्थेतच आहे. नारदाची ती भावपूर्ण मूर्ती पाहून लक्ष्मीला नारदाचे माहात्म्य तर निश्चितच जाणवत होते. परंतु त्याचबरोबर ती हेही जाणून होती की त्या माहात्म्याचा अनुभव तिला येण्यासाठी ते माहात्म्य तिने नारदाच्या मुखातून प्रत्यक्ष श्रवण करणे अत्यावश्यक होते. लक्ष्मीच्याठायीची ही जाणीवच अत्यंत महत्त्वाची होती. कारण तेच तिच्याठायीच्या भक्तिभावाचे लक्षण होते. म्हणूनच लक्ष्मीचे ते विशेषत्वही होते आणि तिचे हे वेगळेपण उठूनही दिसत होते.


लक्ष्मीने तरीही संयम राखला आणि थोडा वेळ तसाच जाऊ दिला. परंतु शेवटी तिचाही नाईलाजच झाला. मनाच्या त्या व्याकूळ अवस्थेत न राहवून लक्ष्मी पुढे झाली. तिने नारदाच्या चरणांना आपल्या हातात दृढ धरले आणि त्या चरणांवर आपले मस्तक ठेवून नारदाला नमस्कार केला. लक्ष्मीच्या मनातील आर्तता तिच्या स्पर्शातून नारदाच्या अंतःकरणात प्रवेश करती झाली आणि त्याचीच परिणती म्हणजे नारदाच्या अंतरातही आर्तभाव हळूहळू निर्माण होऊ लागला. एक प्रकारची अनामिक हुरहुर नारदाच्याठायी निर्माण झाली. एवढा वेळ शांत व निश्चल असलेल्या नारदाच्या अंतःकरणात त्याच्याही नकळतपणे एकामागून एक अशा लहरी निर्माण होऊ लागल्या आणि हळूहळू नारदाचे देहभान येऊ लागले. किंचित काळाने नारदाचे नेत्रही अलगद व सावकाशपणे उघडले गेले. पण तरीही

त्याचे नेत्र मात्र अजूनही भावविरहितच दिसत होते. लक्ष्मी मात्र नारदाकडे एकटक नजरेने पाहत तेथेच उभी राहिली होती आणि अचानकपणे नारदाचे नेत्र लक्ष्मीकडे वळले. लक्ष्मीवर दृष्टीक्षेप होताच मात्र नारदाच्या नजरेत आपलेपणाचा भाव तरळू लागला आणि त्याने लक्ष्मीकडे पाहून मंद स्मित केले. तरीही नारदाला परिस्थितीचे भान अजूनही येत नव्हते. नारद कितीतरी वेळ लक्ष्मीकडे तसाच पाहत राहिला. क्षणार्धात त्याचा चेहरा एकदम उजळला आणि त्याच्या मुखावरती प्रसन्नतेचा भाव झळकला. नारद लक्ष्मीकडे पाहून अत्यंत मोकळेपणाने हसला आणि त्याने लक्ष्मीला हाताने खूण करून खाली बसण्याची सूचना केली. लक्ष्मीलाही एकदम मोकळे झाल्यासारखे वाटले आणि अत्यंत नम्रतापूर्वक ती नारदाच्या सन्मुख बसली.

नारदाशी बोलावयास सुरुवात करावी की न करावी अशा मनाच्या द्विधा स्थितीत लक्ष्मी होती खरी, पण शेवटी मनाचा निश्चय करून तिने नारदाशी बोलावयास सुरुवात केलीच.

“हे नारद महर्षे, या नारायणाचा परमभक्त म्हणून तुझी जी ख्याती आहे ती अगदी सर्वार्थाने खरी आहे. या नारायणाचे खरे माहात्म्य सर्वांगाने तू जाणतोस, एवढेच नव्हे, तर ते माहात्म्य तुझ्या अंतःकरणात तू नित्य अनुभवीत असतोस. खरे तर, तुझ्या रूपाने या नारायणाचे माहात्म्यच पूर्णपणे साकार झालेले आहे. जसे नारायण व त्याचे माहात्म्य हे वेगळे वेगळे नाही तसेच नारायण व तूही वेगवेगळे नाहीतच. नारायण म्हणजे जसे त्याचे अंतःकरणच आहे तसे तुझे अंतःकरण म्हणजे नारायणच आहे. नारायणाशी पूर्णपणे एकरूप असलेला तू त्या नारायणाच्या ऐक्यतेचा अनुभव कसा घेतोस हेच तर तुझ्या अंतःकरणातील एक मोठे गुज आहे. त्याचा थांग तर कोणालाही, केव्हाही व कधीही लागणे कठीणच नव्हे तर अशक्यच आहे. परंतु त्या ऐक्याचा आनंद अनुभवण्याची उर्मी तुझ्याठायीच अचानक व अकारण अशी निर्माण होते म्हणूनच तो आनंद अंशमात्र का होईना पण साकार होतो. हे माझ्यासारख्यांचे अत्यंत भाग्य आहे असे निश्चितपणे म्हणावे लागेल.

नारदा, तुझ्या मुखातून मी या नारायणाचे रामावतारातील चरित्र परमभाग्याने श्रवण केलेले आहे आणि आता तुझ्या मुखातून नारायणाचे कृष्णावतारातील चरित्रही मी त्याच भाग्याने श्रवण करीत आहे. दोन्ही चरित्रे वर्णन करीत असताना ती तू सारखीच रंगवून सांगत आहेस याविषयी जराही प्रश्नच नाही. कारण मूलतः तो रंग तुझ्या अंतरंगातील आहे हे मी पूर्णपणे जाणून आहे. पण तरीही



तू कृष्णचरित्र वर्णन करीत असताना मात्र जरा अधिकच रंगलेला दिसतो आहेस, हेही खरेच आहे. ही गोष्ट अगदी सहजपणे लक्षात येते. खरे तर, तुझ्या अंतरंगात असा काही फरक असणे शक्यच नाही, हे मला ठाऊक आहे. मग असा हा बाह्यांगाने जो फरक दिसतो तो केवळ तसा दिसतोच, की बाह्यांगाने तसा फरक थोडासा पडतोच? नारदा, मला माहित आहे की माझा प्रश्न तुला अंतर्मुख करायला लावणारा आहे. पण त्याचबरोबर मला अशीही निश्चित खात्री आहे, की तुझ्या त्या अंतर्मुखतेमधून या नारायणाचे सगुण माहात्म्यच पुन्हा एका अनोख्या अंगाने व रंगाने प्रगट होणार आहे. त्याची केवढी तरी उत्सुकता व आतुरताच माझ्याठायी लागून राहिलेली आहे. तेव्हा आता तुझ्या अंतरातील हे गुज माझ्यासाठी त्वरीत उघड करून सांग बरे.”


लक्ष्मीच्या प्रश्नाचे नारदालाही थोडेसे नवलच वाटल्यासारखे दिसले. त्याने थोडावेळ नेत्र मिटून घेतले आणि तो स्तब्धच राहिला. किंचित काळाने जेव्हा नारदाने त्याचे नेत्र उघडले तेव्हा त्याच्या नेत्रात जरासा गमतीचाच भाव दिसत होता. नारदाने लक्ष्मीकडे पाहून मंदस्मित केले आणि तो सावकाशपणे एकेक शब्द उच्चारीत बोलू लागला.

“हे लक्ष्मी, तुझ्या प्रश्नाचे खरेच मला नवल वाटले आणि गंमतही वाटली. कारण या दृष्टीने मी कधी विचारच केला नव्हता आणि तसा विचार करण्याचे मला कारणही नव्हते. त्याचबरोबर तसा विचार करणे मला शक्यही नव्हते. कारण मी मला माझ्या बाह्यांगाने तसा पाहूच शकत नाही हे तर खरेच आहे ना? पण ते माझे बाह्यांग नेमकेपणाने केवळ तुलाच दिसणे शक्य आहे. पण आता तुझ्या बोलण्याचा जेव्हा मी विचार करायला सुरुवात केली तेव्हा मला जाणवू लागले की तशी शक्यता नाकारता येत नाही. तसा फरक बाह्यांगाने पडणे किंवा दिसणे अगदी शक्य आहे. अर्थात् एक गोष्ट अगदी निश्चितच आहे की माझ्या अंतरंगात मात्र एकीएक या नारायणाचीच मूर्ती स्थापित आहे आणि त्या अंतरंगातच या नारायणाचे माहात्म्य निरपेक्षपणे, नित्यपणे व सहजपणे असते. त्या स्वानंदातच मी नेहमी पूर्णपणे रमलेला असतो. किंबहुना त्याठिकाणी माझे मीपणही पूर्णत्वाने लयाला जाते आणि एकीएक नारायणाचीच अत्यंत सूक्ष्म जाणीव त्याठायी स्फुरत राहते. माझ्या मीपणाला तर तेथे ठावच राहत नाही आणि

शब्दातीत असा केवळ या नारायणाच्याच अस्तित्वाचा अनुभव शिल्लक राहतो. त्यामुळे ती अवस्था तर अवर्णनीयच आहे.

हे लक्ष्मी, परंतु माझ्या अंतरंगातील निर्गुण, निराकार व निरपेक्ष आनंद जेव्हा सगुण साकार होऊन सापेक्षतेने प्रगट होऊ लागतो तेव्हा मात्र त्या आनंदाचे अनेक रंग व त्या रंगांच्या नानाविध छटा उत्स्फूर्तपणे दृश्यमान होतात आणि त्या आनंदातील अंतर्भूत सौंदर्यालाच साकार करतात. या सौंदर्याचे मूळ कारण त्या आनंदातच सुप्तपणे सामावलेले असते आणि विषयाचे माध्यम हे बाह्यरूपाचे निमित्त कारण ठरते. जसा सूर्याचा प्रकाश हा अत्यंत शुभ्र असतो व तसाच दिसतोही, परंतु त्यामध्ये सप्तरंग अदृश्यरूपाने सहजपणे सामावलेले असतात. सूर्यप्रकाश जेव्हा एखाद्या वस्तूमात्रावर पडतो तेव्हा त्या प्रकाशातील रंगांचे आपसूक विघटन होऊन त्यातील एक रंगछटा परावर्तीत होते आणि बाकी सर्व रंगछटा त्या पदार्थामध्ये शोषल्या जातात. ज्या रंगाची छटा परावर्तीत होते तो रंग आपल्या नजरेला त्या वस्तूच्या ठायी दिसतो आणि आपण ती वस्तू त्या रंगाची आहे असे म्हणतो. सगुणचरित्र गायन घडत असतानाही नेमके असेच घडत असते. काही वेळेला नारायणाच्या सगुण रूपातील अवतारचरित्रात त्या त्या वेळेस एखादाच गुण विशेषत्वाने व प्रकर्षाने प्रगट होतो आणि त्याचे वर्णन करताना व ऐकताना ते चरित्र त्या विशिष्ट गुणाचेच आहे असे जाणवते. परंतु त्या अवतारी पुरुषांच्या अंतरंगात मात्र नारायणाचे निर्गुण स्वरूपातील अस्तित्व असल्यामुळे त्याठायी इतर अनेक गुण अप्रगट रूपात असतातच, हे मात्र सत्य आहे. रामावतारामध्ये नेमके असेच घडले. रामाच्या जीवनात रामाकडून त्याच्या अंतःकरणातील शुद्ध सात्विक असे आत्मतेजच प्रकर्षाने प्रगट झाले. त्यामुळेच रामचरित्राचे वर्णन करीत असताना माझ्याकडूनही माझ्या अंतरंगातील शुद्ध सात्विक भावाचाच रंग विशेषत्वाने प्रगट झाला आणि तुलाही तोच जाणवला हे खरेच आहे.

हे लक्ष्मी, मगाशी मी तुला सूर्यप्रकाश व त्यामध्ये सुप्तपणे समाविष्ट असलेले सप्तरंग यांचा दृष्टांत सांगितला. त्याच सूर्यप्रकाशाची आणखीन एक आगळीच गंमत आहे. त्याच सूर्यप्रकाशाचे किरण जेव्हा बरसणाऱ्या पावसाच्या जलातून पलिकडे जातात त्यावेळी त्या प्रकाशाचे लीलया विघटन होते आणि ते प्रकाशकिरण सप्तरंगांमध्ये विखुरले जातात. त्यावेळेस अत्यंत नयनमनोहर असे दृश्य पहावयास मिळते. कृष्णावतारामध्येही नेमकी अशीच मौज घडली. कृष्णाच्या जीवनामध्ये नानाविध व्यक्ती व प्रसंग यांच्या निमित्ताने कृष्णाच्या अंतरंगातील अनेक रंग व त्यांच्या विविध छटा प्रगट झाल्या. त्यामुळेच कृष्णचरित्राचे गायन करीत असताना माझ्याही अंतरंगातील त्या त्या भावाच्या विविध रंगछटा सहजपणे



दृश्यमान होत असतात. साहजिकच मीही कृष्णचरित्राचे वर्णन करीत असताना बाह्यांगाने अधिक रंगलेला दिसतो आणि तुलाही ते तसे निश्चितपणे जाणवते. एवढेच नव्हे, तर श्रवण करीत असताना तूही तेवढीच व तशीच रंगलेली असतेस हेही अगदी खरे आहे.”

अंतरंग व बाह्यरंग यांची सांगड याविषयी नारद जे विवेचन करीत होता ते ऐकून लक्ष्मी अत्यंत चकित झालेली आहे हे तिच्या मुखावरील भाव पाहताना अगदी स्पष्टपणे जाणवत होते. तोच भाव लक्ष्मीच्या शब्दातूनही सहजपणे व्यक्त होऊ लागला.


“अरे नारदा, तुझी तर अगदी कमालच आहे. तुझे सांगणे एवढे शास्त्रोक्त व मुद्देसूद होते की ते ऐकतानाही मला अगदी लक्षपूर्वक व ध्यान देऊन ऐकावे लागत होते. अर्थात् त्यामुळे माझ्या मनाला थोडासा ताण जाणवला हे खरे आहे. त्यातील सर्व काही मला समजले असा मी दावा करीत नाही. पण जे काही मला थोडेफार कळले असे मला वाटते त्याने मला थोडेसे का होईना पण बौद्धिक सुख मात्र निश्चितच मिळाले हे मात्र मी कबूल करते. तुझ्या सांगण्यातील एवढाच भावार्थ माझ्या लक्षात आला की एकाच ईश्वरी अनुभवाची निर्गुण व सगुण ही दोन अंगे आहेत. निर्गुण निराकार हेच सगुण साकार होते. सगुणरूप हे काही कुठून बाहेरून निर्माण होत नाही आणि तसे ते होऊच शकणार नाही. कारण ईश्वराच्या त्या एकीएक ईश्वरी स्वरूपाशिवाय दुसरे काही वेगळे म्हणून असे अस्तित्वातच नाही. त्यामुळेच ईश्वराचे प्रगटलेले सगुणरूप हे निर्गुणाठायी अप्रगटरूपाने आधीपासूनच असणार हा अगदी तर्कशुद्ध निष्कर्ष आहे. आता त्या सगुणरूपामध्येही अनेक रूपे व विविध रंग प्रगटलेले दिसतात, त्याचेही अप्रगट असे मूळ कारण निर्गुणाठायीच असणार हेही अगदी तर्कशास्त्राला धरूनच आहे. तेव्हा खरे तर ही एकाच ईश्वरी स्वरूपाठायी अप्रगट व प्रगट आणि पुन्हा अप्रगट अशी घडणारी लीलाच आहे आणि त्या ईश्वरी स्वरूपाचा अनुभव हाही असाच अप्रगट व प्रगट यामधून रंगणारा खेळ आहे. हा खेळ अत्यंत रंगतदार व मनोहारी आहे यात जराही शंका नाही. परंतु त्या खेळाचा खरा आनंद मात्र तेव्हाच होऊ शकेल जेव्हा अप्रगट निर्गुणस्वरूप व प्रगट सगुणरूप यांची असलेली मूलभूत सांगड लक्षात येईल. होय ना?”

लक्ष्मीचे तर्कशुद्ध व मुद्देसूद बोलणे ऐकताना नारद तिच्याकडे अत्यंत कौतुकाने व एकटक नजरेने पाहत होता. लक्ष्मीने शेवटी उच्चारलेल्या प्रश्नार्थक शब्दांनी नारद भानावर आला आणि कौतुकमिश्रित हास्य करून म्हणाला,

"लक्ष्मी, खरे तर आता चकित होण्याची पाळी माझ्यावर आलेली आहे. तुझे बोलणे ऐकताना मला तर क्षणभर असाच भास झाला की विषय तुला समजलेला आहे आणि तो तू मला समजावून सांगत आहेस. अर्थात् हा विषय कोणाला समजला आणि तो कोण कोणाला समजावून सांगत आहे यापेक्षा त्या विषयातील जे मूलभूत सत्यत्व आहे ना, त्याचेच महत्त्व आहे. म्हणूनच तुझ्याकडून प्रगटणाऱ्या त्या विषयाचे श्रवण करीत असताना मला अतिशय आनंद होत होता. पण मला एक गोष्ट विशेषत्वाने जाणवली की तुझे बोलणे केवळ श्रवणावर आधारीत नव्हते किंवा ते बोलणे नुसते बौद्धिकही नव्हते, तर तुझ्याठायी श्रवणानंतरच्या घडलेल्या मननचिंतनातून झालेला तो परिपाक होता. श्रवण केलेल्या विषयाचा नेमका गाभा तुला गवसला आहे हेच तुझ्या बोलण्यावरून लगेचच लक्षात येत होते आणि म्हणूनच तुझे बोलणे मला अत्यंत परिणामकारकही जाणवत होते. तुझ्याकडून घडत असलेल्या श्रवणभक्तिचेच ते सहज लक्षण आहे आणि त्याचेच मला अत्यंत कौतुक व समाधान वाटत आहे."

नारदाच्या बोलण्यावरती लक्ष्मीने मंदस्मित केले आणि ती म्हणाली,

"नारदा, तू जे माझे कौतुक करीत आहेस त्याचा मी अत्यंत नम्रभावाने स्वीकार करते. पण माझ्या मननचिंतनाचे मूळ जसे माझे श्रवण आहे, तसे माझ्या श्रवणाचे मूळ हे तुझ्याकडून उत्स्फूर्तपणे घडत असलेले भक्तिगायन व निरूपण हेच आहे ही गोष्ट मात्र विसरता येणारच नाही. तुझ्याकडून घडणाऱ्या भक्तिगायनाचे मूळ कारण तुझ्याठायी अत्यंत खोलवर असलेले या नारायणाचे सगुणप्रेम व त्याचे माहात्म्य हेच आहे, हे तर आता अगदी उघड असे गुपित आहे. परंतु असे भक्तिगायन घडण्यासाठी या नारायणाची प्रगटणारी सगुण अवतारचरित्रे हे बाह्यांगाचे कारणही तेवढेच महत्त्वाचे आहे. होय ना? या अवतारचरित्रांमुळे जसे या नारायणाचे स्वरूप रूपाला येते अगदी तसेच तुझ्याकडून त्या अवतारचरित्रांचे गायन घडत असताना, तुझ्या अंतरातील नारायणाचे अमूर्त प्रेमस्वरूप भक्तिभावाच्या रूपाने मूर्त होते आणि तुझा स्वानंदही साकार होतो हे अगदी सत्य आहे. म्हणूनच तुझ्याकडून घडणाऱ्या भक्तिगायनाचे श्रवण करीत असताना माझे मन जेव्हा त्यामध्ये पूर्णपणे तल्लीन होते, तेव्हा माझ्याही मनाठायीचे या नारायणाविषयीचे प्रेम एकदम जागे होते आणि रंगून खेळू लागते. मनाच्या या प्रेमभावपूर्ण अवस्थेमधूनच भक्तिभावाचा उदय होतो आणि आनंदाच्या अनुभवाची



सुरूवात होते. हा एक आगळावेगळा व अलौकिक आनंद अनुभवण्याची संधी मला तुझ्यामुळेच व तुझ्या रूपानेच लाभलेली आहे याची मला पूर्ण जाणीव आहे.

हे नारदा, पण काही काही वेळा अचानक गंमतच घडते. तुझ्याकडून तुझ्या आंतरिक अवस्थेतून सगुण चरित्राचे भक्तिगायन घडत असताना वर्णनातील एखाद्या विषयामुळे म्हणा किंवा त्या विषयाच्या अंतरंगामुळे म्हणा, पण तू एकदम अंतर्मुख होतोस आणि तुझ्याकडून बाह्यांगाचे गायन घडेनासे होते. तुझ्या अंतरातील भाव हे शब्दरूप होऊच शकत नाहीयेत हे मला त्यावेळेस लगेचच जाणवते. तुझ्याठायीची अंतर्बाह्य सांगड थोडावेळ सुटल्यासारखी वाटते आणि मग मात्र माझे मन बुचकळयात पडल्यासारखे होते. बरे, तुझी आंतरिक अवस्था जाणण्यासाठी बाह्यांगाचे असे काहीच सूत्र माझ्या हाती नसते. त्यामुळे माझे मन बेचैन होते आणि काय करावे ते काहीच सुचेनासे होते. त्यावर काही उपायच सापडत नाही. त्यातून तुझ्या या अवस्थेचा काही कार्यकारण भावच नसल्यामुळे त्यावरती निश्चित असा काही उपायच नाही. अशावेळी केवळ ही नारायणाची अतर्क्य लीला असे म्हणून फक्त स्वस्थ बसणे एवढेच माझ्या हाती असते आणि तेच मी अगदी प्रामाणिकपणे करीत असते.


पण नारदा, खरी गंमत तर तू जेव्हा पुन्हा भानावर येऊन बाह्यांगाने प्रगट होऊ लागतोस ना, तेव्हाच असते. अंतर्मुख होण्याच्या आधीची तुझी अवस्था आणि अंतर्मुखता संपल्यानंतरची तुझी बाह्यांगाची अवस्था यामध्ये काही सांगड वा सुसूत्रता आहे असे जाणवत नाही. तू तर एकदम एवढा ताजातवाना व नवनवीन दिसतोस की जणू तुझ्याठायी आता पूर्वीच्या स्मृती काहीच राहिलेल्या नाहीत असेच जाणवते. काही वेळा तर तू माझ्याकडेही अशा नजरेने बघतोस की जणू काही तू मला प्रथमच पाहत आहेस. तुझ्या दृष्टीतील माझ्याविषयीच्या नवखेपणाची मला जरी गंमत वाटली, तरी काळजीही वाटते, की आता तू चरित्रातील पुढील कथाप्रसंग सांगू शकशील की नाही? कारण आत्तापर्यंत तू जो कथाभाग वर्णन करून सांगितलास त्याचे पूर्वसूत्र तुझ्याठायी अजूनही जागृत आहे असे मला बाह्यदर्शनी तरी वाटत नाही. अशावेळी तुला तू सांगत असलेल्या कथाप्रसंगाच्या सूत्राचे स्मरण करून द्यावे की नाही हेच मला समजत नाही. तेव्हा तूच आता मला सांग की मी काय बरे करावे?"

लक्ष्मीच्या बोलण्यावरती नारद कितीतरी वेळ अत्यंत मनमोकळेपणाने हसत होता. नारदाचे हसणे बघून लक्ष्मी साहजिकच थोडीशी गोंधळली. प्रश्न

विचारण्यात आपली काहीतरी चूक झाली की काय असेच तिला वाटले. लक्ष्मीची ती अवस्था पाहून नारदाने त्याचे हसणे आवरले आणि तो लक्ष्मीला म्हणाला,

"अगं लक्ष्मी, तू तर अगदी कमालच केलीस. एवढ्या सूक्ष्म दृष्टीने तू माझ्याकडे पाहत असशील आणि माझ्या अंतर्बाह्य अवस्थेचा एवढा सूक्ष्म अभ्यास करीत असशील अशी मला तर कल्पनाच नव्हती. परंतु श्रवणभक्तीमुळे तुझे मन अत्यंत तरल व बुद्धीही अत्यंत सूक्ष्म झाली असल्याचेच हे एक चांगले व योग्य लक्षण आहे. म्हणूनच मला तुझ्या विचारण्याचे अत्यंत कौतुकच वाटत आहे. परंतु तुला मी एक खरी गोष्ट सांगतो की माझ्या या अवस्थेचा तुलाच काय, पण माझा मलाही काही अभ्यास करता येणे मुळीच शक्य नाही. कारण अंतःकरणाची ही अवस्था तर तरल मनाच्या तरलतेहुनही तरल व सूक्ष्म बुद्धीच्या सुक्ष्मतेहुनही सूक्ष्म अशीच असते. त्यामुळे ती आंतरिक अवस्था साकार झाली आहे असे जाणवेपर्यंतच्या काळाच्या आधीच सहजपणे लयालाही जाते आणि लयाला गेली आहे असे लक्षात येईपर्यंत पुन्हा तेवढ्याच सहजतेने साकारही होते. अंतर्बाह्य अवस्थेचे असे साकार होणे व परत निराकार होणे हे प्रत्येक श्वास व उच्छवासाबरोबर सातत्याने व एवढ्या सहजतेने घडत असते की ते लक्षात येण्याएवढाही काळाचा क्षण सापडतच नाही, मग तो क्षण पकडता तरी येणे कसे शक्य आहे? समाधीच्या अवस्थेत मात्र प्रगट व अप्रगट यातील ते सूक्ष्म अंतर जाणवून त्याठायी सर्व वृत्ती स्थिर करता येतात. पण त्या अवस्थेमध्ये देह, मन व बुद्धी या सर्वांचेच वेगळे अस्तित्वच लय पावलेले असते. त्यामुळे त्या अवस्थेचा आनंद अनुभवणे शक्य होत नाही. कारण आनंद अनुभवण्यासाठी लागणारे द्वैतही त्या अवस्थेमध्ये पूर्णपणे विलय पावलेले असते.

लक्ष्मी, पण सगुण भक्तीमध्ये मात्र एकरूप अवस्थेतील द्वैत निर्माण होते आणि म्हणूनच आनंद अनुभवणे शक्य होते. परंतु हे द्वैत जलावर पुन्हा पुन्हा निर्माण होऊन पुन्हा पुन्हा लयाला जाणाऱ्या लहरींप्रमाणे असते. जलाची प्रत्येक नवीन लहर ही जलस्वरूपच असते परंतु तरीही प्रत्येक लहर ही नवीनच दिसते. तीच लहर पुन्हा आली असे सिद्ध करून दाखवता येणार नाही आणि तीच लहर आली नाही हेही सिद्ध करून दाखवता येणार नाहीच. तेव्हा लहरींवरती लहरी हा जलावरील बाह्यांगाचा नयनरम्य खेळ आहे आणि तरीही त्या प्रत्येक लहरींठायीचे जलत्व हे एकीएकच आहे. सगुण भक्तीमध्येही हाच मनोहारी खेळ घडत असतो. प्रेमस्वरूप अंतःकरणाठायी सगुण प्रेमाच्या चैतन्यामुळे प्रेमाच्या लहरींवरती लहरी



निर्माण होत असतातच. त्यातील काही लहरी कृतीरूपाने प्रगट होतात व तेवढ्याच लक्षात येतात. परंतु प्रगट वा अप्रगट लहरींठायीचे प्रेमत्व एकीएकच असते.

लक्ष्मी, या नारायणाचे सगुणभक्तिगायन घडत असतानाही अंतःकरणाची नेमकी हीच अवस्था असते. मुळात अंतःकरणातील प्रेमच एवढे दाटून येत असते की त्याठायी प्रेमाच्या अगणित अशा लहरीवरती लहरी सतत उठतच असतात आणि त्यातूनच एक अनाहूत अंतर्नाद सतत घुमत असतो. त्यातील काही लहरींना प्रेमाचा सूर मिळतो आणि त्या प्रेमाच्या एकाच नादाचे अनेक स्वरांमधून निनाद घुमू लागतात. त्या स्वरांमधून प्रेमाचे विविध सुप्त भाव जागे होऊन साकार होऊ लागतात आणि त्या भावांना शब्दही सापडतात. मग शब्दांचा अखंड प्रवाह बाह्यांगाने सुरू होतो. काही कारणामुळे किंवा अगदी अकारणही हा शब्दप्रवाह बाह्यांगाने जरी थोडावेळ थांबला तरी अंतरातील तो प्रेमनाद नित्य घुमतच असतो आणि त्यामुळेच तो प्रेमसूरही नेहमी लागलेलाच राहतो. त्यानंतर जर पुन्हा त्या शब्द प्रवाहाला संधी व कारण मिळून तो प्रगट होऊ लागला तर आधीचा प्रेमभावच साकार होणार हे निश्चित. तसे सिद्ध करणे केव्हाही शक्यच नसले तरी ते आवश्यकही नसते. कारण ते भाव अंतरात सुप्तरूपाने असतातच. त्यामुळे त्याची सांगड जरी बाह्यांगाने दिसली नाही किंवा सिद्ध करून दाखवता आली नाही तरी ती सांगड असतेच, हे त्याचा अनुभव घेणारे मात्र निश्चितच जाणून असतात. सर्वात मुख्य व महत्त्वाची गोष्ट म्हणजे सगुणभक्तिगायनामध्ये अशी बाह्यांगाची सांगड वा सुसूत्रता आवश्यक असतेच असे नाही. कारण प्रेमभावाचे नित्य, नवीन व आनंददायी प्रगटणे हेच तर भक्तिभावाचे मुख्य व मूलभूत लक्षण आहे. तेव्हा प्रेमस्वरूप हे एकीएकच असते आणि त्याचे आविष्कार मात्र अनेकविध सुंदर रूपाने प्रगट होतात. ती सुंदरता हीच अत्यंत मनोवेधक व चित्ताकर्षक असते आणि आनंदाचे बाह्य कारण ठरते."

नारदाचे बोलणे ऐकून लक्ष्मी तर एकदम चकित व स्तब्धच झाली. काही बोलावे असे तिला वाटेचना आणि जेव्हा बोलावेसारखे थोडेसे वाटू लागले तेव्हा तिला काय बोलावे ते सुचेचना. परंतु काहीतरी बोलल्याशिवायही राहवेना. मनाच्या तशा थोड्याशा गोंधळलेल्या स्थितीतच शेवटी तिने बोलण्याचा प्रयत्न करण्यास सुरूवात केली.


"अरे नारदा, खरे तर तुझ्या बोलण्याने माझ्या मनाचा गोंधळ थोडासा वाढतोच आहे. पण त्याची जबाबदारी तुझी नसून ती माझीच आहे. कारण तुझ्या परीने तू तुझी आंतरिक अप्रगट अवस्था व बाह्य प्रगटणारे आविष्कार यांची सांगड

शब्दाने सांगण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेस. पण शब्दांच्याही पलिकडे असलेली ती अवस्था माझ्या बुद्धीला शब्दरूपाने पूर्णपणे कळत नाही आणि तशी ती कळणारही नाही हे खरेच आहे. शब्दातीत अनुभव व्यक्त करण्यासाठी शब्दांची माव ही तर नेहमीच कमीच पडणार हे सत्य आता मलाही अनुभवाने थोडे थोडे कळू लागले आहे. पण जेव्हा तुझ्या स्वानुभवातून असे उत्स्फूर्तपणे प्रगटले, की अशी अंतर्बाह्य सांगड आहे की नाही हे तुलाही सिद्ध करता येणे शक्य नाही, तेव्हा मी तो विषय माझ्या बुद्धीने जाणून घेण्याचा प्रयत्नच सोडून दिला. त्यातूनही जेव्हा तू म्हणालास की अशी अंतर्बाह्य सांगड किंवा सुसूत्रता असण्याची आवश्यकताच नाही, तेव्हा तर माझ्या मनातील सर्व प्रश्नांचे अस्तित्वच पूर्णपणे बाजूला झाले. अर्थात् त्या प्रश्नांचे मूळ माझ्या मनात राहिले असण्याची शक्यता नाकारता येत नाही हे खरे आहे. परंतु त्याचा जास्त विचार करीत न बसता माझे मन मी श्रवणासाठी पुन्हा सज्ज करीत आहे. कारण माझ्या ठिकाणी अशी पूर्ण श्रद्धा आहे की सगुणचरित्राच्या श्रवणानेच माझ्या मनीचे सर्व प्रश्न व शंका समूळ नष्ट होतील.

नारदा, त्याहीपेक्षा तू एक सर्वात महत्त्वाची गोष्ट सांगितलीस, की भक्तिगायनात सुसूत्रतेपेक्षाही त्यातील सुंदरता हीच अत्यंत महत्त्वाची आहे. कारण हे सौंदर्यच अंतर्बाह्य मिळून आहे आणि म्हणून एकीएकच आहे. हे तुझे सांगणे मात्र मला अत्यंत भावले व पटलेही. अंतःकरणातील मूळ ईश्वरी अनुभवाचे सत्य हेच परमसुंदर आहे आणि म्हणून त्या सत्य अनुभवाचे उत्स्फूर्तपणे प्रगटणारे अनेकविध आविष्कारही त्या मूळ सौंदर्याला सहजपणे घेऊन व लेवूनच प्रगट होतात. असे सौंदर्याने सजलेले आविष्कार पाहताना व ऐकताना आपले मनही सुंदर होऊन राहते असा अनुभव मी श्रवण करीत असताना नित्यच घेत असते. हे सौंदर्यच सत्य आहे कारण मुळात सत्य हेच अतीव सुंदर आहे. होय ना?”

लक्ष्मीच्या बोलण्यावरती नारदाने अत्यंत उत्स्फूर्तपणे ‘अगदी बरोबर’ असे म्हणून दाद दिली आणि त्याचा चेहराही अत्यंत खुलला आणि समाधानाने भरून राहिला. अत्यंत उत्साहाने नारद लक्ष्मीशी बोलू लागला.

“अगं लक्ष्मी, तू तर गायनातील समेप्रमाणे नेमका मुद्दा पकडलास. खरेच शाब्बास आहे तुझी! ज्याप्रमाणे गायनात ‘सम’ ही मुख्य व महत्त्वाची असते त्याचप्रमाणे भक्तिनिरूपणातील मूळ मुद्दा हा महत्त्वाचा असतो. जसे त्या एका समेच्या भोवती, समेकडे लक्ष ठेवून व ती सम गाठण्यासाठी सर्व गायन घडत असते



आणि जेव्हा ते गायन समेवर येते तेव्हाच त्या गायनातील सौंदर्य उठून दिसते. त्यावेळी गायक व रसिक आणि एकरूप श्रोते हे दोघेही त्या गायनाचा एकच आनंद अनुभवतात. अगदी त्याचप्रमाणे भक्तिगायनही ईश्वरी माहात्म्याच्या गाभ्याकडे लक्ष ठेवून विस्तार पावत असते आणि रंगून रंगून प्रगट होत असते, ते तो मूळ मुद्दा अधिकाधिक खुलवण्यासाठी. त्यामुळे जेव्हा त्या गायनाशी पूर्णपणे एकरूप झालेला वक्ता व श्रोता या उभयतांकडून तो मूळ मुद्दाच प्रकर्षाने जाणला जातो आणि प्रगटही होतो, तेव्हा त्यांनाही एकाच आनंदाचा अनुभव येतो हे अगदी खरे आहे. हे मूलभूत सत्य तूच आता तुझ्या बोलण्याने सिद्ध केले आहेस आणि त्याचाच मला अती अतिशय आनंद होत आहे. त्याचाच परिणाम म्हणून मी आता पुन्हा भक्तिगायन करण्यासाठी अंतर्बाह्य अशा दोन्ही अंगांनी तयार झालो आहे. सांग, तुला आता माझ्याकडून काय श्रवण करण्याची इच्छा आहे? कृष्णचरित्रातील कोणता भाग श्रवण करण्यासाठी तू आतूर झालेली आहेस हे मला अगदी त्वरित सांग बघू. आता मुळीच वेळ दवडू नकोस."

नारदाच्या बोलण्याने लक्ष्मीही उत्तेजित झाली आणि तीही उत्साहाने बोलू लागली,


"अरे नारदा, भक्तिगायनासाठी तू तयार नसतोस कधी? जसे एखादे आम्रफळ रसाने परिपक्व होऊन तयार होते तसा तू तर या नारायणाच्या सगुणप्रेमरसाने परिपूर्ण भरून अंतरात नेहमीच एवढा तयार असतोस, की बाह्यांगाच्या केवळ स्पर्शानेही तुझ्या अंतःकरणातील तो प्रेमरस भरभरून वाहू लागतो आणि माझ्यासाठी ती एक रसपूर्ण मेजवानीच ठरते. या प्रेमरसापुढे सुधारसाची गोडीही अगदी फिकीच पडते हे मात्र सत्य आहे. तेव्हा आता तू म्हणतोस त्याप्रमाणे या गोडीचेही वर्णन करीत वेळ वाया घालवण्यापेक्षा आलेली पर्वणी साधून सगुणकथांचे प्रत्यक्ष भोजन करणे आणि अनेक प्रकार करून त्या प्रेमरसाची गोडी पूर्णपणे सेवन करावयास सुरुवात करणेच अधिक श्रेयस्कर व प्रियकर होईल. होय की नाही?

हे सगुणकथाप्रिय नारदा, मागच्या वेळेस तू कृष्णचरित्रातील दोन महत्त्वाचे प्रसंग सांगितले होतेस. त्यापैकी एक प्रसंग होता अर्जुन व सुभद्रा यांच्या विवाहाचा आणि दुसरा प्रसंग होता कृष्ण व अर्जुन यांच्यातील युद्धाचा. या दोन अत्यंत विरूद्ध असलेल्या प्रसंगात एक सामाईक गोष्ट होती आणि ती म्हणजे कृष्ण व

अर्जुन यांच्यातील मैत्री व मित्रप्रेम. पहिला प्रसंग मित्रप्रेमातून घडला तर दुसऱ्या प्रसंगात याच मित्रप्रेमाची अत्यंत कठीण अशी कसोटी लागली. सुदैवाने कृष्ण व अर्जुन यांच्या मित्रप्रेमाचा विजय झाला. अर्थातच त्याचे सर्व श्रेय एकीएक कृष्णाकडेच होते हेही खरेच आहे. या प्रसंगाचे सुंदर व सुयोग्य विवेचन करीत असताना तू एक महत्त्वाचा मुद्दा मांडला होतास की अर्जुनाच्याठायी कृष्णाचे व्यक्तिगत प्रेम असूनही, कृष्णाचे ईश्वरी माहात्म्य जाणत नसल्यामुळे तो कृष्णाचे अंतःकरण जाणू शकला नाही. एवढेच नव्हे, तर तो कृष्णाचे व्यक्तिगत प्रेमही विसरला आणि त्याचीच परिणती म्हणजे अर्जुनाच्या कृष्णावरील व्यक्तिगत प्रेमात खंड तर पडलाच परंतु तो कृष्णाच्या विरूद्धही उभा राहू शकला. अर्थात पुढे गालव ऋषींच्या वेळीच झालेल्या आगमनामुळे आणि त्यांच्या सहृदयतेमुळे त्या प्रसंगातून सर्वांचीच सुरळीतपणे सुटका झाली आणि सुदैवाने अर्जुनाठायीचे कृष्णाविषयीचे मित्रप्रेम पुन्हा जागृत झाले.

नारदा, या विषयावर निरूपण करीत असताना तू आणखीन एक महत्त्वाचा मुद्दा मांडलास की ज्यामुळे माझ्या मनातील विचारांना पुन्हा चालना मिळाली. तू असे म्हणालास की अर्जुनाठायीचे व्यक्तिगत कृष्णप्रेम म्हणजे त्याचे जे प्रेम कृष्णावर होते ते नव्हे, तर कृष्णाचे जे प्रेम अर्जुनावर होते ते होय. त्यामुळेच अर्जुन त्याच्यावरील कृष्णाचे प्रेमही विसरला आणि अर्जुनाचे कृष्णावरील प्रेम त्या प्रसंगात फारच कमी पडले म्हणजे कुचकामीच ठरले. अर्थात हे तुझे सर्व सांगणे तर्कसंगत असल्यामुळे मला पटत होते खरे, पण तरीही माझ्या मनाला ते पूर्णपणे मानवतही नव्हते. त्यामुळे माझ्या मनाला एक प्रकारची हुरहुर लागून राहिली होती. अर्जुनाची मनःस्थिती नव्हती हे खरे आहे पण त्याला परिस्थितीची अनुकूलता थोडी तरी होती की नाही, की ज्याची त्याला नितांत आवश्यकता होती?

नारदा, माझ्या मनीची ही व्यथा तुझ्यापर्यंत निश्चितच पोहोचली असावी. कारण तुझ्या मुखातून सहजोद्गार निघाले होते की ‘कृष्णमाहात्म्य जाणून त्याच्यावर प्रेम करणारी अशी व्यक्ती अर्जुनाला नुसती भेटलीच नव्हती तर त्या व्यक्तीने पत्नी म्हणून अर्जुनाच्या जीवनातील त्याची कायमची जोडीदार म्हणूनच त्याच्या जीवनात आधीच प्रवेश केलेला होता. परंतु तिची जोड घेण्यासाठी अर्जुनालाच वेळ लागला. त्यासाठी तोच कमी पडत होता.’ या विशेष गोष्टीचे मला अत्यंत अप्रूप वाटले आणि त्या कथाभागाचे श्रवण करण्याची माझी उत्कंठा अगदी



पराकोटीला गेली. तेवढ्यातच नारदा, या नारायणाची एक लीलाच घडली आणि तू अकल्पितपणे व अचानक अंतर्मुख अवस्थेतच गेलास. त्यानंतर माझेही थोडावेळ देहभानच गेल्यासारखे झाले असावे. कारण मलाही आता त्यावेळचे निश्चित असे काही आठवतच नाही. परंतु त्याची कारण मीमांसा करीत बसण्यापेक्षा किंवा त्याची तर्कसंगती लावत बसण्यापेक्षा, या नारायणाच्या कृपेने तू पुन्हा नारायणाच्या सगुण कथांचे गायन करण्यासाठी अगदी तयार होऊन राहिलेला आहेस आणि मीही त्याच्या श्रवणासाठी आतुर होऊन सादर झालेली आहे, ही गोष्टच माझ्यासाठी आता अत्यंत महत्त्वाची व भाग्याचीच आहे. तेव्हा कथेचे सूत्र मी आता तुझ्या हातात देते, त्या सूत्राद्वारे तुझ्या अंतःकरणातील सगुणभक्तीचे सौंदर्य तू आता लवकरात लवकर प्रगट करावेस हेच योग्य होईल.


□ □ □ □ □

# कृष्ण-द्रौपदी सख्य

लक्ष्मीच्या बोलण्याने नारद अत्यंत संतुष्ट झाला आणि क्षणभरच त्याने त्याचे नेत्र मिटून घेतले. तेवढा एकच क्षण नारदाला पुरेसा होता. कारण त्याचे अंतःकरण सगुण प्रेमरसाने पूर्णपणे भरून अगदी वाहण्याच्याच अवस्थेपर्यंत आधीच आलेले होते. त्यामुळे लक्ष्मीच्या भक्तिभावाचा स्पर्श नारदाच्या अंतःकरणाला होण्यासाठी जराही वेळ लागला नाही. पुढच्याच क्षणी तो सगुण प्रेमरस नारदाच्या वाणीतून स्त्रवू लागलाच.

"लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. असा जोडीदार अर्जुनाला त्याच्या जीवनात मिळणे ही साधी गोष्ट नव्हतीच. ती जशी एक निश्चितच विशेष गोष्ट होती त्याचप्रमाणे ती व्यक्तीही अर्थातच तशीच विशेष असणार हेही नक्कीच आहे. ती व्यक्ती खरोखरीच तशी विशेष होती आणि ती होती पांचाल देशाचा राजा द्रुपद याची सुकन्या द्रौपदी! यज्ञयागादी मार्गाने अग्निदेवतेला प्रसन्न केल्यानंतर अग्निदेवतेच्या कृपाप्रसादाने या कन्येचा द्रुपदाला लाभ झाला होता. श्यामल वर्णाची असूनही अत्यंत तेजस्वी कांती असलेल्या या कन्येचे खरे तर 'कृष्णा' असे नामकरण करण्यात आलेले होते. परंतु द्रुपदाची कन्या म्हणून 'द्रौपदी' याच नावाने ती पुढे ओळखली जाऊ लागली. परंतु तिची मूळ ओळख ज्या 'कृष्णा' या नावाने होती ती मात्र तिचा पुढे प्रत्यक्ष कृष्णाशी अत्यंत जिव्हाळयाचा व जवळीकतेचा संबंध आल्यावरतीच सार्थ ठरली.

द्रुपद राजा हा अत्यंत सात्विक वृत्तीचा व धर्माचरणी असल्यामुळे कृष्णाचा त्याच्याशी संपर्क अत्यंत सहजपणे आला. त्यातूनच त्यांचे प्रेमाचे संबंध एवढे वाढले व जवळीकतेचे झाले की कृष्ण हा द्रुपदाच्या कुटुंबातील व जीवनातील एक अविभाज्य घटक होऊन राहिला. द्रुपदाचा तर कृष्णावर एवढा लोभ जडला की कृष्णावाचून त्याचे पानही हलत नसे. प्रसंग सुखाचे असोत वा दुःखाचे असोत, अडचणी राज्यकारभारातील असोत किंवा कौटुंबिक असोत, कृष्णाशी विचारविनिमय केल्याशिवाय द्रुपदाकडून कोणताच निर्णय घेतला जात नसे. एवढेच नव्हे, तर त्याच्यासाठी कृष्णाचे सांगणे वा त्याचा निर्णय हाच अंतिम असे. द्रुपदाच्या धार्मिक वृत्तीमुळे त्याच्याकडे अनेक ऋषीमुनींचे कारणाकारणाने आगमन होत असे. त्याप्रसंगी अर्थातच कृष्णही स्वतः जातीने हजर राहून त्या धार्मिक



कृत्यात पूर्ण सहभागी होऊन सर्व सहकार्यही करीत असे. त्यावेळेस ते जाणकार ऋषीमुनी कृष्णाची महती जाणून असल्यामुळे कृष्णाचा आदर करून त्याचा विशेष मानही ठेवीत असत. ऋषीमुनींच्या अशा वागण्यामुळे व त्यांच्या मुखातून प्रत्यक्ष ऐकल्यामुळे द्रुपदालाही कृष्णाची थोरवी कळली होती आणि कृष्णाचे विशेषत्वही त्याच्या लक्षात आलेले होते.

हे लक्ष्मी, द्रुपदाची एकुलती एक कन्या म्हणून द्रौपदी अर्थातच त्याची अत्यंत लाडकी होती. द्रुपदाला जसे द्रौपदीवाचून चैन पडत नसे तसेच द्रौपदीलाही सतत तिच्या पित्याबरोबर रहायला आवडत असे. लहानपणापासूनच द्रौपदीठायीचे अनेक गुण प्रगट होऊन चमकू लागले होते. तिच्या अभिजात सौंदर्याला तेजस्वी बुद्धीमत्तेचीही जोड होती. अशी जोड ही खरे तर अत्यंत दुर्मिळ समजली जाते. परंतु द्रौपदीच्याठायी सुंदरता व बुद्धीमत्ता यांचा अत्यंत अनोखा संगम झालेला होता. एवढेच नव्हे, तर द्रौपदीच्या मूळ व्यक्तिमत्त्वातील बाणेदारपणा व स्वतंत्र वृत्ती हे गुणही हळूहळू वाढून प्रकर्षाने प्रगट होऊ लागले होते. तशी द्रौपदी मूलतःच अत्यंत स्वाभिमानीच होती. परंतु अहंकाराचा वारा मात्र तिला स्पर्श करू शकला नाही. बाह्यांगाने तिचे वागणे बोलणे निश्चयात्मक असले तरी अत्यंत नम्रपणाचे होते. सर्वांच्यात कधीही द्रौपदी जास्त मिळून मिसळून वागताना दिसत नसे. तिचे हे वेगळेपणही कधीच झाकोळले जाऊ शकत नसे, तर ते वेगळेपण नेहमीच विशेषत्वाने प्रगट झाल्याशिवाय राहतच नसे.


हे लक्ष्मी, सर्वसाधारणपणे गौर वर्णाची व्यक्ती ही नजरेत पटकन भरते आणि दृष्टीलाही ती लगेचच सुंदर जाणवूही लागते. परंतु श्यामल वर्णाची व्यक्ती ही तेव्हाच लक्ष वेधून घेते, जेव्हा तिच्याठायी काही विशेष आकर्षकता असते. द्रौपदीचा सुडौल व कमनीय बांधा आणि तिला लाभलेले सुरेख शरीर सौष्ठव ही काही द्रौपदीला मिळालेली केवळ निसर्गाचीच देणगी नव्हती तर ते दैवी वरदानच होते. स्वतःच्या या वेगळेपणाची जाणीव द्रौपदीच्याठायी निश्चितच होती. परंतु तिच्याठायी कोणत्याही प्रकारचा ताठा नव्हता, पण तेजस्विता होती. सर्वजण तिच्या व्यक्तिमत्त्वामुळे तिच्याकडे आकर्षित होत असत. द्रौपदीच्याही ते अगदी सहजपणे लक्षात येत असे. पण ती मात्र कोणालाही दाद वा प्रतिसाद देत नसे. द्रौपदीचा तिच्या मनोबळावर पूर्ण विश्वास होता आणि त्यामुळे कोणाच्याही मानसिक आधाराची जरूरी तिला कधी वाटतच नसे. द्रौपदीचा हा आत्मविश्वासच काहीजणांना तिचा शिष्टपणा वाटत असे आणि त्यामुळे सर्वजण द्रौपदीला थोडेसे वचकूनच असत. तिची थट्टा वा मस्करी करण्याचे धाडस कोणी करीत नसे आणि

तसे साहस जर यदाकदाचित कोणी दाखवलेच तर द्रौपदीही त्याला जशास तसे उत्तर देऊन त्याची तेथल्या तेथे लगेचच बोळवण करीत असे. द्रौपदीच्या या स्वभावाचे, द्रुपदाला एकीकडे जेवढे कौतुक वाटत असे तेवढीच दुसरीकडे त्याला तिची काळजीही वाटत असे.

हे लक्ष्मी, द्रुपदाठायीची ही द्रौपदीविषयीची काळजी अत्यंत साहजिकच होती. कारण एक पिता या नात्याने तो द्रौपदीच्या भावी जीवनाचा नित्य विचार करीत असे. द्रौपदीसाठी योग्य पतीची निवड करून तिचे जीवन नीट मार्गाला लावण्याची जबाबदारी द्रुपदावरतीच होती. परंतु द्रुपदाची ही काळजीही कृष्णामुळेच दूर झाली. कृष्णाचे व द्रौपदीचे जेव्हा सूत जमले आणि त्याच्यातील मैत्री जेव्हा वाढू लागली तेव्हा द्रुपदाच्या मनावरील ताण बराचसा कमी झाला आणि त्याचे मन निःशंक झाले. द्रुपदाच्या मनात द्रौपदीच्या भवितव्याविषयीची चिंता अजिबात शिल्लक राहिली नाही. कृष्ण हा द्रौपदीला योग्य मार्गदर्शन करून योग्य वेळी तिच्याविषयी योग्य तो निर्णय घेईल याची पक्की खात्री द्रुपदाला होती.

हे लक्ष्मी, कृष्णाचे मोहक व आकर्षक व्यक्तिमत्त्व तर द्रौपदीच्या मनाला लगेचच भावले. अनेक विषयांवर बोलताना प्रगटणारी कृष्णाची बुद्धिमत्ता व त्याचे वाक्चातुर्य याने तर द्रौपदी लागलीच व चांगलीच प्रभावित झाली. त्याहीपेक्षा कृष्णाचे निर्मळ व कोमल असे प्रेमळ अंतःकरण जसे जसे द्रौपदीला जाणवू लागले, तसे तसे द्रौपदीला कृष्णाचे माहात्म्य अधिकाधिक जाणवू लागले. द्रौपदीची पक्की खात्री झाली की कृष्णाचे 'ईश्वरी माहात्म्य' म्हणून जे म्हटले जाते ते म्हणजे कृष्णाच्या अंतःकरणाची वारंवार प्रगट होणारी ही अवस्था हेच असले पाहिजे. साहजिकच द्रौपदी कृष्णाकडे अधिकाधिक आकर्षित होऊ लागली. कृष्णावरील अलोट प्रेम व कृष्णावरील अलोट श्रद्धा यांचा सुयोग्य संगम द्रौपदीच्या ठायी निर्माण झाला आणि कृष्णासारखा साथीदार तिच्या जीवनात कायमचा असावा, असे द्रौपदीला प्रकर्षाने वाटू लागले.

हे लक्ष्मी, द्रौपदीचे वेगळेपण कृष्णाच्याही लक्षात येण्यास अजिबात वेळ लागला नाही आणि तोही द्रौपदीकडे लागलीच आकर्षित झाला. कृष्णालाही द्रौपदीचा सहवास अतिशय प्रिय होऊ लागला. द्रौपदीशी अनेक गोष्टींवरती बोलण्याचा कृष्णाला एक प्रकारचा वेगळाच आनंद लाभत असे. 'कोणताही विषय चौकस बुद्धीने नीट समजून घेणे आणि त्यावरती स्वतःची मतेही मोकळेपणाने




मांडणे' हे द्रौपदीचे स्वभाववैशिष्ट्य कृष्णाला अगदी मनापासून आवडत असे. त्यामुळे द्रौपदीशी अनेक विषयांवरती वेगवेगळ्या अंगाने बोलताना कृष्णही अगदी रंगून जाई आणि त्याच्याकडून त्याच्या अंतरातील स्वानुभवाची अनेक गुजं प्रगट होत असत. कृष्ण त्याच्या जीवनात घडून गेलेले अनेक प्रसंग, त्या प्रसंगातील त्याची भूमिका आणि त्यावेळी त्याला प्रत्यक्ष आलेला अनुभव, अगदी मोकळेपणाने द्रौपदीला सांगत असे. त्यातून जीवनाकडे पाहण्याची एक वेगळीच व योग्य दृष्टी द्रौपदीला मिळू लागली. जीवनातील कर्तव्यकर्मे काय व किती करावीत आणि जीवनाचे खरे ध्येय काय याविषयीचा उलगडा कृष्णाच्या बोलण्यातून द्रौपदीला होऊ लागला. ईश्वराची सेवा व ईश्वराची भक्ती यामुळेच जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो आणि जीवन कृतकृत्य होते हे जीवनातील खरे रहस्यही कृष्णामुळेच द्रौपदीला कळले. कृष्णाच्या भेटीत कृष्णाशी घडलेल्या अशा अनेक प्रकारच्या संवादाने खरे तर द्रौपदीला आधी कृष्णाकडे पाहण्याची दृष्टीच प्राप्त झाली. एक गोष्ट द्रौपदीच्या निश्चितपणे लक्षात आली की कृष्ण जे काही बोलतो वा सांगतो ते केवळ तात्विक ज्ञान नसते, तर ते सर्व कृष्णाच्या स्वानुभवातून आलेले असते. कृष्ण तसे जीवन प्रत्यक्षपणे जगला आहे आणि आताही जीवनात तसा अनुभव घेत आहे. त्यामुळेच कृष्णाच्या सांगण्यातील स्वानुभवाची सखोलता द्रौपदीच्याही अंतराचा ठाव घेत असे आणि त्यातूनच केवळ सामान्य जीवासारखे जीवन न जगता विशेषत्वाचे जीवन जगण्याचा द्रौपदीचा निश्चय होत राहिला.

हे लक्ष्मी, परंतु द्रौपदी केवळ मनातील भावनेच्या आहारी जाणारी नव्हती. ती एक गोष्ट निश्चितपणे जाणून होती, की वेगळेपणाने जीवन जगण्याचा विचार आणि तसा प्रत्यक्ष आचार यामध्ये महदंतर असते. तसे जीवन प्रत्यक्षपणे जगणे हे वाटते तेवढे सोपे नसते. कारण त्यामध्ये अनेक अडचणी संभवतात आणि त्यावेळेस मनाची दुर्बलता हीच आडकाठी ठरून त्यातून अनेक अडचणी उद्भवू शकतात. अशा वेळेस तिच्यासारख्या एकट्या दुकट्या जीवाचा निभाव लागणे शक्यच नाही. त्यासाठी कृष्णासारख्याचीच साथ व संगत आवश्यक आहे आणि कृष्णासारखा दुसरा कोणी असणे तर शक्यच नाही. कृष्णासारखा एकमेव म्हणजे कृष्णच हे अगदी सत्य आहे आणि त्याचीच जाणीव द्रौपदीच्या ठायी अगदी पक्केपणाने होती. परंतु तिच्या मनातील हे विचार बोलून दाखविण्यासाठी द्रौपदी योग्य वेळ येण्याची वाट पाहत राहिली.

हे लक्ष्मी, कृष्ण हा द्रौपदीसाठी केवळ तिचा मार्गदर्शकच नव्हता तर तो तिचा अत्यंत प्रेमाचा असा खास सखा होऊन राहिला होता आणि द्रौपदीही

कृष्णाची प्रिय सखी होऊन राहिली होती. त्यांच्यामध्ये एक अत्यंत जवळचे व अतूट असे भावनिक नाते जुळून आले आणि अत्यंत शुद्ध अशा प्रेमाचे संबंध त्यांच्यात निर्माण झाले होते. परस्परांच्या हृदयांमध्ये परस्परांना महत्त्वाचे स्थान आहे याची जाणीव त्या उभयतांना होती. द्रौपदीच्या हृदयामध्ये तर कृष्णाला केवळ मुख्यच नव्हे तर एकमेव स्थान होते. तसे एकमेव स्थान द्रौपदीला कृष्णाच्या हृदयात असणे शक्य नाही हे द्रौपदी जाणून होती. कारण एक गोष्ट तिच्या पूर्णपणे लक्षात आली होती की कृष्णाच्या हृदयात मुख्य स्थान कृष्णाच्या हृदयालाच होते, ज्याचा उल्लेख कृष्ण मात्र वारंवार 'माझा हृदयस्थ ईश्वर व त्या ईश्वराची प्रेरणाशक्ती' असा करीत असे. कृष्णाचे हे ईश्वरी हृदय म्हणजे 'सर्व जीवांविषयीचाच आत्यंतिक आपलेपणा अत्यंत सहजतेने व नित्यपणे जेथे स्फुरत असतो असे स्थान होय' हे द्रौपदी जाणून होती. पण त्याचबरोबर कृष्णाच्या त्या प्रेमळ हृदयात तिलाही स्थान आहे याची पूर्ण खात्रीही द्रौपदीच्याठायी निश्चितपणे होती. परंतु द्रौपदीच्या मनाचा एक निश्चय मात्र पूर्णपणे झाला होता की कोणत्याही परिस्थितीत कृष्ण हा बाह्यांगानेही तिच्या जीवनात प्रत्यक्षपणे तिच्याबरोबर नेहमीच असावयास हवा. मग त्यासाठी कोणताही त्याग करावयास लागला तरी त्यासाठी द्रौपदीच्या मनाची पूर्ण तयारी झालेली होती. कारण तिचे मन कृष्णाच्या प्रेमाने पूर्णपणे भरलेले होते.

हे लक्ष्मी, द्रौपदी ही अत्यंत विचारी असल्यामुळे ती तिच्या जीवनाचा व भावी आयुष्याचाही सतत विचार करीत असे. परंतु तिच्या स्वभावाचे वैशिष्ट्य हे होते की केवळ स्वतःच्याच विचारात गढून व अडकून न राहता द्रौपदी सर्व काही कृष्णाला विचारीत असे आणि कृष्णाशी विचारविनिमय झाल्यावरती त्याच्या मार्गदर्शनानुसारच ती निर्णय घेत असे. एकदा अशीच एकांतात कृष्णाशी भेट झाल्यावरती द्रौपदी कृष्णाचे हात आपल्या हातात घेऊन त्याच्याजवळ बसली होती. द्रौपदी कृष्णाकडे प्रेमाच्या नजरेने बराच वेळ एकटक पाहत राहिली असताना अचानक तिच्या नेत्रात अश्रू दाटून आले आणि ओघळून गालावरती येऊ लागले. द्रौपदीची ती भावपूर्ण अवस्था पाहून कृष्णही थोडासा चकितच झाला. त्याने आपल्या शेल्याने द्रौपदीचे अश्रू हळुवारपणे पुसले. परंतु द्रौपदीच्या नेत्रातील अश्रुधारा काही केल्या थांबायला तयारच होईनात. कृष्णाने प्रेमाने द्रौपदीला आपल्या अधिक जवळ घेतले असता तिला अधिकच गहिवर आला आणि ती स्फुंदून स्फुंदून रडू लागली. एका हाताने द्रौपदीचे मस्तक हळुवारपणे थोपटीत थोपटीत कृष्ण तिच्याशी सांत्वनपर बोलू लागला.



"अगं द्रौपदी, आधी शांत हो बघू. स्वतःच्या भावनावेगाला आवर घाल आणि तुझे दुःख माझ्याशी बोलून मोकळे कर. अशी कोणती गोष्ट तुझ्या मनात आहे की जी तुझ्या मनाला एवढी सलत आहे? कोणी तुझ्या भावना जाणता अजाणता दुखावल्या आहेत का की ज्यामुळे तुझ्या मनाला एवढा त्रास होत आहे? का नकळतपणे तुझ्याकडून कोणी दुखावले गेले आहे का की ज्याचा तुझ्या मनाला आता त्रास होत आहे? खरेच असे काही प्रत्यक्ष घडले आहे का की ज्यामुळे तुझे मन एवढे बेचैन झाले आहे? का तुझ्या भावी आयुष्यात काहीतरी घडेल याचीच काळजी तुझ्या मनाला सतावीत आहे? तुझ्या मनातील सर्व काही मला मोकळेपणाने सांग. तुझे दुःख तू माझ्यासारख्या तुझ्या मित्राला नाही सांगणार तर मग दुसऱ्या कोणाला सांगणार बरे? आणि माझ्याशिवाय तुला दुसरा कोणी आहेच कोण? होय ना? तेव्हा सर्व म्हणजे अगदी सर्व काही मला सांग बघू."


कृष्णाच्या प्रेमळ वचनांनी द्रौपदीचे मन हळूहळू शांत झाले आणि तिने तिच्या भावनावेगाला प्रयत्नपूर्वक आवर घातला. पण तरीही तिच्या मुखावरील गांभीर्य मात्र अजूनही तसेच कायम होते. त्याच गांभीर्याने द्रौपदी कृष्णाशी अत्यंत हळुवार स्वराने बोलू लागली.

"अरे कृष्णा, माझे भाग्य एवढे आहे की एक राजकन्या म्हणून माझा राजघराण्यातच जन्म झालेला आहे. त्यामुळे सर्व सुखोपभोग माझ्यासमोर नेहमीच हात जोडून उभे असतात. माझ्या सर्व सुखेच्छा पूर्ण करण्याची सर्व साधने माझ्यासाठी सदैव उपलब्ध आहेत. फक्त माझ्या ठिकाणी सुखाच्या इच्छाच निर्माण होत नाहीत एवढेच. बाह्य सुखाचे वा विषयोपभोगांचे आकर्षण माझ्या ठायी पहिल्यापासूनच कमी आहे. त्यामुळे मला सुख नसल्याचे दुःख कधीच होऊ शकत नाही. दुसरे म्हणजे, माझे मातापिता व बंधू या सर्वांकडूनच मला माया, ममता व प्रेम नेहमीच मिळत आलेले आहे. माझे सर्व लाड व कौतुक मी न मागताही नेहमीच पुरवले जातात. मला तर तक्रार करायला काही जागा व संधीच नाही, हीच खरे तर माझी एकमेव तक्रार शिल्लक आहे. पण या सर्वांपेक्षाही माझ्या परमभाग्याची गोष्ट म्हणजे कृष्णा, माझ्या जीवनातील असलेले तुझे अस्तित्व व तुझे स्थान. माझ्या खऱ्या प्रेमाचा, माझ्या हिताची सदैव काळजी वाहणारा आणि मला सक्रिय साहाय्य

करण्यासाठी सदैव तत्पर असलेला असा तुझ्यासारखा जीवलग सखा मला लाभला, ही तर माझी जन्मोजन्मीचीच पुण्याई आहे हे सत्यच आहे.

कृष्णा, मी पूर्णपणे जाणून आहे की तुझ्या ठायी असलेले गुण हे सामान्य नसून ते दैवीच आहेत. तुझ्या अंतःकरणाची अवस्था ही तर ईश्वरी भावाचेच लक्षण आहे याविषयी माझी पूर्ण खात्री आहे. त्यामुळेच तुझ्या सहवासात असताना, तुझ्याकडे पाहताना, तुझे बोलणे ऐकताना मला एक आगळावेगळाच अनुभव येत असतो. तुझ्या प्रेमाने माझे मन मोकळे होते आणि तुझ्या बोलण्याने माझा माझ्यावरील विश्वासही वाढत असतो. तुझ्या ठिकाणी माझ्याविषयी आत्यंतिक आपलेपणा व अकारण प्रेम आहे हे तर मी नित्य अनुभवतच असते आणि तुझ्याठायी माझ्याविषयीचे व्यवधान व काळजी असते हेही मी अनुभवाने जाणून आहे. माझ्या भावविश्वात केवळ तुला आणि तुलाच स्थान आहे. त्याठिकाणी दुसऱ्या कोणाला म्हणजे कोणालाही, अगदी माझ्या मातापित्यांनाही जागा नाही हे अगदी खरे आहे.

कृष्णा, तुझ्याशिवाय असलेल्या माझ्या जीवनाचा मी विचारही करू शकत नसताना माझ्या मनात एखादे वेळेस अचानक विचार येतो की माझ्या पुढील जीवनातही मला तुझी अशीच प्रत्यक्ष साथ लाभेल ना? माझ्या जीवनातील सर्व प्रसंगात तू माझ्याबरोबर असाच नेहमी राहशील ना? बाह्य परिस्थितीमुळे तुझ्यापासून दूर जाण्याची वेळ तर माझ्यावर येणार नाही ना? कारण माझ्या पुढील जीवनाविषयी माझ्या नशिबात काय लिहून ठेवले आहे याची मला काहीच कल्पना नाही. अशा विचारानेच माझे मन कावरे बावरे होते आणि मी अगदी रडकुंडीला येते. तू माझ्या जीवनात माझ्याबरोबर प्रत्यक्ष नसशील तर माझे काय व कसे होईल या निव्वळ कल्पनेनेच मी अत्यंत हवालदिल होते आणि माझ्या मनावर उदासीनतेचे सावट पसरते. अर्थात् माझ्या मनात, आतमध्ये कोठेतरी असा विश्वासही जागा असतो की कोणत्याही परिस्थितीत तू मला सोडून जाणार नाहीसच आणि माझ्याबरोबर नेहमी राहशीलच राहशील. याच विश्वासाने मी मला सावरते खरी, पण तरीही मी मनातून कमजोर आहे हेही मला जाणवत असते. कृष्णा, तुझाच भरवसा मी नित्य धरून असते, तेव्हा तूच माझ्या मनाची एकदा खात्री पटवून दे, म्हणजे मग माझे मन पुन्हा जोर धरील."



द्रौपदीच्या भावपूर्ण बोलण्याने कृष्णही भावपूर्ण व गंभीर झाला. कृष्णाकडे आशेने व अपेक्षने पाहत असलेल्या द्रौपदीकडे कृष्णही बराच वेळ पाहत राहिला. द्रौपदीच्या भावाचे व तिच्या विचारसरणीचे कृष्णाला निश्चितच अत्यंत कौतुक वाटले. परंतु म्हणूनच द्रौपदीची समजूत घालून तिची योग्य समज करून देणेही आवश्यक होते हे कृष्णही समजून होता. द्रौपदीशी कसे व कोणत्या शब्दात बोलावे याचा विचार कृष्णाच्या मनात क्षणभरातच झाला आणि त्यानेही जरा गंभीर स्वरातच बोलावयास सुरुवात केली.


“अगं द्रौपदी, तुझ्याठायी माझ्याविषयी असलेले प्रेम व श्रद्धा याचे मला अत्यंत कौतुकच वाटत आहे आणि माझ्या मनाला अतिशय तोषही होत आहे. कारण माझ्याठायीही तुझ्याविषयी अत्यंत प्रेम व विश्वास आहे. म्हणूनच सर्व नात्यांपरते असलेले आपले हे उभयतांचे प्रेमाचे संबंध अन्योन्य आहेत. ते संबंध तसेच जन्मभर असावेत असे आपल्याला वाटणे हेही अत्यंत साहजिकच आहे. पण त्यासाठी केवळ अशी इच्छा मनात असून किंवा नशिबाची साथ लाभेल अशी फक्त अपेक्षा ठेवून चालणार नाही हेही लक्षात ठेव. नशिबाची साथही पराक्रम करणाऱ्यांनाच मिळते आणि असा पराक्रम हाही अत्यंत प्रेमातून व विवेकानेच घडतो, हे तर पूर्वसिद्ध असेच सत्य आहे.

द्रौपदी, कोणत्याही परिस्थितीत मी तुझ्यापासून दूर जाणार नाही आणि सतत तुझी साथ करीन असा जो माझ्याविषयीचा विश्वास तुझ्याठिकाणी आहे, तो अत्यंत योग्यच आहे आणि तो विश्वास मी सार्थ करीनच याविषयी कोणत्याही शंकेला वावच नाही. परंतु खरा प्रश्न आहे तो तुझ्या जीवनात येऊ घातलेल्या परिस्थितीतील बदलाचा. ‘विवाह’ या जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यापाशी तू आता येऊन उभी राहिलेली आहेस. त्यानंतरच तर तुझ्या खऱ्या जीवनाला सुरुवात होणार आहे. एका पुरुषाला पती म्हणून स्वीकारून तू त्याच्या जीवनात प्रवेश करणार आहेस आणि सर्व परिस्थितीत तुला त्याला जन्मभर साथ द्यायची आहे. अशा वेळेस तुझ्या प्रत्यक्ष जीवनात माझा बाह्यांगाने सहभाग असण्यावरती निश्चितच मर्यादा येतील. तुझ्या भावी पतीचीही जर माझ्यावर तुझ्याएवढीच श्रद्धा व प्रेम असेल, तरच तुझ्या जीवनात नेहमी तुझ्याबरोबर राहणे मला शक्य होईल. त्या व्यक्तीचे जर माझ्यावर प्रेम असेल तरच मला तुझ्या जीवनात येण्याचा मोकळेपणा घेता येईल आणि त्याची जर माझ्यावर श्रद्धा असेल, तरच मी तुला मार्गदर्शन करू शकेन. कराण तुझे विवाहोत्तर जीवन हे तुझे एकटीचे

असणार नाही, तर ते तुमचे दोघांचे मिळून सहजीवन असणार आहे. त्या जीवनात मी स्वतःहून अकारण प्रवेश करणे ही माझी तुमच्या खाजगी जीवनातील वृथा लुडबुडच ठरेल. त्यातून मग अधिकच भावनात्मक गुंता निर्माण होईल आणि मग त्याचा मानसिक त्रास सर्वांनाच होईल. तेव्हा आपले संबंध हे पुढील परिस्थितीवरच पूर्णतः अवलंबून राहणार आहेत हे तर नक्कीच आहे.”

कृष्णाचे बोलणे अत्यंत लक्षपूर्वक ऐकत असतानाच द्रौपदी अत्यंत गंभीर होत होती. खाली मान घालून अत्यंत विचारमग्न चेहऱ्याने द्रौपदी बराच वेळ काहीच न बोलता अगदी स्वस्थ बसून राहिली होती. परंतु थोड्या वेळाने द्रौपदीच्या मुखावरील भाव हळूहळू बदलताना दिसू लागले आणि तेथे एक प्रकारची निश्चयात्मकता आल्याचे जाणवू लागले. द्रौपदीने तिची मान वर केली आणि ती कृष्णाकडे एकटक नजरेने रोखून पाहू लागली. कृष्णावरील प्रेमाने द्रौपदीचे नेत्र भरून आले आणि तिच्या मुखातून निश्चयात्मक शब्द सहजपणे प्रगट झाले.

“अरे कृष्णा, असे मी कधीच होऊ देणार नाही. कोणत्याही परिस्थितीत माझ्या जीवनातील तुझे स्थान कायमच राहील. विवाहानंतर माझ्या जीवनात बाह्यांगाने बदल होणार आहेत हे तुझे म्हणणे बरोबरच आहे. मीही ती गोष्ट पूर्णपणे ओळखून आहे. परंतु विवाहानंतरही मी माझे जीवन कधीच परस्वाधीन होऊ देणार नाही. त्यासाठी मी कोणतीही तडजोड करणारच नाही. काही झाले तरी माझी स्वतंत्र वृत्ती मी कधीच सोडणार नाही. माझा स्वतंत्र बाणा हा तर माझ्या जीवनाचा कणा आहे आणि तो मी कायम राखीनच राखीन. कृष्णा, माझ्या जीवनातील तुझे स्थान अढळ आहे आणि तसे ते नेहमीच राहणार आहे. मग त्यासाठी मला काहीही व कशाचाही त्याग करावा लागला तरी चालेल. तशीच वेळ आली तर एक वेळ मी विवाहही करणार नाही. परंतु माझ्या जीवनातील तुझे प्रथम स्थान व तुझा प्रत्यक्ष सहभाग याला दुसरा पर्याय नाही म्हणजे नाही, हे तूही लक्षात ठेव. विवाह झाला म्हणजे त्याचा अर्थ असा होत नाही की मी माझे स्वत्व गमावून बसावे. माझे स्वत्व मी कायम राखणारच. त्या स्वत्वानेच माझे सर्व जीवन जगणार आणि माझे स्वत्व हे कृष्णा, तुझ्या रूपानेच आहे. तेव्हा मी तुला गमावणे म्हणजे माझे स्वत्वच गमावण्यासारखे आहे आणि स्वत्वहीन जीवन जगणे हे तर निरर्थकच आहे. नाही का?”



द्रौपदीच्या आवेशपूर्ण बोलण्यातील भावपूर्णता हीच कृष्णाला अत्यंत कौतुकास्पद वाटत होती. कृष्णाच्या मुखावर एक स्मितरेषाही थोडावेळ झळकली खरी, परंतु कृष्ण लगेचच गंभीरही झाला आणि त्याच गंभीरतेने तो द्रौपदीशी बोलू लागला.

“अगं द्रौपदी, तुझा माझ्याविषयीचा हा भाव मला अत्यंत प्रिय तर आहेच. आणि तुझी विचारसरणीही तत्वतः योग्यच आहे. ‘स्वतःचे स्वत्व राखून स्वतःचे जीवन जगण्यासाठी स्वातंत्र्य असावे’ ही तुझी भूमिकाही बरोबरच आहे. परंतु या तत्वाचा प्रत्यक्ष जीवनात अनुभव घेताना मात्र मनाठायी विवेक हवा आणि त्या विवेकानेच सर्व निर्णय घेऊन त्याप्रमाणे वागण्याचे मनोबळही हवे. एक गोष्ट लक्षात ठेव की मनाचे बळ हे त्याच्या ताठर भूमिकेत नसते तर ते मनाच्या लवचिकतेमध्ये असते. म्हणूनच मनात तात्विक भूमिका कायम राखून, बाह्यांगाने योग्य वेळी योग्य प्रकारे आचरण करण्याचे धोरण आखता आले पाहिजे. तरच स्वतःच्या भूमिकेने जीवन जगणे शक्य होईल आणि मुख्य म्हणजे ते जीवन सुखावहही होईल.


द्रौपदी, एक मुख्य गोष्ट लक्षात ठेव की स्वातंत्र्य हे मनाचे असते. कारण बाह्यांगाचे बंधन हे सर्वांनाच काहीना काही प्रमाणात अटळच आहे. अशी बंधने तर कोणालाही कधीही चुकलेलीच नाहीत. मानवी जीवनाचा तर तो एक स्थायीभावच आहे. मुळात ते ईश्वरी तत्त्व जेव्हा मानवी रूपाद्वारे प्रगट झाले तेव्हा ते तत्त्वही बाह्यांगाने देहाच्या बंधनातच आले. अर्थात आत्मतत्त्व म्हणून ते देहाच्या बंधनातही खरे तर स्वतंत्रच आहे. या देहाच्या बंधनात केव्हाही पडण्याचे व त्यातून केव्हाही सुटण्याचे स्वातंत्र्य त्या आत्मतत्त्वाठायी मूलतःच अगदी सहजपणे आहे. त्या आत्मतत्त्वाला जे अज्ञानाने जाणत नाहीत ते जीव मात्र या देहाच्या बंधनात पडून तेथे कायमचेच जखडून राहतात. परंतु ज्या जीवांच्याठायी या आत्मतत्त्वाची जाणीव निर्माण होते, ते मात्र बाह्यांगाने या देहाच्या बंधनात राहूनही अंतरामध्ये पूर्णपणे स्वतंत्र असतात. त्याचेच लक्षण म्हणजे ते सदासर्वदा मोकळया वृत्तीने राहून त्यांचे जीवन नित्य आनंदाने जगतात.

द्रौपदी, मानवी देहातील स्वतंत्रता ही बाह्यांगाने मर्यादितच आहे. मुळामध्ये स्वतः स्वतःहून कोणीही स्वतंत्रपणे मानवी जन्माला येऊ शकतच नाही. हीच तर परमेश्वराच्या या सृष्टीतील मुख्य गोम आहे. मानवी जन्म हा मातापित्यांच्या संयोगातूनच प्राप्त होतो. हा जन्म कोणत्या कुळात व कोणत्या

मातापित्यांच्यापोटी यावा याचेही स्वातंत्र्य कोणाला नाही. एवढेच काय जन्म स्त्रीचा असावा की पुरूषाचा असावा हेही कोणाला स्वतःलाच ठरवता येणे शक्यच नाही. त्यामध्येही स्वतंत्रता नाहीच. जन्माला आल्यावर आपले कुटुंबिय व नातलग कोण असावे हे ठरवण्याचे मतही कोणाला नाही. तेव्हा बाह्यांगाने मानवी जीवन तर परावलंबीच आहे. मातापिता पालन पोषण करतात म्हणून मुले लहानाची मोठी होतात. शिक्षक शिक्षण देतात म्हणून तर जगाचे ज्ञान होते व मनावरती चांगले संस्कार होतात. अनेकांच्या मदतीने मानवी देहाची वाढ होत असते आणि मानवी मनाची जडणघडण होत असते, हे तर खरेच आहे. तेव्हा मानवी जीवन जगण्यासाठी अनेकजण निमित्तमात्र, कारणीभूत व साहाय्यभूत होत असतात हे सत्य आहे. त्यामुळेच 'माझे जीवन जगण्यासाठी माझा मी स्वतंत्र आहे' असा अहंकार बाळगायला कोणालाही जराही वावच नाही.

द्रौपदी, मानवानेही स्वतःचे जीवन स्वास्थ्याने व सुखाने जगता यावे म्हणून स्वतः स्वतःहूनच जाणूनबुजून काही बंधने स्वीकारली. त्यामध्ये कौटुंबिक बंधने व सामाजिक बंधने ही जशी आहेत, तसेच एक अत्यंत महत्त्वाचे व व्यक्तिशः अत्यंत आवश्यक असलेले असे हे वैवाहिक बंधन आहे. प्रजोत्पादनासाठी स्त्रीपुरूषांचा संयोग हा निसर्गधर्मानुसार तर आवश्यकच आहे. परंतु जेव्हा त्यातूनच स्त्री व पुरूष यांच्यामध्ये विषयसुखाची वासना निर्माण होऊ लागली, तेव्हा या वासनेची मर्यादित पूर्ती व्हावी आणि त्या मागे केवळ वासना न राहता काहीतरी प्रेमाची भावनाही असावी, केवळ या सद्हेतूनेच हे विवाहाचे बंधन निर्माण केलेले आहे. अत्यंत शुद्ध अंतःकरणाच्या महात्म्यांच्याकडूनच मानवांच्या कल्याणाच्या हेतूने हे विवाहाचे पवित्र बंधन निर्माण झालेले आहे. कारण केवळ वासनेच्या संबंधातून वासनेची पूर्ती न होता ती वाढतच राहील. त्यामुळे होणारी मानवांची अधोगती टाळता यावी या हेतूनेच त्या महात्म्यांनी हा मार्ग शोधून काढला. तेव्हा ते विवाहाचे बंधन सर्वांनाच अत्यंत आवश्यक आहे. त्या बंधनाचा जर कोणी त्याग केला तर प्रबळ वासनेच्या जोरापुढे पापाचरणाला प्रवृत्त व्हायला मुळीच वेळ लागायचा नाही आणि त्याच्यासाठी केवळ अधोगतीचाच मार्ग शिल्लक राहील. तेव्हा सध्याच्या काळात वैवाहिक बंधन हे सर्वांसाठीच आवश्यक आहे हे पूर्णपणे लक्षात ठेव."

द्रौपदी कृष्णाचे बोलणे अत्यंत लक्षपूर्वक ऐकत होती आणि तिच्या स्वभावानुसार त्याच वेळी तिच्याकडून कृष्णाच्या बोलण्यावरती विचारही घडत



होता. त्याचमुळे द्रौपदीच्या ठिकाणी साहजिकच काही प्रश्नही निर्माण होत होते आणि ते प्रश्न कृष्णाला विचारण्याचा मोकळेपणाही द्रौपदीच्या ठायी कृष्णप्रेमामुळे होता. परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रश्न विचारण्याच्या मागे द्रौपदीची भूमिका चिकित्सक नव्हती, तर कृष्णाकडून अधिकाधिक स्पष्टपणे जाणून घ्यावे असाच हेतू द्रौपदीच्या ठायी होता. त्याच्या मुळाशी एकमेवच कारण होते आणि ते म्हणजे द्रौपदीठायी कृष्णाविषयी असलेली अलोट श्रद्धा. द्रौपदीसाठी कृष्णाचे सांगणे अंतिम होते आणि कृष्णाचे वचन तिच्यासाठी प्रमाणभूत होते. द्रौपदीच्या मनात काहीतरी विचारायचे किंवा सांगायचे आहे ही गोष्ट कृष्णाला कळल्याशिवाय राहूच शकली नाही. द्रौपदीच्याकडे पाहिल्यावरती लागलीच ते कृष्णाच्या लक्षात आले. त्यामुळे कृष्णही द्रौपदीकडे ती बोलण्याच्या अपेक्षेने पाहत राहिला होता. तेवढ्यातच द्रौपदीनेही कृष्णाशी बोलायला सुरूवात केली.

“अरे कृष्णा, तुझे सांगणे हे सम्यक व सर्वांगीण असेच असते. त्यामध्ये दुमताला कोणतीही जागा शिल्लकच राहिलेली नसते. त्यामुळेच विवाहाच्या आवश्यकतेचे कारण जे तू सांगितलेले आहेस, ते अगदी संयुक्तिक आहे असे निश्चितच जाणवते. विवाहामागील जो हेतू तू विशद करून सांगितलास, तोही अगदी रास्त आहे आणि मनालाही अगदी सहजतेने पटणारा असाच आहे. त्या हेतूविषयी शंका घ्यायला काही कारणच नाही. कारण या सर्व गोष्टी सद्हेतूनेच ठरवलेल्या आहेत हे नक्कीच. पण तरीही एक महत्त्वाचा प्रश्न शिल्लक राहतोच की हा हेतू प्रत्यक्ष साध्य होतो की नाही? की हा हेतू केवळ तत्त्वापुरताच मर्यादित राहतो? या विचारानेच माझे मन साशंक होत आहे.

कृष्णा, विवाहबंधनाची आवश्यकता तू सांगितलीस खरी, पण हे बंधन स्त्री व पुरूष या उभयपक्षी मानले गेले पाहिजे व पाळले गेले पाहिजे, तरच त्या बंधनाला अर्थ आहे आणि तरच त्या बंधनाचा हेतू साध्य होईल. या विवाहामुळे केवळ स्त्री हीच बंधनात पडणार असेल आणि पुरूष मात्र मोकळाच राहणार असेल तर ते बंधन स्त्रीसाठी फक्त एकतर्फीच होईल. मग ते बंधन म्हणजे स्त्रीसाठी जन्मभराची गुलामगिरीच ठरेल. कारण पुरूष हा जर स्त्रीकडे नेहमीच एक उपभोगाची वस्तू म्हणूनच पाहणार असेल, तर मग स्त्रीसाठी वेगळे असे जीवन काही उरणारच नाही. स्त्रीने सदैव पुरूषाची सेवा करून त्याला सुखवायचे, सदासर्वकाळ त्याचेच मन राखायचे, पुरूषाला खूष करण्यासाठीच सर्व वस्त्रालंकार

व साजशृंगार करायचा, हेच पुरूषाला त्याच्या पत्नीकडून नेहमी अपेक्षित असते आणि त्याच दृष्टीने पुरूष नित्य पत्नीकडे बघत असतो. आजूबाजूची सर्व परिस्थिती प्रत्यक्ष पाहिल्यावरती हे सर्व माझ्या तरी लक्षात आलेले आहे. परंतु मला मात्र हे सर्व स्वीकारणे कधीच शक्य होणार नाही. अशा एकतर्फी बंधनात मी केव्हाच पडणार नाही की ज्यामुळे मला माझे स्वातंत्र्य पूर्णपणे गमवावे लागेल. एकदा का मी माझ्या हक्कांवर पाणी सोडले की मग कृष्णा, तुला तरी माझ्या जीवनात बाह्यांगाने स्थान देणे मला कसे काय जमणार? आणि तू नसशील असे जीवन मी कधीही जाणूनबुजून पत्करणारच नाही. एवढी एकच गोष्ट मात्र शंभर टक्के खरी आहे.”

द्रौपदीच्या बोलण्यामागे तिची काहीतरी निश्चित विचारसरणी आहे हे कृष्णाच्या लक्षात आले. पण त्याचबरोबर ती विचारसरणी एकतर्फी आहे हेही कृष्णाला जाणवले. म्हणूनच द्रौपदीच्या विचारांना योग्य दिशा व चालना मिळावी या उद्देशाने कृष्णाने द्रौपदीशी बोलावयास सुरूवात केली.

“द्रौपदी, तुझे विचार एकतर्फी आहेत आणि म्हणूनच ते अपुरे आहेत. पतीपत्नी या नात्याविषयी तुझ्या मनात जी काही शंका आहे ती एक शक्यता म्हणून जरी खरी वाटत असली तरी तसा काही नियम नाही. तसे घडू शकेल किंवा घडणारही नाही आणि घडण्याची शक्यता ही पती व पत्नी या दोन्ही बाजूंनी आहे. कारण पतीला जसे पत्नीकडून विषयसुख मिळत असते तसे पत्नीलाही पतीकडून विषयसुख मिळत असते हेही तितकेच खरे आहे. पण हे नाते जर सुखाच्या अपेक्षेपुरतेच मर्यादित राहिले तर नाते असूनही मने जुळत नाहीत आणि मग संबंधही बिघडतात. तेव्हा सुखाच्यापलीकडे जर परस्परांविषयी प्रेमाची भावनात्मकता निर्माण झाली तरच हे पतीपत्नी संबंध टिकून राहतात. त्यामुळेच ते नातेही सुखावह होते आणि त्या नात्याचे बंधनही प्रिय होते हे खरे आहे.

अगं द्रौपदी, तू असेही म्हणालीस की पुरूष स्त्रीकडे केवळ एक विषयोपभोगाची वस्तू या दृष्टीनेच पाहतात. परंतु हेही तितकेच खरे आहे की अनेक स्त्रियाही स्वतःकडे त्याच दृष्टीने पाहतात. पुरूषांच्या नजरेत भरून त्यांच्याकडून दाद मिळावी यासाठीही स्त्रियांचे प्रयत्न चालूच असतात. वस्त्रालंकारादी भूषणे लेवून व अनेक प्रकारचा साजशृंगार करून पुरूषांना आकर्षित करण्याचा प्रयत्नही अशा स्त्रियांकडून होतच असतो. पुरूष त्यांच्याकडे आकर्षित झाल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाही आणि पुरूषांना तोषविण्यामध्येच त्यांना कृतकृत्यता वाटत असते. टाळी कधीही एका हाताने वाजत नाही हे लक्षात घे. तेव्हा स्त्रियांनी सर्वप्रथम

पुरूषांच्या दृष्टीने स्वतःकडे पाहण्याचे थांबवले पाहिजे. पुरूषांप्रमाणे त्याही एक जीवच आहेत एवढेच नव्हे, तर जीव म्हणून त्याही ईश्वराच्या अंशच आहेत हे आधी स्त्रियांच्या लक्षात आले पाहिजे आणि मग त्यांनी तसा निश्चयच केला पाहिजे. ईश्वराचा अंश म्हणून असलेले प्रत्येकाचे अस्तित्व हेच ते खरे 'स्वत्व' आहे हे आधी जाणले पाहिजे आणि मगच ते 'स्वत्व' ज्याने त्याने प्रयत्नपूर्वक राखले पाहिजे. पण हे ईश्वरी अंशाचे 'स्वत्व' सर्वांच्याच ठिकाणी आहे याचेही स्मरण मात्र नित्य असावे. म्हणजे मग त्या स्वत्वाला अहंकाराचा स्पर्शही होणे शक्य नाही."

कृष्णाचे बोलणे ऐकताना द्रौपदी अधिकाधिक गंभीरच होत होती आणि तेही अत्यंत साहजिकच होते. कारण वरकरणी साध्या व सरळ असणाऱ्या कृष्णाच्या बोलण्यामध्ये केवढातरी गर्भितार्थ भरलेला होता आणि नेमका तोच द्रौपदीला जाणवला होता. द्रौपदी अधिकच विचारमग्न झाली आणि थोडावेळ थांबून तिने पुन्हा बोलावयास सुरुवात केली.

"अरे कृष्णा, तुझ्या साध्या बोलण्यातही केवढा तरी सखोल अर्थ आहे हे मला निश्चितच जाणवते. अर्थात तेवढ्या खोलवर जाऊन विचार करणे हे जरी मला शक्य नसले तरी तुझ्या सांगण्याचा परिणाम मात्र माझ्यावर अत्यंत खोलवर असाच होत आहे हे मात्र निश्चित. स्वत्व व अहंकार यातील जो सूक्ष्म फरक तू सांगितलास तोच अत्यंत महत्त्वाचा आणि विचार करायला लावणारा आहे. पण हा फरक तू म्हणतोस त्याप्रमाणे अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे सामान्याच्या लक्षात येणे कठीणच आहे. पण त्याहीपेक्षा तो लक्षात आल्यावरती तसे कबूल करणे हे तर त्याहूनही कठीण आहे. कारण एवढा प्रामाणिकपणा एखाद्याच्या ठिकाणी सहसा असतच नाही. मलाही काही काही वेळा असे वाटते की माझी माझ्या स्वत्वाविषयीची असलेली जाणीव अहंकाराकडे झुकते की काय? माझ्या विशेष रूपाची, गुणांची व बुद्धीमत्तेची खात्री माझ्याठायी निश्चितच आहे. पण त्या खात्रीला थोडासा गर्वाचाही वास येत असावा असे माझे मलाच वाटते. अनेकजण तर 'गर्विता' म्हणूनच माझ्या पाठीमागे माझा उल्लेख करीत असतात, हेही मला ठाऊक आहे. त्यांच्या म्हणण्यात थोडेफार तथ्य असू शकेलही. मी नाही म्हणत नाही.

कृष्णा, परंतु एक गोष्ट मात्र अगदी निश्चित आहे की तुझ्यापुढे माझा गर्व हा टिकूच शकत नाही. तुझे आकर्षक व्यक्तिमत्त्व, तुझे अलौकिक गुण, तुझी अफाट

बुद्धीमत्ता आणि या सर्वांहूनही तुझी निगर्विता व सहजता यापुढे तर कोणालाही अहंकाराला जराही वावच नाही. म्हणूनच तू मला माझ्या जीवनात नित्य व प्रत्यक्ष हवा असतोस. कारण त्यामुळेच माझा स्वभाव कधीही अहंकाराकडे न झुकता तो सदैव तुझ्याकडेच झुकलेला राहील याची मला पूर्ण खात्री आहे. तेव्हा तू जे ईश्वरी स्वत्व म्हणतोस ते जरी मला आकलन होऊ शकत नसले तरी माझ्याठायी कृष्णा, तुझ्या रूपानेच ते 'स्वत्व' सदा सर्वकाळ असावे, एवढे मात्र मला निश्चितपणे कळते.

कृष्णा, एक गोष्ट खरी आहे की माझ्या मनात तू आहेस म्हणूनच माझ्या बाह्य जीवनात तू प्रत्यक्ष असतोस आणि बाह्यांगाने असतोस म्हणूनच माझ्या मनातही नेहमी असतोस. हाच अनुभव मला माझ्या पूर्ण जीवनभर घ्यायचा आहे आणि त्यासाठी मग माझा जीवनातील जोडीदारही तसाच असावा लागणार आहे. कारण तरच ते शक्य आहे. माझ्याप्रमाणेच त्याचाही भाव तुझ्याठायी असणे आवश्यक आहे आणि त्याचीच मला थोडीशी काळजी वाटते. पण त्याचबरोबर मला अशी खात्रीही वाटते की माझ्या भावी जोडीदाराच्या ठिकाणी मी तुझ्याविषयी माझ्यासारखाच भाव निर्माण करीनच. त्याचेही मन मी तुझ्याकडे वळवीन आणि त्यालाही माझ्यासारखीच तुझी साथ घ्यायला लावीन. अशी अनुकूलता प्राप्त झाल्यावर मग माझ्या जीवनातील तुझा प्रत्यक्ष सहभाग कायम राहील यात जराही शंका नाही."

द्रौपदीच्या बोलण्यावरती क्षणभर थांबून नंतर कृष्ण विचारपूर्वक बोलू लागला.

"द्रौपदी, तुझे विचार जरी योग्य असले, तरी तसे प्रत्यक्ष घडणे मात्र तुला वाटते तेवढे सोपे नाही. त्यामध्ये अनेक अडचणी संभवतात हे तू लक्षात ठेव. मुख्य म्हणजे आधी एक लक्षात घे की तुझा व माझा दीर्घकाळचा सहवास आहे. आपले अत्यंत मोकळेपणाचे वागणे व बोलणे आहे आणि त्यामुळेच व त्यातूनच आपले एवढे प्रेमाचे व जवळीकतेचे संबंध निर्माण झालेले आहेत, ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. एखाद्या नवपरिचित व्यक्तीकडून अशा संबंधाची अपेक्षा करणे हे अयोग्यच नव्हे तर चुकीचेच ठरेल. माझ्याविषयी तुझ्यासारखे प्रेम व तशी श्रद्धा निर्माण होणे, ही तुला वाटते तेवढी सोपी गोष्ट नाही. त्यासाठी दीर्घकाळचा व सततचा सहवास आवश्यक आहे. मुख्य म्हणजे मनाचा मोकळेपणा अपेक्षित आहे आणि नेमकी हीच गोष्ट कठीण असते. कारण ते पूर्णपणे ज्याच्या त्याच्या स्वभावावरच अवलंबून आहे. ही पुन्हा ज्याची त्याची आवश्यकता आहे आणि ही ज्याची त्याची जरूरी आहे. त्यासाठी

कोणावरती दबाव आणता येणार नाही, हे खरेच आहे. कारण तसा दबाव आणला तर एखादे वेळेस विपरित परिणाम होण्याची शक्यताच जास्त असते. त्याचप्रमाणे आणखीन एक गोष्ट आहे की जो तो ज्याच्या त्याच्या समजुतीप्रमाणे निर्णय घेऊन जीवनात वागत असतो. मार्गदर्शनाची जरूरीही प्रत्येकाला वाटत असतेच असे नाही. काहीजणांना तर असे दुसऱ्याचे मार्गदर्शन घेणे हे केवळ अनावश्यकच वाटते असे नाही, तर त्यांना तो कमीपणाही वाटतो.

द्रौपदी, जेव्हा पतीपत्नींच्या जीवनात एखादा प्रसंग येतो तेव्हा जर त्यांना मार्गदर्शन करावयाचे असेल किंवा प्रत्यक्ष सहभाग घ्यायचा असेल तर त्या उभयतांचे माझ्याशी सारख्याच प्रेमाचे व श्रद्धेचे संबंध असतील तरच ते मला शक्य होईल. कारण केवळ एकासाठी माझे सहभागी होणे झाले तर ते दुसऱ्याला आवडेलच किंवा मानवेलच असे नाही. तशी शक्यता कमीच असते, निदान मर्यादा तरी पडतातच पडतात. मग त्या मर्यादेमुळे मोकळेपणा बाधीत होतो आणि उभयपक्षी मनाची कुचंबणा होऊन राहते. विशेषतः फक्त पत्नीचीच श्रद्धा व प्रेम असेल तर असे घडण्याची शक्यता अधिकच असते. कारण पतीच्या मनामध्ये कुठेतरी पत्नीवर नात्याचा अधिकार गाजविण्याची भावना सुप्तरूपाने असतेच आणि ती भावना काहीवेळा उघड झाल्याशिवायही राहत नाही. पत्नीच्या मनात व जीवनातही पतीपेक्षा दुसऱ्या कोणातरी व्यक्तीला आणि तेही एका परपुरूषाला प्राधान्य आहे ही गोष्ट सर्वसाधारणपणे कोणत्याही सामान्य पतीला न मानवणारीच आहे. काहीजण तसे बाह्यांगाने एखादेवेळेस दाखवणार नाहीत, पण ती गोष्ट त्यांच्या मनामध्ये कुठेतरी दबून राहणारच आणि मग संधी मिळाली की त्या नाराजीच्या भावनेचा केव्हातरी एकदम स्फोटच होणार. मनातला खदखदत असलेला राग व अशांतता उफाळून बाहेर येणार आणि मग जीवनातल्या सर्व बाह्य सुखशांतीवर पाणीच फिरविल्यासारखे होणार.

द्रौपदी, बऱ्याच वेळा स्त्रियांनाही पतीशिवाय दुसऱ्या कोणाचे मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता वाटतच नाही. एकतर त्यांच्यावर झालेल्या संस्कारामुळे त्यांच्या भावविश्वात दुसऱ्या कोणा पुरूषाचा सहभाग हा त्यांना गैरच वाटतो किंवा जर एखादे वेळेस त्यांना तशी जरूरी वाटली तरी सामाजिक, कौटुंबिक आणि विशेषतः मनातील भावनिक बंधने तोडण्याचे धैर्य त्यांना होत नाही. त्यांच्या पतीनिष्ठेला बाधा येईल अशी त्यांना मनातून सतत भीती वाटत असते. जीव म्हणून असलेल्या स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव स्त्रियांना क्वचितच असते. त्यांच्याठायी एकतर टोकाचा न्यूनगंड असतो किंवा कमालीचा


अहंकार असतो. म्हणूनच आपण केवळ स्त्रीच आहोत अशीच व एवढीच चुकीची भूमिका कायमची घेऊन न बसता, मीही एक सर्वसाधारण जीवच आहे अशी योग्य, सम्यक भूमिका आधी स्त्रियांनी त्यांच्या ठिकाणी प्रयत्नपूर्वक जोपासली पाहिजे. मग जीव म्हणून त्याही ईश्वराच्याच अंशमात्र आहेत या जाणिवेचा भाग नंतर संभवतो. या जाणिवेपोटीच जीव म्हणून असलेले स्वातंत्र्य व मर्यादा हे दोन्ही लक्षात येते आणि त्याची योग्य ती सांगडही घालणे शक्य होते."

कृष्णाचे बोलणे अत्यंत गंभीरपणे ऐकणारी द्रौपदी तेवढ्याच गंभीरतेने कृष्णाशी बोलू लागली.

"कृष्णा, तुझे बोलणे नुसते सयुक्तिकच नाही तर ते अत्यंत अभ्यासपूर्णही आहे असेच मला जाणवते. मला माहित आहे की हा एवढा व असा अभ्यास तू काही मुद्दामहून केलेला नाहीस तर तुझ्याठायी असलेल्या अभ्यासक दृष्टीमुळे तुझ्याकडून हा अभ्यास अगदी सहजपणे घडलेला आहे. तुझी ती सहज वृत्तीच आहे. अनेक व्यक्तींच्या सहवासातून तुझ्याकडून जे निरिक्षण घडले आणि जो मानवी स्वभावाचा सूक्ष्म अभ्यास तुझ्याकडून घडला त्याचाच हा परिपाक आहे. तू म्हणतोस त्याप्रमाणे स्त्री व पुरूष हे दोघेही मूलतः जीवच आहेत, या समभावाच्या दृष्टीने त्या दोघांच्याकडेही पाहणे हे सामान्य व्यक्तीला शक्यच नाही. कारण कोणतीही सामान्य व्यक्ती, मग ती स्त्री असो वा पुरूष असो, तिची दृष्टीही मर्यादितच आहे आणि त्यामुळेच त्यांची वृत्तीही संकुचितच आहे. असा सर्व जीवांकडे समभावाने पाहणारा फक्त ईश्वरच असू शकतो हेही सत्यच आहे. पण अशा ईश्वराला पाहण्याची व ओळखण्याची दृष्टी सर्वसामान्यांना कशी काय असणार बरे? ते तर शक्यच नाही.

कृष्णा, परंतु या दृष्टीने विचार केला असता मी मात्र अत्यंत भाग्यवानच आहे. कारण असा सर्वांकडे समभावाच्या दृष्टीने पाहणारा माझ्या दृष्टीसमोर तरी प्रत्यक्ष तूच आहेस. तू सर्वांकडेच समभावानेही पाहतोस आणि त्यांच्यातील बाह्यांगाचा फरकही जाणून त्यांच्याशी प्रत्यक्ष वागताना तसा फरकही तू करतोस. ही तुझी दृष्टी व वृत्ती हीच त्या ईश्वरीभावाची आहे हे मी पूर्णपणे जाणून आहे. तेव्हा माझ्यासाठी तरी तुझ्याशिवाय दुसरा कोणीही ईश्वर नाही अशीच माझी दृढ श्रद्धा आहे.

कृष्णा, सर्वात मुख्य व महत्त्वाची गोष्ट म्हणजे मला तू माझ्या सर्वच जीवनात प्रत्यक्षपणे माझ्याबरोबर हवा आहेस. ते माझे स्वातंत्र्य मी घेणारच असा



माझा निश्चय अगदी पक्का आहे. मग त्यासाठी मला काहीही व कितीही किंमत मोजावी लागली तरी त्याला माझी पूर्ण तयारी आहे. पण त्याचबरोबर तुझे सांगणे हेही माझ्या लक्षात आलेले आहे. विवाहोत्तर जीवनात थोडीशी परावलंबिता मला येणारच आहे हे तुझे म्हणणे खरेच आहे. केवळ एकतर्फी निर्णय घेणे मला नेहमीच शक्य होईल असे नाही आणि जर मी माझ्या हट्टाने तसे निर्णय घेतले तर त्यातून अधिक अडचणीच निर्माण होतील किंवा वेळप्रसंगी संघर्षही घडू शकेल. अशावेळी मग माझ्या वैवाहिक नात्यावरतीच अधिक ताण निर्माण होईल आणि मनाची शांती व स्वास्थही बिघडून जाईल. केवळ बाह्यांगाने मी माझ्या मनासारखे वागण्याचे स्वातंत्र्य घेतले, एवढेच समाधान माझ्या मनाला मिळेल पण ते खोटेच असेल. कारण त्यामुळे माझ्या मनाला खरी शांती व समाधान तर लाभणार नाहीच, परंतु माझ्या जीवनात प्रत्यक्ष सहभागी होऊनही तुलाही संतोष व आनंद मिळणार नाही तो नाहीच. अशा तऱ्हेने निव्वळ भावनिक गुंतागुंत मात्र वाढेल आणि त्याचबरोबर मनाचे असमाधान व अस्वस्थताही वाढत राहील.


कृष्णा, माझ्या दृष्टीसमोर तू पुढील अडीअडचणींचे संभाव्य चित्र निर्माण केलेस ते योग्यच केलेस. कारण त्यामुळे मी वेळीच सावध झाले आणि माझे स्वत्व व माझा हट्टीपणा यातील तू सांगितलेला फरकही माझ्या नीटपणे लक्षात आला. परंतु तरीही तू माझ्या जीवनात मला प्रत्यक्षपणे हवा आहेसच. माझा हा निश्चय अगदी कायम आहे. आता या सर्व अडचणींतून योग्य मार्ग काढण्याची जबाबदारी मात्र तुझी आहे. मी तर केवळ तुझाच भरवसा धरून आहे. मला काय हवे आहे हे मी तुला सांगितलेले आहे. आता ते कसे मिळवायचे ते तू ठरवायचे आहेस आणि तू मला ते सांगायचे आहेस. तू जसे मला वागायला सांगशील किंवा जे काही मला करायला सांगशील तसे वागण्याची व करण्याची माझी पूर्ण तयारी आहे. काहीही झाले तरी मी मागे हटणार नाही. माझी तुझ्यावर पूर्ण श्रद्धा आहे. आता तू माझ्यावर पूर्ण विश्वास ठेव आणि मला योग्य ते मार्गदर्शन व प्रत्यक्ष साहाय्य असे दोन्ही कर. कारण मला तुझ्याकडून या दोन्हीची नितांत जरूरी आहे. कृष्णा, मुळातच, तू माझ्या जीवनात प्रत्यक्षपणे व नित्य असावास हा माझा भाव योग्यच आहे ना? की नाही?"

द्रौपदीच्या बोलण्यातील आर्तता ही कृष्णाच्या अत्यंत संवेदनाक्षम अंतःकरणापर्यंत जाऊन पोहोचायला मुळीच वेळ लागला नाही. द्रौपदीच्या भावातील सच्चेपणा कृष्णाला ठाऊक होताच आणि कृष्णाच्या ठायीही तोच भाव होता. संभाव्य अडचणी लक्षात येऊनही द्रौपदीचा निर्धार कायमच होता आणि

त्याचेच कृष्णाला अत्यंत कौतुक वाटले. त्यामुळे द्रौपदीच्या विश्वासाला न्याय देऊन तिची जबाबदारी स्वीकारल्यावाचून कृष्णालाही दुसरा पर्यायच राहिला नव्हता आणि कृष्णानेही द्रौपदीवरील आत्यंतिक प्रेमामुळे तिची जबाबदारी पूर्णपणे व अंतःकरणापासून स्वीकारली. थोडा वेळ गंभीरतेने विचार केल्यानंतर कृष्णाने द्रौपदीशी बोलण्यास सुरूवात केली.

"अगं द्रौपदी, तुझ्याठिकाणी जो माझ्याविषयीचा भाव व श्रद्धा आहे त्याची मला जाणीव आहे आणि मला त्याचे अत्यंत कौतुकही आहे. तुझ्या माझ्यावरील श्रद्धाभावाचे फळ देण्याची जबाबदारी आता माझीच आहे आणि ते फळ मी तुला निश्चितपणे देईन याची तू खात्री बाळग. पण तुला आधीच सांगितल्याप्रमाणे मी केवळ बाह्यांगाने तुझ्या प्रत्यक्ष जीवनात राहूनही त्याचे अपेक्षित फळ जे मनाची शांती व समाधान, ते मिळण्याची खात्री देता येत नाहीच. कारण ते फळ मुळातच आंतरिक आहे. त्यासाठी तुझ्याही जीवनात तुला अंतर्बाह्य अशी दोन्ही अनुकूलता असणेही तेवढेच आवश्यक आहे हे तुझ्याही आता लक्षात आलेले आहेच. म्हणूनच जशी मानसिकता तुझी आहे तशीच मानसिकता असलेली व्यक्ती तुझ्या जीवनात तुला पती म्हणून मिळाली, तरच तुला आवश्यक ती अनुकूलता निश्चितपणे लाभू शकेल. तुझी माझ्यावर जशी श्रद्धा व प्रेम आहे तशीच श्रद्धा व प्रेम ज्याच्याठायी माझ्याविषयी आहे असाच पुरूष तुला साहाय्यभूत होऊ शकेल. कारण माझ्यावरील प्रेमापोटी व श्रद्धेमुळे त्यालाही त्याच्या जीवनात मी प्रत्यक्ष सहभागी असावे असेच वाटत असणार. त्यामुळे तुझे माझ्यावरील प्रेम व श्रद्धा तो पुरूषही निश्चितपणे समजू शकेल, एवढेच नव्हे, तर तुझ्या माझ्याठायीच्या भावाचे त्यालाही अत्यंत कौतुक राहील आणि त्यासाठी तो तुला नित्य प्रोत्साहनही देत राहील. तुम्हा उभयतांनाही मी अगदी मनापासून प्रत्यक्ष हवा असेन. त्यामुळेच माझा सहभाग व माझे मार्गदर्शन हे तुम्हाला व मलाही सुखावह होईल आणि कोणत्याही प्रकारचा मानसिक ताण कोणावरही कधीही असणारच नाही. प्रेमामुळे सर्वांचीच मने मोकळी असतील आणि त्यामुळे मनमोकळेपणाचा आनंद सर्वांनाच प्रत्यक्ष अनुभवता येईल."

कृष्णाच्या बोलण्यावर द्रौपदी थोडावेळ शांतपणे विचार करीत राहिली. कृष्णाच्या बोलण्यातील मुद्दा तिला अगदी स्पष्टपणे जाणवला होता आणि पटलाही होता हे द्रौपदीच्या मुखावरील भाव पाहताच लक्षात येत होते. द्रौपदीने कृष्णाकडे अत्यंत प्रेमाने पाहून स्मितहास्य केले. तिचा चेहराही एकदम उजळला आणि ती अत्यंत उत्स्फूर्तपणे कृष्णाला म्हणाली,



"कृष्णा, तुझे म्हणणे अगदी शंभर टक्के बरोबर आहे. तुझ्या बोलण्यामुळे मला माझ्या गोंधळलेल्या मनःस्थितीतून बाहेर पडण्याचा निश्चित मार्ग दिसू लागला आहे आणि माझ्या मनातील विश्वास पुन्हा जागा होऊ लागला आहे. मी व माझे पती या उभयतांची श्रद्धा व प्रेम एकीएक तुझ्याठायीच असेल तरच माझ्या जीवनात तुझी प्राप्ती मला होऊ शकेल आणि माझे जीवन खऱ्या अर्थाने सुखासमाधानाचे होईल, हे आता माझ्या पुरेपूर लक्षात आलेले आहे. पण तसा कोणीही पुरूष माझ्या तरी दृष्टीसमोर नाही. आणि मी तरी त्याला कुठे व कसा शोधणार? तेव्हा आता तीही जबाबदारी तुझ्यावरतीच आहे. मुख्य म्हणजे, तुझ्यावरती कोणाची श्रद्धा व प्रेम आहे हे तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला कसे कळणार आणि कोण सांगणार? कारण तो तसा अनुभव तुझा हवा. तशी खात्री तुझी व्हावयास हवी. खरे ना?"

द्रौपदीच्या बोलण्यावरती कृष्णाने किंचित हसून मान डोलवली आणि तो पुन्हा गंभीर झाला. पुढे होऊन कृष्णाने द्रौपदीचे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन हलकेच दाबले आणि तिला प्रेमाने जवळ घेऊन तिच्या मस्तकावर हळुवार थोपटले. कृष्णाच्या त्या उत्स्फूर्त कृतीतून त्याच्या मनीचे सर्व भाव न बोलताच द्रौपदीच्या मनातून तिच्या अंतरात प्रवेश करते झाले आणि कृष्णाच्या त्या आश्वासक स्पर्शामुळे द्रौपदीला एकदम हलके हलके व मोकळे मोकळे वाटू लागले. कृष्ण तेथून निघून गेल्यावरतीही कृष्णाची मूर्ती द्रौपदीच्या मनात अजूनही तशीच कायम होती आणि तिच्या मनाला सुखावून शांत करीत होती."

▯ ▯ ▯


नारदाने त्याचे बोलणे क्षणभर थांबवले आणि तो अपेक्षित नजरेने लक्ष्मीकडे पाहत राहिला. लक्ष्मीच्या मनातही काहीतरी विचार चालू आहेत हे तिच्या मुखावरून लगेचच लक्षात येत होते. लक्ष्मीची ही अवस्था नारदाने जाणली आहे ही गोष्ट लक्ष्मीनेही ओळखली. तिने नारदाकडे पाहून मंदस्मित केले आणि त्याच्याशी बोलावयास सुरूवात केली.

"अरे नारदा, कृष्णचरित्रातील कृष्णाचे माहात्म्य एका वेगळयाच अंगाने प्रगट करून तू दाखवीत आहेस. त्यामुळे साहजिकच माझ्याठिकाणीही त्या अंगाने विचार करणे सुरू झालेले आहे. ते विचार वेळीच बोलून प्रगट करणे माझ्या

दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. म्हणजे नंतर त्या विचारांचा गोंधळ होणार नाही. त्यातील सुसूत्रताही कायम राखली जाईल आणि त्या विचारांचा योग्य मेळही जमून राहील. बरोबर ना?

नारदा, द्रौपदीच्या ठिकाणी कृष्णाविषयी अलोट श्रद्धा व प्रेमही आहे, हे तर अगदी सहजपणे लक्षात येते आणि त्याचे निश्चितच केवढे तरी महत्त्व आहे. कारण कृष्णाचे वेगळेपण आधी लक्षात येणे आणि मग त्याचे विशेषत्वही अनुभवाने कळून त्याची खात्री पटणे ही गोष्टही साधी नाहीच. 'कृष्णाचे ते विशेषत्व म्हणजेच ईश्वरत्व आहे' एवढी जाण यावयास बराच कालावधी हा जावा लागणारच. ती काही एवढी सहजासहजी घडणारी गोष्ट नाहीच मुळी, हे मी जाणून आहे. परंतु त्या अनुभवाकडे नेणारा भरभक्कम पाया द्रौपदीच्या ठिकाणी निर्माण झालेला होता, हीच गोष्ट मुख्य आहे आणि ती अत्यंत कौतुकाचीही आहे. द्रौपदीला जीवनात कृष्ण प्रत्यक्ष हवा आहे म्हणजेच तिला कृष्णाचे प्रेम नित्य हवे आहे. त्या प्रेमाची सर्व म्हणजे आधार, रक्षण, मार्गदर्शन, आपलेपणा, सहवास इत्यादी सर्व अंगे द्रौपदीला प्रिय आहेत आणि ते कृष्णप्रेम द्रौपदीला पूर्ण जीवनभराचे हवे आहे. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. कारण कृष्णप्रेमाची केवळ गोडीच द्रौपदीला लागली आहे असे नव्हे तर त्या कृष्णप्रेमाचे माहात्म्यही तिने अनुभवाने जाणले असल्याचेच हे लक्षण आहे.

नारदा, पण द्रौपदी ही निव्वळ भावनाप्रधानही नाही. कृष्णाचे प्रेम नित्य हवे तर प्रत्यक्ष कृष्णच जीवनात नित्य हवा ही मुख्य गोष्ट द्रौपदीच्या लक्षात आलेली होती. तोच द्रौपदीच्या ठायीचा पूर्ण निश्चय होता आणि तोच ध्यास तिला पूर्णपणे लागलेला होता. त्याच दृष्टीने द्रौपदीच्या मनात विचारचक्र सतत चालू असावे हे तिच्या बोलण्यातून ताबडतोब जाणवते. त्या विचारचक्राचा केंद्रबिंदू कृष्ण व त्याचे प्रेम होते हे महत्त्वाचे! त्यामुळेच स्वतःच्याच विचारचक्रात अडकून न राहता द्रौपदी कृष्णाचे मार्गदर्शन घेते आणि त्याचेच साहाय्यही मागते. पुढील जीवनातील संभाव्य अडचणी कृष्णाने लक्षात आणून दिल्यावरती स्वतःच्या विचारसरणीचा हट्ट न धरता खरी वस्तुस्थिती लक्षात घेऊन स्वतःच्या विचारांची दिशा बदलण्याचा मनाचा मोकळेपणा व लवचिकताही द्रौपदीच्या ठिकाणी आहे. कारण काय साधायचे आहे हे साध्य तिच्या नजरेसमोर निश्चितपणे आहे आणि त्यासाठी आधी ठरवलेला मार्ग बदलून योग्य दिशेने वाटचाल करण्याचे मनोबळही द्रौपदीच्या ठायी आहे. याहीपेक्षा वरकडी म्हणजे द्रौपदीची कृष्णावरती पराकोटीची श्रद्धा आहे आणि त्याचे सांगणे हेच तिच्यासाठी अंतिम आहे. तिचे हित केवळ



कृष्णच जाणतो आणि करूही शकतो यावरती तिचा दृढ विश्वास आहे. द्रौपदीच्या या श्रद्धाभावाला मी पूर्ण गुण देते. कारण व्यक्तिगत प्रेमाला श्रद्धेची जोड नसेल तर ते प्रेम केवळ भावनात्मकच राहते आणि म्हणून दुर्बलही ठरते. होय ना?

नारदा, द्रौपदीने जे मागणे कृष्णाकडे मागितले तेही आगळे वेगळेच आहे. तिने कृष्णाच्या व्यक्तिगत जीवनात कायमचे स्थान मागितलेले नाही, तर द्रौपदीला तिच्या व्यक्तिगत जीवनात कृष्ण कायमचा हवा आहे आणि त्यासाठीच तिला तिच्या जीवनात योग्य ती अनुकूलता हवी आहे. द्रौपदीचे हे मागणे कृष्णाने केवळ मान्यच केले असे नव्हे तर ते अगदी आनंदाने देऊ केले. कारण कृष्णाचाही द्रौपदीविषयी तोच भाव होता. खरे तर यामध्येच द्रौपदीच्या भावाचे विशेषत्व कळले. तिच्या ठायी असलेल्या कृष्णप्रेमाचीच जणू ती पावती होती. पण तरीही एक प्रश्न माझ्या मनात शिल्लक राहतोच की मग द्रौपदीच्या ठिकाणी एवढे कृष्णप्रेम असूनही तिच्या मनात कृष्णाशीच विवाह करण्याचा विचार कसा आला नाही? तसा विचार येणे अगदी साहजिकच होते ना? म्हणजे मग द्रौपदीच्या जीवनात कृष्ण प्रत्यक्षपणे अगदी सहजच राहिला असता आणि द्रौपदीच्या मनातली इच्छापूर्तीही झाली असती. अर्थात् माझ्या मनातील या प्रश्नाला जास्त महत्त्व नाही हे मला ठाऊक आहे. परंतु तरीही तो प्रश्न माझ्या मनात कोठेतरी थोडासा रेंगाळतो आहे हे मात्र खरे आहे. म्हणूनच तो प्रश्न तुला मी अगदी मोकळेपणाने विचारते आहे. म्हणजे त्यामुळे माझे मन मोकळे होईल.”


लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारद थोडा वेळ स्वस्थच राहिला. त्यामुळे ‘आपण विचारलेला प्रश्न चुकीचा तर नाही ना’ अशी शंका लक्ष्मीच्या मनात येऊ लागली आणि तिला थोडेसे बेचैनही वाटू लागले. पण तिच्या मनातील ती शंका तिने व्यक्त करण्याच्या आधीच नारदाने बोलावयास सुरूवात केली.

“अगं लक्ष्मी, तसे म्हटले तर तू विचारलेला प्रश्न वरकरणी तरी अगदी साधा वाटतो. परंतु तो प्रश्न तेवढाच महत्त्वाचाही आहे. कारण त्यामुळेच व्यक्तिगत प्रेम व भक्तिभावाचे प्रेम यामधील मूलभूत फरक तुला जाणून घेता येणे शक्य होईल. व्यक्तिगत प्रेमामध्ये ती व्यक्ती बाह्यांगानेही आपली व्हावी आणि आपणही तिचे व्हावे असे वाटत असते. नव्हे, मनामध्ये तसा भावनिक हट्टच असतो. त्यामध्येच आपल्या प्रेमाची मूर्ती आहे अशी समजूत पक्की असते. त्यामुळे जर तसे बाह्यांगाने घडू शकले नाही तर तो आपल्या प्रेमाचा पराभव आहे अशा समजुतीने

मनाला कायमचे नैराश्य येते. जीवनातील सर्व रसच जणू निघून गेला, अशा कल्पनेने सर्व जीवन नीरसच झाल्यासारखे वाटते आणि जीवनात केवळ औदासिन्य शिल्लक राहते.

लक्ष्मी, पण भक्तिभावाचे मूळ असलेले प्रेम हे मात्र अत्यंत वेगळ्या स्तरावरचेच असते. त्यामध्ये बाह्यांगाने कायमचे एकमेकांचे होऊन राहणे शक्य नसते हे ठाऊक असते आणि मुळातच ते आवश्यकही नसते. भक्तिभावाचे प्रेम हे देव व भक्त यामधील ईश्वरभावाचे प्रेम असते आणि त्यांच्यामध्ये घडणारे ऐक्य हे उभयतांच्या अंतःकरणाच्या ठायीच घडत असते. त्यासाठी अनेक बाह्य गोष्टी अनेक अंगाने साहाय्यभूत व कारणीभूत होत असतात हे जरी खरे असले तरी एकरूपतेचा अंतिम अनुभव हा अंतरातच येत असतो हे मात्र सत्य आहे. काहीवेळा बाह्य अनुकूलता प्रयत्नपूर्वक प्राप्त करून घेता येते हे जरी खरे असले, तरी तसा नियम असू शकत नाही. कारण त्यालाही मर्यादा या असतातच आणि केव्हा ना केव्हा तरी त्या समोर येऊन उभ्या ठाकतातच. त्या मर्यादांना ओलांडणे किंवा डावलणे नेहमीच शक्य होते असे नाही. अशा वेळी त्या बाह्यांगाच्या मर्यादेत राहूनच अंतरातील अमर्याद प्रेमाचा अनुभव घेणे आवश्यक ठरते. तसा अनुभव जो घेतो त्याच्याच प्रेमाचा कस लागतो आणि तोच भक्तिभावाच्या कसोटीला उतरतो. म्हणूनच कृष्णाशी ऐक्य पावायचे तर त्यासाठी द्रौपदीने कृष्णाशी विवाहच करणे आवश्यक होते असे मुळीच नाही. कृष्णाशी ऐक्य पावण्यासाठी एखाद्या स्त्रीने कृष्णाशी लग्नच करणे जरूरीचे आहे असा नियमच जर झाला असता तर कठीणच झाले असते. कारण मग तशी संधी सर्वांनाच उपलब्ध होणे शक्य नव्हते. कळत नकळत तसा चुकीचा संकेत जर निर्माण झाला असता, तर तो सर्वांनाच म्हणजे अगदी कृष्णालासुद्धा त्रासदायकच झाला असता. भक्तिभावासाठी बाह्य लग्नापेक्षा मनाची संलग्नता हीच आवश्यक व महत्त्वाची आहे. त्यासाठी आधी कृष्णाशी सख्य घडणे आवश्यक होते आणि कृष्णचरित्रात ती संधी मात्र स्त्री असो वा पुरूष असो, सर्वांनाच सारखी उपलब्ध होती. हेच तर त्या कृष्णचरित्राचे विशेषत्व होते.

लक्ष्मी, मला असे वाटते की तुझ्या मनात एखादे वेळेस रूक्मिणीचे उदाहरण असण्याची शक्यता आहे. तसे असल्यास त्यात तुझी काही चूक नाही. खरे तर, दोन व्यक्तींची वा त्यांच्या भावाची तुलना करणे हे योग्यच नव्हे. कारण जो तो ज्याच्या त्याच्या भावाने असतो आणि ज्याच्या त्याच्या स्वभावानुसार प्रगट होत असतो. त्यातून निर्माण झालेला भक्तिभाव व साधले गेलेले ऐक्य हेच सर्वात महत्त्वाचे असते. तेव्हा बाह्यांगाचे मार्ग अनेक असू शकतात आणि तसे ते



असतातही. परंतु त्या मार्गाने गाठलेले एकरूपतेचे ध्येय हे मात्र एकीएकच असते. तरीही भिन्न मार्गाने गाठलेले एकच ध्येय याचा अभ्यास मात्र जसा बोधदायी असतो तसाच तो आनंददायी असतो. त्यासाठीच रूक्मिणी व द्रौपदी या भिन्न व्यक्तिरेखा आपण उदाहरण म्हणून हाताशी घेऊन त्या अनुषंगाने बोलणे करणे निश्चितच योग्य ठरेल. त्या निमित्ताने भक्तिभावातील प्रेमरंगाच्या अनेकविध छटा प्रगट होतील. त्याचाही एक आगळावेगळा आनंद आपल्याला अनुभवता येईल.


हे लक्ष्मी, रूक्मिणीच्या ठायी कृष्णाप्रेमापोटी ध्यास लागलेला होता तो कृष्णाच्या जीवनात पूर्णपणे सहभागी होऊन राहण्याचा, तर द्रौपदीच्या ठायी त्याच कृष्णप्रेमापोटी ध्यास लागलेला होता तो तिच्या जीवनात कृष्णाला पूर्णपणे सहभागी करून घेण्याचा. म्हणजे त्या दोघींच्या ठायीही कृष्णाशी संलग्न होऊन राहणे हे ध्येय व हा ध्यास एकीएकच होता. ही गोष्ट मूलभूत व अत्यंत महत्त्वाची आहे हे लक्षात ठेव. दुधात साखर घातली काय किंवा साखरेत दूध ओतले काय, या बाह्यांगाने दोन भिन्न कृतींनी सुरू झालेल्या प्रक्रियेची परिणती, साखर दुधामध्ये पूर्णपणे विरघळून दुधाशी एकरूप होऊन राहण्यामध्येच होते. मग दुधामध्ये साखर कोणी जाणूनबुजून घालो किंवा ती साखर दुधामध्ये नकळत पडो. साखर विरघळण्याची प्रक्रिया ही लागलीच सुरू होते आणि ती शेवटी पूर्तीला जातेच जाते. तसे बाह्यांगाने कृष्णाच्या जीवनात पूर्णपणे सहभागी होणे काय किंवा स्वतःच्या जीवनात कृष्णाला पूर्णपणे सहभागी करून घेणे काय, या दोन्ही बाह्यांगाने भिन्न दिसणाऱ्या क्रियांची परिणती, स्वतःचा मीपणा पूर्णपणे विरघळून कृष्णाशी एकरूप होऊन राहण्यामध्येच होणार याची निश्चिती असते.

हे लक्ष्मी, जेव्हा दोन व्यक्तींचा परस्परांच्या जीवनात पूर्णपणे सहभाग असे म्हटले जाते तेव्हा त्या सहभागालाही बाह्य मर्यादा या असतातच ना? कोणीही दुसऱ्याच्या सहवासात सतत राहू शकत नाही वा प्रत्येक लहान सहान प्रसंगात सहभागीही होऊ शकत नाही ही गोष्ट तर सर्वांच्याच बाबतीत खरीच आहे ना? परंतु देव व भक्त यांना मात्र एकमेकांच्या जीवनातील सुखदुःखाच्या भावनेशी समरस होता येणे शक्य होते. कारण त्यांची मने ही एकमेकांशी प्रेमाच्या भावनेने कायमची जोडून राहिलेली असतात. सुखदुःखाचे प्रसंग येतातही आणि काळाच्या ओघात ते सरतातही. परंतु परस्परांशी प्रेमाने जडलेल्या मनातील प्रेम मात्र घडलेल्या प्रसंगामुळे कायमचे वाढत राहते. म्हणजेच प्रेमाची ओढ व ध्यास वाढत

राहतो. प्रेमातील आर्तता वाढत राहते, प्रेमाच्या भेटीगाठी वाढत राहतात, प्रेमपूर्तीचा भाव वाढत राहतो आणि त्यातून होणारा आनंदाचा अनुभवही वाढत राहतो. या आनंदाच्या नित्य अनुभवातच ऐक्यभावही वाढत राहतो आणि एकरूपतेचा अनुभव सहजपणे होऊन राहतो. या एकरूपतेमध्ये ‘मी’पण व ‘तू’पण हे दोन्ही विरघळतात आणि एकीएक ‘आपलेपण’ शिल्लक राहते.

हे लक्ष्मी, रुक्मिणीने कृष्णाच्या जीवनात त्याची पत्नी या नात्याने प्रवेश करून कृष्णाच्या अंतःकरणाशी भक्तिभावाने ऐक्य साधले. खरे बघायला गेले तर, रुक्मिणीचा बाह्यांगाने कृष्णाच्या जीवनातील सहभागही अत्यंत मर्यादीत असाच होता. परंतु तरीही नाराज वा उदासीन न होता आणि त्यात स्वतःचा कोणताही कमीपणा न मानता रुक्मिणी कृष्णाच्या प्रेमाने व त्याच्या माहात्म्याच्या जाणीवेने प्रयत्नपूर्वक युक्त होऊन राहत असे. या भक्तिभावातच रुक्मिणीचे ‘मी’पण कृष्णप्रेमात विरघळत गेले आणि तिचे सर्व अंतःकरणच कृष्णमय होऊन राहिले. त्याचीच परिणती म्हणजे कृष्णाला अपेक्षित अशी अंतर्बाह्य साथसंगत रुक्मिणीकडून कृष्णाला नित्य मिळत राहिली. त्यामुळेच कृष्ण रुक्मिणीवरती नेहमीच प्रसन्न असे आणि त्यातच तर रुक्मिणीच्या भक्तिभावाची पूर्ती आणि आनंद होता.

हे लक्ष्मी, द्रौपदीने तिच्या बाह्य जीवनात ‘कृष्ण नित्य व प्रत्यक्ष हवा’ असा ध्यास धरला आणि अर्थातच त्याची पूर्तीही कृष्णाने अत्यंत कृपावंत होऊन केली. परंतु द्रौपदीच्या कृष्णप्रेमाची व कृष्णावरील श्रद्धेची कसोटी ही सुद्धा लागणार होतीच. कारण कृष्णाच्या मार्गदर्शनानुसार कृष्णाला अपेक्षित असे बाह्य निर्णय घेऊन त्याप्रमाणे तिलाच जीवन जगायचे होते. त्यावेळेस स्वतःच्या मनाला बाजूला करून प्रसंगी स्वतःच्या स्वभावाच्या विरूद्ध वागण्याची वेळ ही द्रौपदीवरही आली असणारच हे नक्कीच! त्यावेळेस द्रौपदीच्या मनाला क्लेशही निश्चितच झाले असणार. पण तरीही कृष्णावरील भावाचे बळ एकवटून घेऊन, द्रौपदी कृष्णाला अपेक्षित असे जीवन जगून त्याला संतुष्ट करीत राहिली हेच महत्त्वाचे. म्हणूनच द्रौपदीच्या ठायीचे ‘मी’पणही विरघळत राहिले आणि द्रौपदीही अधिकाधिक कृष्णाच्या प्रेमाने व माहात्म्याने युक्त होऊन राहिली. त्याचीच परिणती म्हणजे द्रौपदीनेही कृष्णाला स्वतःच्या अंतःकरणात कायमचे आपलेसे करून ठेवले.”



नारदाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत असताना लक्ष्मीची नजर नारदाच्या मुखावर अगदी खिळून राहिली होती. नारदाचे मुद्देसूद बोलणे श्रवण करीत असताना तर लक्ष्मीची तंद्रीच लागल्यासारखे झाले होते. नारदाचे बोलणे थांबल्यावरती नारद लक्ष्मीकडे सहेतुक नजरेने पाहत तसाच स्तब्ध बसून राहिला होता. नारदाचे शब्द ऐकू येईनासे झाल्यावरती थोड्या वेळाने लक्ष्मीची तंद्री भंग पावली आणि ती भानावर आली. तिच्याकडे टक लावून पाहणाऱ्या नारदाकडे पाहून लक्ष्मीने किंचितसे हास्य केले आणि तिने बोलावयास सुरुवात केली.


“अरे नारदा, तुझे सुस्पष्ट व तर्कशुद्ध बोलणे ऐकून माझी बुद्धी केवळ गुंग होऊन न राहता तिची जाणून घेण्याची क्षमता अधिकाधिक वाढते आणि माझ्या मनातील विचारांना योग्य ती दिशा प्राप्त होते. बुद्धीच्या पलीकडे असलेला विषय तू माझ्या बुद्धीपर्यंत निश्चितपणे आणून पोहोचवतोस आणि माझ्या मनातील भावाला अधिक पुष्ट करतोस. त्यामुळेच माझ्या मनाची अवस्थाही अधिकाधिक भावपूर्ण होत राहते आणि ते श्रवणभक्तीचा आनंद अनुभवण्यासाठी पात्र व सज्ज होऊन राहते. या भक्तिभावाचे श्रेष्ठत्वच तू पुन्हा पुन्हा सिद्ध करून दाखवतोस. शब्दाने कितीही कळले तरी शब्दज्ञान म्हणजे काही तो अनुभव नव्हे, तर त्यासाठी भक्तिभावच हवा. त्याचप्रमाणे व्यक्तिगत प्रेम म्हणून जरी कितीही असले, तरी त्यातून भक्तिभाव निर्माण झाल्याशिवाय खऱ्या आनंदाचा अनुभव येत नाही आणि भक्तिभाव म्हणजे स्वतःचे ‘मी’ पण ईश्वरी प्रेमात पूर्णपणे विरघळणे, हे तुझे प्रतिपादन अगदी यथार्थच आहे.

नारदा, या दृष्टीनेच तू रुक्मिणी व द्रौपदी यांची तुलना न करता त्यांच्यातील बाह्य फरक व वेगळेपण जे विशद करून सांगितलेस ते तर अत्यंत योग्य व समर्पक होते. त्यांच्यात बाह्य वेगळेपण जरी दिसले आणि ते तसे असलेही तरी त्यांच्याठायी निर्माण झालेला कृष्णाविषयीचा भक्तिभाव हा एकच होता आणि म्हणूनच त्यांनी कृष्णाशी साधलेले ऐक्यही एकीएकच होते. तसे ते असणारच यात कोणतीही शंकाच नाही. कारण ऐक्यत्वाचा अनुभव हा एकीएकच असतो हे तर सत्यच आहे. परंतु तरीही एक गोष्ट शिल्लक राहतेच. रुक्मिणीने कृष्णाशी साधलेले ऐक्य सिद्ध झालेले आहे आणि द्रौपदीचे कृष्णाशी ऐक्य अजून सिद्ध व्हायचे आहे आणि तेच कसे झाले हे श्रवण करण्याची माझी आतुरता तर आता अधिकच वाढून राहिलेली आहे. कारण कोणत्याही मार्गाने गेले तरी त्या मार्गात अडचणी तर येणारच ना? त्यावेळेस द्रौपदीची मनःस्थिती कशी झाली आणि तिने कृष्णावरील

प्रेमाने व श्रद्धेने परिस्थितीवर कशी मात केली हे सर्व जाणून घेण्याची माझी उत्कंठा अगदी शिगेला पोहोचलेली आहे.

अरे नारदा, पण एक गोष्ट माझ्या पूर्णपणे लक्षात आहे की मुळातच द्रौपदीचा विषय या कृष्णचरित्रात तेव्हाच आला होता जेव्हा तू उल्लेख केलास की अर्जुनाच्या जीवनात त्याची पत्नी म्हणून एक अशी व्यक्ती आधीच आली होती, की जिच्याठायी कृष्णाविषयी अतिशय श्रद्धा व प्रेम होते. म्हणजेच अर्जुन व द्रौपदी यांचाच विवाह झाला हे तर स्पष्ट आहे आणि तो विवाह कृष्णाच्या प्रेरणेने व सहकार्यानेच झाला असणार हेही नक्कीच. मग अर्जुन व द्रौपदी या उभयतांच्या मनात कृष्णाचे श्रद्धास्थान ही सामाईक गोष्ट असताना द्रौपदीला भावनिक पातळीवरती काही अडचणी येण्याची शक्यता मला तरी दिसत नाही. अर्थात् त्यांच्या बाह्य जीवनात अडचणी आल्या असणारच. मग त्यावेळची अर्जुनाची मानसिकता व द्रौपदीची मानसिकता एकच असे की वेगवेगळी असे? तसा थोडासा फरक हा असणारच ना? मग त्यामुळे थोडासा मानसिक गुंता व संघर्षही संभवतोच, हो ना? अशावेळी कृष्णाची भूमिका काय व कशी असे? नारदा, हे सर्व प्रश्न माझ्या मनात एकदम उभे राहून माझ्या मनाला थोडेसे अस्वस्थही करीत आहेत."

□□□□□



# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी



श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.

गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्‌गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्‌गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ 'हा राम माझा' २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ 'कृष्ण सखा माझा' २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ 'कृष्ण परमात्मा' २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा 'मृत्युंजय' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ 'दत्त हाचि अवधूत' २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह 'आनंदाचे डोही' २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. 'दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा' ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे 'दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा' हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान


मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाहीतुमच्या मोबाईलवर . आता हजार मराठी ईपुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा.

हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य